म. ग्रं. सं ठाणें
विषय कु प्रवास
सं. क्र ६९२

REFBK-0023202

# साम्यवादी देशांतील फेरफटका

ज. द. जोगळेकर

कल्पनेवर वास्तवतेचे नियन्त्रण घालणे आणि जग कसे असेल याचा विचार करण्याऐवजी ते कसे आहे हे पाहणे, हाच प्रवासाचा उपयोग असतो

— डॉ जॉन्सन

REFBK-0023202

राष्ट्रविचार साहित्य प्रकाशन

वितरक

उत्कर्ष बुक सर्व्हिस, पुणे ४११ ००४

© ज द जोगळेकर, १९८१

प्रथमावृत्ती मे १९८१ / चैत्र शके १९०३

पूर्वप्रसिद्धी
या पुस्तकातील पहिली सात प्रकरणे 'साम्यवादी देशातील फेरफटका' या शीर्षकानेच 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये ९ डिसेंबर १९७९ ते २७ जान्युआरी १९८० या काळात प्रसिद्ध झाली नऊ नि दहा ही प्रकरणे 'धर्मभास्कर'च्या जून नि जुलै १९८०च्या अंकात प्रसिद्ध झाली 'महाराष्ट्र टाइम्स'चे संपादक श्री गोविंदराव तळवलकर नि 'धर्मभास्कर'चे संपादक श्री अवधूत शास्त्री याचे आभार

छायाचित्रकार
३९, ५९, ८५, ८९, १०१ नि १०३ या पानांवरील चित्रे सौ शोभा जोगळेकर
पान ४९ वरील चित्र लेखक

प्रकाशन संयोजक
शरच्चंद्र बडोदेकर, सवाद, ६ सेनापती बापट सहनिवास, सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ०१६

मुद्रक
प्रकाश लक्ष्मण सातपुते, प्रकाश प्रिंटर्स, ३५७ कसबा पेठ
पुणे ४११ ०११

प्रकाशक
ज द जोगळेकर, राष्ट्रविचार साहित्य प्रकाशन, २८ दर्या महाल-ए
८० लक्ष्मीबाई जगमोहनदास मार्ग, मुंबई ४०० ००६

म. हिं. ग्रंथ संग्रहालय ठाणे
६९२
२३१४९
भू-प्रवास
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

माझ्या सासूबाई श्रीमती लक्ष्मीबाई पटवर्धन
आणि
माझे श्वशुर कै. नानासाहेब पटवर्धन
याना आदरपूर्वक अर्पण

## अनुक्रम

१ प्रयाण / १
२ सोफिया / ७
३ बेलग्रेड / १३
४ बुखारेस्ट / १९
५. बुडापेस्ट / २६
६ वॉर्सा / ३३
७. प्राग / ४२
८ झुरिक / ५३
९ लंडन (एक) / ६१
१० लंडन (दोन) / ७२
११ डब्लिन / ८३
१२ लिस्बन / ९१
१३ माद्रिद / ९९
१४ रोम / १०९
१५ अॅथेन्स / ११७

२३१६९
अ. प्रवास

# १. प्रयाण

'अरेबियन नाइट्स्' हे लहानपणातले माझे आवडते पुस्तक होते त्यातल्या सिंदबादच्या सफरी या कथा मी पुन्हा पुन्हा वाचल्या होत्या. मागच्या सफरीत बऱ्याच हालअपेष्टा होऊनही सिंदबाद नवीन सफरीवर जात असे या गोष्टीचा त्यावेळी मला मोठा अचबा वाटावयाचा नवीन जग पाहण्याच्या उत्सुकतेपोटी तो जुन्या हालअपेष्टा कशा काय विसरू शके, हे एक कोडेच वाटे पण त्याचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न मी कधीच केला नाही किंवा तो करावा असे कधी मला वाटले नाही पण,एकाएकी या गोष्टीची आठवण मला गेल्या जुलैमध्ये पूर्व युरोपच्या प्रवासात असताना झाली

खिशात छदाम नसताना युरोप पर्यटनाचा बादशाही षोक १९५२मध्ये मी केला होता त्यावेळी आलेल्या अडचणी नि पुढे भोगाव्या लागलेल्या अपेष्टा या मनात ताज्या असताना पुन्हा असा प्रवास करावयाचा नाही असे मी ठरविले होते पण काळ ही अशी गोष्ट आहे की, तो सुखाचे क्षण जसे पुसतो तसेच दुःखाचे क्षणही पुसतो त्यामुळे दोन दशकांचा काळ पाठीमागे पडल्यावर मला पुन्हा प्रवासाची सुरसुरी आली, नि १९७१मध्ये मी जवळजवळ जगाची सफर केली यावेळी पूर्वी-सारख्या विवंचना नव्हत्या पण प्रवासाची दगदग काही कमी झाली नाही किंवा अडचणी आल्या नाहीत असेही झाले नाही त्यामुळे पुन्हा अशा लाबच्या प्रवासाला जायचे नाही असा मी मनाशी निश्चय केला आता त्या गोष्टीलाही आठ वर्षे झाली होती या काळात हिंदुस्थानच्या अनेक प्रदेशात मी हिंडलो पण अशा प्रवासाचा कटाळा आला आणि पुन्हा एकदा नवीन अनोळखी प्रदेशात जावे, नवीन भूमी, नवीन चेहरे, नवीन वेष, नवीन खाद्य पदार्थ—अगदी पूर्णपणे नव्या जगाचे दर्शन घ्यावे असे वाटू लागले

मनात क्षणभर आलेला हा विचार पुढे स्थिर झाला हळूहळू तो वाढू लागला, नि त्याची बोचणी सुरू झाली पण कोणत्या प्रदेशात जावयाचे? इडोनेशिया, इडोचायना, कोरिया, वगैरे प्रदेशांकडे मन वळावयाचे एक वेळ तेथे हिंदू सस्कृतीने आपला मोठा पसारा मांडला होता पण इडोचीनमध्ये सघर्ष चालू असल्याने तिकडे जाणे जमेल असे काही दिसेना मग विचार वळला पूर्व युरोपकडे निरनिराळ्या देशांतल्या राष्ट्रवादी चळवळीविषयी मी लिहीत असल्याने तो प्रदेश स्वाभाविक मनात आला शिवाय पश्चिम युरोपमधल्या अनेक देशांत निदान एकदा तरी मी गेलो होतो. पण पूर्व युरोपांतल्या साम्यवादी देशात—युगोस्लाव्हिया वगळून—जाण्याची सधी आलीच नव्हती दुसऱ्या महायुद्धाचा इतिहास मी वाचला असल्याने पोलंड, हगेरी, युगोस्लाव्हिया वगैरे देशात ज्या भीषण लढाया, चित्त-

अद्भुत घटना, ऐतिहासिक प्रसंग घडले त्यांची मला माहिती होती म्हणून मी मनाशी निश्चय केला की, आता प्रवास करावयाचा झाला तर याच प्रदेशातून करावयाचा.

एकदा हा निर्णय झाल्यावर प्रवासाची निश्चित आखणी करणे हे पहिले काम होते कारण प्रवासाला पहिली मर्यादा होती वेळेची, दुसरी होती तिकिटाच्या पैशाची आणि तिसरी होती परदेशी चलनाची विशिष्ट मैलाच्या प्रवासाचे तिकीट काढावयाचे असल्याने आखणी करताना अडचणी येऊ लागल्या 'झेक एअरलाइन्स'ने अॅथेन्सला आल्यावर तेथून इस्तबूलला जायचे असे माझी यादी सांगत होती पण तुर्कस्थान नि ग्रीस यांचे सायप्रसवरून बिनसले असल्याने अॅथेन्सवरून इस्तंबूलला जाता येईना सोफियावरून जावे तर अतर वाढत होते. साहजिकच इस्तंबूल यादीतून उडाले शेवटी अनेक वेळा मैलाची बेरीज–वजाबाकी करून प्रवासाचा मार्ग पक्का झाला तो असा सोफिया (बल्गेरिआ), बेलग्रेड (युगोस्लाव्हिया), बुखारेस्ट (रोमानिया), बुडापेस्ट (हगेरी), वॉर्सा (पोलड), प्राग (झेकोस्लोव्हाकिया), झुरिक (स्वित्झर्लंड), लडन (इग्लड), डब्लिन, (आयर्लंड), लिस्बन (पोर्तुगाल), माद्रिद नि बार्सिलोना (स्पेन), रोम नि फ्लॉरेन्स (इटली) अॅथेन्स (ग्रीस)–मुबई

प्रवासाचा मार्ग निश्चित झाल्यावर प्रारभीच एक अडचण आली पूर्व युरोपातल्या ज्या गावांना आम्ही जाणार होतो तिथे हॉटेल बुकीगसाठी पधरा दिवस आधी टेलेक्स पाठवूनही, बेलग्रेड वगळता, आम्हाला उत्तरे आली नव्हती परदेशात हॉटेलची व्यवस्था पक्की नसताना प्रवासास जाणे हे धोक्याचे असते पण तो पत्करावयाचा असे मी ठरविले डॉ सौ शोभा जोगळेकर, त्याच्या के इ एम् मधल्या सहकारी डॉ सौ. मालिनीबाई देशमुख नि त्याचे यजमान डॉ आनदराव देशमुख (महाराष्ट्र शासनाच्या दुग्ध विकास योजनेतील एक ज्येष्ठ अधिकारी) आणि मी अशा चौघांनी हा प्रवास करावयाचा असे ठरविले पण महत्त्वाच्या कामानिमित्त डॉ देशमुख याना काही काळ पाठीमागे थाबावे लागल्याने ते पधरा दिवसानी प्रागला आम्हाला येऊन मिळाले

दिनाक ३० जुलैला रात्री बारानतर आम्ही घर सोडले अर्ध्या तासात सांताक्रुझ विमानतळ आला डॉ देशमुख आपल्या मडळीसह आधीच आले होते त्यांच्यामुळे माझ्या मुलाना आत येता आले प्रथम एअरपोर्ट टॅक्स भरला नतर डॉलर्स घेतले येथे मराठी मडळी होती त्यांच्याबरोबर प्रवासाच्या चार गप्पा मारल्या यात एक वाजून गेला मग डॉ देशमुख घरी जाण्यास निघाले, म्हणून त्याच्या पाठोपाठ आमची मुलेही गेली आता विमानतळावर आम्ही तिघेच होतो पावणे दोनच्या सुमारास सामान रवाना झाले थोड्या वेळाने कस्टम्सचे काम आटोपले परत आल्यावर त्रास नको म्हणून आम्ही पासपोर्टवर काही वस्तूची नोंद करून घेतली.

लाउजमध्ये प्रवाश्याची बरीच गर्दी होती. साडेतीन वाजले पण आमच्या विमानाचा पत्ता नव्हता चार वाजता विमानाचे उड्डाण होते साडेचार वाजता सूचना मिळाली नि आम्ही बसमध्ये बसलो विमानापाशी पोहोचून आसनस्थ होण्यात पधरा मिनिटे गेली एअर होस्टेस थोराड होत्या आसनाच्या रांगाच्या मधल्या चिंचोळ्या वाटेतून चालताना त्यांपैकी एकीच्या नितंबाचा स्पर्श खुर्च्यांना होत असे. माझ्या शेजारी जपानी दापत्य होते आणि भोवतालीही बरेच जपानी लोक होते समृद्धीमुळे जपानी लोक मोठ्या प्रमाणात प्रवास करताना दिसतात अखेरीस 'पेटी लावा'—फासन सीट बेल्ट—ही सूचना झळकली पाचच्या सुमारास विमान धावू लागले नि थोड्याच क्षणात त्याने आकाशाकडे झेप घेतली मग विमानातले दिवे मालवले गेले

पावणेसहाला पुन्हा एअर होस्टेस्‌ची गडबड सुरू झाली न्याहारीची वेळ होती मुसुबीचा रस, पाव, लोणी, चिकन, चीज असे उत्तम पदार्थ न्याहारीच्या तबकात होते पधरा मिनिटानी सूर्योदयाची चिन्हे दिसू लागली आकाश लाल निळसर झाले काही समयाने उजाडले यावेळी भोवतालचे आकाश गडद निळे होते न्याहारीनतर माझ्या शेजारी बसलेल्या बाईने मला भेट म्हणून एक जपानी नाणे दिले प्रतिभेट म्हणून तिला भारतीय नाणे देऊ लागलो तर तिने हसत नकार दिला

साडेसात वाजता विमान आबू डाबीच्या तळावर उतरले भोवताली हिरव्या रगाच्या दोन-तीन मोटरी होत्या, नि छोटी लष्करी विमाने होती शिवाय कुवेत नि एम इ ए वगैरे कपन्याची विमाने होती अर्ध्या तासाने विमान निघाले जमिनीवरच्या मशिदी, मातीची घरे मागे पडली नि समुद्र दिसू लागला तो शात होता थोडा उष्मा होऊ लागला साडेनऊ वाजता मोठी न्याहारी आली आता समुद्र मागे पडून थोडा रेताड प्रदेश दिसू लागला पाऊण तासाने प्रदेशाचे रूप पालटले, नि झाडी दिसू लागली नतर डोंगर आले त्याच्या बाजूने विमानाने उतरण्यास सुरवात केली आता सपाट भूमी आली त्यात शेती होती मग वस्ती लागली. बाराच्या सुमारास बायरूट आले लेबेनॉनच्या भूमीवर मी तिसऱ्यादा पाय ठेवत होतो आम्ही लाउजमध्ये आलो उष्मा विलक्षण होता समोर दिस-णाऱ्या डोंगरांवरची घरे उद्ध्वस्त झालेली होती सपाट भूमीवरच्या घराचीही पडझड झालेली होती लेबेनॉन मधल्या यादवी युद्धाचे हे पडसाद असावेत

अर्ध्या तासाने बायरूट सुटले आता विमान समुद्रावरून जाऊ लागले काही क्षणांनी ढगाची गर्दी होऊ लागली खाली अधूनमधून जहाज दिसे आता जमिनीचा भाग नजरेत आला तो डोंगराळ असून त्यावर कमी झाडी होती. एका डोंगरात हिरव्या छटेचे सुदर सरोवर दिसले यावेळी स्वच्छ उन्ह होते आता डोंगर मोठे झाले त्यातून जाणारे पदपथ नि नागमोडी नद्याची कोरडी पात्रे यामुळे या रुक्ष प्रदेशाला सौंदर्याची झलक आली होती काही डोंगरांवर वस्तीही दिसू लागली.

आता पुन्हा एकदा विमान समुद्रावरून जाऊ लागले जलाशयाचा रंग करडा होता क्षितिजापाशी आकाश नि समुद्र यांना भेदणारा पांढऱ्या रंगाचा एक पट्टा होता खाली समुद्रात असंख्य छोट्या होड्या प्रथम दिसल्या मग तारवे, जहाजे, मचवे आढळले काही वेळाने ते मागे पडले विमान पुन्हा जमिनीवरून जाऊ लागले पण हा प्रदेश अनेक बेटांचा असावा एका बेटाचा आकार सुसरीसारखा वाटला आता समुद्रात टँकर्स दिसू लागले पाण्याचा रंग पोपटी झाला थोड्याच समयात समुद्र मागे पडला आणि नवीन वस्त्या, नवीन रस्ते, हॉलीडे रिझॉर्टस्, तिथल्या शिडाच्या होड्या दिसू लागल्या विमान अँथेन्सला उतरले तेव्हा माझ्या घड्याळात दुपारचे दोन वीस झाले होते पण स्थानिक वेळ होती साडेअकरा

अँथेन्स ते सोफिया हा प्रवास ‘एरोफ्लोट’ या सोव्हिएट एअरलाईन्सने करावयाचा होता तेव्हा सोफियाला जाणाऱ्या विमानाची प्रथम चौकशी केली पण नीट माहिती मिळेना एका बाईने चक्क सांगितले, ‘ काही माहिती नाही ’ मी म्हणालो, ‘ आनंद आहे ’ मग थोडी पळापळ केली हवी असलेली माहिती मिळाली पण थोडे चालावे लागले पुढे बोर्डिंग पास कुठे मिळणार ते कळेना पण अखेरीस ते मिळाले दीड वाजताचे उड्डाण होते विमानात बसलो मग भोवतालच्या प्रवाश्यांकडे नजर टाकली काहींच्या हातात माळा होत्या त्यावरून मी तर्क केला की ते प्रवासी मुसलमान असून मध्य आशियाई प्रदेशातले असावे एकजण तिकडच्याच वृत्तपत्रातले कोडे सोडवत होता

दोनच्या सुमारास विमानाने अँथेन्स सोडले प्रारंभी ते समुद्रावरून गेले मग पुन्हा जमिनीवरून उडू लागले खालचा प्रदेश टेकड्यांचा होता नि त्यावर झाडी नव्हती आता एअर होस्टेस इकडून तिकडे जाऊ लागली लालबुंद गोरा रंग, थोडी स्थूल यष्टी, नि चेहऱ्याची ठेवण पाहिल्यावर आपल्याला जाणीव होते की, एक नवीन राष्ट्रीय रूप आपण न्याहाळत आहोत तिने सर्वांना मुसुंब्याचा रस दिला आणि कोणीतरी अधिक मागितला तेव्हा तिने हातातला मोठा चषक फक्त उलटा करून रिता झालेला दाखविला

आकाश निरभ्र होते खालच्या भू-प्रदेशात काही जागी हिरवळ दिसू लागली सोफिया जसे जवळ येऊ लागले तसे डोंगरांच्या माळा दिसू लागल्या. काही डोंगरावरील झाडी दाट होती नेहमीप्रमाणे डोंगरांत पायवाटा, ओहोळ, नदीची छोटी-मोठी पात्रे यांचे सम्यक चित्र दिसत होते चाळीस मिनिटांचा प्रवास झाला नि विमान उंची सोडू लागले खाली लोहमार्ग, मोठे सरोवर, विस्तीर्ण हिरवी शेती, रस्त्यावरून धावणाऱ्या मोटरी, छोटी गावे, मधूनच लागणारे कालवे ही चित्रे डोळ्यासमोरून जात होती त्यांची नोंद घेत आहे तोच सोफिया आल्याचे सांगण्यात आले

विमानातून बाहेर पडलेले प्रवासी पाच-सहा होते तपासणीसाठी दोन अधिकारी होते. त्यांनी फॉर्म दिले ते कसे भरायचे ते समजेना मग कसे तरी ते

भरले नि अधिकाऱ्याच्या हातात दिले. त्याने ते बाजूला ठेवले नि आत जाण्यास हाताने खुणविले थोड्याच वेळात सामान आले पाच-सहा जणाचे सामान किती असणार ? माझ्या प्रथम लक्षात आले ते म्हणजे माझी मोठी बॅग त्याच्यात नाही मी पळत पोर्टरकडे जाऊन बॅग आली नाही असे म्हणालो त्याला इग्रजीचा गंध नव्हता सामानाकडे बोट दाखवून तो म्हणाला, 'बगाज' म्हणजे जे सामान आहे ते हे मी म्हणालो, 'माय बगाज नो ' खादे उडवून तो दूर निघून गेला मग तक्रार करायला गेलो तिथल्या बाईला माझे म्हणणे समजेना एवढ्यात इग्रजीचे बेताचे ज्ञान असलेला एक अधिकारी आला मी त्याला म्हणालो की, विमान अजून आहे तुम्ही पुन्हा तपास करा तो म्हणाला, 'सोफियाचे सामान उतरले आहे तुमची बॅग नसल्यास हा फॉर्म भरा ' तिथे वाद कोणाशी घालणार ? माझ्यासारखेच आणखी दोघे होते सामान गेल्याची त्याचीही तक्रार होती फक्त त्यांचे सामान चार-पाच दिवसांपूर्वी गायब झाले होते आम्ही त्याच्या रांगेत जाऊन बसलो

त्या बॅगेत माझे कपडे, कागदपत्रे, दाढीचे सामान, टूथब्रश नि पेस्ट असे सर्व सामान होते त्या क्षणाला माझ्याजवळ अगावरच्या कपड्याशिवाय काही नव्हते. प्रवासाच्या पहिल्याच दिवशी असा प्रसग यावा याने काही क्षण अस्वस्थ झालो पण १९५३ मध्ये लंडन-इस्तबूल-बगदाद-बसरा हा तीन महिन्यांचा प्रवास एक–दोन कपड्यातच केला होता, त्याची आठवण केली आणि माझ्यापुरते बॅगचे प्रकरण मी मनातून काढून टाकले एकापरी ते बरे झाले कारण त्यामुळे पुढील अडचणीना तोंड द्यावयास मन शाबूत राहिले

तक्रार कार्यालयातून बाहेर पडल्यावर हॉटेलची चौकशी करण्यास गेलो तिथल्या बाईने विचारले, 'तुमचे हॉटेल बुकिंग आहे का ?' आमचे उत्तर नकारार्थी होते ती म्हणाली, 'येथे दोन प्रकारची राहण्याची सोय आहे ' 'डिलक्स हॉटेल' किंवा 'प्रायव्हेट लॉज ' डॉलर्सची टचाई असल्याने आम्ही, प्रायव्हेट लॉज हवा, असे सांगितले त्यावर तिने पृच्छा केली, 'किती दिवस राहणार ?' 'आम्ही तीन तारखेला जाणार' असे सांगितले ती काय समजली कोणास ठाऊक । दिवसाचे दहा डॉलर्स याप्रमाणे तीन दिवसांचे प्रत्येकी तीस डॉलर्स मोडण्यास सांगितले ते काम सपल्यावर आम्ही विचारले, 'राहण्याची व्यवस्था कुठे ?' ती म्हणाली, 'टॅक्सीने गावातल्या बाल्कन टुरिस्टवर जा तिथे व्यवस्था होईल ' टॅक्सीला किती पैसे पडतील या पृच्छेला तिचे उत्तर होते, 'तीन-चार लेव्हा द्या पाच खूप झाले '

टॅक्सीने बाल्कन टुरिस्टवर आलो प्रायव्हेट लॉजचा पत्ता पाच मिनिटांत मिळेल अशा समजुतीने आम्ही टॅक्सीवाल्याला थाबण्यास सांगितले. पण त्याने नकार दिला त्याला येथील अनुभव जास्त होता तेव्हा शब्द न वाढवता मध्यम मार्ग हा कमी उपद्रवी असतो असे म्हणत ड्रायव्हरला चार लेव्हा दिले यावर तो सतुष्टपणे गेला

बाल्कन टुरिस्टचे कार्यालय रस्त्यालगत तळमजल्यावरच आहे तिथे उभे राहण्याला जागा नव्हती राग दिसत होती पण ती अधूनमधून मोडलीही जात होती बाहेर प्रवाश्यांची गर्दी होती. त्यात अरब होते, तुर्क होते, निग्रो होते, त्याच-प्रमाणे पूर्व नि पश्चिम युरोपमधून पाठीला रकसॅक लावून, प्रवासाला आलेली मुले-मुलीही होत्या त्यातून आमचा क्रमाक यायला दोन तास लागले तिथे आम्हाला राहण्यासाठीचे एक व्हाउचर नि अन्नोदकासाठीची कुपने देण्यात आली ही कुपने कुठल्याही बाल्कन टुरिस्टच्या हॉटेलात चालत, आम्ही त्याचा उपयोग ग्रँड हॉटेल-ऐवजी टुरिस्ट ऑफिसजवळच्या एका बोळातील इराण्याच्या रेस्टॉरंटसारख्या एका हॉटेलात केला व्हाउचरवर घराचा पत्ता होता तिथे ६ क्रमांकाची ट्रॅम जात होती. पण पुढे चालावे लागणार होते. शिवाय घर शोधावे लागणार होते म्हणून टॅक्सीनेच जायचे ठरविले

पण बराच वेळ टॅक्सी थांबेना एक थाबली पत्ता पाहून ड्रायव्हर न थांबताच निघून गेला यात तास गेला मग ज्या भागात जायचे होते तिकडे जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूकडे सामान हलवून टॅक्सीची वाट पाहत उभे राहिलो अखेरीस एक थांबली ड्रायव्हर म्हणाला, 'पाच डॉलर्स घेईन' असे डॉलर्स देणे गुन्हा होता तेव्हा त्याला दुप्पट लेव्हा दे ो असे सांगितले तो काय समजला कोणास ठाऊक ! पण निरनिराळ्या रस्त्याने, बारीक बोळातून त्याने आम्हाला योग्य घराशी आणून सोडले

सामान घेऊन वर आलो घरात एक तरुण होता त्याने व्हाउचर पाहून आम्हाला जागा दाखविली एका खोलीत दोन पलंग होते एकात एक तिथे बॅगा ठेवल्या मग चहा घेतला, आणि गावाची ढोबळ कल्पना घेण्यासाठी बाहेर पडलो साम्यवादी देशासबधी आपल्या काही कल्पना असतात पण आम्हाला पोलिसाची वर्दळ दिसलीच नाही बहुतेक घरांसमोर मोटरी होत्या त्यावरून मध्यम नि वरचा वर्ग सुखवस्तू झाल्याचे दिसत होते लोकाचे कपडेही छानछोकीचे होते आम्ही राहात होतो ते घर मध्यम वस्तीतले होते आणि दादर हिंदू कॉलनीची चटकन आठवण यावी असा भोवतालचा आसमत होता दुकानात मास, पाव, चीज, वगैरे पदार्थ होते भाज्या नि फळे ठराविकच दिसली कलिंगडाचा उठाव फार दिसला घराकडे परतणाऱ्या बहुतेक लोकांच्या हातात कलिंगड दिसायचे रात्रीच्या फराळा-साठी आम्ही काकडी नि पाव घेतला जॅम आमच्याकडे होताच

# २. सोफिया

सोफिया ही बल्गेरिआची राजधानी  तसे हे प्राचीन नगर आहे  रोमन सम्राट ट्राजन याने सैनिक केंद्र म्हणून या गावाची स्थापना केली  तिसऱ्या नि चौथ्या शतकात ते भरभराटीला आले  पुढे हुणानी त्याला बेचिराख केले  क्रुम या बल्गेरिअन राजाने इ. स ८०९मध्ये  हे गाव जिंकल्यावर त्याला महत्त्व प्राप्त झाले पुढील काळात गावाचे नाव बदलत राहिले  अखेरीस चौदाव्या शतकात गावातल्या सेंट सोफिया या चर्चवरून त्याला सोफिया हे नाव पडले  ते आजतागायत चालू आहे  सन १३८२ मध्ये तुर्कांनी बल्गेरिआ जिंकला नि या गावात तुर्की गव्हर्नर जनरल राहण्यास आला  सन १८७७ मध्ये रूसो-तुर्की युद्धाच्या अताला बल्गेरिआ स्वतत्र झाला  इस्तबूल, बेलग्रेड, मॅसिडोनिया, डॅन्यूब इकडे जाणारे सर्व मार्ग या गावातून जात असल्याने स्वतत्र बल्गेरिआने सोफियाची राजधानी म्हणून निवड केली

दुसऱ्या महायुद्धानतर पूर्व युरोपातील इतर देशांप्रमाणे बल्गेरिआतही साम्यवादी राजवट सुरू झाली  साम्यवादी राजवटीत व्यक्तिस्वातत्र्याचा सकोच होतो हे जरी खरे असले तरी त्या राजवटीचे सर्वसामान्य माणसाला काही फायदेही निश्चित मिळतात  तसे फायदे बल्गेरिअन जनतेला मिळाले आहेत  शिक्षण विनाशुल्क असून वय वर्षे ७ ते १६ पर्यंत ते सक्तीचे आहे  वैद्यकीय सेवाही विनामूल्य आहे  कल्याणकारी राज्य असल्याने निवृत्तीवेतन, आजारपणातील वेतन, कुटुब भत्ता, वगैरे बल्गेरिअन नागरिकाला मिळतात

बल्गेरिअन लोक ईस्टर्न ऑर्थोडॉक्स चर्च मानतात  देशात धार्मिक स्वातत्र्य आहे  मात्र या स्वातत्र्याचा उपयोग शासनाविरुद्ध करण्यास मनाई आहे  साप्रदायिक शाळा (थिऑलॉजिकल सेमिनारीज) चालवण्यास चर्चला परवानगी आहे  मात्र त्याला इतर शाळा चालविता येत नाहीत  चर्चला लागणाऱ्या वार्षिक खर्चातील सतरा टक्के खर्च त्याला शासनाकडून मिळतो  तसेच त्याच्या अधिकाऱ्यांच्या नेमणुकांना शासनाची मजुरी लागते  या गोष्टी लक्षात ठेवायला हरकत नाही नव्वद टक्के लोक बल्गेरिअन आहेत  तुर्की लोक अल्पसंख्य आहेत  आणि त्याची अधूनमधून तुर्कस्थानाकडे रवानगी झाली आहे, तसेच त्यानी देशातर केले आहे

सोफिया गावाच्या युरोपीकरणाला सुमारे शभर वर्षांपूर्वी म्हणजे सन १८८०-पासून सुरवात झाली  त्याचे दृश्य चित्र गावातले विशाल पथ, उद्याने, त्यांतील पुतळे, रस्त्याच्या मध्यभागातून जाणारी ट्रॅम, लोकांचा वेष यावरून दिसते  आदल्या दिवशी टॅक्सीसाठी आम्हाला जरा जादा द्रव्य खर्च करावे लागले होते  म्हणून बाल्कन टुरिस्टकडे जाण्यासाठी कमी खर्चाचे वाहन घ्यायचे ठरविले  तिकडे कोणती ट्रॅम जाते याची कल्पना होती  सकाळी आठच्या सुमारास आम्ही ट्रॅम पकडली

आत शिरलो पण कंडक्टर दिसेना आमची गोंधळलेली स्थिती पाहून इंग्रजीचा थोडा गंध असलेल्या एका व्यक्तीने आम्हाला दुरून वृत्तपत्राचा 'किऑस्क' दाखविला नि तिकिटे तिथे मिळतील असे सांगितले थांबा येताच आम्ही लगबगीने उतरलो कारण विनातिकीट प्रवासाचा उपद्रव कसा असतो, याची मला मुंबईतील 'बेस्ट'चा जनता संपर्काधिकारी म्हणून अनेक वर्षे काम केल्याने कल्पना होती 'किऑस्क'कडे जाऊन येता-जाताची तिकीटे काढली पूर्व युरोपमधल्या प्रवासात हा धडा कायम ध्यानात ठेवला होता

आपण गावाच्या मध्य भागाकडे येतो तसे सोफियाचे नगरसौंदर्य आपल्याला जाणवते रस्त्याच्या दोन्ही बाजूना उत्तम दुकाने आहेत मधूनच मोठी उद्याने लागतात सिटी सेंटर हे तर डोळ्यात भरते या भागातच सर्व महत्त्वाची स्थाने नि स्मारके आहेत पण या भागावर स्वतःचे वजन नि छाप टाकणारी इमारत म्हणजे साम्यवादी पक्षाचे कार्यालय त्याचा उंचच उंच असणारा लाल तारा साम्यवादी शासनाचा घोष करतो (वेष्टनावरील चित्र पहा) तुर्कस्थानची इस्लामी राजवट गावावर सुमारे पाचशे वर्षे चालल्याने तिथे मशिदी नसतील असे कसे होईल ? बायनाबाशी मशिद ही तशी छोटी आहे तिचा उपयोग होतो की नाही हे मला सांगता येणार नाही कारण तिथे कोणालाच मी पाहिले नाही बुयुक जामिया ही मोठी मशिद आहे मात्र तिचे रूपांतर आर्किऑलॉजिकल म्युझिअममध्ये झाले आहे आम्ही गेलो त्या दिवशी ती बंद होती इथला पॅट्रिआर्च कुठे राहतो, सेमिनारीजना सरकारी द्रव्यसहाय्य कसे मिळते हे गाईड सांगत असताना मी तिला विचारले, 'इस्लामी धार्मिक शाळाना आर्थिक मदत मिळते का ?' आमचा देश ख्रिश्चन आहे,' माझ्या नजरेला तटस्थ नजर देत ती मला म्हणाली सेंट सोफिया हे सर्वांत जुने चर्च तुर्की राजवटीत त्याची मशीद झाली होती त्यातल्या 'फ्रेस्को'ची ख्याती आहे

रोमन लोकांनी गावाची स्थापना केली असल्याने प्राचीन अवशेष येथे दिसतात बायना मशिदीजवळ रोमन बाथ आहे तसेच सेंट जॉर्ज चर्चच्या भोवतालीही उत्खनन केलेले अवशेष आहेत पादचाऱ्यासाठी एक भुयारी पथ खोदताना रोमन अवशेष मिळाले तेव्हा त्यांना बगल देऊन रस्ता पुढे नेण्यात आला आणि त्या अवशेषांचे तिथेच छोटे प्रदर्शन करण्यात आले

डिमिट्राव्ह हा बल्गेरिअन साम्यवादी नेता होता १९३३ मध्ये नाझी राजवटीत 'राइशटॅग फायर' नावाचा प्रसंग घडला त्या संबंधात खटला होऊन त्यात डिमिट्राव्हला गुन्हेगार म्हणून गोवण्यात आले उलट-तपासणीत त्याने गोअरिंगची भंबेरी उडविली होती त्याचे वर्णन गंथरच्या 'इनसाइड युरोप'मध्ये आहे. डिमिट्राव्ह अखेरीस सुटला. या डिमिट्राव्हचा मॉसलिअम आहे. आणि तो राजवाड्यासमोर आहे क्रेमलिनमध्ये लेनिनचे शव काचेच्या पेटीत ठेवलेले आहे, तसेच डिमिट्राव्हचे

शव ठेवलेले आहे त्याला तसे ठेवण्यात आल्यावर एका विदेशी साप्ताहिकाने लिहिल्याचे मला स्मरते की, लेनिनप्रमाणे डिमित्राव्हला 'सेमी परमनंट' करण्यात आले आहे! लेनिनच्या शवाविषयी गथरने एक विनोद दिला आहे तो साम्यवादाच्या विरुद्ध आहे लेनिनचे शव पाहून आल्यावर एका शेतकऱ्याला त्याचा मित्र विचारतो, 'लेनिन कसा दिसला?' शेतकरी म्हणतो, 'आपल्याचसारखा मेलेला पण पुरलेला नाही' बर्नार्ड न्यूमन आपल्या 'बल्गेरिअन बॅकग्राउंड' या प्रवासवर्णनात लिहितात की, ते गेले तेव्हा डिमित्राव्हच्या मॉसलिअममध्ये जाण्यासाठी लोकांची रांग नव्हती, आणि त्याना डिमित्राव्हच्या चेहऱ्यावर धैर्याची झाक तसेच कठोरता आढळली मात्र आम्हाला येथे रांगेत उभे राहावे लागले आणि आत गेल्यावर डिमित्राव्ह शांतपणे झोपलेला आहे असे त्याच्या चेहऱ्याकडे पाहिल्यावर मला वाटले येथे मॉसलिअमसमोर प्रवाश्याची छायाचित्रे घेणारे धंदेवाईक छायाचित्रकार असतात त्यापैकी एकाने मला छायाचित्राविषयी विचारले. मी नकार दिल्यावर तो मला म्हणाला की, मी हिंदी चित्रपट पाहिले आहेत

डिमित्राव्ह मॉसलिअमच्या समोरच्या राजवाड्याची उभारणी १८८०–८२ मध्ये प्रिन्स अॅलेक्झांडरने केली आता तिथे म्युझिअम आहे त्यात बल्गेरिअन नवकलाकाराची चित्रे आहेत त्याचे एक छोटे पुस्तक मिळाले पण त्यातली माहिती इंग्रजीत नव्हती सोफियातली भव्य अशी वास्तू म्हणजे अॅलेक्झांडर नेव्हेस्की चर्च तुर्की साम्राज्यापासून बल्गेरिआला स्वतंत्र करण्यासाठी ज्या रशियन सैनिकानी १८७८ मध्ये रणांगणावर देह ठेवला त्यांच्या स्मरणार्थ हे चर्च उभे करण्यात आले आहे त्याच्या आतली रशियन चित्रकाराची चित्रे लक्षणीय आहेत

सोफियातल्या डिपार्टमेंट स्टोअरचा उल्लेख आवश्यक आहे कारण त्यावरून निदान या गावातल्या समृद्धीची कल्पना येते त्याची इमारत तीन–चार मजली असून त्यात अनेक प्रकारच्या वस्तू मिळतात येथे हव्या असणाऱ्या वस्तूचे पैसे प्रथम भरून मग मिळालेली छोटी पावती परत काउंटरकडे आणून तिथल्या बाईला दिली म्हणजे ती वस्तू आपल्या हातात पडते माझ्या बॅगचा पत्ता दोन दिवसांनतरही न लागल्याने टूथब्रश, रेझर, शर्ट अशा वस्तू घेणे आवश्यक झाले होते. लहान दुकानातून काही वस्तू बोटाने दाखवून विकत घेतल्या टूथपेस्ट नि शेव्हिंग क्रीम डिपार्टमेंट स्टोअरमधून विकत घेतल्या आम्हाला काय हवे आहे ते समजण्याला नि शेव्हिंग क्रीम हातात पडण्यास अर्धा तास लागला नि दोनदा एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर फेऱ्या माराव्या लागल्या

सोफियात येणारे प्रवासी–त्यात पूर्व युरोपातले अधिक असतात–हे बहुसंख्येने ब्लॅक सी रिझॉर्टस्‌कडे जातात बाकीचे बरेचजण 'रिला मॉनस्ट्रीला भेट देतात रिला मॉनस्ट्रीविषयी मी वाचले होते साहजिकच आम्ही तिकडे जाण्याचे ठरविले रिला मॉनस्ट्रीला बल्गेरिअन इतिहासात अतुलनीय स्थान आहे बल्गेरिअन

राष्ट्रीयत्व, बल्गेरिअन संस्कृती, बल्गेरिअन कला नि भाषा याची गेली सहस्र वर्षं तिथे जपणूक झालेली आहे

सेंट जॉन या नावाचा एक साधू होता चर्च नि शासन यांच्या जुलमी पद्धतीला कटाळून रिला पर्वतश्रेणीच्या आसमतात तो वास्तव्यासाठी आला पुढे त्याची विद्वत्ता, सदाचार याची कीर्ती हळूहळू पसरून त्याच्याभोवती शिष्यगण जमा झाला मग हे स्थान ज्ञानाच्या उपासनेचे केंद्र होऊन तिथे मॉनस्ट्री उभी झाली सन ९४६मध्ये जॉनचा मृत्यू झाला आणि त्याला सतपदाची प्राप्ती होऊन त्याचे अवशेष दर्शनासाठी निरनिराळ्या गावांत नेण्यात येऊ लागले चौदाव्या शतकापासून मॉनस्ट्रीची आर्थिक स्थिती चागली सुधारली बल्गेरिअन राजे नि सरदार यानी तिला विपुल आर्थिक सहाय्य तसेच भूमिदान केले आहे त्यामुळे येथील ज्ञानाच्या पणतीचा मोठा दीप झाला

बल्गेरिआवर तुर्कांच्या स्वाऱ्या सुरू झाल्यावरही मॉनस्ट्रीला उपद्रव झाला नाही याचे कारण स्वाऱ्याच्या मार्गापासून ती बरीच दूर होती पुढे तुर्कांनी आधीच्या राजानी दिलेल्या सनदा कायम केल्या यासबधीचे दुसरा महमद याचे फर्मान तिथे भिंतीवर लावलेले आहे तरीही नतरच्या काळात लुटारू टोळ्याचा तिला उपसर्ग झाला पण अशा अडचणींवर मात करून ज्ञानाच्या नि सस्कृतीच्या रक्षणाचे कार्य तिथे उत्तम प्रकारे चालले, नि मॉनस्ट्रीचा विकासही झाला

सन १८३३ मध्ये मोठी आग लागून या वास्तूचा मोठा भाग भस्मसात झाला. पण लोकाच्या राष्ट्रीय आकाक्षेचे ते एकमेव केंद्र असल्याने मॉनस्ट्रीच्या उभारणीसाठी गावातले नि भोवतालच्या प्रदेशातले श्रेष्ठ वास्तुशिल्पी येथे येऊन दाखल झाले. त्यांनी वास्तू पुन्हा बाधली चित्रकारांनी चित्रे रगविली, मूर्तिकारानी मूर्ती (इकॉन्स) तयार केल्या अशा प्रकारे मॉनस्ट्री पूर्वीसारखी उभी झाली बल्गेरिअन राष्ट्रीय जीवनात तिला अनन्यसाधारण स्थान असल्याने १९६१मध्ये साम्यवादी शासनाने एक आदेश काढून ही वास्तू सस्कृतीचे स्मारक नि राष्ट्रीय सग्रहालय आहे असे उद्‌घोषिले

रिला मॉनस्ट्री सोफियाच्या दक्षिणेला १२५ किलोमिटरावर असून रिला पर्वतश्रेणीत ती उभी आहे सकाळी साडेआठ वाजता तिकडे जाण्यास आम्ही निघालो मार्गावर जुनी घरे आणि नवीन उच्च इमारती दिसत होत्या डोगराची राग थोड्याच वेळात दिसू लागली त्यांच्या खोऱ्यातली छोटी घरे नेपाळच्या प्रवासाची आठवण देत होती दूरवर दाट झाडी होती हिरवी शेते नि हिरवी कुरणे यामुळे त्याच रगाचा एक गालीचा भोवताली पसरलेला आहे असे वाटे

दहाच्या सुमारास उन्ह जाणवू लागले वाटेत मोटरी नि ट्रक लागले, तसेच थोड्या घोड्याच्या गाड्या, तसेच गाढवाचे कळप लागले बल्गेरिअन जीवनात वाहन म्हणून या प्राण्यांना अजून स्थान आहे यावरून यात्रिकीकरणाच्या टप्प्याची

आपण कल्पना करू शकतो शेती प्रामुख्याने होती ती गहू, तबाखू याची. शिवाय द्राक्षाचे मळेही खूप होते काही घरालगत होते आता रस्ता डोंगराळ झाला. वाटेत एक नदी लागली मग हवा थंड झाली रस्त्यावर सावली मिळावी इतकी काही ठिकाणी झाडी दाट होती

अकरा वाजता मॉनस्ट्रीच्या दाराशी येऊन थांबलो. तिच्या भोवती चढते डोंगर असून त्यावर दाट झाडी आहे पाठीमागे नदी वाहत असून तिच्या प्रवाहाचा मोठा आवाज घुमत होता डोंगरात लोकाची वस्ती आहे मॉनस्ट्रीभोवती एक सरक्षण कोट आहे कोटाचे प्रवेशद्वार मोठे असून त्याच्यावरच्या भागाला एक मुरल पेंटिंग आहे आत चार मजली इमारत आहे आणि तिच्या भितीवरच्या पांढऱ्या रगावर लाल नि काळे पट्टे आहेत

इग्रजी भाषिकासाठी एक स्वतत्र गाईड होता मोठा रुबाबदार नि अद्ययावत कपड्यातला त्याने आम्हाला प्रथम म्युझिअम दाखविला त्यातल्या किती वस्तूचे वर्णन करणार ! मॉनस्ट्रीचा सगळा व्यवहार कसा चालावा हे सागणारे पहिले पुस्तक इथे आहे, पधराव्या शतकातले सेंट जॉनचे चरित्र आहे प्राचीन पुस्तके आहेत, १०४ शिक्के आहेत, तांब्याची नि सोन्याची नाणी आहेत, निरनिराळ्या चर्चची चित्रे आहेत, हिरे आहेत, माणके आहेत, अरबी भाषेतील फर्माने आहेत, सुलतान महमदाने दिलेली मेणबत्ती आहे, रशियाच्या इव्हान द टेरिबलने भेट दिलेल्या किंमती वस्तू आहेत, छपाईचे यत्र आहे, पृथ्वीचा गोल आहे, गमत म्हणजे सन १८३३ ते १८८१ पर्यंतचा दैनंदिन खर्चाचा हिशेब दाखविणारी गलेलठ्ठ चोपडीही आहे रॅफेल क्रॉस नावाची कृती आहे त्यात ६०० व्यक्तिरेखा कोरलेल्या आहेत रॅफेल या साधूने हे काम सुईच्या सहाय्याने बारा वर्षे केले शेवटी तो अंध झाला एक तिजोरी असून ती उघडण्यासाठी पाच किल्ल्या लागतात, नि त्या पाच भिन्न व्यक्तीकडे असतात ! द्रव्याचा अपहार थाबविण्यासाठी मॉनस्ट्रीतही अशी उपाययोजना करावी लागावी यावरून मनुष्याच्या स्खलनशील स्वभावाची कल्पना येते

मध्यभागी चर्च आहे त्याला पाच घुमट आहेत एक क्रॉस दिसावा अशी त्या घुमटांची रचना केलेली आहे त्याच्या आतल्या नि बाहेरच्या भितीवरची साप्रदायिक कथा सागणारी चित्रे छान आहेत तसेच छतावरचे 'फ्रेस्को' लक्षणीय आहेत गाभाऱ्यात त्या सताच्या अवशेषाचे, पेटी उघडून दर्शन देण्यात येत होते. कुतुहलाचे पोटी आम्ही घेतले त्यासाठी दानपत्रात थोडे द्रव्य सोडावे लागले सताच्या अवशेषाच्या सबधात न्यूमनने आपल्या ग्रथात एक गोष्ट दिली आहे अवशेषाच्या चमत्काराच्या कथा ऐकल्यावर तुर्की सुलतान मुराद याने त्याना कॉन्स्टंटिनोपलला नेले परतु त्याची पट्टराणी बल्गेरिअन राजकन्या होती तिने त्याचे मन वळविले आणि हे अवशेष मॉनस्ट्रीकडे परत आले येथील स्वयपाकघर

कायम लक्षात राहील चार बैल मारून त्याना एकावेळी शिजवता येईल इतकी मोठी भांडी त्यात होती

मॉनस्ट्रीचा इतिहास कथन केल्यानतर म्युझिअममधून बाहेर पडताना आमचा गाईड म्हणाला, 'ही प्राचीन धार्मिक वास्तू आपण पाहिलीत आपल्याला सतोष झाला असेल असे मला वाटते हल्ली देशात धर्मविरोधी प्रचार होत आहे पण अनेकाना असे वाटते की, स्वत पुरता एखादा तरी सप्रदाय असावा ' 'तुम्हाला तसे वाटले का ?' अशी मी पृच्छा केली यावर तो फक्त हसला

दोननतर वाटेत एका हॉटेलात भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती पण मॉनस्ट्रीत पाहिलेल्या नि ऐकलेल्या गोष्टींचा इतका परिणाम झाला होता की, जेवताना नि परतीच्या मार्गावर असताना मी अंतर्मुख नि अबोल झालो होतो बल्गेरिअन राष्ट्रीयत्वाच्या या प्रेरणा केंद्राने मला इतके विस्मित केले होते

घरी परत आल्यावर एक गमतीचा पण थोडा हबकवणारा प्रसग घडला तो असा चहा पीत असताना घरधनी आला पाच-दहा इग्रजी शब्द नि हातवारे यावर सभाषण चालले होते शेवटी परवाच्या दिवशी सकाळी आम्हाला टॅक्सी लागेल असे मी सागितले तेव्हा तो म्हणाला, 'परवा कसे ? नो स्लीप टुमारो ' त्याने व्हाउचर आणले आम्ही तीन तारीख म्हणत होतो, तो तीन दिवस म्हणत होता मग एकदम माझ्या ध्यानात आले मी त्याला सागितले, 'उद्याचे व्हाउचर सकाळीच आणून देतो ' दुसऱ्या दिवशी सकाळी ते मिळेपर्यंत छातीत धडधडत होते न जाणो आमची हल्लीची जागा दुसऱ्याला देऊन आम्हाला एक दिवसासाठी नवीन जागी पाठविले तर ? पहिल्या दिवशीचा अनुभव ताजा होता चवथ्या दिवसाचे पैसे भरल्याचा कागद घरधनिणीला दिल्यामुळे सर्व सुरळीत झाले रात्री तिने टॅक्सी स्टँडवर दूरध्वनी करून पहाटेला टॅक्सी बोलावली

●

# ३. बेलग्रेड

टॅक्सी निघत असल्याचा दूरध्वनी सहाच्या सुमारास आला आम्ही तत्पूर्वीच तयार होतो सामान घेऊन खाली आलो त्या आधीच टॅक्सी आलेली होती दोन-तीन मिनिटांचा उशीर झाला म्हणून टॅक्सीवाला कुरबुरला, पण प्रवासात अशा तक्रारी मनावर घ्यायच्या नसतात सामान टॅक्सीत ठेवले नि निघालो रस्त्यावर रहदारी जवळजवळ नव्हती पधरा वीस मिनिटात विमानतळ आला पैसे देण्याच्या वेळेला ड्रायव्हरने आम्हाला विचारले, 'डॉलर्स आहेत का ?' न बोलता त्याच्या हातावर लेव्हा ठेवले नि सामान उचलून आत गेलो अजून उजाडलेले नव्हते सर्वच शात होते लाउज छोटा होता त्यात बसण्यासाठी कोच वगैरे ठेवलेले होते बॅगा किंवा रकसॅक डोक्यांखाली घेऊन त्यावर काही प्रवासी मडळी झोपली होती अजून माझ्या बॅगचा पत्ता लागलेला नव्हता तेव्हा चौकशीसाठी दोन चार जागी हिंडलो पण बहुतेक ठिकाणी दारे बद होती सात वाजल्यानतर एक एक कार्यालय उघडू लागले, म्हणजे दरवाजा उघडून महाशय गायब व्हायचे आता लोक रागा लावू लागले कोणती राग कशासाठी हे कोणीच सांगू शकेना आम्ही काही वेळ त्यात उभे राहिलो मग जाटचे–युगोस्लाव्ह एअरलाइन्स–कार्यालय उघडले त्याच्याच विमानाने आम्ही सोफिया ते बेलग्रेड हा प्रवास करणार होतो तिथल्या माणसाला बॅगचा तपास लागल्यास बेलग्रेडला कळवा असा निरोप ठेवून सामान रवाना केले अजून थोडे बल्गेरिअन चलन आमच्याकडे राहिले होते ते काही परत घेतले जाणार नव्हते तेव्हा सिगरेट, चॉकलेट खरेदी करण्यात ते वापरले

बेलग्रेड हा प्रवासाचा दुसरा टप्पा होता तिकडे जाणारे विमान मोठे नि छान होते पण प्रवासी जेमतेम पन्नासही नसावे उड्डाण चाळीस मिनिटांचे होते आठ-नतर विमान प्रवास सुरू झाला प्रवासाचा मार्ग बराचसा डोंगराळ प्रदेशावरून होता अशा प्रदेशाच्या आश्रयानेच टिटो नि त्याचे गनिमी सैनिक जर्मनाशी लढू शकले आता विमान धुक्यातून जाऊ लागले तरीपण खालचा प्रदेश अस्पष्टपणे दिसत होता अर्धा तास प्रवास झाल्यानतर धुके गेले नि खाली छोटी छोटी गावे दिसू लागली मग एक मोठे गाव दृष्टिपथात आले आता भूमीचा रूक्षपणा जाऊन ती हिरव्या शालूने लपेटलेली आहे असे वाटू लागले बेलग्रेड जसे जवळ आले तसे सुदर उपनगरे खाली दिसू लागली एक आगगाडी जाताना दिसली महामार्गावर मोटरी पळताना दिसल्या पण एकदर वर्दळ कमीच वाटली त्याचे मला जरा आश्चर्य वाटले विमान भूमीवर टेकले तेव्हा माझ्या घडळ्यात आठ–चाळीस झाले होते पण बाहेर आल्यावर बेलग्रेड विमानतळावरच्या घड्याळातील काटे सहा–चाळीसवर असल्याचे मला दिसले

सामान घेऊन बाहेर आल्यावर स्थानिक चलन घेणे, वाहनाची चौकशी करणे, इत्यादी गोष्टींची कसरत सुरू झाली मात्र एका गोष्टीची चिंता नव्हती हॉटेल बुकिंग पूर्वीच झालेले होते तेथे कसे जायचे एवढाच प्रश्न होता चौकशीत समजले की, आमचे बाल्कन हॉटेल एअर टर्मिनलपासून दहा मिनिटाच्या रस्त्यावर आहे तेव्हा बसने एअर टर्मिनलकडे येण्यास निघालो प्रथम बस रेल्वे स्थानकाकडे आली. येथे काही प्रवासी उतरले १९५३मध्ये बेलग्रेडला मी आगगाडीने आलो होतो त्यावेळी दिसलेल्या चित्राचे मी पुढील शब्दात वर्णन केले होते 'स्थानकाच्या बाहेर जाण्याच्या दरवाज्यावर ओंगळ कपड्यातला तिकिट-तपासनीस होता बाहेर पडतो तो टांगेवाल्यानी गर्दी केली हमाल माझ्या दाढीवरून मला विचारू लागले की, मी तुर्की का अरबी ?' आता हे चित्र साफ पालटलेले दिसले स्थानकाबाहेरच्या लोकाचे कपडे चांगले होते तिथे मोटरीची वर्दळ होती

एअर टर्मिनलवर इंग्रजी बोलणारे प्रथम कोणी आढळेना दहा-पाच मिनिटे इकडे तिकडे हिंडल्यावर माहिती केंद्र सापडले तिथल्या मुलीने हॉटेलकडे कसे चालत जायचे याचे दिशादर्शन केले हॉटेल बाल्कन हॉटेल मॉस्कोव्हाच्या जवळच आहे असे ती म्हणाली पण हॉटेल मॉस्कोव्हा कुठे, हा प्रश्न आमच्यासारख्या नवख्याला राहातच होता टॅक्सीला काय भाडे पडेल असा प्रश्न विचारल्यावर ती हसली नि म्हणाली 'पैसे थोडे पडतील पण अतर कमी आहे टॅक्सीवाला येईलच असे नाही त्याने उद्धटपणे नकार दिला तर मनावर घेऊ नका ' 'मी मुबईकडचा आहे असे अनुभव तिथेही अधूनमधून मिळतात,' असे मीही हसत हसत तिला सांगितले पण आम्ही चालतच जाण्याचे ठरविले त्यात डॉलर्स वाचत होते

दहा मिनिटाच्या अतरावर हॉटेल आहे असे सांगितले तरी सामान घेऊन मार्ग विचारीत उन्हात तिथे पोहोचायला अर्ध्या तासापेक्षा जास्त वेळ लागला हॉटेलकडे जाणारा मार्ग विशाल राजरस्त्यावरून होता वाटेतच प्रथम मुख्य टपाल कचेरीची इमारत लागते. त्यानतर लगेच उजव्या हाताची लोकसभेची भव्य नि दर्शनीय वास्तू नजरेत भरते तिच्या समोरच्या भागाला छोटा ॲव्हेन्यूसारखा रस्ता येतो नि त्याच्या पलीकडे महापौराचे कार्यालय होते हा विस्तीर्ण चौक, त्याच्यातल्या दर्शनीय इमारती, ॲव्हेन्यू इत्यादीमुळे अत्यत रमणीय झाला आहे हॉटेल बाल्कन मध्यवर्ती आहे त्याच्या समोरच्या रस्त्यावर पलीकडे फळांचे छोटे दुकान होते झेक एअरलाइन्सचे कार्यालय शेजारीच होते खोली चांगली होती फक्त तीत पखा नव्हता त्यामुळे उकाड्याचा त्रास झाला पूर्व युरोपात आम्ही मुक्काम केला होता त्या हॉटेलामध्ये पखे आढळले नाहीत. उन्हाळा जरी अल्प समय असला तरी तो दुपारी जाणवे

दुसऱ्या महायुद्धात जर्मनीने युगोस्लाव्हियावर स्वारी करण्यापूर्वी बेलग्रेडवर प्रचड विमानहल्ला केला होता त्या दिवसाचे भयप्रद वर्णन रॉबर्ट सेंट जॉन या

'असोशिएटेड प्रेस'च्या वार्ताहराने आपल्या 'फ्रॉम द लँड ऑफ सायलेंट पिपल' या ग्रंथात केले आहे. या एका हल्ल्यात २५ सहस्र माणसे दगावली जॉन हॉटेल बाल्कनमध्ये होता असा माझा समज होता पण परतल्यावर मी ते पुस्तक पाहिले, तेव्हा तो हॉटेल सर्पस्की क्राल्जमध्ये राहात होता असे दिसले पण फळे घेण्यासाठी जेव्हा रस्ता ओलांडला तेव्हा 'बाल्कन'लाही बॉबचा प्रसाद मिळाल्याचे त्याच्या छपराकडे पाहिल्यावर दिसले तसेच पलीकडच्या काही घरांच्या भिंतींची पडझड झालेली अजूनही दिसत होती फळे घेतल्यावर शेजारच्या झेक एअरलाइन्सच्या कार्यालयात गेलो त्याना बॅगची कथा सांगून प्राग, अथेन्स, मुबईकडे चौकशी करण्यास सांगितले दुसऱ्या दिवशी माहिती मिळाली की बॅग या गावांत नाही तेव्हा अबूदाबी, बायरूट नि मॉस्को येथे चौकशी करण्यास सांगितले

बेलग्रेडला सर्बिअन भाषेत बेओग्राड, म्हणजे 'व्हाईट कॅसल' (पांढरा किल्ला) म्हणतात आणि ते युगोस्लाव्हियाची राजधानी आहे दक्षिणेला स्लाव्ह भाषेत 'युग' म्हणतात 'युगोस्लाव्हिया' म्हणजे 'दक्षिण स्लाव्ह लोकाचा देश' युगोस्लाव्हियाच्या भूमीवर पुढील सहा प्रजासत्ताक राष्ट्रे आहेत स्लोव्हेनिया, क्रोशिया, बोसनिया, सर्बिया, मॉंटेनेग्रो नि मॅसेडोनिया या देशात जरी साम्यवादी शासन असले तरी ह्यू सेटन वॅट्सन आपल्या 'नेशन्स अँड स्टेट्स्' या ग्रथात लिहितात की, तिथे राष्ट्रीय तणाव पुन्हा जागृत झाले आहेत बोसनियाच्या सबधात ते सांगतात की, 'तिथली मुस्लिम समाजाची लोकसख्या वेगाने वाढली आहे हा समाज सर्बोक्रोट भाषा बोलत असला तरी सप्रदाय नि सास्कृतिक परपरा यामुळे तो स्वतत्र सामाजिक गट झाला आहे आणि त्याची लोकसख्या सर्ब नि क्रोट या समाजापेक्षा जास्त आहे' मग पुढे काय होईल ? या प्रश्नाचे उत्तर देण्याचे हे स्थान नाही

हगेरी नि सर्बिया तसेच डॅन्यूब नदीतील वाहतूक यावर नियत्रण ठेवण्यासाठी बेलग्रेड हे मोक्याचे ठाणे असल्याने प्राचीन काळापासून त्याला लष्करी केंद्राचे महत्त्व प्राप्त झाले आहे त्यामुळे या गावाच्या तटबदीला युरोपातल्या कुठल्याही किल्ल्यापेक्षा अधिक लढाया पाहाव्या लागल्या आहेत येथील पहिली तटबदी केल्ट लोकांनी केली मग आले रोमन त्यांच्या पाठोपाठ बल्गेरिअन नि ग्रीक आले त्यानतर तुर्क आले त्यानी गावाला नवीन नाव दिले. 'दरोल-इ-जेहाद' म्हणजे 'द होम ऑफ द वॉर्स ऑफ फेथ' युगोस्लाव्हियाच्या साम्यवादी शासनाने आपल्या देशाविषयी एक माहितीपुस्तक न्यूयॉर्कमध्ये प्रसिद्ध केले होते त्यात म्हटले आहे 'सन १३८९ मध्ये सर्बिया या बलिष्ठ राज्याचा तुर्कांनी पराभव केल्यावर दक्षिणेच्या स्लाव्ह भूमीवर अधार पसरला तुर्की आक्रमणामुळे दक्षिण स्लाव्ह सस्कृतीचा विकास थाबला' सन १८६२ पर्यंत किल्ल्यात नि त्याच्या भोवतालच्या भागात तुर्क लोक राहात आणि त्यावर त्याचे आधिपत्य होते. शहरात सर्बियन

लोकाची वस्ती होती नि त्याचा व्यवहार त्याच्याकडे होता १८७८ मध्ये बेलग्रेड तुर्की स्वामित्वातून पूर्ण मुक्त होऊन ते सर्बियाची राजधानी झाले

बेलग्रेडच्या युरोपीकरणाला १८६९ पासून सुरवात झाली विशाल पथ, त्याच्या दुतर्फा असणारी झाडे, उद्याने, उत्तम पुतळे, शोभिवत इमारती यांनी ते गाव सुशोभित झाले १९५३ मध्ये मी येथे आलो होतो तेव्हा नवीन इमारती बाधल्या जात होत्या आता सपूर्ण शहर अद्ययावत झाले आहे आधुनिक फ्लॅटच्या डोळचात भरणाऱ्या अनेक वस्त्या, त्याची झालेली नवीन उपनगरे, त्यातील वाटिका, क्रीडागणे, कारपार्क, ओबेरॉय शेरेटोनसारखी आधुनिक हॉटेले, सर्व प्रकारच्या वस्तूनी – कॅमेरे, टेलेव्हिजन, इलेक्ट्रॉनिक यत्रे, स्त्री-पुरुषाचे किमती सूट नि गाउन, सौंदर्य प्रसाधने, मोत्याचे दागिने, सिरॅमिक्स (मृत्तिकापात्रे), उची चामडचाचे सामान, वैद्यकीय उपकरणे, उत्तम मद्ये, चॉकोलेट, बिस्किटे, इत्यादींनी भरलेली दुकाने, उत्तम पेहेराव केलेले तरुण-तरुणींचे गट, मोठचा पदपथावरच्या खुर्च्यांवर बसून बीअर नि कॉफी पीत असलेले लोक, विशाल पथावरून धावणाऱ्या भिन्न जातींच्या मोटरी–या सर्व गोष्टी युगोस्लाव्हियातील एका मोठचा सख्येच्या वर्गाची सधनता दाखवीत होत्या भूयारी मार्गात दोन याचक बायका, नि एक ततुवाद्य वाजवणारा याचक मला दिसले तसेच बूटपॉलिशवालाही आढळला क्वचित दिसणारी गोष्ट प्रथम लक्ष वेधून घेते इतकेच तिचे महत्त्व !

युगोस्लाव्हिया हा साम्यवादी देश आहे परतु १९४८ मध्ये टिटो नि स्टॅलिन याच्यात वाद होऊन युगोस्लाव्हिया मॉस्कोच्या नेतृत्वाखालच्या युरोपातील साम्य-वादी गटातून बाहेर पडला आणि साम्यवादाचा स्वत च्या निराळा मार्ग त्याला शोधावा लागला या देशात १९५६ पासून 'वर्कर्स मॅनेजमेट सिस्टिम' प्रचलित करण्यात आली मात्र कारखाना नुकसानीत जाणार नाही याची कामगारावर जबाबदारी असते महत्त्वाच्या धद्याचे जरी राष्ट्रीयीकरण झाले असले तरी लहान खाजगी कारखाने चालू शकतात, फक्त त्यात सर्बियामध्ये सात नि स्लोव्हेनियात दहा यापेक्षा जास्त कामगार असता कामा नयेत, असा दडक आहे सामान्य काम-गाराला वेतन चागले मिळते पण सर्व देशांत जो प्रश्न आहे तो येथेही आहे वस्तूच्या किंमती वाढत, नव्हे भडकत आहेत आणि तो तक्रारीचा विषय आहे शेतकरी दहा हेक्टरपर्यंत व्यक्तिगत मालकीची शेती ठेवू शकतो तसेच कोणत्याही नागरिकाला स्वत च्या नि कुटुबाच्या उपयोगासाठी खाजगी मालकीचे घर ठेवता येते प्राथमिक शिक्षण मोफत असून सक्तीचे आहे उच्च शिक्षणासाठी अनेक सोयी उपलब्ध आहेत याशिवाय कल्याणकारी राज्यात उपलब्ध असणाऱ्या वैद्यकीय नि इतर सुविधाही युगोस्लाव्ह नागरिकाला मिळतात. युगोस्लाव्हियात किती स्वातत्र्य आहे हे सागताना गाईड म्हणाली की, आमच्या सीमा सात देशाना भिडतात नि त्या पूर्ण मोकळचा आहेत

जुना किल्ला नि त्याच्या भोवतालचे कालेमकदान उद्यान ही बेलग्रेडची मोठी आकर्षणे आहेत किल्ला आता मोडकळीस आला आहे त्याला अनेक दरवाजे आहेत ' ईस्टगेट 'कडचा रस्ता इस्तबूलकडे जातो या गेटच्या जवळच तुर्की पाशाचे निवासस्थान होते खदक मोठा आहे मात्र आता त्याचा उपयोग वस्तुसग्रहालयासारखा होतो १९१४ मध्ये वापरण्यात आलेल्या तोफा, त्याचप्रमाणे १९३९ मध्ये वापरलेल्या तोफा नि रणगाडे, तसेच जर्मनाकडून काबीज केलेल्या तोफा, मॉर्टर इत्यादी वस्तू या खदकात ठेवण्यात आल्या आहेत अगदी टोकाकडे आले म्हणजे खाली नद्याचे प्रवाह दिसतात सावा नि डॅन्यूब या त्या दोन नद्या त्याचा येथेच सगम होतो येथल्या उचवटचावर उभे राहिले की, बेलग्रेड शहर कसे पसरत आहे, अद्ययावत इमारतीच्या नवीन वसाहती कशा उभ्या होत आहेत याचे सुदर विहगम चित्र दिसते उद्यानात रहदारी खूप होती कुटुबवत्सल लोक फिरायला आलेले होते, रजेवर आलेले सैनिक होते, हौशी प्रवासी होते, कोपऱ्यात वाचत बसलेले काही अभ्यासू होते, काही म्हाताऱ्या स्त्रियांनी स्वत विणलेल्या वस्तूची येथे दुकाने उघडली होती, आणि प्रणयी युगुले स्वत च्या आनदात मश्गुल होती

बेलग्रेडमध्ये तीस म्युझिअम आहेत हे सर्व पाहावयास महिनादेखील पुरा पडणार नाही आम्ही तर दोन दिवसाचे प्रवासी होतो म्हणून आम्हाला निवड करणे भाग होते दुसऱ्या महायुद्धात टिटो नि त्याचे पार्टिझान सैनिक यानी जर्मनाशी केलेल्या सैनिकी सघर्षाची माहिती मी वाचली होती साहजिकच त्या काळासबधीचे एक आकर्षण मला आहे तेव्हा त्या काळातील घटनांची चित्रे दाखविणारे नि माहिती देणारे सग्रहालय प्रथम पाहण्यास गेलो प्रवेश केल्यावर प्रारभीच मार्क्स, एजल्स, लेनिन नि टिटो याच्या पुतळ्याचे दर्शन होते एका बाजूने आत शिरले की, प्रथम शस्त्रास्त्राचे छोटे प्रदर्शन दिसते अनेक प्रकारच्या बदुका, रिव्हॉल्व्हर, त्याच्या गोळ्या, मशिनगन, तलवारी, तसेच सैनिक वेष तिथे काचेच्या कपाटातून माडलेले आहेत चित्रे असख्य होती त्यातून त्या काळाच्या इतिहासाची माहिती मिळते या चित्रांत हिटलर होता, मुसोलिनी होता, युगोस्लाव्ह नेते होते, काही चित्रात फाशी दिलेली माणसे दिसत होती, तसेच गोळ्या घातल्याने मेलेली माणसे होती काही चित्रे पुरुषभर उचीची होती एका खोलीत युद्धकाळातील प्रसगाची चित्रे दाखवणाऱ्या स्वयचलित स्लाइडी होत्या युगोस्लाव्हियाच्या एका उज्ज्वल काळाचे जतन करण्याचा मोठा प्रयत्न या सग्रहालयात केलेला दिसतो हे सग्रहालय काही काळाने नवीन वास्तूत जाणार आहे असे तिथे समजले

नॅशनल म्युझिअम हा इतर ठिकाणच्या म्युझिअमसारखाच समृद्ध असून भिन्न भिन्न वस्तू नि चित्रे याचा उत्तम सग्रह येथे केलेला आहे रोमन नि रोमनपूर्व काळातील नाणी, कुऱ्हाडी, फावडी दगडी चक्रे, छोटी शस्त्रे, दगडी मूर्ती, पुरुषभर उचीच्या मूर्ती, वगैरे वस्तू येथे काचेच्या कपाटातून ठेवलेल्या आहेत स्थानिक

भाषेतील बायबल, लाकडावर काढलेली प्राचीन चित्रे या लक्षात राहाणाऱ्या गोष्टी आहेत डिमिट्री पोपोव्हिकने १७७२ मध्ये लाकडात जी कोरीव रंगीत चित्रे तयार केली ती विशेष चित्तहारी आहेत निकोलॉय नेस्काव्हिकचे 'क्रुसिफिकेशन नि १७८५ मध्ये त्याने स्वत चे काढलेले चित्र, इव्हान व्हिकोव्हिकचे नेपोलिअनचे चित्र, पॅव्हेल ड्युरकोव्हिकचे प्रिन्स मिलॉस ऑब्रोनोव्हिकचे चित्र–ही सर्व चित्रे मोहक आहेत निकोला अॅलेक्सीकने एका बाळाचे चित्र काढलेले आहे त्या मुलाच्या अगावर जो झगा घातलेला दाखविलेला आहे तो पारदर्शक आहे कॉन्स्टंटाइन डॅनिएलने काढलेल्या नॅशनल हिरो ' या चित्रातील व्यक्तीने घातलेली टोपी तुर्की आहे स्टिव्हान टोडोरोव्हिकने हायडूक व्हेलजेकाचे जे चित्र काढलेले आहे ते चित्ताकर्षक आहे (तुर्कांविरुद्ध गनिमी काव्याने लढणाऱ्या सैनिकाला हायडूक म्हणतात ) एका विभागात छोटी निसर्गचित्रे–लॅंडस्केप–आहेत तीही मोहक होती लढायाची काही चित्रे आहेत या भूमीवर झालेल्या असंख्य लढाया ध्यानात घेतल्या तर त्याविषयीची चित्रे काढलेली नसती तरच आश्चर्य ! एका चित्रात झुंज दाखविलेली आहे, दुसऱ्यात प्रेताचे दहन दाखविले आहे, तिसऱ्यात कत्तल दाखविली आहे, चौथ्यात तुर्की राजाकडे ' लोकावर दया करा ' अशी अर्चना करणारा धर्मगुरू दाखविलेला आहे अगदी वरच्या मजल्यावरची चित्रेही डोळ्यात भरतात त्यात इटालियन चित्रकार व्हेंसेलीची चित्रे आहेत, तसेच रुबेन्सचे व्हेनेशिया ' हे चित्र आहे ते मूळ आहे का प्रतिकृती आहे ते मात्र सागणे कठीण

रात्री नऊच्या सुमारास एकाएकी गाण्याचे आवाज ऐकू येऊ लागले म्हणून खिडकीतून मी बाहेर पाहिले एक सुमारे वीस जणाचा गट असावा नि दुसरा तीस-चाळीस जणाचा गट असावा त्यांच्यापैकी काहींच्या हातात ध्वज होते आपल्याकडे गणपती विसर्जनाच्या वेळी जसा नृत्याचा प्रकार दिसतो त्याच प्रकारचे नृत्य एका गटातील काही मुले करीत होती भोवतालचे लोक उदासीनतेने त्याकडे पाहात होते काहीजण रस्ता ओलाडण्यासाठी थाबले होते, तर दोन-पाच लोक कुतूहलाने मिरवणुकीकडे पाहात होते चौकातल्या बाकावर दोन युगुले बसली होती त्यापैकी एकाचे प्रियाराधन चालले होते मिरवणुकी चालल्या आहेत याची त्याना गधवार्ता नव्हती-मग एकाएकी वादळ सुरू झाले त्यामुळे पालापाचोळा जसा विखुरला गेला तसे लोकही विखुरले गेले थोडा वेळ पाऊस पडला मग सर्व शात झाले त्यानतर बराच वेळ गाण्याचे नि घोषवाक्याचे आवाज ऐकू येत होते हे गट बेलग्रेडमध्ये होणाऱ्या एखाद्या कॅंपसाठी बाहेरून येत होते की काय, कोणास ठाऊक ' पण त्यांच्या आवाजावरून त्यांचा उत्साह अफाट असावा !

# ४. बुखारेस्ट

प्रवासाचा तिसरा टप्पा होता रोमेनिआ हॉटेल बाल्कनकडून एअर टर्मिनल-कडे चालत आलो विमानतळाकडे जाणाऱ्या बसला थोडा वेळ होता म्हणून जवळ चर्च होते ते पाहण्यासाठी गेलो गोल घुमट असलेले बिझन्टाइन ठेवणीचे चर्च होते पाचदहा वृद्ध स्त्री-पुरुष आणि चारपाच तरुण-तरुणी इतकीच माणसे त्या विशाल चर्चच्या गाभाऱ्यात होती एकदोन पाद्री इकडून तिकडे गेले काही मेणबत्त्या तेवत होत्या त्यांच्यांत या तरुणींनी आपल्या मेणबत्त्या पेटवून भर घातली चर्चमध्ये गर्दी नसावी याचे मला आश्चर्य वाटले प्रार्थनेसाठी नाही तरी बघण्यासाठी लोकांची गर्दी व्हायला हरकत नव्हती कारण चर्च प्रेक्षणीय आहे

बुखारेस्टकडे जाणारे विमान एक तास उशिरा सुटले विमानाने आकाशाकडे झेप घेतली तेव्हा पावणेदोन वाजले होते विमान जसे वर जाऊ लागले तसे खालची हिरवीगार शेते नि घरे पाहता पाहता छोटी झाली विमान साव्हा नि डॅन्यूब या नद्यावरून गेल्यानंतर थोड्याच वेळाने ढगाचे लोंढे आले मग विमान आणखी वर चढले आता खाली शुभ्र ढग नि वर निळे आकाश एवढेच दिसत होते सुमारे दहा मिनिटे असा प्रवास झाला, आणि ढग एकाएकी विरळ होऊ लागले दोन ढगातील मोकळ्या जागेतून खालचा प्रदेश दिसू लागला नंतर डोंगराच्या रांगा दिसल्या, काही ठिकाणी डोंगरावर तुरळक घरे आढळली मात्र थोडी दाट वस्ती खाली दऱ्यात होती पुन्हा एकदा पांढऱ्या ढगाची गर्दी झाली पण काही क्षणच आता खाली सरोवर दिसले नंतर छोटे छोटे आहोळ दृष्टिपथात आले इतके क्वचित दिसतात मग नुसती अरण्ये दिसू लागली त्यातली झाडी दाट होती अर्थात यात नवल नव्हते रोमेनिआतील सत्तावीस टक्के भूमी अरण्यांनी व्यापलेली आहे आता अरण्ये सपली नि मोठमोठाली शेते नजरेत आली ती सामुदायिक शेती असावी त्यांच्या भोवती कालवे होते या निसर्गचित्राचे निरीक्षण करीत असतानाच बुखारेस्ट येत आहे असे सांगण्यात आले विमान भूमीवर धावू लागले तेव्हा दुपारचे दोन पन्नास झाले होते

विमानतळावर पहारा कडक होता आरक्षक मशिनगन घेऊन उभे होते येथे आम्हाला एक भारतीय व्यापारी भेटले ते पाल्यांचे होते आमच्याप्रमाणेच हँडबॅग, कॅमेरा यांना तपासणी-यंत्रातून जावे लागले पण स्वागत नि मार्गदर्शन यात सौजन्य होते दिवसाचे प्रत्येकी दहा डॉलर मोडले पाहिजेत हा नियम सोफियाप्रमाणे येथेही होता पण गडबडीत आमचा समज झाला की, दोघांपैकी एकाने तितकी रक्कम मोडली म्हणजे झाले त्याप्रमाणे डॉक्टर सौ जोगळेकरांनी तीस डॉलर मोडले पण पासपोर्ट तपासणीत माझा पासपोर्ट अडकला तीस डॉलर

मीही मोडले पाहिजेत असे मला सांगण्यात आले जेव्हा तेवढी रक्कम मी मोडली तेव्हा पासपोर्टवर शिक्का बसला

'पासपोर्ट बॅरिअर' ओलांडून बाहेरच्या भागात आल्यावर नेहमीची कसरत सुरू झाली हॉटेल बुकिंग कुठे होईल याची प्रथम चौकशी केली तेव्हा आम्हाला एका कोपऱ्यातला काऊंटर दाखविण्यात आला तेथे रांग होती प्रत्येक प्रवाशाच्या अपेक्षा भिन्न होत्या त्याला परवडणारे हॉटेल मिळणे, तिथे जागा आहे की नाही याची चौकशी होणे, मग त्याने खोलीचे पैसे भरणे याला वेळ लागे त्यातच ही व्यवस्था करणाऱ्या बाईचा स्वभाव कनवाळू होता एका जपानी प्रवाशाला मोटर-स्टँडपर्यंत तिने सोबत केली, नि त्याला मोटर मिळेपर्यंत ती त्याच्याबरोबर राहिली पण त्यामुळे इतराचा थोडा खोळंबा झाला दोन तास आम्ही रांगेत उभे होतो शेवटी आमचा क्रमांक आला थोड्या चौकशीनतर आम्हाला परवडेल असे हॉटेल मिळाले हॉटेलचे नाव होते 'शर्नी त्या हॉटेलसाठी मिळालेल्या व्हाउचरमध्ये बेड नि ब्रेकफास्टची सोय होती तिथे कसे जायचे या प्रश्नाला नेहमीप्रमाणे उत्तर मिळाले 'टॅक्सी' 'बस सर्व्हिस नाही का ?' आम्ही पृच्छा केली ती बाई म्हणाली की, टर्मिनलकडून हॉटेलवर यायला टॅक्सी घ्यावी लागेल कारण तेथून पुन्हा बस मिळताना तुम्हाला त्रास होईल मग टॅक्सीने हॉटेलकडे आलो टॅक्सीवाल्याने सांगितले तेवढे पैसे चुकते केले थोडे जास्त आहेत, असे आम्ही म्हणालो पण सामानाकडे बोट दाखवून तो काही तरी बोलला तेव्हा सामानाचे अधिक पैसे असावेत, असे सोयीचे मानसिक समाधान आम्ही करून घेतले

'शर्नी'चा लाउंज छोटा होता नि अरब, इराणी, फ्रेंच, जर्मन, अमेरिकन, इत्यादी प्रवाशांची त्यात गर्दी होती काही हॉटेल सोडण्याच्या तयारीत होते काही खोली मिळण्याची वाट पाहात होते येथेही थोडा वेळ थांबावे लागले मग किल्ल्या मिळाल्या तसेच ब्रेकफास्टची कुपने मिळाली वर जाण्यासाठी लिफ्ट होते तीन माण-सांना सामानासह त्याच्या आत उभे राहण्यासाठी थोडी कसरत करावी लागे खोलीत फक्त वॉश बेसीन होते न्हाणीघर वगैरे प्रत्येक मजल्यासाठी स्वतंत्र पण बाहेर होते तेव्हा तिथल्या परिस्थितीचे वर्णन आवश्यक नाही स्वस्त प्रवास करायचा असेल तर तक्रारीला जागा नसते खोलीत बऱ्यापैकी टेलिव्हिजन होता यावर न समजणाऱ्या गोष्टी पाहाणे ही करमणूक होती एके दिवशी दुसऱ्या महायुद्धावरची कथा पाहिली हॉटेलसमोरचा चौक मोठा होता त्यातून ट्रॉली, ट्रॅम नि बस यांची रहदारी सतत चालत होती समोर रेल्वेस्थानक होते नि उजव्या हाताला उद्यान होते शर्नीला लागूनच एक छोटे रेस्टॉरंट होते त्यात न्याहारीची सोय होती त्याच्या पलीकडे मोठे हॉटेल होते त्यात जेवणाचे चांगले नि स्वस्त पदार्थ मिळत एके दिवशी हॉटेलजवळ गडबड झालेली दिसली, म्हणून तिथे गेलो टॅक्सीवाल्याशी स्थानिक माणसाची बाचाबाची चालली होती अखेरीस प्रवाशाने टॅक्सीचा क्रमांक

टिपून घेतला काही आरक्षक रस्त्यावरून फिरताना दिसले, पण या भानगडीत कोणी पडले नाही एक-दोघे आमच्या हॉटेलच्या लाउंजमध्ये रात्री बसलेले आढळले

रोमेनिआ हा देश पूर्व युरोपात पडतो पण तो स्लाव्ह वंशीय नाही तो लॅटिन वंशाचा असून त्याचा वांशिक संबंध फ्रान्स नि इटली या देशांशी आहे रोमेनिआतल्या डेशिअन लोकांचा पराभव करून रोमन सम्राट ट्राजनने तेथे रोमन वसाहत वसविली पुढे रोमचे वैभव संपले आणि या प्रदेशावर टार्टर वगैरे लोकांच्या टोळधाडी कोसळल्या त्यातून हा देश सावरला नाही तोच तुर्कांच्या स्वाऱ्या सुरू झाल्या, नि अखेरीस त्याला तुर्कांचे मांडलिक व्हावे लागले

'द रोमेनिअन नेव्हर डाइज' अशी एक रोमेनिअन म्हण आहे म्हण उगीच निर्माण होत नाही तिचा लोकव्यवहाराशी संबंध असतो वरील म्हण हेच दर्शवते की, स्वत्वाची जाणीव रोमेनिअन लोकांत कायम टिकून राहिली होती एकोणि-साव्या शतकात युरोपमध्ये राष्ट्रवादाच्या विचारसरणीचा प्रभाव विलक्षण वाढला नि रोमेनिआही तिच्या प्रभावात ओढला गेला पुढे रशियाच्या साहाय्याने सन १८७७मध्ये रोमेनिआ तुर्की जोखडातून मुक्त झाला

बुखारेस्ट—रोमेनिअन भाषेत 'बुकुरेस्टी'—या गावाची स्थापना प्राचीन काळी बुकूर नावाच्या मेंढपाळाने केली अशी एक दंतकथा आहे मात्र बुकुरेस्टी या नावाचा उल्लेख सन १४५९ पासून मिळतो पथप्रकाश ( स्ट्रीटलाइटिंग ) ज्या शहरांत प्रथम आले त्यांपैकी एक बुखारेस्ट आहे सन १८५६ मध्ये रॉकेलचे दिवे रस्त्यावर लावण्यात येऊ लागले पुढे अकरा वर्षांनी गॅसचे दिवे सुरू झाले नि आता विजेचा वापर आहे बुखारेस्ट अत्यंत स्वच्छ नि सुंदर शहर आहे गावा-भोवती नि गावात सरोवरे आहेत उद्याने तर ठिकठिकाणी आहेत रस्त्यांची आखणी नि इमारतींची उभारणी पाहिली की नगररचना करताना किती दक्षता घेतली जात आहे ते दिसते रोमन स्क्वेअरकडून म्हागेरू, निकोलाय बाल्सेस्क्यू नि १८४८ या राजपथावरून आपण चाललो की, अद्ययावत बुखारेस्ट कसे उभे झाले आहे याची कल्पना येते या पथावर उत्तम हॉटेले आहेत विमान कंपन्यांची कार्यालये आहेत, सर्व प्रकारची दुकाने आहेत, रेस्टॉरंट आहेत, पर्यटन विभागाचे मुख्य कार्यालय येथेच आहे पर्यटनाच्या तिकिटांसाठी आपल्याला डॉलर्स भरावे लागतात यावरून डॉलर्सच्या मागणीची कल्पना करता येते पण तेवढ्याने जर समाधान झाले नाही तर रस्त्यावर उभे राहावे झक्क कपड्यातला तरुण तुमच्या अंगावरून जाताना डॉलर्स मोडावयाचे आहेत का अशी पृच्छा करील त्याच्याकडून घेतलेत तर स्थानिक चलन जास्त मिळते पण असे करणे गुन्हा आहे

१९४५ पासून रोमेनिआ साम्यवादी झाला साम्यवादी शासन येण्यापूर्वी रोमेनिआत सत्ता नि संपत्ती, जमीनदार नि राजकारणी लोक यांच्या हातात होती त्या काळातील सामाजिक जीवनाची भ्रष्टता दाखविणारा पुढील विनोद प्रसिद्ध

आहे ' Mania means madness, Kleptomania means madness to steal, and Romania means madness to steal applied to an entire nation ' अशा समाजात सामान्य माणसाचे जीवन हालअपेष्टेचेच होते म्हणूनच वरील विनोद देऊन गथर म्हणतात की, साम्यवादाच्या पेरणीला येथील जमीन सुपीक होती साम्यवादी शासन आल्यापासून सर्वसामान्य माणसाच्या जीवनात परिवर्तन झाले आहे येथेही शिक्षण विनामूल्य नि सक्तीचे आहे तसेच वैद्यकीय सुविधा मुबलक नि विनाशुल्क मिळतात अन्न नि सार्वजनिक वाहतूक स्वस्त आहे शेती जवळजवळ सामुदायिक झाली आहे तरी शेतकऱ्याला स्वत च्या मालकीचा भूमीचा छोटा तुकडा ठेवता येतो चर्चला स्वायत्तता असून धर्मगुरू तयार करण्यासाठी ते स्वत सांप्रदायिक शाळा चालवते चर्चचा खर्च नि धर्मगुरूचे पगार शासनातर्फे होतात रोमेनिआ नि रशिया याच्या संबधात थोडा तणाव आहे येथे रशियाचे अंधानुकरण होत नाही किंवा सतत समर्थन होत नाही पण तसे असले तरी रोमेनिआ साम्यवादी देश आहे नि तिथल्या व्यवहारावर त्याची छाया कशी पडते याची कल्पना आमच्या पुढील अनुभवावरून येईल

निकोलाय बाल्सेस्क्यू राजपथावर पचवीस मजली इटर कॉन्टिनेंटल हॉटेल आहे त्याच्यासमोर युनिव्हर्सिटीची इमारत येते आज वेळ होता तेव्हा सौ जोगळेकर नि सौ देशमुख यानी स्त्रीरोग-चिकित्सेचे काम तिथल्या मेडिकल विभागात कसे चालते ते पाहावयाचे ठरविले त्यासाठी त्या दोघी आत गेल्या दोन-तीन ठिकाणी चौकशी केल्यावर त्याना माहिती मिळाली की, गाइनिक फॅकल्टी थोड्या अतरावर आहे एका माणसाने मोटारीतून तिकडे नेण्याची तयारी दर्शविली पण फॅकल्टी दहा-पधरा मिनिटाच्या रस्त्यावर असल्याने आम्ही चालत जाऊ असे त्या दोघी म्हणाल्या मग नकाशातील रस्त्याची नावे पाहात अर्धा तास पायपीट केल्यावर हवी ती इमारत आली प्रथम भाषेची अडचण आली एवढ्यात एक जॉर्डेनिअन मुलगा आला त्याला इग्रजीचे चार शब्द येत होते त्याने प्रथम एका प्राध्यापकाकडे नेले प्राध्यापक म्हणाला, ' मी कामात आहे खातेप्रमुखाकडे त्याना घेऊन जा तेव्हा त्याच्याकडे गेलो त्याने सागितले की, डायरेक्टरकडे जा, म्हणून आम्ही तिकडे गेलो त्या ऑफिसात सागण्यात आले की, मिनिस्ट्रीची परवानगी असल्याशिवाय काही एक दाखविता येणार नाही तीन तासाच्या दगदगीनतर आम्ही मूळस्थानी परत आलो अर्थात यात दोष कोणाचाच नव्हता एकदा नियम झाले की, या गोष्टी अपरिहार्य होतात जाताना त्या जॉर्डेनिअन विद्यार्थ्याने नमस्कार केला नि म्हणाला, ' मी हिंदी चित्रपट पाहातो ' त्याच्या नमस्काराची स्फूर्ती कुठे होती याची मला कल्पना आली

रोमेनिअन सास्कृतिक जीवन समृद्ध आहे बुखारेस्टमध्ये नॅशनल थिएटर नि ऑपेरा हाऊस आहे येथे दर तीन वर्षांनी ' द जॉर्जेस इनेस्को आतरराष्ट्रीय सगीत

समेलन भरते गावात तीन ग्रथालये आहेत, तसेच अनेक म्युझिअम आहेत. त्यातले महत्त्वाचे तीन पहिला म्युझिअम ऑफ द हिस्टरी ऑफ द सिटी ऑफ बुखारेस्ट ' तो युनिव्हर्सिटीच्या जवळच आहे आत शिरले की, प्रारभीच आपल्याला मोठी चित्रे, जाहीरनामे नि फोटो दिसतात ९ मे १८७७चे स्वातत्र्य-दिनाचे वृत्तपत्रीय कात्रण, १९२१ चा रोमेनिअन कम्युनिस्ट पार्टीचा जाहीरनामा, २३ ऑगस्ट १९४४ चे रोमेनिआ जर्मन जोखडातून मुक्त झाल्याचे चित्र, १९४४–४५ मधल्या हिटलरविरोधी चळवळीची चित्रे कम्युनिस्ट पक्षाच्या अकराव्या अधिवेशनाची चित्रे, तसेच निकोलाय सिमेक्यू टिटो, कॅस्ट्रो इत्यादींचे फोटो या पहिल्या विभागात सग्रहित आहेत

शेजारच्या खोलीत १४५०, १४७५, १५७० या सालातील राजाचे शिक्के आहेत त्याशिवाय त्यांच्या बदुका, तलवारी, खजीर, घड्याळे, दुर्बिणी, किल्ल्या याचाही सग्रह केलेला आहे वर जाताना जिन्यापाशी वीस-पचवीस फूट उचीचा आरसा आहे प्राच्य वस्तूच्या विभागात तीन हजार वर्षांपूर्वीची भाडी, दगडाच्या वस्तू आहेत त्याचप्रमाणे ख्रिस्तपूर्व कालातील तांब्याचे दोन मोठे कुभ, गाळणी, चाकू नि इतर हत्यारे आहेत ही सर्व उत्खननात मिळालेली आहेत सन १९६३ मध्ये सापडलेले ५००० वर्षांपूर्वीच्या माणसाचे अवशेष येथे ठेवलेले आहेत

रगीत चित्राचा एक छोटा विभाग आहे १७८१ चा इतिहास कथन करणारे चित्र १४५६ ते १४६२ मधल्या टेपे राजाच्या चित्राची प्रतिकृती, सुलतान टाटलीचे चित्र, बॅटल ऑफ कॅलिगॅरेनी ही त्यातली लक्षणीय चित्रे आहेत इथलीच एक विशेष लक्षात राहाणारी वस्तू म्हणजे तांब्याच्या पत्र्यावरचे कोरीव काम लढायांचे प्रसग चर्चच्या इमारती हे कोरीव कामाचे विषय आहेत, तसेच बायबलही कोरलेले आहे

यानतरच्या खोलीत एकोणिसाव्या शतकातील प्रगती दाखविणारी चित्रे आहेत तसेच १८४७ मध्ये लागलेल्या भीषण आगीचे चित्र आहे निकोलाय बाल्सेस्क्यूचे १८४८ मधल्या क्रातीसबधीचे विचार, त्याचे लोकाबरोबरचे चित्र, १८४८ मधला ध्वज, फाशी गेलेल्या क्रातिकारकाची चित्रे येथील भितीवर लावलेली आहेत

म्युझिअमचे कापडावर भरलेले चित्र, सन १०६, १६०१, १८४८ नि १९७७ या काळातला एका मोठ्या टॅपेस्ट्रीवर सागितलेला इतिहास, बिझन्टाइन, रोमनेस्क रचनेच्या चर्चचे मनोज्ञ फोटो, चारशे वर्षांपूर्वीचे सोनेरी पानावरचे हस्तलिखित, लाकडातील रगीत चित्रे, १६४३मधले लिथोवर छापलेले पुस्तक, अत्यत सुबक असलेली दगडी नि लाकडी पॅनेल्स—या गोष्टी विशेष लक्षात राहातात गावाच्या इतिहासाची अशी जपणूक करणारा म्युझिअम मी प्रथम पाहिला स्वत च्या परपरेच्या अभिमानाशिवाय अशी गोष्ट सुचणार नाही

पर्यटन कार्यालयाच्या पाठीमागच्या भागाकडे गेले की, प्रथम अॅथेनिअमची इमारत येते मग मोठा चौक येतो आणि त्याच्या पलीकडे राजवाडा आहे त्यातच नॅशनल म्युझिअम आहे पहिल्या विभागातले कॉन्स्टंटिन लिकाचे 'द्वंद्व' नि एक सायंकाळ ' ही दोन चित्रे उत्तम उतरलेली आहेत थिओडोर अमानच्या चित्रासाठी एक विभाग आहे त्यातील काही चित्रे खरोखरच वेधक आहेत बल्गेरिअन मॅसॅकर, बूलव्हाड, कॅलिगॅरेनीची लढाई, खेड्याचे चित्र ही विशेष लक्षात राहातात टाटा-रेस्क्यूने काढलेले बाईचे चित्र हे रोमेनिअन स्त्रीच्या सौंदर्याचे प्रतीक समजायला हरकत नाही 'घोड्यावरून झालेला पाठलाग नि पळणाऱ्या माणसावर केलेला तलवारीचा घाव नि 'एक युद्धप्रसंग' ही ग्रिओरेस्क्यूची चित्रे आहेत त्यापैकी पहिले काळ्या रंगातले आहे ही दोन्ही चित्रे उठावदार आहेत तशीच त्याची निसर्गचित्रेही (लँडस्केप) हृद्य आहेत त्यातले, 'सध्याकाळ झालेली आहे, झाडी-तून ओढा वाहात आहे, मेंढ्याचा कळप परतत आहे' हे हिरव्या रंगातले चित्र दीर्घकाळ लक्षात राहाणारे आहे

जॉन अँड्रेस्क्यूसाठीही एक स्वतंत्र विभाग होता त्याने ग्रामीण जीवनावरची काढलेली चित्रे अत्यंत रेखीव नि चित्तवेधक आहेत त्यानेही काही वेळा हिरव्या रंगाचा वापर केला आहे घोडा, मनुष्य, नांगर नि गवताचे भारे ज्यात दाखविलेले आहेत ते 'पॅस्टोरल' हे चित्र उत्तम उतरलेले आहे

स्टेफन लुशिअनचे 'पुष्पगुच्छ', थिओडोर पॅलॅडीचे 'दोन नग्न स्त्रिया', निकोले डारेस्क्यूचे 'व्हेनीस', व्हेराना आर्टुरचे 'वनराई', व्हसिली पॉपस्क्यूचे निळ्या हिरव्या रंगात काढलेले 'सरोवर', झुकोरीचे 'ख्राइस्ट' ही उत्तम चित्रे आहेत त्याशिवाय प्रोकासिनीचे 'सॅम्सन', रुबेन्सचे 'सिंहाची शिकार' रेंब्राँचे समरप्रसंगाचे भव्य चित्र नि आयव्हाझोव्हस्कीचे 'वादळाचा अंत होत आहे, पाण्यात होडी बुडली आहे, एक इसम शिडाच्या टोकाला धरून आहे नि इंद्रधनुष्य आकाशात आले आहे' – ही सर्व चित्रे अविस्मरणीय आहेत

पण बुखारेस्टचे सर्वांत मोठे वैशिष्ट्यच म्हणजे तिथला व्हिलेज म्युझिअम तो कल्चर अँड रेस्ट या उद्यानात आहे ते उद्यान हेरास्ट्रो या मोठ्या सरोवराच्या काठाशी आहे त्याची स्थापना १९३६ मध्ये झाली नि १९४८ मध्ये त्याला पक्के स्वरूप आले देशाच्या निरनिराळ्या विभागातील वांशिक, सांस्कृतिक, पारंपरिक ग्रामीण जीवन भिन्न भिन्न घराच्या साहाय्याने दाखविण्याचा यत्न येथे केला आहे ही ग्रामीण घरे बांधताना जे लाकूड नि वस्तू यांचा वापर होत होता त्याचाच उपयोग येथे केलेला आहे घरात वा झोपडीत टेबल, खुर्च्या, बिछाना, भोजनाच्या थाळ्या, कपडे, भांडी, इत्यादी वस्तू ज्या प्रत्येक प्रदेशात वापरण्यात येतात त्याच येथे मांडलेल्या आहेत घराची ठेवण, त्याचे कुंपण, मोठा दरवाजा, त्याच्यावरील कलाकुसरीचे काम, हे निरनिराळ्या प्रदेशांत जसे असते तसेच येथे दाखविले आहे

देशातील प्रादेशिक जीवनाचे किती प्रकार असतात, त्याचे कसे स्तर असतात, याची सुंदर कल्पना त्यावरून येते रोमेनिअन लोकात राष्ट्रीयत्वाची जाणीव कशी प्रखर आहे हे ' द रोमेनिअन नेव्हर डाइज ' या म्हणीवरून दिसते अशा या एकात्म समाजाचे जीवन किती विविध प्रकारानी युक्त आहे हे या म्युझिअमवरून दिसते त्याला दिलेली भेट ही मनात कोरली गेली आहे

येथेच आम्हाला एक आनंदाची गोष्ट कळली' आमच्या बॅगचा पत्ता लागला असून ती सोफियात आहे बुडापेस्ट नि वॉर्सा या प्रवासातील पुढील टप्प्याना पाठविण्याऐवजी ती प्रागला पाठवा अशी सूचना आम्ही येथल्या झेक एअरलाइन्स मधून सोफियाला पाठविली

●

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# ५. बुडापेस्ट

रोमेनिआतून आम्ही हंगेरीकडे येणार होतो माझ्या प्रवासयादीतला हा चौथा साम्यवादी देश होता नवीन गावात शक्यतो दिवसा उजेडी शिरावयाचे असे ठरवूनच विमान उड्डाणे मी पक्की केली होती बुडापेस्टला जाणारे विमान सकाळचेच होते गावात येताना जसे टॅक्सीने आलो तसे आता विमानतळाकडेही टॅक्सीने गेलो आत शिरलो तोच सगळे सामान तपासणीसाठी पुढे रवाना करावे लागले मग पासपोर्टवर शिक्का बसला नि आम्ही आत गेलो या वेळी आमच्याकडे बरेच ले शिल्लक होते ते कुठे बदलून घेता येतील याची चौकशी केली तेव्हा-आम्हाला सांगण्यात आले की, त्यासाठी बाहेर जावे लागेल पण तो रस्ता आमच्या-साठी बंद झाला होता बरे ' ड्युटी-फ्री शॉप 'मधल्या वस्तू घ्याव्या तर ले चालत नव्हते त्यासाठी डॉलर्स हवे सामान्य माणसाला डॉलर्स हवे तसे सरकारलाही हवे तेव्हा चॉकलेट घेण्यात आम्ही बरेच रोमेनिअन चलन संपविले

अजून उड्डाणाला बराच वेळ होता विमानतळावर गर्दी होती म्हणून एका कोपऱ्यात जाऊन बसलो जवळच एक नियतकालिक पडले होते रस्त्यावरच्या किऑस्कमध्ये लावलेली नियतकालिके मी पाहिली होती काहींच्या मुखपृष्ठावर स्त्रियांची चित्रे होती पण आतली चित्रे कशी असतील याची त्यावरून कल्पना येत नव्हती तेव्हा कुतूहलाने ते नियतकालिक मी उचलले वाहवा, बहारच होती ' पॅरिस, लंडन, इत्यादी युरोपीय देशांतल्या नियतकालिकात आढळणारी चित्रेच त्यात होती म्हणजे नवीन निर्माण होणाऱ्या साम्यवादी माणसाचाही अशा चित्रातला रस आटलेला नव्हता ' नाही तर अशी चित्रे छापली जाणे नि शासनाने त्याला अनुज्ञा देणे कसे शक्य आहे ? विमानातल्या एक-दोन कुटुंबवत्सल माणसाच्या हातातही अशी नियतकालिके दिसली

साडेदहाच्या सुमारास विमानात बसण्याची सूचना मिळाली विमान छोटे होते नि त्याला पंखे होते. पावणेअकराला विमानाने आकाशाचा मार्ग धरला नेहमीप्रमाणे खाली छोटी घरे नि हिरवीगार शेती दिसली आता सपाट मैदान आले त्यात विस्तृत पात्राची नदी होती त्यानंतर नुसते रानच रान काही वेळाने गावे दिसू लागली मग दोन नद्या आल्या क्षितिजाकडे पांढरे ढग होते बाकी सर्व निळे आकाश आज केक्स, बीअर, वगैरे पदार्थ प्रवाशांना देण्यात आले अर्ध्या तासाचा प्रवास झाल्यानंतर एकाएकी पांढऱ्या ढगांचे लोट आले आणि खालचा प्रदेश दिसेनासा झाला हिमप्रदेशातच आपण प्रवास करीत आहोत असे वाटावे अशा प्रकारे शुभ्र ढग पसरलेले होते पंधरा मिनिटांनंतर हे चित्र बदलले आता भूमी दिसू लागली, नि छोट्या नद्या, ओहोळ, लहान वस्त्या दृष्टिपथात आल्या सव्वा-

बारा वाजता छोट्या छोट्या शेताचे पट्टे दिसू लागले बुडापेस्ट जसे जवळ आले तसे शेतांचा आकार खूपच मोठा झाला आता खाली लोहमार्ग, मोटारी, टोलेजंग इमारती आढळल्या मग एक मोठी दफनभूमी दिसली पुन्हा एकदा वनराया लागल्या या वेळी विमान जमिनीकडे झेपावत होते साडेबारा वाजता विमानाच्या चाकानी भूमी पकडली

पासपोर्ट तपासणी, सामान घेणे, कस्टममधून बाहेर येणे या सर्व कामाना अर्धा तास लागला पण कुठलाही त्रास झाला नाही येथे दहा डॉलर प्रथम मोडा वगैरे भानगड नव्हती लाउंज खूपच मोठा होता लोकाची गर्दीही तितकीच होती पण आरक्षक वगैरे कुठे आढळले नाहीत येथले माहितीकेंद्र एकदम नजरेत आले नाही कारण ते एका कोपऱ्यात होते तिथे हॉटेलची चौकशी केली तिथल्या बाईने सागितले की, ती व्यवस्था गावात होते तुम्ही एअर टर्मिनलवर जा तिथून पाच मिनिटावर पर्यटन कार्यालय आहे तुमचे तिथे काम होईल मग प्राथमिक खर्चा-साठी थोडे डॉलर्स मोडले सामान घेतले नि बाहेर येऊन बससाठी थाबलो

दीड वाजता बस निघाली बसमध्ये दोन जपानी कुटुबे होती म्हातारी होती पण हौशीने प्रवास करीत होती थोड्याच वेळाने बसने हायवे मागे टाकला आणि लहान लहान रस्त्यांतून ती जाऊ लागली जुन्या घराची ठेवण एकदम निराळीच वाटली छोटी, दुमजली घरे होती काहीचा गिलावा पडलेला होता आता रस्ता बोळकडीसारखा झाला त्यातली काही घरे दुमजली होती काहींचा थोडा भाग पडलेला होता भिंतीवर गोळ्या लागलेल्या दिसत होत्या दुसऱ्या महायुद्धाचे हे पुरावे होते की १९५६ च्या हंगेरीतल्या बडाचे होते हे सागणे कठीण! या रस्त्याच्या तोंडाशी बस थाबली कारण समोर ट्रॅमचा मार्ग होता, नि त्यावरून ट्रॅम-गाड्या जात होत्या आता या मोठ्या रस्त्यावरून आमची बस निघाली त्यावरील इमारती नवीन होत्या नि त्याचा रग जाभळा होता इकडच्या नवीन इमारतीच्या वसाहती नि आपल्या गृहनिर्माण मडळाच्या वसाहती यांची बेलग्रेडपासून नकळत मनात तुलना येई निदान दुरून तरी येथल्या घराची बांधणी अधिक पक्की नि रेखीव वाटली त्यात राहाणारे लोकही सज्जातून रंगीत फुलझाडे ठेवून आपली घरे अधिक शोभिवत ठेवीत

बस एअर टर्मिनलकडे आली पर्यटन कार्यालयाकडे कसे जायचे याची माहिती घेतली शेजारीच एक छोटे दुकान होते तिथल्या बाईला इग्रजी येत होते नि दुकानात अनेक देशातला माल होता मला तिथे असलेल्या इग्रजी सिगरेटी नको होत्या मी त्या बाईला म्हणालो, मला उत्तम हंगेरिअन सिगरेट हवी आहे ' तिने एक पाकिट काढून दिले ते घेऊन मी बाहेर सामानापाशी थाबलो सौ जोगळेकर नि सौ देशमुख हॉटेलची व्यवस्था करायला गेल्या अर्धा तास उलटला, एक तास सपला त्या दोघी परत आल्या नाहीत मी जरा सचित झालो या दोघी रस्ता चुकल्या का त्याना

कार्यालय मिळाले नाही ? एक ना दोन, मनात नाना शंका आल्या माझा पासपोर्ट नि द्रव्य सौ जोगळेकरांच्या पर्समध्ये होते बरे इतके सामान घेऊन मी जाऊ कुठे ? आणि चौकशी तरी कुठे करणार ? दुसरा तास उलटला पाचमहा सिगरेटी संपल्या मी अत्यंत अस्वस्थ झालो पण एवढ्यात दूरवर त्या दोघी दिसल्या मी नि श्वास सोडला हॉटेल मिळविण्यातच सगळा वेळ गेला होता आणि राहण्याची सोय झाली होती ती फक्त दोन दिवसाची तिथल्या माणसाने सांगितले की, खूप प्रवासी आलेले आहेत सगळ्या जागा भरलेल्या आहेत दोन दिवसाची सोय झाली हेच तुमचे नशीब तुम्ही हॉटेलवर जा आणि तिसऱ्या दिवसासाठी जागा मिळाली तर तिथे त्या दिवसाचे पैसे भरा आमची आडकाठी नाही 'हॉटेल बेके'वर कसे जायचे या प्रश्नाचे उत्तर मिळाले 'टॅक्सी करा '

आम्ही थांबलो होतो तिथेच समोर टॅक्सी उभी होती पण त्या टॅक्सीवाल्याने नकार दिला दुसरा थांबलाच नाही तिसऱ्याने सांगितले की, टॅक्सी रस्त्यात मिळणार नाही टॅक्सी थांब्यावर जा तिथे मिळेल थांब्यावर आलो तेव्हा तिथे रांग होती आम्ही शेवटी उभे राहिलो दुसरे दोघेजण आले पण ते बाजूला उभे राहिले दोन-तीन टॅक्सी गेल्यावर आमचा क्रमांक आला तेव्हा त्यांपैकी एक पुढे सरकला पण 'ही मंडळी पुढे आहेत,' असे म्हणत दुसऱ्याने त्याला थांबवला अनेक ठिकाणी 'वन वे ' असल्याने हॉटेल जवळ असूनही तिथे यायला वेळ लागला

'हॉटेल बेके' राजपथावरच आहे हॉटेल जुन्या धर्तीचे होते खोल्या खूप मोठ्या असून बिछाने, पडदे, टॉवेल हा सरंजाम उत्तम होता बाथरूम वगैरे बाहेर होते एकजण लिफ्टमध्ये गमतीने म्हणाला की, गेल्या शतकातल्या हॅप्सबर्ग काळाला शोभणारे हॉटेल आहे न्याहारीचा हॉल पाउणशे माणसे बसतील एवढा मोठा होता नि पदार्थही चांगले असत हंगेरिअन भोजनाची ख्याती मी वाचली होती रात्रीच्या भोजनाच्या पदार्थांवरून ती रास्त असल्याचे पटले शिवाय पदार्थ स्वस्तही होते

हंगेरी हा स्लाव देश नाही तो माग्यार वंशाचा आहे या प्रदेशावर बरीच शतके रोमचे वर्चस्व होते पुढे अॅटिलाच्या नेतृत्वाखाली हूणांनी त्या प्रदेशावर स्वारी केली अॅटिलाचे दफन हंगेरिअन भूमीत झाले असा एक समज आहे पुढील शतकात स्लाव्ह टयुटन्स नि अव्हर्स यांच्या टोळ्यांनी या प्रदेशावर स्वामित्व गाजविले नवव्या शतकात माग्यार वंशाचे लोक आले त्यांचा ठसा या देशावर कायम उठला माग्यार लोकांनी कॅथॉलिक संप्रदायाचा स्वीकार केल्याने त्यांच्या जीवनाची धाटणी पश्चिम युरोपीय झाली

टिबॉर मेंडच्या मते, हंगेरीच्या इतिहासात स्टिफन हा एक असामान्य राजा होऊन गेला त्याने हंगेरिअन राष्ट्राची जी उभारणी केली ती पुढे अनेक शतके चालू राहिली पोपने त्याला एक राजमुकुट पाठविला तोच प्रसिद्ध 'क्राऊन ऑफ सेंट स्टिफन ' मला स्मरते त्याप्रमाणे, दोनएक वर्षांपूर्वी तो मुकुट अमेरिकेकडून हंगेरीला

परत करण्यात आला हंगेरिअन राष्ट्रीयत्वाचे तो प्रतीक समजला जातो तेराव्या शतकात मगोल लोकांच्या स्वारीला तो देश बळी पडला आणि जवळजवळ तो नामशेष झाला होता पण चौथा बेला या राजाच्या नेतृत्वाखाली हंगेरिअन जीवनाची पुन्हा उभारणी झाली पुढे काही शतकांनी तुर्की स्वाऱ्या सुरू झाल्या आणि मोहॅकच्या लढाईत हंगेरिअन सैन्याचा नि:पात होऊन बुडापेस्टला तुर्की पाशाचे प्रशासन सुरू झाले दीडशे वर्षांनतर ऑस्ट्रियाच्या साहाय्याने हंगेरी तुर्कांच्या हातातून मुक्त झाला पण यात झाले इतकेच की, तुर्की जोखडाऐवजी आता ऑस्ट्रियन जोखड हंगेरीच्या मानेवर बसले ऑस्ट्रियाविरुद्धची स्वातंत्र्याची चळवळ कोसूथच्या नेतृत्वाखाली झाली आणि पुढे ऑस्ट्रियन साम्राज्यांतर्गत हंगेरीला स्वायत्त शासन मिळाले

पहिल्या महायुद्धानंतर हंगेरी स्वतंत्र झाला दुसऱ्या महायुद्धात हंगेरीने जर्मनीच्या बाजूने युद्धात प्रारंभी पदार्पण केले पण जर्मनीचा पराभव होत आहे असे दिसताच हंगेरीने रशियाबरोबर शस्त्रसंधी केला पण त्यामुळे युद्धाच्या चटक्यापासून बुडापेस्ट वाचले नाही रशियन सैन्याला बुडापेस्टला वेढा घालावा लागला नि तो २३ डिसेंबर १९४४ ते १२ फेब्रुवारी १९४५ पर्यंत चालला जर्मनीने माघार घेताना घर नि घर लढवले त्यामुळे बुडापेस्टमधली ८५ टक्के घराची हानी झाली दहापैकी नऊ कारखाने कमी-अधिक उद्ध्वस्त झाले डॅन्यूब नदीवरचे सहा पूल नष्ट करण्यात आले होते किमती कशा भडकल्या होत्या याचे वर्णन गथरनी 'बिहाइंड द आयर्न कर्टन' यात दिले आहे कॉफीच्या कपाची किंमत दिवसातून चार वेळा बदलत असे पण ते सर्व भूतकाळात जमा झाले असून आता दुकाने सर्व प्रकारच्या वस्तूंनी भरलेली आढळली हॉटेले नि कॅफे यांच्यात उत्तम पदार्थ मिळतात नि लोकांची त्यात गर्दी असते स्त्री-पुरुषांचे कपडे नीटनेटके होते हॉटेल इंटरकॉन्टिनेंटलपाशी उभे राहून अवतीभोवती नजर टाकली की, युरोपातील एक रम्य नगरी अशी जी बुडापेस्टची पूर्वी प्रसिद्धी होती ती परत आलेली आहे याची खात्री पटते

हंगेरी हा साम्यवादी देश आहे तेथील महत्त्वाच्या धंद्यांचे राष्ट्रीयीकरण झाले आहे शेती प्रामुख्याने सामुदायिक किंवा सरकारी तत्त्वावर चालत असली तरी शेतकऱ्यास स्वत च्या मालकीचा शेतीचा छोटा तुकडा ठेवता येतो वैद्यकीय सेवा विनामूल्य आहे मात्र दारूबाज नि उगाच गर्भपात करणाऱ्यांना ती मिळत नाही निवृत्तीवेतन, आजारीपणातील आर्थिक साहाय्य नागरिकाला मिळते शिक्षण सक्तीचे नि विनाशुल्क आहे सरकारी शाळांबरोबरच आठ कॅथॉलिक शाळा आहेत त्यातही विद्यार्थी जातात वीस सांप्रदायिक पंथांना मान्यता असून सर्वांना थोडेबहुत आर्थिक साहाय्य शासनाकडून मिळते मुले असणाऱ्यांना किंवा होऊ देऊ असे अभिवचन देणाऱ्या तरुण कुटुंबाला घरासाठी आर्थिक साहाय्य प्रथम मिळते

बुडापेस्ट हंगेरीचे सांस्कृतिक, वैज्ञानिक नि कला केंद्र आहे हंगेरिअन ॲकॅडमी ऑफ सायन्स या संस्थेचे मोठे कार्य या शहरात चालते येथे मोठे म्युझिअम आहेत,

उत्तम नाट्यगृहे आहेत, ऑपेरा हाऊस आहे, ग्रंथालये आहेत हंगेरिअन चित्रपटाची श्रेणी उच्च समजली जाते थोडक्यात म्हणजे सुसंस्कृत नगराची सर्व अंगे तुम्हाला येथे भेटतात

'हिरोज स्क्वेअर' हे दर्शनीय स्मारक आहे विशाल उद्यानाच्या प्रारंभी एक मोठा चौक येतो त्याच्या मध्यभागी अर्धवर्तुळाकृती दोन चौथरे असून त्याच्यावरील स्तंभामधून हंगेरिअन राजाचे नि देशभक्ताचे पुतळे आहेत मध्यभागी ११७ फूट उंचीचा स्तंभ असून त्यावर आर्चएंजल गेब्रिअलचा पुतळा आहे मी गाईडला विचारले, "यात कोसूथ आहे काय ?' 'तुला कोसूथची कशी माहिती ?' तिने प्रतिप्रश्न केला 'कोसूथची व्यक्तिरेखा मी लिहिली असून ती काही महिन्यापूर्वी प्रसिद्ध झाली होती,' हे मी सांगितल्यावर ती हसली आणि तिने मला उजव्या बाजूच्या चौथऱ्याकडे नेले नि कोसूथचा पुतळा दाखविला त्याचे छायाचित्र घेतल्यावर त्या पुतळ्याकडे काही क्षण पाहात मी उभा राहिलो ज्या कोसूथविषयी मी वाचले नि लिहिले होते त्याच्या हंगेरीत मी एके दिवशी त्याचा पुतळा न्याहाळीन असे मला कधी वाटले नव्हते

बुडा नि पेस्ट ही दोन निराळी गावे होती त्यांचे १८७२ मध्ये एकीकरण झाले त्या दोन गावातून डॅन्यूब वाहाते बुडा भाग टेकडीवर वसलेला आहे या टेकडीवरच चौथा बेला या राजाने मंगोल टोळ्यांच्या स्वारीनंतर, म्हणजे सन १२४१ नंतर एक किल्ला बांधला तोच हा 'बुडा कॅसल' नि तिथल्याच कड्याला 'कॅसल हील' म्हणतात त्याच्याजवळच अठराव्या शतकात बांधलेला राजवाडा आहे येथून थोड्या अंतरावर कॉरोनेशन चर्च आहे चौथा बेला या राजाने ते बांधण्यास सुरवात केली नि पंधराव्या शतकात मॅथिऑस राजाच्या राजवटीत ते पूर्ण बांधून झाले त्याची बांधणी रोमनेस्क धाटणीची आहे या चर्चची एके काळी मशीद झाली होती चर्चच्या पाठीमागेच स्टिफन राजाचा अश्वारूढ पुतळा आहे या टेकडीच्या उंच कड्यावर उभे राहून चारी बाजूंना दृष्टिक्षेप केला की संथ वाहाणारी डॅन्यूब, तिच्यावरचे ते अजस्त्र पूल, राजवाडा, लोकसभेची इमारत, उंच शिखराचे चर्च असे बुडापेस्टचे रम्य चित्र दिसते

हंगेरीचा हुकूमशहा ॲडमिरल हॉर्थी हिटलरचा साथीदार होता पुढे जर्मनीचा पराभव होणार असे दिसताच त्याने रशियाशी बोलणी सुरू केली याचा सुगावा हिटलरला लागला तेव्हा मुसोलिनीला ज्याने सोडवून आणले होते त्या स्कोरझेनीकडे हॉर्थीला पळवून आणण्याचे काम हिटलरने सोपवले हॉर्थी कॅसल हीलवर राहात होता स्कोरझेनीने विलक्षण धाडसी हिकमत रचून हॉर्थीला उचलले नि बर्लिनला नेऊन हिटलरच्या स्वाधीन केले बुडा कॅसलकडे जात असताना ही कथा माझ्या डोळ्यासमोरून गेली

लेक बॅलॅटोनची ख्याती ऐकली असल्याने येथे आल्यावर तिकडे जाण्याचे मी निश्चित केले बॅलॅटोन हे मध्य युरोपातले सर्वात मोठे सरोवर असून याची लांबी

७७ किलोमीटर आहे बॅलॅटॉन सरोवराकडे जाणारी सहलीची बस हॉटेल इंटर-कॉन्टिनेंटलपासून निघाली नदी ओलांडल्यावर उजव्या हाताला बुडा कॅसल दिसला तो पाठीमागे पडल्यानंतर काही वेळाने बस राजमार्गावरून धावू लागली भोवताली मैलोमैलाचे मैदानच होते दूरवर डोंगर दिसत होते नि त्यावर छोटी वस्ती नि चर्च असे वाटेत लेक व्हेलेस्का लागले हेही मोठे सरोवर आहे व्हेनिसचे लोक येथे राहण्यास आल्याने हे नाव त्या सरोवराला पडले सरोवरात ३४ जातींचे मासे आहेत नि भोवतालच्या बनात ९२ जातींचे पक्षी आहेत असे गाईड म्हणाली

आता पाऊस सुरू झाला पंधरा मिनिटे त्याने आमची सोबत केली मग आकाश निरभ्र झाले रस्त्याच्या दोन्ही बाजूंना विस्तीर्ण शेती लागली ती सहकारी होती शिवाय द्राक्षाचे मळे दिसलेच गाईडच्या म्हणण्याप्रमाणे इथला शेतकरी चांगला सधन आहे शेताच्या कडेला असणाऱ्या काही मोटारी त्याचा पुरावा होत्या पण याशिवायही बॅलॅटॉनकडे जाणाऱ्या मोटारींची लांबच लांब रांग पाहिली की, हंगेरीतल्या सुबत्तेची कल्पना येते

फेरीच्या साहाय्याने सरोवर ओलांडून आम्ही टिहानी या द्विपकल्पावर आलो. त्याची लांबी सहा किलोमीटर असून दोनतीन किलोमीटर रुंदी आहे त्याच्या भोवताली टेकड्या आहेत नि त्यातील एकीच्या पठारावर 'बेनेडिक्टाइन ॲबी' आहे त्याच्या छतावरची चित्रे सोनेरी वर्खाची असून ती मोठी सुबक आहेत अकराव्या शतकात या ॲबीला किल्ल्याचे स्वरूप मिळाले पुढे दोन शतकांनी मंगोल लोकांच्या स्वारीत याचा बराच भाग नष्ट झाला पण तो पुन्हा बांधण्यात आला ॲबीची रचना बरोक धर्तीची आहे येथे पुढील दंतकथा सांगतात मंगोल लोकांची धाड आल्यावर त्यांच्या खानाला परत जाण्याची बुद्धी झाली तर आपली मुलगी देवाला अर्पण करू अशी चौथा बेला याने शपथ घेतली पुढे खान परत गेला राजाची बुद्धी बदलली नि त्याने मुलीच्या लग्नाची तयारी सुरू केली पण राज-कन्येने नकार देऊन जोगिणीचा झगा अंगावर घातला पुढे तिला संतपदाची प्राप्ती झाली बेला राजाचे थडगे येथे असून ते पाहण्यासाठी खोलगट जागेत जावे लागते

दुपारच्या भोजनाची व्यवस्था सरोवराजवळच्या हॉटेलातच होती निळसर रंगाचे स्वच्छ अथांग जलाशय, त्याच्या काठावर फिरणाऱ्या काळ्याभोर डोळ्यांच्या, ताबूस गौरवर्णाच्या हंगेरिअन तरुणी, उत्तम शाकाहारी भोजन नि जिभेवर बराच वेळ चव राहील असे हंगेरिअन मद्य– दोन तास केव्हा संपले तेच समजले नाही

'जे लोक झाड लावतात ते झाडाइतकेच जगतात' अशी हंगेरिअन म्हण आहे सरोवराच्या काठावर एके ठिकाणी ज्यांनी झाडे लावली आहेत त्यांच्यातली गिरी, श्रीमती गांधी, नि फक्रुद्दिन अली अहमद यांची नावे मला आठवतात या प्रदेशातले पाणी औषधी असल्याने असंख्य लोक प्रकृतिस्वास्थ्यासाठी येथे येतात रवींद्रनाथ ठाकूर येथे आले होते त्यांचा पुतळा आहे पण तिथे पोहोचण्यासाठी

अनेक वेळा चौकशी करावी लागली आणि पायपीटही पुतळ्यापाशीच त्याची कविता कोरलेली आहे

When I am no longer on this earth,
My tree left the ever-renewed leaves of thy spring,
Murmur to the wayfarer
The poet did love while he lived (8 Nov 1926)

आता सूर्य कलल्याने उन्हाची झळ कमी झाली पाचच्या सुमारास आम्ही एका 'इन'कडे आलो जुनी एक-मजली इमारत होती समोर मोठा व्हरांडा होता पाठीमागे अडीच मीटर उंचीचे 'वॉटर व्हिल' होते तुर्की शासनाविरुद्ध लढणाऱ्या लोकांना 'हायडूक' म्हणत ते गरिबांचे कैवारी असत ते अशा इनच्या साहाय्याने राहात त्यांना पकडण्यासाठी आरक्षक इनमध्ये थावत अशा वेळी इनचा मालक खिडकीपाशी दिवा ठेवून हायडूकना सावधानतेची सूचना देत असे इथे मद्याची चव घेण्याचा कार्यक्रम झाला या वेळी ग्रामीण जीवनातली गीते वादकानी वाजविली

बुडापेस्टला राहण्याची सोय दोन दिवसाची होती तिसऱ्या दिवसासाठी चौकशी केली तेव्हा मॅनेजर म्हणाला, खोल्या भरलेल्या आहेत तुम्ही विमान पकडावे हे उत्तम ते जमले नाही तर पाठीमागे एक कोच आहे तिथे तुम्हाला रात्र काढावी लागेल आरक्षक तपासणीला येतात तेव्हा बाहेरच्या लाउंजमध्ये कोचावर तुम्हाला बसता वा झोपता यावयाचे नाही ' मॅनेजरचे म्हणणे ऐकल्यावर आम्ही वॉर्साला जायचे ठरविले मग झेक एअरलाईन्सच्या कार्यालयात गेलो आणि विमान उड्डाणाची तारीख बदलून हवी आहे असे सांगितले त्यानी पोलीश एअरलाईन्सकडे चौकशी केली सुदैवाने तीन जागा खाली होत्या तेव्हा वॉर्साला आम्ही जातो असे सांगितले नि त्याप्रमाणे तिकिटे पक्की केली

●

# ६. वॉर्सा

टॅक्सीने प्रथम एअर टर्मिनलवर आलो. तेथून दुपारी चारच्या सुमारास विमानतळावर आलो सामान रवाना करताना तिकिट तपासणारा म्हणाला, ‘किती देशांना तुम्ही जाऊन आला आहात नि अजून जाणार आहात !’ ‘आम्ही हंगेरीला जसे आलो तसे तुम्ही हिंदुस्थानला या,’ मी त्याला म्हणालो ‘मला खरोखरच यायचंय एकदा मी रविशंकरचा फॅन आहे,’ तो उत्तरला हात मोकळे ठेवण्यासाठी मी छत्री कमरेला लावलेली होती त्यावर हात फिरवून आरक्षक अधिकारी म्हणाला, ‘रिव्हॉल्व्हर दिसतय ’ ‘होय, पण त्यात गोळी नाही,’ मी उत्तर दिले काही वेळा प्रवासात अशी गमतीदार माणसे भेटतात

विमान एक तास उशिरा सुटले विमानात बसलो त्यावेळी ढगाळलेले होते नि पाऊस पडत होता विमानाने जमीन सोडली तेव्हा पावणेसात झाले होते काही क्षण खालच्या भूमीचे दर्शन झाले, मग धुके नि ढग आले पधरा मिनिटानी वातावरण थोडे मोकळे झाले आकाशाचा गडद निळा रग परत आला होता दूरवर थोडे पाढरे पिवळसर ढग दिसत होते क्षितिजापाशी सूर्यबिब नुसते लालबुद झाले होते पण हे दृश्य काही क्षणच दिसले मग बिब लुप्त झाले, आणि आकाशाला रक्तिमा आला नंतर ते थोडे काळसर झाले सधिप्रकाश असल्याने खालच्या छोट्या टेकड्या, नद्याचे प्रवाह अस्पष्ट दिसत होते मग अधार झाला आता सायकाळचे भोजन देण्यात आले पावणे आठच्या सुमारास खाली गावातले दिवे दिसू लागले विमानाने भूमीकडे जाण्याचा प्रवास सुरू केला होता आठच्या सुमारास चाकानी भूमीला स्पर्श केला नि वॉर्साच्या विमानतळावर काही क्षण धावून विमान स्तब्ध झाले.

व्हिसा तपासणी चटकन सपली बाहेर आल्यावर चलन मोडण्यास गेलो चार दिवस राहणार असे सागितल्यावर दिवसाचे पधरा याप्रमाणे साठ डॉलर्स प्रत्येकी मोडा असे सागण्यात आले तितके चलन मोडले मग कस्टममध्ये आलो इथे एक फॉर्म देण्यात आला किती चलन आहे, कोणत्या प्रकारचे आहे, शिवाय दागदागिने किती आहेत, याची माहिती या फॉर्ममध्ये भरावयाची होती नोंद करण्याचे काही बाकी राहिले नि वॉर्सातून बाहेर पडताना, ही अगठी कुठली, या चलनाची नोंद फॉर्ममध्ये का नाही, असे प्रश्न उपस्थित होऊ नयेत, म्हणून सर्व प्रकारचे चलन नि वस्तू पाहून फॉर्म भरण्यास सुरवात केली पण यास बराच वेळ लागला एव्हाना पाठीमाग लाब रांग झाली होती शवटी तिथल्या अधिकारी बाईने आमचे फॉर्म घेतले, त्यावर थोडी खाडाखोड केली नि शिक्के मारून कस्टमच्या तटबदीतून आम्हाला बाहेर सोडले, तिथे हॉटेलची चौकशी केली. तेव्हा आम्हास सागण्यात

आले की, हॉटेले भरलेली आहेत, पण तुम्ही ग्रँड हॉटेलवर जा तिथे तुमची पुढील व्यवस्था होईल 'ग्रँड हॉटेलवर कसे जायचे ?' या प्रश्नाला उत्तर मिळाले, 'टॅक्सीने' बाहेर मैदानात टॅक्सी फार दिसेनात डॉक्टरने आरक्षकाकडे चौकशी केली तेव्हा त्याने, 'बसने जा', असे सांगितले पण आमच्याकडे बसची तिकिटे नव्हती आरक्षकाने दुरून दाखविलेल्या जागी चक्कर मारल्यावर दिसले ते बंद कार्यालय नि अंधार. आरक्षकाला अडचण सांगितली तरी, 'बसने जा', हेच त्याचे पालुपद शेवटी त्या अंधाऱ्या जागेकडे मी गेलो समोरून एक विमानदळातला अधिकारी आला 'आपण इंग्रजी बोलता का ?' मी विचारले

'बोलतो', तो हसत म्हणाला

'माझी एक अडचण आहे'

'कोणती ?' त्याने पृच्छा केली

'मला ग्रँड हॉटेलवर जायचे आहे बसने जा असे आरक्षकाचे सांगणे आहे. पण माझ्याजवळ बसची तिकिटे नाहीत येथे सर्व बंद आहे.'

त्याने कोटाच्या खिशात हात घालून वॅलेट काढले नि त्यातून दोन तिकिटे काढून मला दिली माझ्याबरोबर आणखी एक बाई आहेत असे मी म्हटल्यावर त्याने तिसरे तिकिट काढून दिले त्याचे पैसे देऊ लागलो तर त्याने मान हलवली 'तुम्ही तिकिटे देऊन मोठी अडचण दूर केलीत, हेच खूप झाले' मी त्याला म्हणालो मग जेव्हा त्याने पैसे घेतले तेव्हा बस प्रवास किती स्वस्त आहे याची कल्पना आली जाताना तो म्हणाला, ड्रायव्हर तुम्हाला हॉटेजवळच सोडेल पण तुम्हाला थोडे चालावेच लागेल. बसमध्ये बसलो प्रवासी थोडेच होते एकाच्या मदतीने कुठे जायचे आहे ते ड्रायव्हरला सांगितले. बस पंधरा मिनिटे पळाली रस्त्यावर शुकशुकाट होता यावेळी खरे सांगायचे म्हणजे मनाला कातरतेचा स्पर्श झाला रस्त्यावरच्या मोठ्या खुणा मी पाहात होतो शेवटी एका कोपऱ्याला बस थांबली ग्रँड हॉटेलकडे कसे जायचे हे ड्रायव्हरने खुणेने सांगितले यावेळी रात्रीचे अकरा वाजले होते

सामान घेऊन निघालो. दहा मिनिटे चाललो ग्रँड हॉटेल आले तिथे चौकशी केली रविवारपर्यंत जागा भरलेल्या आहेत असे मॅनेजरने सांगितले मग राहण्याची सोय कोण करेल असे डॉक्टरने विचारल्यावर मॅनेजर म्हणाला, 'पलीकडे टुरिस्ट ऑफिस आहे ते चोवीस तास उघडे असते तिथे चौकशी करा' डॉक्टरने तिथे जाऊन चौकशी केली पण नकारच लागला मग मी गेलो नि तिथल्या बाईला म्हणालो, 'मुंबईहून आम्ही टेलेक्स पाठविले होते जागा नाही असे उत्तर पाठवायचे नकार आला असता तर आम्ही वॉर्साला आलो नसतो पण तुमच्याकडून या क्षणापर्यंत उत्तर आलेले नाही आता रात्री साडेअकरा वाजता आम्ही कुठे जाणार ? एकटा असतो तर रस्त्यावर झोपलो असतो असा प्रवास मी १९५२ मध्ये केला आहे. पण माझ्याबरोबर दोन डॉक्टरणी आहेत. त्या काय करतील ? एक खोली

मिळाली तरी आम्ही भागवून नेऊ तुम्ही दूरध्वनी करा जागा मिळाली नाही तर कार्यालयात थाबू ते चोवीस तास उघडे असते.'

मग त्या बाईने दोनचार ठिकाणी दूरध्वनी लावले. शेवटी एका हॉटेलात एक खोली होती तिने पत्ता दिला बाहेर आलो पण टॅक्सीवाला येईना तेव्हा डॉक्टरने ग्रँड हॉटेलच्या द्वारपालाला टॅक्सी बोलवण्यास सांगितले त्याने त्याच टॅक्सीवाल्याला बोलविले त्याची शब्दाशब्दी झाली पण साम्यवादी राज्यातला द्वारपाल राज्यपालाच्या लायकीचा असतो आता त्याचे रागाचे बोलणे सपून थोडे हसत सभाषण झाले त्यावरून मी तर्क केला की, द्वारपाल म्हणाला, 'कितीही पैसे घे पण याना तुला न्यावे लागेल ' कदाचित ते चूक असेल पण टॅक्सीवाल्याने हॉटेलपाशी आणून सोडल्यावर मागितलेले पैसे अवाच्या सव्वा होते पण रात्री बारा वाजता झगडणार कसे ? आणि सहाय्य कोणाचे मिळणार ? तेव्हा पैसे चुकते केले प्रवासातही थोडे द्रव्य नुकसानीपोटीच घालावयाचे असते इथल्या बाईने पासपोर्ट घेतले खोली दाखविली आणि ती सकाळी खाली करून पाहिजे असे बजावले रात्रीच्या राहण्याचा प्रश्न सुटला असल्याने आम्ही निश्वास सोडला

सकाळी लवकरच न्याहारीसाठी गेलो तिथल्या मुलीला भाषा समजेना मग हवे ते पदार्थ बोटाने दाखवून घेतले न्याहारी आटोपल्यावर पैसे भरले नि सामान घेऊन बस स्टॉपकडे आलो. आता उजाडले असल्याने टॅक्सी लागणार नव्हती. पण बसची तिकिटे लागणार होती तेव्हा चौकशी करीत एक दुकान गाठले तिथे गर्दी होती पण आम्हाला पाहून लोक थोडे बाजूला झाले मग बसची एक डझनभर तिकिटे घेतली शिवाय सिगरेटी नि फराळासाठी म्हणून बिस्किटे घेतली नतर बसने आम्ही ग्रँड हॉटेलवर आलो तिथे परिस्थितीत बदल नव्हता म्हणून टूरिस्ट ऑफिसमध्ये गेलो तिथे हॉटेले नि खाजगी घरे यात कुठेही जागा नाही असे सांगण्यात आले आता काय ?

---

वॉर्साला पुन्हा येण्याची शक्यता कमी होती तेव्हा जास्त खर्च झाला तरी चालेल पण मोठ्या हॉटेलात राहावयाचे असे ठरवून मी मेट्रोपोलकडे आलो डेस्ककडे जाऊन चौकशी केली. तिथला मनुष्य म्हणाला, 'रविवारपर्यंत भरलेले आहे ' 'आणखी कुठे चौकशी करू ? ' मी विचारले 'पलीकडच्या फोरममध्ये करा,' त्याने उत्तर दिले तिथे गेलो तर डेस्कपासला इसम वर पाहायला तयार नव्हता माझ्या प्रश्नाला त्याने एका शब्दात उत्तर दिले 'फुल' 'आणखी कुठे चौकशी करू ?' 'पोलिनियात जा' तिकडे जाण्यास निघालो तेव्हा दरवाज्यापाशी दोन बायका भेटल्या त्यातल्या एकीने मला विचारले, 'स्लीप ?' मी म्हणालो येस' 'इट ?' तिने विचारले 'येस, हौ मच ?' मी पृच्छा केली तिने तळहातावर प्रत्येकी तीस डॉलर्स असे लिहिले मी म्हणालो 'मच तिने हॉटेलकडे बोट दाखविले नि म्हणाली, 'चौकशी कर ' दहा मिनिटांत उत्तर देतो असे तिला सांगून

मी डॉक्टरकडे आलो. ती झेक टुरिस्ट ऑफिस शोधत होती तिला त्या पोलिश-बाईची ऑफर सांगितली नि विचारले, 'काय वाटते ?' तिने मला तोच प्रतिप्रश्न केला. शासनाच्या परवानगीशिवाय खाजगी घरात राहायला जाणे किती शहाण-पणाचे आहे याचा मला प्रश्न पडला मी परत आलो, नि त्या बाईला विचारले, 'सरकारी परवाना आहे ?' तिने वही दाखविली तिच्या घरी जाण्याचा मी निर्णय घेतला. टॅक्सीने घरी जावे लागेल असे ती म्हणाली 'ती तूच ठरव,' असे मी तिला सांगितले तिने दोन टॅक्सीवाल्याना थांबवले पण त्यानी नकार दिला मग एक खाजगी मोटर आली. त्याने जास्त भाडे मागितले अखेर एक टॅक्सी थांब्यापाशी येताच मारिआ– हे तिचे नाव होते– त्यात बसली मी तिला म्हणालो, 'वन मॅडम, बगाझ, ग्रँड हॉटेल,' ती समजली, नि टॅक्सी तशी वळविण्यात आली ग्रँड हॉटेलपाशी डॉ सौ देशमुखाना घेतले टॅक्सीत सगळे सामान ठेवले नि पधरा मिनिटांनी आम्ही मारिआच्या निवासस्थानी आलो

तीन लहान खोल्या नि स्वयपाकघर असा हा तळ मजल्यावरचा फ्लॅट होता उपनगरामध्ये ज्या उत्तमोत्तम वसाहती बाधल्या जात होत्या त्यातल्या एका इमारतीत हा फ्लॅट होता या इमारती दहा मजली होत्या काही वसाहतीत मध्यभागी उद्यान किंवा क्रीडागण असे येथे सायकाळी लोक बुद्धिबळे खेळत किंवा मुले फूटबॉल खेळत अशा वसाहतीत माझा निवास होईल असा अस्पष्ट विचारही माझ्या मनाला कधी शिवला नव्हता ! माणसाला त्याचे दैव केव्हा नि कुठे नेईल हे सागणे कठीण ! सामान खोलीत ठेवल्यावर गावात कोणत्या बसने जायचे याची मारिआकडून माहिती घेतली आणि त्या बसने गावात फेरफटका करण्यासाठी परत आलो

वॉर्सा–पोलिश भाषेत वॉर्झावा–ही पोलडची दुसरी राजधानी तत्पूर्वी तो मान क्रॅकॉव्हला होता आजही क्रॅकॉव्ह मोठे सास्कृतिक केंद्र समजले जाते. राष्ट्रीय अभिमान सर्वच युरोपीय देशांत प्रखर असतो पण पोलिश लोकाचा राष्ट्रीय अभिमान काही विलक्षणच आहे म्हणूनच स्टॅलिन एकदा म्हणाला होता, 'साम्यवाद पोलिश लोकाना मानवणार नाही ते लोक फारच व्यक्तिनिष्ठ नि राष्ट्रवादी आहेत' दुर्दैवाने राष्ट्र म्हणून त्यांच्यावर कोसळलेले प्रसगही भयानक आहेत

पोलड हे नाव पोलिअन्स–शेतात खपणारे–या एका स्लाव्ह जातीच्या नावा-वरून पडले असावे असा एक तर्क आहे दहाव्या शतकापासून या देशाचा, पोलड या अभिधेने ज्ञात असलेला इतिहास आपल्याला मिळतो पहिला मिएसझको याच्या राजवटीत पोलडने कॅथॉलिक सप्रदाय स्वीकारला, नि सास्कृतिक दृष्टीने पोलडची पश्चिम युरोपीय देशाशी नाडी बाधली गेली तेराव्या शतकात तार्तर लोकाच्या पोलड-हगेरी या देशावर स्वाऱ्या सुरू झाल्या पण पोलिश लोकांना तार्तर टोळ्याना हाकलण्यात यश मिळाले सोळावे शतक हे पोलडच्या दृष्टीने सुवर्णयुग होते

या शतकामध्ये आर्थिक नि सांस्कृतिक विकासाला या देशात विलक्षण भर आला होता

आता नियतीचे चक्र फिरले पोलंडच्या दुर्दैवाला सुरवात झाली सन १७७२ मध्ये पोलंडचे रशिया, प्रशिया नि ऑस्ट्रिया या देशांनी लचके तोडले अमेरिकन क्रांतीमध्ये वॉशिंग्टनचा सहकारी असलेला पोलिश नेता थॅडिअस कोसचिअस्को मायदेशी परत आला त्याने स्वातंत्र्ययुद्ध सुरू केले पण अखेरीस ते मोडले गेले १७९५ मध्ये पोलंडची पुन्हा विभागणी झाली त्या देशाला आता नकाशातही स्थान उरले नाही पोलिश लोकांनी रशिया, प्रशिया नि ऑस्ट्रिया या देशाविरुद्ध उठाव केले. पण ते सगळे फसले रशियन स्वामित्वाखालच्या प्रदेशात पोलिश भाषा बोलण्यास बंदी आहे अशी शाळेच्या भिंतीवर सूचनापत्रके असत जर्मन विभागात सर्व प्रकारे लोकांचे जर्मनीकरण चालू होते पण अशा अत्यंत प्रतिकूल परिस्थिती-तही पोलिश लोकांनी आपला राष्ट्रीय अहंकार जागृत ठेवला आणि पहिल्या महा-युद्धाच्या अखेरीस पोलंड स्वतंत्र राष्ट्र म्हणून जगापुढे आले

पण त्यांना स्वातंत्र्याचा उपभोग जेमतेम वीस वर्षे घेता आला सन १९३९ मध्ये हिटलरच्या सैन्याने पोलंड पादाक्रांत केला आणि पुढील सहा वर्षे पोलिश लोकांना भयंकर अपेष्टांतून जावे लागले वॉर्साची लोकवस्ती तेरा लाख होती त्यातले सात लाख लोक युद्धकाळात मारले गेले (मारिआच्या कुटुंबातले बहुतेक लोक मारले गेले अगदीच लहान असल्याने आपण वाचलो, असे ती म्हणाली ) इतकेच नाही तर वॉर्सा जवळजवळ जमीनदोस्त झाले वॉर्साला पहिला चटका सप्टेंबर १९३९ मध्ये जर्मन वेढा पडला तेव्हा लागला तोफांचा मारा नि विमान-हल्ले यांमुळे वॉर्साचा दहा टक्के भाग नष्ट झाला. वॉर्सात जर्मन शासन असताना त्यांनी गावातील ज्यू लोकांना एका विशिष्ट भागात डांबले या भागाला वॉर्सा घेटो हे नाव होते चार लक्ष ज्यूंना जेव्हा कॉन्सन्ट्रेशन कँपमध्ये नेण्यात आले तेव्हा राहिलेल्या ज्यूंनी बंड केले. ज्यू नि जर्मन सैनिक यांच्यांत सुमारे महिनाभर शस्त्र संघर्ष झाला. त्यात वॉर्साचा हा सगळा भाग बेचिराख झाला आता तिथे एक स्मारक उभारलेले आहे १९४४ मध्ये पोलिश भूमिगत सैन्याने वॉर्सात बंडाचे निशाण उभारले त्यावेळी त्रेसष्ट दिवस तुंबळ लढाई झाली यात पोलिश सैन्याचा पराभव झाला नि जर्मन सैन्याने राहिलेल्या वॉर्सातले घर नि घर उद्ध्वस्त केले एक चित्र असे आहे की, त्यात चर्च नि क्षितिजापाशी दिसणारी दोन-पाच घरे वगळली तर जळलेल्या झाडाशिवाय काहीच उभे दिसत नाही पोलंडच्या स्वातंत्र्यलढ्याच्या किंमतीची कल्पना पुढील गोष्ट देईल वॉर्सात उठाव झाला रात्री तोफमारा चालला असताना एक लॉरी थांबली तीमधून एक अधिकारी बाहेर आला पलीकडे एक मुलगी हातात मूल घेऊन जात होती. तिच्याबरोबर तीन वर्षांचा पोरगा होता 'तुम्ही येथे काय करताय ? तुमचे आईवडील कुठे आहेत ?' अधिकाऱ्याने विचारले.

'काही वेळापूर्वी बाँब हल्ल्यात ते मारले गेले' 'तुम्ही कुठे जात आहात?' अधिकाऱ्याने पृच्छा केली 'त्याच बाँबने माझ्या भावाचा हात तोडला मी त्याला हॉस्पिटलमध्ये नेत आहे,' मुलगी म्हणाली 'तुझं वय काय?' 'सहा पण माझ्या भावाचा हात पुन्हा येईल ना? तो भक्कम पोरगा आहे' मुलीने विचारले अधिकाऱ्याच्या डोळ्यात अश्रू झाले त्याबरोबर ती मुलगी म्हणाली, 'रडू नका माझ्या भावाचा हात निश्चित येईल' वाचकाच्या डोळ्यात कथा वाचून अश्रू आले नाहीत तरच आश्चर्य सपूर्ण नष्ट झालेले हे वॉर्सा पुन्हा कसे उभे करावयाचे? एका साम्यवादी नेत्याने पोलडची राजधानी लोड्झला न्यावी असे सुचविले पण ती सूचना अमान्य होऊन वॉर्साचीच पुन्हा उभारणी करण्याचा निर्णय साम्यवादी शासनाने घेतला मग कामाला सुरवात झाली यावेळी बहुसख्य लोकांनी श्रमदान केले मन्त्रिमडळातील सदस्यानीही रविवारच्या दिवशी श्रमदान केले समाजवादाची माळ जपणाऱ्या भारतातल्या मन्त्र्यानी असे काही केल्याचे ऐकिवात आहे काय? वॉर्साचे ध्येयवाक्य आहे 'डिफाइज द स्टॉर्म्स' वरचा इतिहास वाचल्यावर ते यथार्थ नाही असे कोण म्हणेल?

पोलडचे शासन साम्यवादी आहे देशात भूमीवाटप झाले असून १९.२ दशलक्ष हेक्टर भूमीपैकी १५ २ दशलक्ष हेक्टर भूमी व्यक्तिगत मालकीच्या क्षेत्रात आहे बाकीची भूमी सहकारी नि सामुदायिक क्षेत्रात आहे सात ते पधरा वर्षांपर्यंत शिक्षण सक्तीचे नि विनामूल्य आहे मारिआने सांगितले त्यावरून वैद्यकीय सोयी विपुल नि विनाशुल्क आहेत ८० टक्के लोक चर्चमध्ये जातात लुब्लिनला चर्चची युनिव्हर्सिटी आहे शिवाय इतर साप्रदायिक शाळा आहेत या सर्वांत मुलाना धार्मिक शिक्षण मिळते

वॉर्साच्या राजमार्गावरून हिंडताना या नगराचा तीस वर्षांपूर्वी विध्वस झाला होता असे वाटत नाही प्रचड मोठ्या इमारती, उत्तुग हॉटेले, उत्तम बसगाड्या नि ट्रॅमगाड्या, छानदार कपड्यातले लोक, चागल्या फराळाची रेस्टॉरंट नि अनेक प्रकारच्या वस्तूनी भरलेली दुकाने आपल्याला आढळतात परतु 'स्टारे मिॲस्टो' ही जागा कायम लक्षात राहील हा भाग जुन्या वॉर्साचा तिकडे जाण्याचा मार्ग एका छोट्या गल्लीतून असून त्या गल्लीतच वॉर्सातले जुने सेंट जॉन कॅथिड्रल आहे बाँब हल्ल्यात त्याचा बराचसा भाग कोसळला. खाली पडलेली मोठी घटा एक स्मारक म्हणून कोपऱ्यात ठेवलेली आहे तसेच चर्चच्या भिंतीचे दगड नि विटा वगैरे वस्तू तिथे अवशेष म्हणून ठेवलेले आहेत येथून पुढे गेले की, मध्यभागी चौक येतो त्याच्या भोवताली घरे असून त्यात दुकाने आहेत जुन्या शहरातून जसे गॅस किंवा रॉकेलचे दिवे आढळतात तसे खाबावरचे किंवा भिंतीला लावलेले दिवे इथे आहेत चौकात फुलाची, फळाची, आईस्क्रिमची दुकाने होती एका कोपऱ्यात खुर्च्यांवर बसून लोक शीतपेय पीत होते घोड्यांच्या गाड्या येत होत्या प्रवाश्यांची गर्दी होती.

या घरांची काढलेली चित्रे येथे विकत मिळत होती मध्यभागी पाण्याचा जुना पंप होता तर पलीकडे दाण्याची प्रतिक्षा करीत बसलेला कबुतरांचा थवा होता



स्टारे मिअॅस्टो चौकातील पाण्याचा जुना पप उजवीकडे लेखक

तुम्ही म्हणाल की, गावासारखा गाव, त्यातलाच हा भाग त्याची नवलाई काय ? नवलाई हीच की, हा सगळा भाग जमीनदोस्त झाला होता पोलिश लोकाची राष्ट्रीय अस्मिता इतकी प्रखर की, त्यानी तो भाग जसा होता तसा बाधून काढला अठराव्या शतकातला इटालिअन चित्रकार अँटोनिओ कॅनॅलेटा याने काढलेल्या गावाच्या चित्राचा तसेच जगभर पसरलेल्या पोलिश लोकांकडे असणाऱ्या चित्राचा त्यासाठी उपयोग करण्यात आला परपरा जिवत ठेवण्याचा हा पोलिश प्रयत्न कौतुकास्पद नि अनुकरणीय आहे आणखी एक गोष्ट वॉर्सा उठावात जी माणसे मारली गेली त्यांची छोटी स्मारके घराच्या भिंतीत स्मृतिशिला बसवून केलेली असतात आणि तिथे लाल रगाची फुले असतात शिला नसेल तिथेही लाल रगाची फुले ठेवण्यात येतात

वॉर्सामध्ये अनेक उत्तम उद्याने आहेत तिथल्या शासनाने त्याच्या धर्मशाळा होऊ दिलेल्या नाहीत लाझिएकी हे दाट झाडीचे उद्यान असून तेथेच राष्ट्रपतिनिवास आहे थोडे आत गेले की, शोपीन या सगीतकाराचे स्मारक येते जर्मनानी ते नष्ट केले होते, पण ते पुन्हा बाधण्यात आले येथे ग्रीष्म ऋतूत सगीताच्या मैफली

होतात तेराव्या शतकातले नि सतराव्या शतकातले असे जुन्या वॉर्साचे दोन भाग आहेत. हा भेद दाखवणारी भिंत नदीकडून दिसते युद्धाचे चटके येथील वस्तीलाही बसले पण टिकलेली घरे सुबक असून त्यांची रचना शॅटोसारखी आहे घरे कोसळ-लेल्या भागात दगडी चौथऱ्यावर हातात खड्ग नि ढाल घेतलेल्या सायरेनचा पुतळा आहे

रेडिअमचा शोध लावणारी मादाम क्युरी, नेपोलिअनची प्रेयसी मेरी वॉलेवॉस्का, संगीतकार शोपीन, पृथ्वी सूर्याभोवती फिरते या शोधाचा जनक कोपर्निकस—हे सर्व पोलिश कोपर्निकसचेही स्मारक असून त्याच्या नावाची वैज्ञानिक संस्था स्मारकाजवळच आहे मादाम क्युरीचा जन्म ज्या घरात झाला तेही अभिमानाने दाखविण्यात येते याच भागात स्वत क्रॉस नेत आहे असा ख्राइस्टचा पुतळा मी पाहिला यापूर्वी मी असा पुतळा पाहिला नव्हता

स्टारे मिॲस्टोकडे जाणाऱ्या रस्त्याच्या अलीकडे हॉटेल इंटर-कॉन्टिनेंटल नि युरोपेजस्की याच्यासमोर मोठे मैदान असून त्यात ‘द टूम ऑफ द अज्ञोन सोल्जर’ आहे. येथे रविवारी सकाळी परेड झाली ती पाहण्यासाठी पोलिश लोकाप्रमाणे असंख्य प्रवासीही उभे होते भूदल नि वायुदल यातील शानदार लष्करी पेहराव घातलेल्या दोन तुकड्या होत्या प्रचलन करताना एका विशिष्ट जागी तुकडी आली की, सेनानी आदेश देई त्याबरोबर सैनिक बुटाचे नाल जोरात आपटून चालत नि त्याचा ‘राप राप’ असा विशेष आवाज होई सैनिकांची चालण्याची पद्धत ‘गुज स्टेप’ची असून त्यावेळी बॅंडवर वाजलेले संगीत रोमांच उभे करणारे होते

नोरोडावे नि वाइस्का पोल्स्किगो हे दोन म्युझियम पाहावे अशी मारिआने शिफारस केली होती. पहिला चित्रकलेचा म्युझियम आहे यातील कोवास्कीची निसर्गचित्रे, सिमिराड्झी पिक्सचे ‘कापलेला बैल, त्याला बांधलेली कुमारिका नि भोवतालचे निग्रो गुलाम’ हे भव्य चित्र, सिमेर जोसेफचे ‘निद्रिस्त बाई’, आर्टुर ग्रोटगेरचे ‘डोंगरावर चढणारे घोडेस्वार नि तिथल्या गुहेतील दिसणारा दिव्याचा लालसर उजेड’ हे मोठे चित्र, मारूम झालेस्कीचे ‘वॉर्सा चर्च’, ग्राग्लेवस्कीचे ‘वादळात सापडलेली नाव, जवळच्या खडकावर तिला ओढणारी माणसे, शिडावर चढलेला मनुष्य’ — ही सर्व लक्षात राहातात जोसेफ शेल्मॉंस्कीची पोलिश निसर्ग चित्रे — बर्फातील घरे, नुसते घोडे, झोपलेला गुराखी, त्याचा कुत्रा नि गुरे — छान आहेत हिमऋतूतले बर्लिन हे ॲना वोहर्डॅनोव्हिझचे छोटे चित्र लक्षणीय आहे घाईने शिपाई घोड्यावर बसत आहेत हे जोसेफ ब्रॉडचे अलार्म चित्र नि अल्फ्रेड कोवाल्स्कीचे स्लेज उत्तम उतरली आहेत

प्राचीन चित्रे कशी दुरुस्त केली जातात याची येथे दोनतीन ठिकाणी प्रात्यक्षिके ठेवलेली होती ॲंटाव्ह निकोक्लेस्लोनीचे सतराव्या शतकातले एक चित्र होते. त्याचेच पधरा फुटाचे मोठे चित्र तयार करण्यात आले, आणि त्यावरून पुन्हा

जुन्या चित्रात जो नादुरूस्त भाग होता तो दुरूस्त केला जाणार होता दुसऱ्या ठिकाणी 'टचअप टेक्निक'चे प्रात्यक्षिक होते याशिवाय लाकडात कोरलेली ख्रिस्ताच्या जीवनावरची रंगीत चित्रे, दगडी पुतळे, इजिप्शिअन ममी वगैरे गोष्टी येथे होत्या

दुसरा म्युझिअम शस्त्रास्त्राचा होता येथे प्रवेशद्वारी लेनिनचा पुतळा आहे त्यानंतर अनेक प्रकारच्या तोफा, रणगाडे, सैनिकवाहू गाड्या, जर्मन विमाने, बॉंब-गोळे, वगैरे भिन्न प्रकारची शस्त्रे आपल्याला पाहायला मिळतात या गोष्टीचे लहान मुलांना विशेष आकर्षण असते इथेही तोफा, रणगाडे याच्यासमोर उभे राहून मुले स्वत:ची छायाचित्रे काढून घेत होती

वॉर्साहून क्रॅकॉव्हला जाण्यासाठी मी दोन दिवस मुद्दाम ठेवले होते. पण वॉर्सात राहण्यासाठी केलेल्या पळापळीमुळे सगळा उत्साह तपला होता क्रॅकॉव्हला राहण्याची अडचण आली नि परतीची गाडी वेळेवर मिळाली नाही तर काय, हा प्रश्न अस्वस्थ करणारा असल्याने क्रॅकॉव्हला जाण्याचा बेत रद्द करून मी पोलंडला रामराम करण्याचे ठरविले

●

# ७. प्राग

साम्यवादी देशांतल्या प्रवासाचा सहावा नि शेवटचा टप्पा प्राग होता डॉ सौ जोगळेकर नि डॉ सौ. देशमुख यांना प्रागमधले इस्पितळ पाहावयाचे होते, तसेच तिथल्या सशोधनासबधी माहिती घ्यावयाची होती त्यामुळे इथला मुक्काम थोडा प्रदीर्घ होता प्रागमधल्या हॉटेलची व्यवस्था आधी झालेली होती शिवाय त्या देशात रुपयाचे चलन चालणार होते त्यामुळे मनाला थोडी निश्चिती होती

सोमवारी दिनांक १३ला सकाळी बसने वॉर्साच्या सेंट्रूमकडे आलो तेथून झेक एअरलाईन्सच्या कार्यालयाकडे चालत पोहोचायला वीस मिनिटे लागली. पाऊस झिमझिम पडत होता नि थडी खूप होती आलो तेव्हा कार्यालय बद होते तेव्हा मधल्या वेळात 'टूम ऑफ द अन्नोन सोल्जर' हा जवळ जाऊन पाहिला नऊच्या सुमारास झेक एअरलाईन्सच्या कार्यालयाकडे आलो, आणि उड्डाण बदलून आजचे करून हवे असे सांगितले त्यांनी प्रागकडे चौकशी केली तिकडून पृच्छा झाली ' चार तिकिटे आहेत, तीन प्रवासी कसे ? डॉ देशमुख प्रागला स्वतत्रपणे येत आहेत असे मी उत्तर दिले मग तिथल्या बाईने तिकिटे बदलून दिली मी नि श्वास सोडला बाहेर येऊन १७५ क्रमांकाची बस घेऊन सेंट्रूमकडे आलो. तेथून 'जे' बस घेऊन मारिआच्या घरी आलो हिशेब चुकता केल्यावर चहा झाला मग तिचा या दोघीबरोबर फोटो घेतला नतर सामान घेऊन बस थांब्यावर आलो. पावसाने जरा जोर धरला होता 'जे' बसने सेंट्रूमकडे आलो नि १७५च्या थांब्याकडे जाताना पावसात बरेच भिजलो शेवटी बस आली आणि आम्ही एक वाजता विमानतळावर आलो

एक दिवसाचा मुक्काम कमी झाल्याने बाकी राहिलेले बरेच चलन बदलून घेतले तरीही जे थोडे राहिले त्याचा उपयोग सिगरेट घेण्यात केला पण इथल्या बाईने हिशेबात एक नाणे जास्त घेतले सामान तपासणीच्या वेळी काय वस्तू नेत आहात असा कस्टम अधिकाऱ्याने प्रश्न केला 'खरोखरीच नेण्यासारखे येथे काही आहे काय ?' असा प्रश्न माझ्या जिभेवर आला होता पण त्याला गमतीचा प्रश्न आवडला नाही तर पचाईत! म्हणून 'काही नाही' असे उत्तर देऊन मी पुढे सरकलो आत लाउजमध्ये कु अकलेश्वरिया नावाच्या बाई भेटल्या त्या व्यवसायाने वकील होत्या भारतीय माणसे भेटली याचा त्याना विशेष आनद झाला गप्पा मारताना त्या म्हणाल्या, 'हिंदुस्थानवर आपण कितीही टीका केली तरी तोच देश एकदरीत बरा वाटतो' या विधानाशी सहमत व्हायला मला अडचण दिसत नाही.

साडेचारला विमान सुटले तेव्हा झिमझिम पाऊस पडत होता थंडी मात्र

खूप होती काही क्षणातच विमान ढगात शिरले त्यामुळे खालचे चित्र अदृश्य झाले विमान आता ढगांच्या वर आले सूर्यप्रकाश लख्ख होता त्याची किरणे या पांढऱ्या ढगावर पडून त्यांना हिमप्रदेशाचे रूप आले अर्ध्या तासानतर ढगाचे आच्छादन कमी होऊन खालचा प्रदेश थोडाफार दिसू लागला यानतर काही वेळ गेला नि खाली टोलेजग इमारती, मोठी नदी, विस्तृत हिरवी शेती दिसू लागली काही शेतात कापणी झालेली होती

विमान जमिनीवर टेकले तेव्हा साडेपाच वाजून गेले होते पासपोर्ट तपासणीच्या ठिकाणी डॉक्टरला चलन मोडण्याची सूचना मिळाली तेव्हा त्या दोघींनी रुपयाचे चलन बदलून क्राउन्स घेतले डॉक्टर पुढे सरकल्यावर मी 'पासपोर्ट दिला' त्याच्याबरोबरच्या कागदावर चलन मोडल्याचा उल्लेख नव्हता तेव्हा मला चलन मोडण्याची सूचना मिळाली आमचे हॉटेल बुकीग झालेले आहे, नि माझ्या पत्नीने बरेच चलन बदलून घेतले आहे तेव्हा मी आणखी मोडण्याची काय आवश्यकता आहे,' असे विचारले यावर काही डॉलर्स मोडावे लागतील असे सांगण्यात आले तेव्हा दहा डॉलर्स मोडले डॉ आनदराव देशमुख चार दिवसानी आले त्याचा व्हिसा दहा दिवसाचा होता त्याना शभर डॉलर्स मोडा असे सांगण्यात आले डॉ सौ देशमुखनी बरेच चलन बदलून घेतलेले असणार या समजुतीवर त्यानी तीन दिवसांसाठी तीस डॉलर्स मोडले पासपोर्ट तपासणाऱ्याने व्हिसा तीन दिवसाचा केला तो वाढवून घेण्यासाठी आम्हाला पळापळ करावी लागली

मी बाहेर आलो तेव्हा डॉक्टर मोठी बॅग घेऊन आली होती हॉटेलच्या चौकशीस जाताना तिला एका जागी बॅगा पडलेल्या आढळल्या. त्यात आमची बॅग होती म्हणून तिने चौकशी केली तिथली बाई म्हणाली, आधी बॅगा उचला कारण उद्या ती मुबईला रवाना होणार आहे ' फॉर्म कुठला भरू ?' डॉक्टरने विचारले ''फॉर्म वगैरे काही भरायचा नाही बॅग तुमची आहे, ती घेऊन जा

बॅग हरवली असता प्रवाशाला पचवीस डॉलर्स तात्पुरत्या खर्चासाठी नियमाप्रमाणे द्यावयाचे असतात सोफियात ते आम्हाला मिळाले नव्हते प्रागमध्ये झेक एअरलाईन्सकडे द्रव्याची मागणी केली तेव्हा ही जबाबदारी एरोफ्लोटची आहे असे आम्हाला सांगण्यात आले एरोफ्लोटमध्ये मागणी केल्यावर दोन दिवसानी झेक नाण्यात त्यानी पैसे देण्याची तयारी दर्शविली पण डॉलर्स खर्च केले असल्याने डॉलर्स हवे असे आम्ही सांगितले तिथले अधिकारी म्हणाले, 'तसे डॉलर्स देता येणार नाहीत' 'मग ते कुठे मिळणार ?' लडनमध्ये प्रयत्न करा असे त्यानी सुचविले शेवटी लडनमध्ये थोड्या प्रयत्नानतर दहा पाउड मिळाले चार दिवसानी डॉ देशमुख आले माझी बॅग गेल्याचे कळल्यावर माझ्या मुलीने कपडे, औषधे, ब्रश, वगैरे भरून एक छोटी बॅग त्याच्याबरोबर पाठविली ही आणखी एक बॅग मला पुढे सहा आठवडे उचलावी लागली

वॅगचा अध्याय संपला होता तेव्हा हॉटेलची चौकशी केली आमचे बुकींग असले तरी आम्ही दोन दिवस आधी आलो होतो पण हॉटेलात जागा होती फक्त 'डिलक्स' खोल्या घ्याव्या लागतील असे तिथली बाई म्हणाली हे काम महागडे होते पण आता रुपयाचे चलन चालत होते तेव्हा फार तक्रार न करता आम्ही खोली घेतली. अर्थात तक्रारीचा उपयोग झाला असता असे नाही हॉटेलच्या पायथ्यापर्यंत जाणारी क्रमांक ७ ची बस होती नि भाडे अगदी स्वस्त प्रत्येकी सहा क्राउन म्हणजे एक डॉलर, किंवा सहा रुपये. फक्त सर्वांचे सामान बसमध्येच ठेवण्यात आले त्यामुळे बसताना सर्वांची अडचण झाली हाच केवळ त्रास!

हॉटेल इंटरनॅशनलची इमारत मोठी उंच असून गावाच्या एका बाजूला आहे त्याच्यासमोर २६ क्रमांकाच्या ट्रॅमचा अखेरचा थांबा असून या स्थानका-भोवती रंगीत फुलांची छोटी वाटिका होती स्थानकाला लागूनच दोन छोटे किऑस्क होते एकात वृत्तपत्रे, ट्रॅमची तिकिटे, सिगरेट, वगैरे वस्तू मिळत दुसऱ्यात हॉट डॉग्ज्, बीअर नि इतर शीत पेये मिळत. ट्रॅम केव्हाही मिळे नि गावात जाण्याचे ते स्वस्त वाहन होते या ट्रॅमच्या प्रवासासाठी बरीच तिकिटे आम्ही आधी खरेदी करून ठेवली हॉटेलच्या खोलीत सामान लावल्यावर आंघोळ करून नवीन कपडे घातले नवीन कपड्यांचा स्पर्शही इतर काही स्पर्शांसारखा सुखावह असतो

झेकोस्लोव्हाकिया या देशात झेक नि स्लोव्हाक हे दोन स्लाव्ह वंशाचे प्रमुख समाज असून त्यांच्या भाषाही स्लाव्ह गटाच्या आहेत पाचव्या शतकात स्लाव्ह वंशाच्या काही टोळ्यांनी या प्रदेशात वसाहत केली झेक लोकांच्या टोळ्यातील एका टोळीचे नाव होते बोहेमिअन या टोळीच्या प्रमुखाने झेक नि मोरेव्हिअन लोकांना एकत्र करून दहाव्या शतकात बोहेमिआ राज्याची स्थापना केली. या राज्याचा दुसरा राजा व्हॅक्लॅव्ह होता त्याला संतपदाची प्राप्ती झाली आणि तो आता वेन्सेस्लास या नावाने ख्यात आहे पुढे अनेक शतके मध्य युरोपात प्रबल राज्य म्हणून हे बोहेमिअन राज्य गाजले या वंशात चौदाव्या शतकात चौथा चार्लस् या नावाचा राजा झाला त्याच्या राजवटीचा ठसा प्राग नगरावर अजून आहे प्राग-मधले चार्लस् विद्यापीठ त्याने स्थापन केले त्याने शेतीच्या क्षेत्रात सुधारणा केल्या. गरीब लोकांसाठी न्यायालये स्थापन करून त्यात सरदार वर्गाविरुद्ध दावे करण्याची परवानगी दिली सोळाव्या शतकापासून या प्रदेशावर ऑस्ट्रियाचे प्रभुत्व सुरू झाले पहिल्या महायुद्धाच्या अंताला झेकोस्लोव्हाकिया हा नवीन देश निर्माण करण्यात आला पण १९३८ मध्ये हिटलरने त्याला गिळंकृत केले जर्मनीच्या पराभवानंतर तो पुन्हा स्वतंत्र झाला

झेकोस्लोव्हाकिया रशियन सैन्याने मुक्त केला होता त्यामुळे पूर्व युरोपातील इतर देशांत घडले तसे येथेही घडले या देशात थोड्याच काळात साम्यवादी

राजवट सुरू झाली सन १९६८ मध्ये डुबुव्चेकच्या नेतृत्वाखाली प्रागतिक साम्य-वादाचा प्रयोग झाला पण बाह्य दडपणामुळे तो टिकला नाही झेकोस्लोव्हाकिया हा आज पक्का साम्यवादी देश आहे उद्योगाचे राष्ट्रीयीकरण झाले आहे सामुदायिक किंवा सहकारी क्षेत्रात शेतीचा अतर्भाव झालेला असला तरी शेतकऱ्याला स्वत साठी भूमीचा तुकडा ठेवता येतो सहा ते पधरा वर्षांपर्यंत शिक्षण विनाशुल्क असून गणित, झेक, स्लोव्हाक नि रशियन भाषा याकडे विशेष लक्ष पुरविण्यात येते शारीरिक शिक्षणावर अधिक भर असतो या देशातल्या शारीरिक कवाइतीची जगभर ख्याती आहे वैद्यकीय सहाय्य विनामूल्य उपलब्ध आहे चर्चचे नियत्रण करण्यासाठी शासनाचा एक स्वतत्र विभाग आहे. आणि धर्मगुरूचे पगार शासना-कडून मिळतात

पूर्व युरोपातील देशांत झेकोस्लोव्हाकिया सर्व दृष्टचा अधिक प्रगत समजला जातो त्या समाजाची सास्कृतिक पातळी फार वरच्या श्रेणीची आहे कला-दालने, म्युझियम, नाटके, ऑपेरा कॉन्सर्ट्स् याच्याविषयी या समाजाला विलक्षण प्रेम आहे या देशातील पपेट थिएटर्स नि 'व्हौडव्हिल शो' नावाजलेले आहेत चित्रपटाच्या क्षेत्रातील त्याची प्रगती आता जगमान्य आहे लोकाना सगीत नि नृत्य याचा विशेष षोक आहे येथे दर वर्षी वसतऋतूत सगीत समेलन भरते साम्यवादी राजवटीमुळे या हौशीकडे लोकांनी पाठ फिरविलेली दिसत नाही

आलो त्याच्या दुसऱ्या दिवशी सकाळी डॉक्टरने डॉ मिसेस रुथ बित्चोवाला दूरध्वनी केला डॉ रुथ ही डॉ रोटांची कार्यवाह होती तिने हॉस्पिटल पाहणे वगैरेसाठी दिवस पक्का केला नि त्या दिवशी सकाळी हॉटेल इटरनॅशनलवर आम्हाला नेण्यासाठी उपस्थित झाली आम्ही ट्रॅमने नि बसने हॉस्पिटलकडे आलो शासकीय अनुज्ञा आधीच मिळालेली असल्याने प्रवेशास अडचण आली नाही डॉ रोटा हिंदु-स्थानला येऊन गेलेले होते त्यांच्याबरोबर चहा नि गप्पा झाल्यावर डॉ सौ जोगळेकर नि डॉ सौ देशमुख या दोघी हॉस्पिटल पाहण्यास गेल्या मला काम नसल्याने मी बाहेर उद्यानात बसलो त्या दोघींची व्यवस्था लावून थोडचा वेळाने रुथ तिथे आली ती पूर्वी भारतात येऊन गेलेली असल्याने आम्ही काही वेळ जातिसस्था, राजकारण, इतिहास, इत्यादी विषयांवर गप्पा मारीत बसलो हॉस्पिटल पाहून झाल्यावर रुथने आम्हाला कॅन्टीनमध्ये नेले शाकाहारी जेवण साधे पण चागले होते दुपारनतर डॉ रोटांनी ते जे काम करीत आहेत त्याची माहिती दिली, नि ते कसे चालते ते दाखविले

सध्याकाळी रूथबरोबर आम्ही गावाच्या जुन्या भागात हिंडलो याच भागात टाऊन हॉल, टिनचर्च या प्राचीन वास्तू आहेत सन १६२१ मध्ये प्रागमधल्या २७ सामान्य नागरिक नि झेक सरदार याचा येथील चौकात शिरच्छेद करण्यात आला होता येथेच सध्याकाळी लोकनृत्याचे नि शुल्क प्रयोग होतात. टाऊन

हॉलच्या भिंतीवरच प्रसिद्ध अॅस्ट्रॉनॉमिकल क्लॉक आहे बराच वेळ हिंडल्यानंतर आम्ही आइस्क्रीम घेण्यासाठी थांबलो येथे एक देखणी मुलगी माझ्यापाशी येऊन कुजबुजली मी मानेने नकार देत तिचे आभार मानले. रूथने हे पाहिले, नि मला विचारले, 'काय म्हणत होती ?' 'तुला ज्या प्रश्नाची भीती आहे तो तिने विचारला नाही हमरस्त्यावर जे रोज विचारले जाते तेच तिने विचारले डॉलर्स मोडायचे आहेत का ?' रूथ म्हणाली, 'ही लाजीरवाणी गोष्ट आहे.' 'मला तसे वाटत नाही या पूर्वीच्या प्रवासात हा प्रश्न विचारण्यात आला आहे मानवी व्यवहार नेहमीच कायद्याच्या चौकटीत बसू शकत नाहीत ते नदीसारखे निराळा मार्ग शोधतात' मी तिला सांगितले जाण्यापूर्वी शनिवारी किंवा रविवारी तुम्ही माझ्या घरी या किंवा आपण बाहेर हिंडावयास जाऊ असे ती म्हणाली शुक्रवारी रात्री दूरध्वनीवर कार्यक्रम पक्का करू असे मी तिला सांगितले

प्राग—झेक नाव 'प्राहा'—हे खरोखरच रमणीय नगर आहे ते प्रशस्त नि पसरलेले आहे हॉटेलसमोर थांबणाऱ्या ट्रॅमने आम्ही गावाच्या जुन्या भागाकडे आलो हा ट्रॅमचा प्रवास वीस-एक मिनिटांचा होता मार्गाच्या दोन्ही बाजूंना उत्तम घरे नि उद्याने होती पुढे नदी ओलांडली की, व्यापारी विभागाला सुरवात होते पावडर टॉवर या गोथिक रचनेच्या द्वाराच्या अलीकडे आम्ही ट्रॅम सोडली आतापर्यंत साम्यवादी नगरातून जे पाहिले तेच इथे दिसले सर्व प्रकारचा माल दुकानांतून खच्चून भरलेला होता नि त्याला गिऱ्हाईकीही चांगली होती

कुठूनही पाहिली असता डोळ्यात भरणारी वास्तू म्हणजे ऱ्हाडकानी डोंगरावरचा प्राग कॅसल चार्ल्स ब्रीजवर उभे राहिले म्हणजे त्याचे खरे सौंदर्य दिसते व्हल्टावा नदीवर अनेक सेतू आहेत पण त्यांतला चार्ल्स ब्रीज हा सर्वांत जुना नि ऐतिहासिक महत्त्वाचा आहे चौथ्या चार्ल्स राजाच्या कारकिर्दीत तो बांधण्यास सुरवात झाली, नि १५०७ मध्ये तो बांधून पुरा झाला त्याच्या दोन्ही बाजूंना पुतळे असून दोन्ही तोंडांवर संरक्षण मनोरे आहेत पायी किंवा मोटर वा बस या वाहनाने प्राग कॅसलकडे जाता येते या किल्ल्याच्या उभारणीला दहाव्या शतकात जरी सुरवात झाली असली तरी त्याला आजचे स्वरूप चौथ्या चार्ल्सच्या राजवटीत आले किल्ल्यातील राजवाड्याचा मुख्य भाग मॅथ्यू ऑफ आरास या फ्रेंच वास्तुशिल्पीने बांधला आहे या कामासाठीच चार्ल्स राजाने त्याला फ्रान्सहून प्रागला आणले बोहेमिअन राजवंशाचे ते निवासस्थान होते आता तेथे राष्ट्राध्यक्ष राहातात

सेंट व्हिटस कॅथिड्रल हे प्रेक्षणीय आहे. या कॅथिड्रलमध्येच राज्यारोहणाचे विधी होत असत, तसेच राजवंशाची दफनभूमी म्हणूनही त्याचा उपयोग करण्यात आला आहे पूर्वीच्या छोट्या चर्चच्या जागी हे कॅथिड्रल उभारण्याचे ठरवून चार्ल्स राजाने ते काम मॅथ्यू ऑफ आरासकडे सोपले पुढे आठ वर्षांनंतर हे काम पिटर

ऑफ जिमुडकडे देण्यात आले कॅथिड्रलची सपूर्ण उभारणी करण्यासाठी पिटरला पधरा वर्षांचा अवधी लागला पुढील काळात या कॅथिड्रलची बरीच पडझड झाली., तेव्हा या वास्तूचे बाधकाम पूर्ण करण्यासाठी एक सस्था स्थापन करण्यात आली तिने १८६०पासून हे काम हाती घेतले पण ते पूर्ण होण्यास १९२९ साल उजाडावे लागले युरोपमधले एक उत्तम कॅथिड्रल अशी त्याची प्रसिद्धी आहे.

स्ट्रहॉव मॉनस्ट्री हे प्रागमधले आणखी एक आकर्षण आहे प्राग कॅसलकडून एका छोटया रस्त्याने या मॉनस्ट्रीकडे येता येते सोळाव्या शतकात ही मॉनस्ट्री उभी झाली १९५३मध्ये झेक शासनाने ' नॅशनल म्युझिअम ऑफ लिटरेचर ' या सस्थेत तिचे रूपातर केले इथल्या ग्रथालयात १,३०,००० पुस्तके आहेत त्यातले सर्वांत जुने दहाव्या शतकातले आहे सोळाव्या नि सतराव्या शतकातील पुस्तके असंख्य आहेत यांतील अनेक पुस्तके प्रागमधील श्रीमत व्यापाऱ्यानी भेट दिलेली आहेत. वैद्यक, कायदा, धर्मशास्त्र अशा अनेक विषयावरील ही पुस्तके असून त्यातील बहुतेक लॅटिन भाषेतील आहेत अभ्यासकाला ती वाचायला मिळतात आता त्याच्या मायक्रोफिल्म्स होत आहेत आतमधली दोन सभागृहे अत्यत मनोज्ञ असून त्यातले ' फ्रेस्को ' पाहिले म्हणजे कलाकार किती उच्च श्रेणीचे होते याची कल्पना येते येथील एका ' फ्रेस्को 'चा विषय आहे विज्ञान, तत्त्वज्ञान नि वैद्यक ग्रथाचे महत्त्व पटावे, ते इतक्या सख्येत जमा व्हावे ही थोडी नवलाची गोष्ट वाटते पण युरोप जगाच्या पुढे का गेला याचे रहस्यही त्यात आहे ग्रथालयात वरच्या मजल्यावर जाण्यास एक जिना आहे एक मोठी बूककेस दूर केली की तो दिसतो तो जिना खालीही जातो सकटकाळात निसटण्यासाठीची ती युक्ती होती

उच मनोऱ्याची अनेक चर्चे आहेत म्हणून प्राग नगराचे ' सिटी ऑफ हड्रेड स्पायर्स ' असे वर्णन करण्यात येते ऱ्हाडकानी डोंगरावरून कुठल्याही दिशेला पाहिले की, या वर्णनाची सत्यता पटते. नॅशनल म्युझिअम हा वेन्सेस्लास चौकात आहे त्याच्याकडे जाणारा मार्ग विस्तीर्ण असून मध्यभागी ट्रॅमचा रस्ता आहे त्यानतर मोटरीसाठी मार्ग असून त्याना लागून पादचारी पथ आहेत या पथावरच मोठमोठी दुकाने, विमान कपन्याची कार्यालये, वगैरे आहेत म्युझिअमसमोर सेंट वेन्सेस्लासचा अश्वारूढ पुतळा आहे

आत प्रवेश केला की प्रथम पॅथिऑन येतो त्यात झेक राष्ट्रपुरुषाचे पुतळे आहेत त्यात मसरिकचा पुतळा आहे पण त्याचा मुलगा डॉ जॅन मसरिक नि डॉ बेनेस यांचे पुतळे दिसले नाहीत दुसऱ्या विभागात उत्खननात मिळालेले सागाडे, शस्त्रे, भाडी, हडे, हातोडया, सुरे, बांगडया, करवती या गोष्टींचा सग्रह आहे तिसऱ्या विभागात झेक शिल्पकार कॉरेल ओटाहल, बेड्रिच स्टेफन, मिलान नोव्लॉश, जिरी प्राडलेर, लॅडिस्लाव्ह कोझॅक, जिरी सईफर्ट, लुडेक हॅवेलकॉव्ह यांच्या शिल्प-कृतींच्या छोटया प्रतिकृती ठेवलेल्या आहेत

पण किंमती खड्याचा संग्रह हे या म्युझियमचे वैशिष्टय आहे त्यासाठी तीनचार दालने आहेत प्रत्येकात किमती खडे तसेच ते ज्या दगडातून मिळतात किंवा तयार केले जातात ते दगड ठेवलेले आहेत यातल्या बऱ्याच नावांशी मी अपरिचित होतो त्यातल्या त्यात परिचित नावे होती ती म्हणजे टोपाझ, गार्नेट, रूबी, सफायर एका खड्याचे प्रकार तरी किती असावेत ? टोपाझच्या नऊ छटा होत्या नि बेरिलच्या अकरा हिऱ्याचेही निरनिराळे प्रकार काचेच्या कपाटातून माडलेले होते हे मौल्यवान खडे नि दगड उरल, पोलड, श्रीलका नि झेकोस्लोव्हाकिया या प्रदेशातले आहेत इथल्या भिंतीवरच्या सुदर चित्राचा उल्लेख जाता जाता करणे आवश्यक आहे

झेकोस्लोव्हाकिया निसर्गरम्य देश आहे विशेषत· बोहेमिआचा प्रदेश अधिक रम्य असल्याचे मी वाचले होते त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी काही ठिकाणी मुद्दाम सहलीला गेलो प्रथम गेलो ते टाबोर नि हलुबोका या गावाना ही दोन्ही प्रागच्या दक्षिणेला आहेत

प्रागमधून बाहेर पडल्यावर बस अगदी सरळ असणाऱ्या राजमार्गावर धावू लागली मैलोमैल पसरलेली हिरवीगार शेती राजमार्गाला लागून होती आणि दूरवर दाट अरण्ये दिसत होती मधूनच एखादे छोटे गाव लागे ते बहुधा नदीच्या काठी असे त्याच्या भोवताली गर्द झाडी नि रेखीव शेते असत मध्यभागी उच मनोरा असलेले चर्च दिसे इग्लडच्या ग्रामीण जीवनाचे हे चित्र आहे असे या देखाव्यावरून वाटे आता एकाएकी ढगाळले धुकेही आले मधूनच काही क्षण सूर्यदर्शन होई वाटेवर छोटया टेकड्या, सूर्यफुलांची शेते लागली. हवेतला गारवा विलक्षण होता एक तासाने धुक्याचा जोर वाढला वाटेवर हॉस्टिसाव्हचा प्रदेश लागला इथल्या थडी-मुळे त्याला बोहेमिअन सैबेरिया हे नाव आहे सव्वा दहाच्या सुमारास धुके संपले आणि डाव्या हाताला जॉर्डन नावाचे सरोवर दृष्टिपथात आले थोड्याच समयात ऐतिहासिक महत्त्वाचे टाबोर आले

जॉन हुस हा मार्टिन ल्यूथरच्या पूर्वी होऊन गेला त्याचा काळ चौदाव्या शतकातला धार्मिक सुधारणाचा त्याने पुरस्कार केल्यामुळे त्याने चर्चविरुद्ध बड केले आहे असा त्याच्यावर आरोप करण्यात आला नि अखेरीस त्यास जाळण्यात आले. पण त्यामुळे त्याच्या पथाचा बीमोड झाला नाही उलट टाबोरला त्यानी आपले केंद्र स्थापन केले गाव टेकडीवर वसलेले आहे त्याच्या तिन्ही बाजूना लुझनीस नदीचे पात्र असून चौथ्या बाजूला जॉर्डन सरोवर आहे अशा प्रकारे गावाला नैसर्गिक सरक्षण आहे हुस पथीय विलक्षण निष्ठेचे लोक असावेत पोपचा प्रतिनिधी एनास सिल्व्हिअस म्हणाला, ' इटालिअन धर्मगुरूपेक्षा हुसाईट बायकाचा बायबलचा अभ्यास अधिक चांगला आहे.' येथील प्रारंभीचे जीवन जवळजवळ साम्यवादी पायावर आधारलेले होते म्हणजे मिळकत समाईक होती आणखी एक विशेष

म्हणजे धार्मिक विधीत लॅटिनऐवजी झेक भाषेला प्राधान्य देण्यात आले होते त्यामुळेच पुढे झेक राष्ट्रीयत्वाचे नि संस्कृतीचे केंद्र असा या गावाला लौकिक प्राप्त



टाबोर येथील जॉन हुसचे स्मारक

झाला. गाव छोटे आहे नि आत जाण्याचा मार्ग चढणीचा, चिंचोळा नि नागमोडी आहे गावाच्या चौकात हुसचा पुतळा आहे या चौकातील घराबद्दल आता एक कायदा आहे तो म्हणजे त्याचे जुने दर्शनी भागाचे स्वरूप बदलता येत नाही या घराच्या दुरुस्तीचा नव्वद टक्के खर्च झेक शासन करते असे सांगतात की, येथील घरांना तळघरे असून त्यांना एकमेकांशी जोडणारे रस्ते आहेत पाचशे वर्षांपूर्वी संरक्षणाच्या दृष्टीने अशी सोय करणे स्वाभाविक होते

हलुबोकाकडे जाणारा रस्ताही नयनरम्य अशा ग्रामीण विभागातून होता वाटेत छोटे ओढे नि सरोवरे लागली मधेच एकदा बराच वेळ रस्ता पाईन वृक्षांच्या वनातून गेला नंतर लांब अंतरावर टेकडीवरचा हलुबोका शॅटो दिसू लागला मग व्हल्टावा नदी लागली ती ओलांडली, नि बस गावात शिरली हा वाडा प्रिन्स स्वार्झेनबर्गने गेल्या शतकामध्ये तिसऱ्या दशकात बांधला त्याची रचना इंग्लंडमधल्या विंडसर कॅसलच्या धर्तीवर आहे नि त्याच्या भोवताली विशाल उद्यान आहे सन १९४८ मध्ये झेक शासनाने त्याचे राष्ट्रीयीकरण केले स्वार्झेनबर्ग हे लढाऊ परंपरा असलेले सरदार कुटुंब होते. त्या कुटुंबाचा इतिहास सांगणाऱ्या गोष्टींचा येथे प्रामुख्याने संग्रह आहे

मुख्य दालनातून आत प्रवेश करण्यापूर्वी प्रत्येकाला तिथ ठेवलेले स्लिपर्स घालावे लागतात खोल्याची भूमी लाकडाची असल्याने ती खराब होऊ नये यासाठी ही खबरदारी घेण्यात येते गोथिक हॉलची जमीन करताना पाच जातीचे शभर वर्षांचे जुने लाकूड वापरलेले आहे नि आतली 'टॅपेस्ट्री' सतराव्या शतकातली आहे गोल्डन रूममधील टेबलाच्या लाकडावर सोन्याचा मुलामा दिलेला आहे तसेच छतासाठी लाकूड नि कातडे याचा वापर केला असून त्याला सोन्याचे पाणी दिले आहे जॉन हॅमिल्टन याने शिकारी जीवनावरची अनेक चित्रे काढली हे काम तो बारा वर्षे करीत होता त्यातील बरीच चित्रे येथील भितीवर लावलेली आहेत मार्बल हॉल, डायनिंग हॉल, मॉनिंग हॉल, हॉल ऑफ कंडल्स असे अनेक हॉल या वाड्यात आहेत रंगीत चित्रे, कुटुंबातील व्यक्तींचे फोटो, उत्तम फर्निचर, गोबलिन्स, आरशे, चिनी मातीची भांडी, जपानी अँटिक्स, इत्यादींनी ते सजवले आहेत एक हॉल ग्रंथालयासाठी असून त्यात १२,००० पुस्तके आहेत. एका जागी कुटुंबाचे ध्येयवाक्य–मोटो–दिले आहे 'Nothing but right' एकदरीत शॅटो सरदार परंपरेला शोभेल असाच आहे. पण परदेशी प्रवाश्याना तो दाखवावा असे साम्यवादी शासनाला वाटावे हे जरा नवलाचे आहे

ऑलिक नि झिव्हिकॉव्ह ही दोन्ही गावेही प्रागच्या दक्षिणेला आहेत तिथे जाण्याचा मार्ग टाबोरला जाण्याच्या मार्गापेक्षा थोडा निराळा असला तरी निसर्ग-रम्य अशा बोहेमियाच्या ग्रामीण भागातूनच तो जातो सकाळची वेळ असल्याने दूरवरचे डोंगर अजून धुक्यातच होते रस्त्याच्या बाजूला सफरचंदाच्या झाडांच्या रांगा होत्या नि त्यावर विपुल फळे होती शेताच्या कडेला असंख्य निळी फुले फुललेली होती आणि पलीकडे अधूनमधून शेतकऱ्याची नवीजुनी टुमदार घरे दिसत होती एकदर या प्रवासातले हे निसर्गचित्र मोठे रम्य होते नि ते पाहाता पाहता वेळ कसा गेला ते समजले नाही

ऑलिकचा किल्ला टेकडीवर असल्याने गावात शिरण्यापूर्वीच दुरून दिसतो प्रथम जरी किल्ला होता तरी त्याचे पुढे शॅटोत रूपांतर झाले येथेही मुख्य दालना-तून प्रवेश करण्यापूर्वी आपल्याला स्लिपर्स घालावे लागतात स्वार्झेनबर्ग कुटुंबाचा छाप या वास्तूवरही दिसतो त्या कुटुंबातील अनेक जणांची चित्रे येथे लावलेली आहेत. तसेच अनेक वस्तूंचा संग्रहही आहे एका कोपऱ्यात नेपोलिअनचा पुतळा आहे तो त्यानेच भेट दिलेला आहे भितींवर निरनिराळ्या जातीच्या बंदुका ठेवलेल्या असून त्याच्यावर कोणी किती प्राणी मारले याच्या नोंदी आहेत एका जागी पाच बंदुका आहेत त्या नेपोलिअन, झार, मॅटरनिख याच्याकडून भेट आलेल्या आहेत

झिव्हिकॉव्हचा किल्ला बेटावर असून ते बेट व्हल्टावा नि ओटवा या नद्यांच्या संगमावर आहे ऑलिकहून तिकडे आम्ही मोठ्या नावेतून गेलो. जलमार्गाच्या दोन्ही बाजूना टेकड्या असून त्यावर पाईन वृक्षांची गर्द झाडी होती सुरवातीला

जलमार्ग चिंचोळा होता यावेळी पाण्याचा रंग हिरवा असून झाडीमुळे काही ठिकाणी ते काळसर दिसे निघतानाच पाऊस लागला पुढे त्याचा जोर वाढला जलमार्गा-वरील काही बेटांवर घरे आढळली पलीकडच्या टेकड्यावर टुमदार घरे होती नदीमध्ये अनेक लोक नौकाविहार करीत होते आता नाव दोन डोंगरामधून गेली यावेळी मला जबलपूरच्या मार्बल रॉकचे स्मरण झाले मात्र इथले खडक काळे होते आता पाऊस संपला आणि संगमावरचा किल्लाही दृष्टिपथात आला

मूळ किल्ला तेराव्या शतकातला आहे त्याच्या तटावरती पाथरवटानी आपली नावे कोरून ठेविली आहेत तटाचा गुलाबी रंगाचा भाग मूळचा असून दुरुस्त भाग करड्या रंगाचा आहे १८५० मध्ये स्वार्झेनबर्ग कुटुंबाने त्याची संपूर्ण दुरुस्ती केली होती १९४५ मध्ये त्याचे राष्ट्रीयीकरण झाले पहिल्या मजल्यावरचे 'फ्रेस्को' अर्धवट स्थितीत असून इथला काही भाग कोसळलेला आहे त्यातील पूर्वीची गोथिक आर्च दिसते दुसऱ्या खोलीमधले 'फ्रेस्को' उत्तम स्थितीत असून ते पाहताना अजंठ्याची आठवण येते हे सर्व 'फ्रेस्को' चौदाव्या शतकातलें आहेत

इथलें चॅपेल छोटे असून त्यात हातात ध्वज घेतलेल्या वेन्सेस्लासचे चित्र आहे लाकडात कोरलेल्या कलाकृतीही शोभिवंत आहेत परंतु या सर्व कलाकृती जशा रम्य होत्या त्याचप्रमाणे बोहेमियाच्या प्रदेशामध्ये हिंडताना जे निसर्गचित्र दिसले ते तितकेच रम्य होते आणि क्लाइव्ह हॉलंडने बोहेमिआचे 'जेम प्रॉव्हिन्स' असे जे वर्णन केले आहे ते अतिशयोक्तीचे नाही हे पटते

रुथची आई टाबोरला राहते तेव्हा आपण तिकडे जाऊ, अशी तिची सूचना होती पण आम्ही त्या गावाला नुकतेच जाऊन आलो होतो मला स्वत लिडिझ्झला जायचे होते. रुथ तिकडे जाण्याला फारशी उत्साही नव्हती पण शेवटी ती तयार झाली लिडिस हे प्रागच्या पश्चिमेला वीस किलोमिटरवर आहे. १९४२ च्या वसंत ऋतूत नाझी नेता हैड्रीच याचा खून झाला. या खुनाशी लिडिझ्झच्या लोकाचा संबंध आहे या समजुतीवर जर्मन लोकांनी या गावावर गाढवाचा नांगर फिरविला यावेळी या गावात सुमारे पाचशे लोक होते त्यापैकी १९२ पुरुष, ६० बायका नि ८८ मुलें यांना जर्मनांनी मारले चौऱ्यांशी वर्षांच्या म्हाताऱ्यापासून ते पंधरा वर्षांच्या मुलापर्यंत सगळ्या वयाची माणसे या हत्याकांडात सापडली

लिडिझ्झला जाणारी बस वेळेवर पकडण्याठी तिथल्या थांब्याकडे आम्ही भुयारीने गेलो तिकडे जाणारी बस अद्ययावत असून ट्रेलर होती त्यात प्रवासी कमी होते प्रवास सुमारे अर्ध्या तासाचा झाला, आणि प्रवासाचा मार्ग रमणीय अशा ग्रामीण विभागातून होता बीट नि गहू यांची शेती मैलोमैल पसरलेली होती गावाबाहेर रस्त्याला लागून एक छोटा 'किऑस्क' होता येथे थंड बीअर घेतली नि स्मारकाकडे कसे जायचे वगैरेची माहिती त्या किऑस्कच्या मालकाकडून घेतली

मुख्य स्मारकाकडे पोहोचण्यासाठी थोडे चालावे लागते त्याच्या जवळच

म्युझियम आहे त्यात अनेक छायाचित्रे लावलेली आहेत, लेखी माहिती आहे. शिवाय ध्वनिमुद्रित केलेली माहिती आहे पण तिच्यात थोडे राजकीय भाष्य आहे एका जागी काचेच्या कपाटात सतरा छायाचित्रे आहेत त्यात नष्ट झालेले गाव, त्यातील वस्तू हलवत असणारे ज्यू कामगार, मेलेले कुत्रे, उभे असलेले नाझी अधिकारी, कॉन्सन्ट्रेशन कँप, इत्यादी चित्रे आहेत. उजव्या हाताच्या कपाटात डोळ्यावर काळे रुमाल बांधलेले लोक, त्यांना गोळ्या घालण्यासाठी उभे असलेले जर्मन सैनिक, गोळ्याना बळी पडलेले लोक अशी चित्रे आहेत आईवडील नसलेल्या मुलाचे चित्र आहे मृत्युमुखी पडलेल्या मुलाची पत्रे आहेत एका पत्रात ब्रेड नि कपडे पाठवा असे एका मुलाने काकुळतीने लिहिलेले आहे ज्या बायका कॉन्सन्ट्रेशन कँपमधून जिवत परत आल्या त्या आपली कथा रडत सांगत आहेत असे चित्र आहे ही सर्व चित्रे पाहाताना पोटात कालवाकालव होते

बाहेरच्या विस्तीर्ण भागात इतर काही स्मारके आहेत त्यात समाईक दफनभूमी आहे 'द गार्डन ऑफ फ्रेंडशीप अँड पीस' आहे त्यात जगातल्या निरनिराळ्या देशातून आलेली गुलाबाची झाडे लावलेली असून त्याना लाल, पिवळी, गुलाबी गाची फुले आलेली होती रशियन लोकांनी दिलेले स्मारकही येथे आहे

लिडित्झला जमीनदोस्त केल्याची वार्ता प्रकट झाल्यावर अमेरिकेत अनेक खेडेगावानी लिडित्झ हे नाव घेतले युद्ध संपल्यावर झेकोस्लोव्हाकियाच्या शासनाने नवीन गाव वसविले हे काम ८ मे १९४७ ते २८ ऑक्टोबर १९४८ पर्यंत चालले झेक लोकाबरोबर इतर परदेशी लोकानीही या पुनर्बांधणीला हातभार लावला हे गाव टुमदार आहे त्यातील घरे आधुनिक रचनेची असून प्रत्येक घराच्या उद्यानात सफरचंदाची झाडे होती या नवीन लिडित्झमधल्या भोजनगृहात दुपारचे भोजन घेतले नि चारच्या सुमारास बस घेऊन आम्ही प्रागला परत आलो

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६९२ - २३२०२
दा. क्र.
२३।६।०९
ग्रं० शाखा (स्थळ प्र...)

# ८. झुरिक

दिनाक २० ऑगस्ट हा प्रागमधला शेवटचा दिवस होता सहा साम्यवादी देशात आम्ही एकदर एकवीस दिवस होतो साम्यवादी देशांतील प्रवासाची योजना अकल्पितपणे ठरली नि हा एकवीस दिवसांचा प्रवास आज सपणार होता या प्रवासात कोणाही व्यक्तीचे, सस्थेचे कशाही प्रकारचे सहाय्य आम्हाला मिळालेले नव्हते प्रवासाची योजना आम्ही आखली होती नि आमच्याच अल्प सामर्थ्यावर आम्ही ती पुरी केली होती प्रवासात अडचणी आल्या नाहीत असे नाही काही ठिकाणी त्या बऱ्याच आल्या आणि काही वेळेला त्या पार होतील की नाही याची शकाही वाटली अशा वेळी मानसिक ताण फार वाढत असे काही वेळा भीती वाटली नाही असेही नाही पण आज हे सर्व सपणार होते आम्ही साम्यवादी शासनाच्या सीमा पाठीमागे टाकून लोकशाही शासनाच्या सीमांमध्ये प्रवेश करणार होतो

सकाळी साडेचारला उठलो सामान आवरले न्याहारी आटोपली आणि आठ वाजता हॉटेलच्या प्रवेशद्वारापाशी आम्ही बसची वाट पाहत उभे राहिलो एअरपोर्टची बस आली ती गच्च भरून आसनाच्या जवळच सामान ठेवायचे होते त्यामुळे आपण अडगळीत उभे आहोत असे सर्वांना वाटावे असाच तो प्रवास होता पण तो जेमतेम अर्ध्या तासाचा असल्याने सर्वजण मुकस्तभ होऊन बसप्रवासाच्या अतिम क्षणाची वाट पाहत होते अखेरीस विमानतळ आला आता आम्हाला घाई नव्हती सर्वांचे सामान हलल्यावर आम्ही सामान आत नेले इथे फार गर्दी नव्हती साडेनऊ वाजता आम्ही सामान रवाना केले मग थोड्या वेळाने आरक्षकाची सीमा–'पोलीस बॅरिअर'– ओलाडली, नि पहिला निश्वास टाकला आता विमानात बसण्याच्या सूचनेची वाट पाहत उभे राहिलो शेवटी सूचना आली मग आम्ही रांगेत उभे राहिलो इथे पासपोर्टची पुन्हा तपासणी झाली पण त्यासाठी अर्धा तास खोळबा झाला यानतरही नुसते उभे राहण्याची क्रिया थाबली नाहीच इथल्या लोकाना त्याची सवय झालेली दिसली कारण सर्वजण तटस्थपणे या तपासणी चक्रातून गेले नि पुन्हा उभे राहिले मात्र एक अपवाद दिसला एका व्यक्तीची पासपोर्ट तपासणी रागेत ती उभी नसताना झाली अर्थात साम्यवादी झाला तरी अधिकारी तो अधिकारीच ! अखेर आम्ही विमानात बसलो साडेअकराच्या सुमारास विमान चालू लागले पूर्व युरोपचा प्रवास भूतकाळात जमा झाला एक पर्व सपले मला स्वत:ला मानसिक समाधान मिळाले होते

काही क्षणातच विमानाने उची पकडली बाहेर स्वच्छ उन्ह होते. गर्द झाडी, हिरवीगार शेती, छोटी घरे, याचे चित्र दिसत आहे तोच पांढरे ढग येऊ लागले

त्याची गर्दी झाली विमान त्यांच्यावर गेले मग काही दिसेनासे झाले खाली पांढरे ढग पसरले होते. बारा वीसला 'फासन सिट बेल्ट'ची सूचना मिळाली दहा मिनिटांनी विमान उतरू लागले ते ढगातून गेले ढग वर राहताच खाली डोंगराळ भाग दिसला त्यावर घरे नि शेती होती डोंगराच्या पायथ्याशी गर्द झाडी दिसली मग तुरळक वस्ती आढळली घरांची रचना निराळी होती हा फरक लगेच जाणवतो मग छोटी आगगाडी जाताना दिसली विमान जमिनीला टेकले तेव्हा साडेबारा वाजून गेले होते बाहेर आलो तेव्हा ढगाळलेले होते नि हवेत गारवाही होता झुरिकला— स्वित्झर्लंडला— यावेळी अकरा पचवीस झाले होते त्यामुळे घडयाळ एक तास मागे न्यावे लागले

काय वाटेल ते म्हणा, पण लोकशाही स्वातंत्र्याचे वातावरण काही निराळेच असते झुरिकच्या विमानतळावरची तपासणी औपचारिक होती सामानासाठी फार वेळ थाबावे लागले नाही झुरिकमधले हॉटेल बुकिंग मुबईच्या इडियन वाय एम् सी ए तर्फे झाले होते तिकडे जाण्यापूर्वी लोझानला जाण्याची सोय काय आहे याची माहिती घेतली तसेच लडनला आधीच्या उड्डाणाने जाण्यासाठी तिकिट बदलून घेतले मग टॅक्सी घेतली नि ग्लोकेनहॉफ हॉटेलवर आलो

साडे तीनशे वर्षांपूर्वी बेन्व्हेनुटो सेलिनी याने झुरिकचे वर्णन 'ए ज्युवेल फॉर लस्टर' असे केल्याचा उल्लेख मुरहेडने 'ए वेफेअरर इन स्वित्झर्लंड' या प्रवास-वर्णनात केला आहे झुरिक हे स्वित्झर्लंडचे यांत्रिक नि आर्थिक केंद्र आहे ते सर्वांत मोठे शहर असून झुरिक सरोवराच्या वायव्य कोपऱ्याकडे वसलेले आहे या सरोवरातून लिमाट नदीचा उगम आहे या नदीच्या काठावर प्राचीन काळी केल्टिक जमातींनी आपली वसाहत केली होती ख्रिस्तपूर्व ५८मध्ये रोमन लोकांनी या जातीचा पराभव केला नि या गावाला आपले 'कस्टम पोस्ट' करून त्यावर रोमन सस्कृतीचा छाप मारला तिसऱ्या शतकात ख्रिश्चन धर्मप्रसारक येथे आले त्यांच्या हौतात्म्याच्या जागेवरच ग्रॉस मुन्स्टेर हे सर्वांत मोठे कॅथिड्रल उभे आहे ते शार्लेमेनने स्थापन केल्याचा समज आहे या कॅथिड्रलमधल्या 'स्टेनग्लास विंडोज्' मार्श ॲगल या ज्यू पेंटरने रगवल्या आहेत

या कॅथिड्रलमधला एक धर्मोपदेशक हुलड्रिच झ्विंगली याने १५१९ सालच्या पहिल्या दिवशी उपदेशाची जी भाषणे सुरू केली त्यांनी स्वित्झर्लंडात धार्मिक सुधारणेचे युग सुरू झाले परिणामत युरोपीय इतिहासाला नवीन वळण लागले पुढे धर्म सुधारणेच्याविरुद्ध लाट आली तेव्हा उत्तर इटली नि फ्रान्स या देशांतल्या अनेक सुधारकाना या गावात आश्रय मिळाला या लोकांच्या आगमनामुळे आर्थिक नि सास्कृतिक विकासाला गती मिळाली आजही झुरिकमध्ये सोळा प्रतिशत लोक परदेशी आहेत

युरोपीय व्यापारी मार्गावर हे गाव असल्याने त्याला महत्त्व प्राप्त होऊन

त्यात व्यापारी लोक वस्तीला आले. तेराव्या शतकाच्या अखेरीस त्याला ' इंपिरिअल फ्री सिटी 'चा मान मिळाला हे व्यापारी महत्त्व आजही कायम आहे झुरिकला ' सिटी ऑफ बँक्स ' म्हणतात आज तिथे १३२ बँकांची कार्यालये आहेत झुरिकहून विमानाने ७० देशांतल्या ११० गावाना जाता येते याशिवाय आगगाडीनेही युरोपातल्या कोणत्याही मोठ्या शहराला जाता येते ' युनिव्हर्सिटी ऑफ झुरिक ' नि ' फेडरल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या उच्च शिक्षण देणाऱ्या सस्था येथे असून त्यात ३० सहस्र विद्यार्थी आहेत यांतील मोठ्या सख्येचे विद्यार्थी परदेशी आहेत गावात ग्रॉस मुन्स्टेरसह चार मोठी चर्चे आहेत फ्राऊ मुन्स्टेर चर्चच्या बाहेर एक शिलालेख आहे १९६८मध्ये झेकोस्लोव्हाकियामधून जे लोक पळाले त्यांनी तो १९७८मध्ये स्मारक म्हणून लावला

सास्कृतिक दृष्टीनेही झुरिकला विशेष स्थान आहे वॅग्नरचा ऑपेरा येथे लिहिला गेला युरोपीय खडाबाहेरच्या सास्कृतिक जीवनाचे दर्शन घडविणारा ' व्हिला ऑफ नॉन-युरोपिअन आर्ट ' येथे आहे इथल्या ऑपेरा हाऊसमध्ये हॅंबूर्ग, एडिंबरा, बर्लिन, मिलान येथील प्रसिद्ध ऑर्केस्ट्राचे वाद्यसगीत ऐकण्याची सधी लोकाना मिळते याशिवाय म्युझिक ऑफ् फाइन आर्ट्स्, नॅशनल म्युझियम याही सस्था येथे आहेत इथल्या गिल्ड हाऊसच्या सज्जातून चर्चिल यानी युरोपचे एकीकरण व्हावे यासाठी आवाहन करणारे भाषण केले युरोपच्या एकीकरणाच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा या दृष्टीने त्या भाषणाला नि या जागेला महत्त्व आहे झुरिकमधल्या जुन्या भागातील घराविषयी एक राष्ट्रीय नियम झाला आहे. त्याचे बाह्य स्वरूप आता बदलता येत नाही परपरेचा अभिमान आधुनिकतेतही असा सभाळला जातो

स्वित्झर्लंडमध्ये चार भाषा बोलल्या जातात जर्मन, फ्रेंच, इटालिअन नि रोमानिक यातील जर्मन भाषा बोलणारे ६५ टक्के असून फ्रेंच नि इटालिअन भाषा बोलणाऱ्यांची सख्या अनुक्रमे १८ टक्के नि १२ टक्के आहे झुरिकमधल्या टेकडीवर जाताना मला मलबार हिलची आठवण झाली गावाचा नि झुरिक सरोवराचा सुदर देखावा येथून दिसतो

स्वित्झर्लंडचे निसर्गसौंदर्य भूमीमार्गे प्रवास करताना आपल्याला दिसते हे सौंदर्य पाहण्याचा आनद आम्ही झुरिकहून लोझानला गेलो तेव्हा मिळाला डॉ सौ जोगळेकर नि डॉ सौ देशमुख याना लोझानला डॉ बोसार्ट याना भेटून तिथले हॉस्पिटल पाहावयाचे होते. तेव्हा एके दिवशी सकाळी आम्ही चौघेजण सकाळच्या गाडीने तिकडे जाण्यास निघालो प्रवास दुसऱ्या वर्गानेच केला पण त्याचे सौख्य आपल्याकडच्या पहिल्या वर्गापेक्षा जास्त मिळाले

सकाळी आठ-दहाला गाडी सुटली ती वेगवान होती सुरवातीला बरीच स्थानके तिने घेतली नाहीत. मार्गात प्रारभालाच एक सुदर सरोवर आले ते

पाठीमागे पडले नि समोर डोंगरमाळ दिसू लागली एका डोंगराच्या कुशीत एक सुंदर चर्च होते या प्रदेशात औद्योगिकरण विशेष झालेले असल्याने वेळोवेळी मोठमोठे कारखाने लागले

लोहमार्ग डोंगरातून असल्याने बोगदे लागले एक खूप मोठा होता नि तो पार करावयास दीड मिनीट लागले तो ओलांडल्यावर एक रमणीय सरोवर आले भोवतालची झाडी गर्द होती आता वातावरण थोडे धुसर झाले सुरूच्या झाडांची बने पुन्हा पुन्हा लागली मधूनच एखादी नदी त्यातून वाहताना दिसे या लांबच लांब पसरलेल्या उचसखल भूमीवर छोटी छोटी टुमदार उपनगरे वसलेली होती. काही ठिकाणी जुनी घरे होती पण तिथेही आधुनिक घरे बांधली जात होती मात्र त्यावरून जुन्या परिचित स्वित्झर्लंडचे चित्र बदलले जात आहे याची जाणीव होई शेती मोठी नि हिरवीगार होती त्यात ट्रॅक्टर आढळले लहान शेतात हाताने चालवायचे ट्रॅक्टर दिसले

डुलिकेन स्थानकाजवळ गाडीचा वेग मंद झाला तिथे नदीवर नवीन पूल होत होता उलिअन स्थानक मोठे होते पण गाडी तिथे थांबली नाही येथून उतार सुरू झाला उजव्या हाताची डोंगरमाळ धुक्यात लपेटली होती. सगळी भूमी हरित तृणांनी व्यापलेली होती नऊ वाजता लँगेलथॉल आले येथे प्रथम सूर्यप्रकाश दिसला आता शेताचे आकार विस्तृत झाले काही ठिकाणी शेते डोंगरावरही होती, नि त्यात गुराची खिल्लारे चरत होती एक लक्षणीय गोष्ट म्हणजे घर लहान वा मोठे, जुने वा नवे असो, बहुतेक ठिकाणी खिडक्यांतून रंगीत फुले ठेवलेली असत.

दहाच्या सुमारास बर्न आले गाव नि स्थानक दोन्हीही खूप मोठी होती बर्न सोडल्यावर मोठमोठ्या दऱ्या लागल्या त्यांत जुन्या रचनेची घरे होती ती चंद्रमौळी असली तरी त्याच्या परसात मोटर असावयाची काही घरातून अल्सेशिअन कुत्रे होते प्रदेश डोंगराळ असल्याने प्रवासाचा मार्ग चढ-उताराचा होता डोंगराच्या माथ्यावर घरे असत तशीच खाली दरीतही असत वस्ती थोडी विखुरलेली वाटली मात्र घरे टुमदार होती त्या खिडक्या, व्हरांडा, छोट्या वाटिका, तो लहान जिना वरच्या मजल्यावरची एखाददुसरी खोली—अशा घराचे चित्र मोठे मनोज्ञ वाटे मात्र नवीन बांधकाम दोन प्रकारचे होते अपार्टमेंट्सची पाच—सहा मजली घरे उभी होती, किंवा दुमजली घरे होती पण दोघांचीही रचना आधुनिक होती त्यात शुभ्र पाषाणाचा वापर अधिक दिसला

आता प्रदेश अधिक डोंगराळ झाला. खालच्या दरीत धुके होते डोंगराळ भागात द्राक्षाचे मळे दिसले मग दूरवर जलाशय दिसू लागले समुद्रासारखे खूप विस्तीर्ण वाटले त्यात शिडाच्या असंख्य होड्या होत्या ते जिनिवा सरोवर होते त्याच्याच काठाशी लोझान शहर वसलेले आहे स्थानकात शिरलो तेव्हा पावणे अकरा वाजले होते

टॅक्सीने आम्ही प्रथम हॉस्पिटलवर गेलो तिथे डॉ सौ. जोगळेकर नि डॉ सौ देशमुख डॉ बोसार्ट याना भेटून त्यांच्याबरोबर हॉस्पिटल, वगैरे पाहण्याच्या कामाला गेल्या मग डॉ आनदराव देशमुख नि मी चालत चालत सरोवराकडे आलो लोझान गावाची ख्याती अनेक गोष्टीसाठी आहे येथील मेडिकल फॅकल्टी प्राचीन आहे गिबनने आपला 'डिक्लाईन अँड फॉल ऑफ दि रोमन एपायर' या ग्रथाचा बराच भाग या गावात लिहिला तसेच वायरनचे 'प्रिझनर ऑफ शिलाँ' येथेच लिहिले गेले १९२३ साली तुर्कस्थान नि दोस्त राष्ट्रे याच्यात शाततासधी येथेच झाला लोझानच्या रस्त्यावरून हिंडताना या गोष्टीचे स्मरण न झाले तरच आश्चर्य !

या पूर्वी दोन वेळा मी स्वित्झर्लंडला आलो होतो पहिल्यादा आलो १९५१-मध्ये नि दुसऱ्यादा आलो १९७१मध्ये त्यामुळे पाहण्यासारखे तसे काही बाकी नव्हते पुन्हा पुन्हा तीच गोष्ट पाहण्यात गमत नव्हती एकदोन गोष्टी नवीन आढळल्या तेव्हा तिकडे जावे असे मनाने घेतले एक होती 'फोर कट्रिज् टुअर' नि दुसरी होती 'माउट पिलॅटसची टुअर' प्रथम आम्ही 'फोर कट्रिज टुअर'ला जावयाचे ठरविले पण व्हिसाची अडचण निर्माण झाल्याने आम्ही 'माउट पिलॅटसची टुअर' घेतली

सकाळी नऊच्या सुमारास बस झुरिकच्या ऑपेरा हाऊसपासून निघाली, नि थोडयाच वेळात ती गावाबाहेर आली डाव्या हाताला अल्पाइन अरण्य होते पलीकडे डोगराची राग होती नि त्यावर दाट झाडी होती लुझर्नकडे जाणारा रस्ता सुदर होता बराच वेळ पेहेलगामचे स्मरण व्हावे असा हा रस्ता होता डाव्या हाताला सील नदीचे खोरे होते येथेही झाडे कापण्यासाठी परवानगी लागते नि एक झाड कापले की, त्याचवेळी दुसरे लावावे लागते असे गाईडने सांगितले आता शॅले गाव लागले त्यात पाढऱ्या रगाची घरे जास्त होती थोडया वेळात घरांची सख्या कमी होऊन विस्तीर्ण शेती लागली मात्र नेहमीप्रमाणे येथेही टेकडी-वर उंच मनोऱ्याचे चर्च होते मात्र दूरवरचे डोंगर धुक्यात लपेटले गेलेले होते आता वाटेवर राइस नदी लागली तिचे पात्र छोटे होते पण पाणी मात्र स्फटिकासारखे स्वच्छ दिसले वाटेवर सफरचद नि पेअर याच्या विस्तीर्ण बागा लागल्या काही झाडावर भरपूर सफरचदे होती मध्येच सतराव्या शतकातले घर लागले त्याच्यासाठी वापरलेला दगड तपकिरी रगाचा होता इथल्या बऱ्याच झाडांची फुले लाल रगाची होती, आणि बहुतेक घराच्या सज्जात ती ठेवलेली असत एक नवलाची गोष्ट म्हणजे येथील कुरणात चरणाऱ्या गाईच्या तीन जाती आढळल्या

आता लुझर्न दिसू लागले उजव्या हाताला जुने शहर होते हळूहळू रुस नदी, वॉटर टॉवर, चर्चचा मनोरा या गोष्टी दृष्टिपथात आल्या दूरवर माउट पिलॅटस

दिसला तो धुक्यात होता रोमन गव्हर्नर पिलॅटस याच्या नावावरून डोंगराला ते नाव मिळाले आहे आता लेक लुझर्न आले त्याला 'लेक ऑफ् फोर काउंटीज' म्हणतात कारण त्याचे पाणी चार काउंटीमध्ये पोहोचते सरोवरात आज काही शिडाच्या होड्या नि एक मोठी नाव होती आता बस बोगद्यातून गेली बाहेर आली नि डोंगराच्या पायथ्याला लागून असलेल्या रस्त्याने जाऊ लागली मग सरोवराचे मैलोमैल पसरलेले जलपृष्ठ नजरेत आले उपनगरातील घरे रेखीव नि टुमदार होती आणि बहुतेक घरातून जिरॅनिम, पिटोनिआ याची फुले होती

आता बस माउंट पिलॅटसच्या पाठीमागच्या भागाला आली, आणि घाटासारख्या रस्त्याने वर जाऊ लागली इथली घरे जुनी नि लाकडाची होती बहुतेक घराच्या अंगणात कोंबड्यांची खुराडी होती, नि लाकडाच्या वखारी होत्या आता मार्ग चिंचोळा झाला जेमतेम एक बस जाईल इतका तो रुंद होता काही घराच्या दरवाज्यावर 'खोली भाड्याने देणे आहे' अशा पाट्या आढळल्या जी नवीन घरे या डोंगराच्या कुशीतून आढळली, ती मात्र दगडाची होती या लहान रस्त्यावर बस वळवताना ड्रायव्हरला कसरत करावी लागली अखेरीस एका घराच्या कुंपणाच्या खांबावर ती आदळलीच मग त्या घराच्या मालकाने तो खांब उपटला मग ती बस नीट वळली पलीकडेच एक कॅथॉलिक चर्चची मोठी टुमदार इमारत होती

पावणे अकरा वाजता आम्ही लुझर्नमधल्या अल्पनाशस्टाड या रेल्वे स्थानकापाशी आलो येथून फ्युनिक्युलरने वर जावयाचे होते एका कंपार्टमेंटमध्ये दहा आसने होती गाडी डोंगर चढू लागली मार्ग उभ्या चढणीचा होता भोवताली हिरवेगार गवत नि विभिन्न रंगाची फुलझाडे होती आता एक बोगदा आला तो ओलांडला नि गाव मागे पडले पाहता पाहता ते छोटे झाले हवेत गारवा आला. मग वरून एक गाडी आली इथे रूळ बदलले आणि आमची गाडी वर निघाली आता लोहमार्ग फारच उभ्या चढणीचा झाला ४८ अंशांची ही चढण होती डाव्या हाताची दरी डोळे फिरतील अशी खोल होती. पण क्षणभरात तिच्यात ढग नि धुके भरले त्यामुळे खालचा प्रदेश अदृश्य झाला पण इथल्या पठारावर गाई चरताना आढळल्या खडकाचा वर्ण शुभ्र असून ते अजस्त्र होते एक प्रचंड कोटासारखा दिसला पण तोही धुक्यात लपेटला गेला लोहमार्गावर मात्र धुके नव्हते आता मोठे पठार आले गाडी खूप उंच आली होती पुन्हा अजस्त्र खडक दिसू लागले. आणखी मोठा बोगदा ओलांडला नि खोल दरी दृष्टिपथात आली येथे धुके नव्हते पाऊलवाटेने एक-दोन लोक वर येत होते आता गाडीचा वेग कमी झाला नि हळूहळू ती थांबली आम्ही ७,००० फूट उंच आलो होतो बाहेर विलक्षण थंडी होती

स्थानकाबाहेरच्या पठारावर हॉटेले असून त्यात जेवणाची तसेच राहण्याची सोय होती एका हॉटेलात आम्ही भोजनासाठी गेलो वेटरला सांगितले की, आम्ही

शाकाहारी आहोत नि आम्हाला स्विस पदार्थ हवा आहे थोड्या वेळाने त्याने गरम सूप, रुचकर पाव, लोणी नि स्विस चीझचा एक पदार्थ आमच्यापुढे ठेवला गारठ्यातून आलेल्या माणसाला हे अन्न किती सुखकारक वाटले असेल हे सांगावयास नको!



माउंट पिलॅटसवर जाणारी फ्युनिक्युलर रेल्वे

हॉटेलशेजारीच एक उंच कडा होता माउंट पिलॅटसचे ते एक उंच शिखर होते असे म्हणावयास हरकत नाही तिथे जाण्यासाठी लाकडाच्या पायऱ्या केलेल्या होत्या येथून निसर्गाचे विलक्षण दृश्य दिसते त्यात रौद्रपणाची झाक होती येथे धुक्याचे प्रचंड लोट येत होते नि जात होते धुके आले की काही क्षण सायंकाळचा भास होई, नि भोवतालचा काही प्रदेश अदृश्य होई पण मग सोसाटयाच्या वाऱ्याने ते धुके उचलले जाई तसे झाले म्हणजे लख्ख सूर्यप्रकाश, निरनिराळे पक्षी, डोलणारी बारीक बारीक फुले नजरेत येत हा सगळा अविस्मरणीय आनंददायी अनुभव होता

परतीचा मार्ग उलट बाजूने होता उतरतानाही काही वेळा डोळे फिरावे नि छाती धडधडावी अशा खोल दऱ्या मधूनमधून लागल्या प्रथम आम्ही केबलकारने फ्रॅकमुटेग येथे आलो मग या नवीन स्थानकाहून ' फोर सिटर कॅबिन कार 'ने आम्ही

खाली येण्यास निघालो या वेळीही खोल दऱ्यावरून तारेवरून कार घसरत होती. तार तुटल्याने अपघात झाल्याची वार्ता आपण अधून मधून वाचतो अशा वार्तेची आठवण या वेळी येते, नि नकळत क्षणभर डोळे मिटतात गाव जसे जवळ येऊ लागते तशी छोटी घरे दिसू लागतात तसेच गाईंची खिल्लारे नजरेत येतात लोकही हातरुमाल हलवून आपल्याला अभिवादन करतात, आणि आपणही नकळत हात हलवून त्यांना प्रतिसाद देतो

युरोपमध्ये मोठे गाव म्युझिअमशिवाय क्वचितच असते गावाची सांस्कृतिक पातळी मोजण्याचा एक निकष म्युझियम असतो स्विस म्युझियम स्थापन करण्याचा कायदा १८९०मध्ये होऊन पुढे एक वर्षाने झुरिकमध्ये तसा म्युझियम स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला पुढे त्याची वास्तू उभी झाली म्युझियममध्ये अनेक दालने आहेत रोमन दालनात त्या काळातील शवपेटी, केल्टिक बाईचे थडगे, चांदी-सोन्याचे दागिने, भिन्न जातीची नाणी, मातीची भांडी, वगैरे आहेत

स्विस सैनिकी दालन प्रेक्षणीय आहे त्यात सैनिकाचे निरनिराळ्या काळातले वेश, शिरस्त्राणे, शस्त्रे, पदके, ध्वज येथे ठवलेले आहेत तसेच स्विस शिपायाच्या प्रतिकृती मांडलेल्या आहेत स्विस भाडोत्री सैनिक अन्य देशांत लढले, त्याचीही वर्णने येथे आहेत नेपोलिअनच्या रशिअन चढाईतल्या एका लढाईची प्रतिमा बोटभर उंचीच्या टिन सोल्जरच्या नमुन्याच्या सहाय्याने दाखविली आहे तोफांचे, बंदुकांचे, भाल्यांचे अनेक प्रकार येथे मांडलेले आहेत

स्वित्झर्लंडच्या म्युझियममध्ये घड्याळाचे दालन नसते तरच आश्चर्य ! या छोट्या विभागात किती तरी प्रकारची घड्याळे आहेत सोळाव्या नि सतराव्या शतकातील घड्याळे आहेत त्यापैकी शभर-सव्वाशे छोटी होती तर दहा-बारा मोठी होती याशिवाय सनडायल, नि खगोलशास्त्राची उपकरणे होतीच तीन फूट उंचीच्या चार घटा होत्या घड्याळाचा हा विभाग तसेच बॅनहॉफस्ट्रासे या राजपथावरील किंमती घड्याळे नि त्याचे प्रकार पाहिल्यावर यांत्रिक प्रगती आता किती वेगाने होत आहे याची कल्पना येते

स्वित्झर्लंडमधल्या नागरी नि ग्रामीण जीवनाची कल्पना देणारे दालन मला तरी फार रंजक वाटले त्यात जुनी घरे, कपडे, दागिने, खोल्या, त्यांची सजावट त्यातले फर्निचर, स्टोव्ह, कपबश्या, हस्तकला, स्त्री-पुरुषाची चित्रे अशा गोष्टींचे निरनिराळ्या काळातील प्रदर्शन येथे आहे

प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंतचा स्वित्झर्लंडचा इतिहास नि संस्कृती यांच्या विकासाची कल्पना या म्युझिअमला भेट दिली असता येते

# १. लंडन ( एक )

लंडनला सायंकाळी पाच वाजण्यापूर्वी येण्यासाठी आम्ही उड्डाणाची वेळ बदलून घेतली होती. २४ ऑगस्टला सकाळी दहा वाजता आम्ही टॅक्सीने विमानतळाकडे निघालो. टॅक्सीवाला बडबड्या होता. तेलाचे भाव वाढल्याने टॅक्सीचा धंदा तितका किफायतशीर राहिलेला नाही, शिवाय स्वित्झर्लंड इतके महाग झाले आहे की, प्रवासीही पूर्वीइतके येत नाहीत अशी त्याची तक्रार होती. त्याचे हे म्हणणे ऐकल्यावर मला लिफ्टमधला प्रसंग आठवला. एके दिवशी हॉटेलात खाली येण्यासाठी लिफ्टमध्ये शिरलो. आत एक वयस्क अमेरिकन दांपत्य होते. त्या गृहस्थाने मला विचारले, 'स्वित्झर्लंड कसं काय वाटलं?' 'छान, पण जरा महाग आहे,' मी उत्तरलो. 'जरा महाग नाही. भयंकर महाग. मी पुन्हा येणार नाही,' त्याची पत्नी जरा त्वेषाने म्हणाली.

विमानतळ आला. पैसे बदलणे, सामान रवाना करणे, तपासणी होणे या गोष्टी विनासायास झाल्या. पूर्वानुभवाच्या पार्श्वभूमीवर हे जरा सुखावह वाटले. पाऊण वाजता विमान हलले. पण त्याच्या चाकांनी विमान सोडायला एक वाजला. हवेत गारवा होता. खाली झुरिक सरोवर दिसत होते. हळूहळू ढगांची गर्दी झाली. मग खालचे काही दिसेनासे झाले. पण पावणेदोन वाजता विमान पॅरिसच्या पूर्वेकडून जात आहे असे कॅप्टन म्हणाला. आता ढग थोडे विरळ झाले. मग इंग्लिश खाडी दिसली. थोड्या वेळाने 'व्हाईट क्लिफ्स ऑफ डोव्हर' आले. यावेळी मला एका इंग्रजी कवितेचे स्मरण झाले. हिंदुस्थानचे व्हॉइसरॉय असताना वेव्हेल यांनी सैनिकांसाठी कवितांची स्पर्धा ठेवली होती. त्यात उत्तम ठरलेल्या कवितेच्या शेवटच्या ओळीत मायदेशी परतणाऱ्या इंग्लिश माणसाच्या काय भावना असतात त्याचे हृद्य वर्णन आहे. त्या ओळी अशा :

And, being back, shall find again,
    When war is over,
The gates of heaven are
    But the cliffs of Dover.'

आता खाली घरे दिसू लागली. लाल विटांची नि विशिष्ट रचनेची इंग्लिश घरे सहज ओळखता येतात. थोड्या समयाने विमान उंची सोडू लागले. लंडनचा हिथ्रो विमानतळ जवळ येत होता. अडीचच्या सुमारास आम्ही लंडनच्या भूमीवर उतरलो. येथे इंडियन वाय. एम्. सी. ए. च्या हॉस्टेलमध्ये राहण्याची सोय केली होती. तिकडे टॅक्सीने जाणे अधिक चांगले असे माहिती केंद्रावर आम्हाला सांगण्यात आले. मग सामान घेऊन बाहेरच्या लाउंजमध्ये आलो. इथली भारतीय

लोकांची गर्दी पाहून आपण हिंदुस्थानमधल्या एखाद्या विमानतळावर तर उभे नाही ना असा कोणाचाही समज झाला तर आश्चर्य नाही

सामान घेऊन आम्ही रस्त्यावर आलो टॅक्सी मिळायला थोडा विलब लागला शिवाय टॅक्सीवाला या हॉस्टेलकडे पूर्वी आलेला नव्हता त्यामुळे रस्त्याचा थोडा घोटाळा झाला पण अखेरीस त्याने हॉस्टेलपाशी आणून सोडले बाहेर सामानापाशी डॉ देशमुख नि मी थावलो दोघी डॉक्टरणी आत गेल्या माझ्या बाबतीत एखादी गोष्ट सुलभतेने झाली असे क्वचितच घडते त्याचा आजही प्रत्यय आला बुकिंग आधीचे असूनही पोस्टाच्या सपामुळे मुबईहून गेलेले कन्फर्मेशनचे पत्र त्याना न मिळाल्याने त्या ऑफिसने खोली राखून ठेवली नव्हती आता का प्रश्न ? मी थोडा अस्वस्थ झालो आता दुसरी व्यवस्था कुठे पाहवयाची ? स्वतःशी थोडा चडफडलो मग डॉ देशमुख वर गेले अखेरीस आमच्या राहण्याची व्यवस्था झाली फक्त मला खोली एक-दोनदा बदलावी लागेल असे सागण्यात आले ही गैरसोय मोठी नव्हती

सामान खोलीत लावले आणि पुढील कार्यक्रमाची आखणी करण्यासाठी माहिती घेण्यास गेलो आता नवीन अडचण उभी झाली आम्ही लडनला पोहोचलो ते शुक्रवारी सध्याकाळी पुढे चार दिवस लडनमध्ये सुट्टी होती त्यामुळे कामाच्या दृष्टीने हे चार दिवस फुकट जाणार होते तेव्हा या सुट्टीच्या दिवसात आम्ही मित्रमडळीना भेटण्याचे काम उरकून घेतले प्रारभीच्या दिवसात मी श्री सिन्हा नि श्री आर्या यांना भेटलो श्री सिन्हा पूर्वी 'बेस्ट' अडरटेकिंगमध्ये अधिकारी होते नि १९७१ मध्ये मी त्याच्याकडे मुक्कामाला होतो श्री आर्या हे आमचे मुबईचे स्नेही श्री वर्दे याचे मेहुणे

लडनला यापूर्वी दोनदा येऊनही थेम्सवरच्या नौका सहलीला मी जाऊ शकलो नव्हतो तेव्हा एके दिवशी दुपारी या सहलीला गेलो. तिची सुरवात होती विडसर ब्रिजपासून त्या स्थानाकडे जाण्यासाठी आम्ही बसने निघालो. वाटेवर जी पी ओ चे प्रचड उच टॉवर लागले नतर केनेडी स्मारक, रिजट पार्क, मॅडम टुसार्ड, बेकर स्ट्रीटकडून बस गेली बेकर स्ट्रीटपाशी ड्रायव्हरने शेरलॉक होम्स-सबधीचा नेहमीचा विनोद सांगितला 'होम्स इज नो मोअर होम', आणि तो विनोद माहीत असूनही त्याला सर्वांनी मोठ्याने हसून प्रतिसाद दिला. आता बस मार्बल आर्च, हाइड पार्क, नोटिंग हील गेट, केन्सिंगटन गार्डन यावरून राजमार्गाकडे आली पुढे बालमोर, इटन ही स्थाने लागली इटनच्या क्रिकेट फील्डविषयी असे म्हणतात की, वॉटर्लूची लढाई येथे जिंकली गेली मॉम त्या सबधात म्हणाले होते, 'हे विधान किती सत्य आहे ते मला माहीत नाही पण उद्याच्या इतिहासात असे लिहिले जाईल की हिंदुस्थानातील ब्रिटिश क्लबमध्ये—वांशिक भेदभावामुळे—ब्रिटिश साम्राज्याचा अत झाला'

विंडसर जलस्थानकापाशी दोनचार मोठ्या लाँचेस होत्या त्यांच्याभोवती लहानमोठ्या होड्या होत्या किनाऱ्यावर लहान लहान घरे होती सुरवातीला थोडा उष्मा झाला पण जलप्रवासाला सुरवात झाल्यावर हवेत थडपणा आला नदीच्या पात्रात बदके विहार करीत होती किनाऱ्याकडून दोनपाच लोक सायकलवरून जात हाते काही जण सनबेदिंग करीत होते नदीवर पहिले लॉक आल्यावर लाँच थावली प्रवासी लगबगीने बीअर, सँडवीच वगैरे पदार्थ घेण्यास गेले या लॉक-मधून बाहेर पडल्यावर पाण्याचा रग बदलला इथे उत्तम जातीची दोनचार कुत्री पोहोताना दिसली शिडाच्या छोटया होडया असंख्य होत्या किनाऱ्यावर काही जागी सुदर वाटिका होत्या त्याच्या अलीकडे जुन्या पद्धतीची घरे होती, नि अठराव्या शतकाची ती आठवण देत होती आता किनाऱ्याच्या दोन्ही बाजूना गर्द झाडी आली आणि तिच्यावर 'विपिंग विलोज' होत्या त्याच्या फाद्या पाण्यात लोंबत होत्या

हा गर्द झाडीचा भाग मागे टाकला नि काही वेळाने अद्यतन घराचा भाग आला. हा श्रीमत वस्तीचा भाग होता इथली घरे नि सुविधा अद्ययावत होत्या किनाऱ्यापाशी उत्तमोत्तम नावा होत्या, आणि जलप्रवाहातच कारपार्क तयार करण्यात आला होता यावरून श्रीमतीच्या सोयी कशा असाव्यात याची कल्पना करता येते आता शभर वर्षांचा जुना किल्ला आला येथे डि गॉलचे वास्तव्य होते. मग ओकली कोर्ट आले. त्यानतर काही हॉटेले नि भाड्याने मिळणारी घरे दिसली हा सगळा विभाग मनोज्ञ आहे नदीच्या पात्रात अधूनमधून बेटेही लागली आता ब्रे लॉक आले लॉकच्या पलीकडे त्याच नावाचे खेडेगाव आहे सधिसाधू-पणाबद्दल ब्रेच्या व्हिकारची ख्याती आहे त्या सबधीच्या पुढील काव्यपक्ती प्रसिद्ध आहेत

> And this is law that I'll maintain
> Until my dying day, Sir,
> That whatsoever king shall reign,
> Still I'll be Vicar of Bray, Sir

नदीला एकदा खूप पूर आला होता त्या पुराची पातळी दाखविणारी खूण इथल्या लॉकवर आहे येथून पुढे गेल्यावर जी घरे आली ती पांढऱ्या रगाची होती बरीचशी एक–मजली होती दोन–तीन मोठी होती येथे नॉर्मन चर्च लागले इग्लड-मध्ये छोटया पण प्राचीन गोष्टीना फार महत्त्व देण्यात येते परपरेविषयी वाटणाऱ्या ममत्वाचा हा भाग आहे आता किनाऱ्याकडचा सर्वांत श्रीमत भाग आला येथे घरासाठी दोन लक्ष पाउंड किंमत द्यावी लागते ही सर्व घरे रेखीव, नि आधुनिक होती त्याची दारे, खिडक्या, वगैरे सर्व काचेच्या होत्या आणि भोवतालचे बगीचेही रमणीय होते त्यात रगीबेरंगी फुलाची नुसती रेलचेल होती.

आता ब्रुनेलने बांधलेला सुंदर सेतू लागला त्यानंतर मेडनहेड आले मग १३ कमानींचा दगडी पूल आला तो १७१७मध्ये बांधून पूर्ण झाला बकिंगहॅमशायर-कडून बर्कशायरकडे जाणारा बाथचा रस्ता या पुलावरून जातो नदीच्या काठचा हा सगळा भाग निसर्गरमणीय आहे आता संध्याकाळ झाली होती पक्षी घराकडे परतत होते झाडाच्या काळसर सावल्या जलप्रवाहावर पडल्या होत्या लहान मुले छोट्या होड्यातून जलविहार करीत होती दूर दिसणाऱ्या रस्त्यावरून मोटरी नि बसगाड्या जात होत्या बदके किनाऱ्याकडे येऊन क्वॅक् क्वॅक् करीत होती लाँच बोटीच्या डेकवर काही जण पहुडले होते थोडे लोक पाण्यात गळ टाकून बसले होते लांबवर आगगाडीचा आवाज येत होता अशा आल्हाददायक वातावरणात आमची लाँच स्थानकापाशी येऊन थांबली.

लंडन नि त्याच्या अवतीभोवतीची स्थाने येथे येणारा प्रत्येकजण थोडी फार पाहतो मागच्या दोन भेटीमध्ये मी पाहिली होती तेव्हा यावेळी अनोळखी प्रदेशात मुशाफरी करावयाची असे मी ठरविले सुदैवाने काही चांगल्या सहली उपलब्ध होत्या पहिली सहल होती तीन दिवसांची चेस्टर, वेल्स, वाय व्हॅली, बाथ, वेल्स, स्टोनहेंज, आणि सॅलिस्बरी या ठिकाणी ती सहल जाणार होती, आणि तिचे नाव होते 'मिनिक हॉलिडे'

दिनांक ३१ ऑगस्टला किंग क्रॉसपासच्या सहलीच्या स्थानकाकडे सकाळी साडेआठ वाजता आम्ही आलो परदेशी सहलीला जाणाऱ्या लोकांना नेण्याची व्यवस्था येथूनच होती शिवाय इतर सहलीचे प्रवासीही होते त्यामुळे स्थानक गच्च भरले होते आम्ही तिकिट दाखविल्यावर योग्य वेळी सूचना मिळेल असे आम्हास सांगण्यात आल्याने आम्हीही गर्दीत उभे राहिलो नऊ वाजता निघणारी सहल अर्धा तास उशिरा निघाली ड्रायव्हरचे नाव निक्सन होते स्वतःची ओळख करून देताना तो म्हणाला, 'मी इंग्लिश नाही तसेच अमेरिकेचा पूर्वाध्यक्ष निक्सन माझा नातलग नाही मी स्कॉच आहे इंग्लिश लोकांना त्यांच्या देशातल्या रस्त्यांवर वाहने नीट चालविता येत नसल्याने हे काम आम्ही करतो '

युस्टन, पोर्टलँड स्ट्रीट, बेकर स्ट्रीट, वगैरे परिचित मार्गाने बस गेली वाटेत एक विमानतळ लागला युद्धकाळात पोलिश विमानदळ तो वापरत असे, आणि ब्रिटिश वैमानिक ज्या 'स्पिटफायर' विमानाचा उपयोग करीत त्यापैकी एक विमान प्रदर्शनासाठी येथे ठेवलेले आहे ते मधूनमधून उड्डाणासाठी नेतात दहा वाजता लंडनचा विभाग संपला, नि बस एम–४१ या राजमार्गावरून धावू लागली हवा थंड होती भोवतालचे मैदान हिरवेगार होते झाडी दाट असून शेतात गुरे नि मेंढ्या चरत होत्या मध्येच एक सरोवर दिसले हळूहळू भूमीचे स्वरूप बदलू लागले दूरवर डोंगराळ भाग दिसू लागला तो जसा जवळ आला तसा रस्ता चढ–उताराचा झाला दहाच्या सुमारास हाय वायकोंब लागले हे बकिंगहॅमशायरमधले महत्त्वाचे

गाव असून व्यापारी केंद्र आहे इथे पोस्टाची तिकिटे छापण्याचा कारखाना आहे

आता मधूनच पाच–पन्नास घराचे गाव लागे. काही शेतांत गवत कापलेले होते त्यांचे भारे आपल्यापेक्षा निराळ्या प्रकारे लावलेले दिसले एकाएकी हवेत विलक्षण गारवा आला पुन्हा एकदा दूरवर पसरलेले मैदान आले. त्यात हिरवे हिरवे गवत होते नि त्यात चरणाऱ्या किंवा रवथ करीत बसलेल्या गाई–मेंढ्यांचे कळप दिसले या दृश्यात मधूनच एखाद्या माणसाचा प्रवेश होई. या भागात माणसे आहेत की नाहीत याची शका वाटावी इतकी त्याची अनुपस्थिती जाणवे चित्र काढण्याचा मोह कोणाही चित्रकाराला व्हावा असाच हा देखावा होता.

पधरा मिनिटांनी स्टोकनचर्च आले दूरवर एक टॉवर दिसले. आता झाडी गर्द झाली. वाहनांचे मार्ग बदलण्यासाठी छोटे पूल लागले. शेतातून लहान झोपड्या दिसू लागल्या थोडी घरे नवीन होती त्याना पाढरा रग दिलेला होता. जमीन मात्र काळी होती आता ऑक्सफर्ड जवळ येत होते तेव्हा निक्सनने ऑक्सफर्ड नि केंब्रिज याची माहिती दिली प्राचीन विद्यापीठाचे आगर असणारी ही दोन्ही गावे मी पूर्वी पाहिली होती नि त्यांच्याविषयी थोडे लिहिले होते पण आजची काही माहिती नवीन नि गमतीदार होती

ऑक्सफर्डमध्ये नफील्ड नावाचे कॉलेज आहे नफील्ड हे मोठे कारखानदार होऊन गेले मॉरिस नावाच्या प्रसिद्ध मोटरीची निर्मिती त्यांच्या कारखान्यातील. नफील्ड लहानपणी वाहनदुरुस्तीचे काम करीत, नि ऑक्सफर्डमध्ये त्याचे छोटे वर्कशॉप होते त्याचाच पुढे कारखाना झाला सुखवस्तू झाल्यानतर येथल्या एका क्लबचे सभासद होण्यासाठी त्यानी अर्ज केला पण त्यांच्या प्रारभीच्या जीवनाची माहिती असणाऱ्या लोकानी तो नामजूर केला. पुढे क्लब नि गोल्फकोर्स ही दोन्ही नफील्डनी विकत घेतली त्याना सतती नसल्याने त्यांनी आपली सपत्ती नफील्ड फाउडेशनला देऊन टाकली

साडे अकरानतर ऑक्सफर्ड सुटले ड्यूक ऑफ मार्लबरो याच्या ब्लेनइम पॅलेसकडे बस निघाली ब्लेनइम हे ऑक्सफर्डशायरमध्ये वुडस्टॉक गावाजवळ आहे. तिकडे जाणारा रस्ता चिचोळा असून दाट झाडीतून होता. या रस्त्यापासून अडीच मैल आत ब्लॅन्डॉन गाव येते सर विस्टन चर्चिल याचे दफन तेथे झाले आहे दुरूनच ब्लेनइम पॅलेस नजरेत येतो मार्लबरोला – नि चर्चिल त्याच घराण्यातले असून त्यांनी ड्यूकचे चरित्र लिहिले आहे– त्याच्या राष्ट्रीय सेवेसाठी हा राजवाडा इग्लडने बक्षीस दिला होता राजवाड्याच्या वाटेवरच उजव्या हाताला सरोवर असून त्यावर एक छोटा पूल आहे सात मैलाचा परिसर असलेले हे छोटे गाव आहे. त्यातील मैदान उचसखल आहे काही ठिकाणी शेतीची कापणी झालेली दिसली. ट्राफलगार स्क्वेअर-मध्ये नेल्सनचा उच स्तभावर जसा पुतळा आहे तसाच राजवाड्यापासून काही अतरावर मार्लबरोचा उच स्तभावर पुतळा आहे येथेही राजवाडा पाहण्यासाठी

प्रवाश्यांची गर्दी होती आत जाण्यास प्रवेशशुल्क होते हिंदुस्थानातील माणसाला राजवाड्याविषयी फारसे कुतूहल नसते शिवाय बाहेरून तो काही उठावदार दिसला नाही मार्लबरोच्या वंशजांना ही मिळकत स्वतःकडे ठेवण्यासाठी वर्षातून एकदा राजाला मुजरा करावा लागतो. त्यात खंड पडला तर ही सर्व मिळकत सरकार जमा होईल

आता बस चिपिंग नॉर्टन या छोट्या व्यापारी पेठेतून गेली या गावात 'वॉर मेमोरिअल हॉस्पिटल' काढण्यात आले आहे इथल्या एका पबच्या नावाच्या पाटीकडे निक्सनने लक्ष वेधले तिच्यावर डोके उडवलेल्या बाईचे चित्र असून त्याला 'क्वाएट वुमन' हे नाव होते पुढे स्टॅनफोर्ड हे छोटे गाव आले तेथले चर्च लहान पण डौलदार होते आता भोवतालचा प्रदेश खूपच दाट नि हिरवागर्द झाला रस्ता इतका निमुळता झाला की, काही वेळा झाडांच्या फांद्या बसला जोराने लागत रस्त्याच्या पश्चिमेकडे कॉटस्वोल्ड डोंगरांची माळ दिसली. रस्त्यावरून वाहनांची फारशी रहदारी नव्हती काही दुचाकीवाले दिसले हौशी प्रवासी असावेत काही ठिकाणी शेते भाजलेली दिसली छोटी गावे, त्यातील सुबक घरे, त्याच्या भोवतालचे लाकडी कुंपण, आतली वाटिका, रंगीबेरंगी फुले, मध्यभागी असणारे लहान चर्च यामुळे भोवतालच्या प्रदेशाचे चित्र मनोज्ञ होई वाटेतच चेल्टेनहॅम लागले स्त्रियांचे कॉलेज, एक पब्लिक स्कूल, तसेच मिनरल वॉटर्स याविषयी गावाची ख्याती आहे शिवाय ते मूळातच सुंदर आहे हे निराळेच !

एव्हरशॅमच्या थोडे अलीकडेच सगळा प्रदेश दाट हिरव्या झाडींचा झाला आणि ते स्वाभाविक होते. कारण व्हेल ऑफ एव्हरशॅम हा प्रदेश फळांच्या लागवडी-बद्दल प्रसिद्ध आहे तसेच या गावापाशी १२६५मध्ये झालेल्या लढाईत पहिल्या एडवर्डने सायमन द मॉन्फर्ड याच्या नेतृत्वाखालच्या सरदार गटाचा पराभव केला यामुळे इंग्लिश इतिहासात या गावाला महत्त्व आहे

आता आम्ही चेस्टरकडे निघालो पश्चिमेला डोंगरमाळ होती हवेत गारवा होताच शिवाय धुकेही होते रस्त्याची दुरुस्ती चालू असल्याने बसचा वेग बराच कमी झाला वॉर्सेस्टर, किडेरमिन्स्टर, वेलिंग्टन अशा गावांतून व्हाइटचर्चकडे आलो येथून पुढील मार्गावरच्या शेतांच्या कुंपणांना मेंदीसारखी झाडे लावलेली होती इकडची सगळीच भूमी विलक्षण हरित होती त्या हिरवेगारपणाची कल्पना त्यातून प्रवास केल्याशिवाय येणार नाही

सहाच्या सुमारास चेस्टर आले प्राचीन काळापासून हे गाव प्रसिद्ध आहे येथे रोमन सैन्याची छावणी होती डी नदीच्या काठी ते वसलेले असून गावाच्या मध्य-भागातील घरे फार जुनी नि लहान आहेत लिटलवूड हा डिपार्टमेंट स्टोअर किंवा वेस्टमिन्स्टर बँक ही पण छोटी आहेत मात्र इथले कॅथिड्रल भव्य असून तेथे पुढील नोंद आहे '१०९२ ते १५४१ या काळात हे अॅबी-चर्च बेनेडिक्टाईन साधूंचे

प्रवाश्याची गर्दी होती आत जाण्यास प्रवेशशुल्क होते हिंदुस्थानातील माणसाला राजवाड्याविषयी फारसे कुतुहल नसते शिवाय बाहेरून तो काही उठावदार दिसला नाही मार्लबरोच्या वंशजांना ही मिळकत स्वतःकडे ठेवण्यासाठी वर्षातून एकदा राजाला मुजरा करावा लागतो. त्यात खंड पडला तर ही सर्व मिळकत सरकार जमा होईल

आता बस चिपिंग नॉर्टन या छोटया व्यापारी पेठेतून गेली या गावात 'वॉर मेमोरिअल हॉस्पिटल' काढण्यात आले आहे इथल्या एका पबच्या नावाच्या पाटीकडे निक्सनने लक्ष वेधले तिच्यावर डोके उडवलेल्या बाईचे चित्र असून त्याला 'क्वाएट वुमन' हे नाव होते पुढे स्टॅनफोर्ड हे छोटे गाव आले. तेथले चर्च लहान पण डौलदार होते आता भोवतालचा प्रदेश खूपच दाट [illegible] हिरवागर्द झाला रस्ता इतका निमुळता झाला की, काही वेळा झाडाच्या फांद्या बसला जोराने लागत रस्त्याच्या पश्चिमेकडे कॉटस्वोल्ड डोंगरांची माळ दिसली. रस्त्यावरून वाहनाची फारशी रहदारी नव्हती काही दुचाकीवाले दिसले हौशी प्रवासी असावेत. काही ठिकाणी शेते भाजलेली दिसली छोटी गावे, त्यातील सुबक घरे, त्यांच्या भोवतालचे लाकडी कुंपण, आतली वाटिका, रंगीबेरंगी फुले, मध्यभागी असणारे लहान चर्च यामुळे भोवतालच्या प्रदेशाचे चित्र मनोज्ञ होई वाटेतच चेल्टेनहॅम लागले स्त्रियांचे कॉलिज, एक पब्लिक स्कूल, तसेच मिनरल वॉटर्स याविषयी गावाची ख्याती आहे शिवाय ते मूळातच सुंदर आहे हे निराळेच!

एव्हरशॅमच्या थोडे अलीकडेच सगळा प्रदेश दाट हिरव्या झाडीचा झाला आणि ते स्वाभाविक होते कारण व्हेल ऑफ एव्हरशॅम हा प्रदेश फळाच्या लागवडी-बद्दल प्रसिद्ध आहे तसेच या गावापाशी १२६५मध्ये झालेल्या लढाईत पहिल्या एडवर्डने सायमन द मॉन्फर्ड याच्या नेतृत्वाखालच्या सरदार गटाचा पराभव केला यामूळे इंग्लिश इतिहासात या गावाला महत्त्व आहे

आता आम्ही चेस्टरकडे निघालो पश्चिमेला डोंगरमाळ होती हवेत गारवा होताच शिवाय धुकेही होते रस्त्याची दुरुस्ती चालू असल्याने बसचा वेग बराच कमी झाला वॉर्सेस्टर, किडेरमिन्स्टर, वेलिंग्टन अशा गावांतून व्हाइटचर्चकडे आलो येथून पुढील मार्गावरच्या शेताच्या कुंपणांना मेंदीसारखी झाडे लावलेली होती इकडची सगळीच भूमी विलक्षण हरित होती त्या हिरवेगारपणाची कल्पना त्यातून प्रवास केल्याशिवाय येणार नाही

सहाच्या सुमारास चेस्टर आले प्राचीन काळापासून हे गाव प्रसिद्ध आहे येथे रोमन सैन्याची छावणी होती डी नदीच्या काठी ते वसलेले असून गावाच्या मध्य-भागातील घरे फार जुनी नि लहान आहेत लिटलवूड हा डिपार्टमेंट स्टोअर किंवा वेस्टमिन्स्टर बँक ही पण छोटी आहेत मात्र इथले कॅथिड्रल भव्य असून तेथे पुढील नोंद आहे '१०९२ ते १५४१ या काळात हे अॅबी-चर्च बेनेडिक्टाईन साधूचे

निवासस्थान होते ज्या गोष्टी तुम्ही पाहत आहात त्या त्यानी बांधल्या.' चर्चचा आतील भाग प्रेक्षणीय असून त्याचे स्टेनग्लासेस विशेष नजरेत भरतात आम्ही आत गेलो तेव्हा श्रवणीय चर्च–सगीत चालले होते बाहेरील उद्यानाला 'गार्डन ऑफ रिमेंब्रन्स' नाव असून त्यात गुलाबाच्या झाडाची रेलचेल होती. अर्थात यातला काही भाग दफनभूमी म्हणूनही वापरलेला आहे गावाभोवतालचा कोट सन १४०मधला असून तो उत्तम स्थितीत आहे कोटाच्या मुख्य दरवाज्यावर घड्याळ असून ते व्हिक्टोरिया राणीच्या ६० वर्षांच्या कारकिर्दीचे स्मारक म्हणून लावण्यात आले आहे कोटावरून गावाचे चित्र चागले दिसते

आम्ही चेस्टर सोडले नि लँगोलेनकडे निघालो. ते गाव वेल्समध्ये येते आणि वेल्सचा प्रदेश नैसर्गिक सौंदर्याबद्दल प्रसिद्ध आहे गर्द वृक्षराजीच्या भागातूनच प्रवासाचा मार्ग जात होता भोवतालचा देखावा विस्मयकारक होता. वाटेत एक मोठा कालवा लागला त्यात लोक नौकाविहार करीत होते आता सूर्यास्त झाला पण अधार होण्यापूर्वीच आम्ही लँगोलेन गावात शिरलो येथे मुक्कामाची व्यवस्था हँड हॉटेलात होती. हॉटेल अडीचशे वर्षांचे जुने आहे घोड्याची बग्गी हे ज्यावेळी प्रवासाचे वाहन होते त्या काळात आयरिश मेल लडनहून हॉलिहेडला जाताना इथे थांबत असे तेव्हापासून रात्रीचा मुक्काम प्रवासी येथे करीत बग्गीचे घोडेही येथेच बांधले जात आता फक्त त्याची येथे जाहिरात आहे मात्र हॉटेलचे आधुनिकीकरण झाले आहे त्याचे स्थळही निसर्गरम्य आहे पाठीमागे डी नदी असून तिचा स्फटिका-सारखा जलप्रवाह घोंघावत वाहत असतो हॉटेलसमोरच्या डोंगरावर तेराव्या शतकातला किल्ला असून त्याचे भग्न अवशेष येथून दिसतात सभोवताली विपुल झाडी असलेली डोंगरांची रांग आहे नदीकाठाला लागून एक सुदर गुलाब वाटिका आहे त्यात लाल, गर्द लाल, पाढुरका लाल, केवळ शुभ्र अशी गुलाबांची फुले फुललेली होती

काल अधार झाल्याने गावात हिंडता आले नव्हते तेव्हा सकाळी साडे सहालाच क्विन्ज रोड या राजरस्त्यावरून लांबवर फिरायला गेलो दुकाने उघडत होती रस्त्यावरून एखाद–दुसरे वाहन अधूनमधून जात होते लहान गावातली घरेही लहानच असणार पण बहुतेक घरांसमोर लहान बाग असून त्यात प्रामुख्याने गुलाब लावलेला होता काही ठिकाणी रस्ते, घरे नि कार्यालये याच्यावरील पाट्या दोन भाषात दिसल्या इग्रजी नि वेल्श गमत म्हणून एका पाटीवरचे नाव मी मुद्दाम टिपून घेतले ते म्हणजे Employment Office-Swaddfa Gyflogi-उच्चार 'सुदवा गव्हलागी' ब्रिटनसारख्या एकात्म समाजातही असे पृथकपणाचे वारे आहेत. अर्थात वेल्श राष्ट्रवादाची परपरा जुनी आहे लोक ना स्वभाषेचा अभिमान असून इग्लिश लोकाबद्दल ममत्व कमी आहे जिज्ञासूने मॉर्टनचे 'इन सर्च ऑफ वेल्स' हे पुस्तक पाहावे इग्रजानाही वेल्श लोकाबद्दल तितकेच प्रेम आहे

त्यामुळेच पुढील काव्यपंक्ती प्रचलित झाली

Taffy was a Welshman
Taffy was a thief

सकाळी लँगोलेन सुटले. रस्ता निर्मनुष्य होता. शेतात काळ्या रंगाच्या गाई चरताना दिसल्या दूरवरच्या डोंगरात घरे दिसली आता छोटा घाट आला तो ओलाडला नि चर्क व्हॅली आली यात दगडी पाटीसाठी लागणाऱ्या प्रस्तराच्या खाणी आहेत हा भाग मेंढ्यांचा प्रदेश म्हणून प्रसिद्ध आहे फार पूर्वी स्पेनमधून मेंढ्या आणण्यात आल्या, आणि तेव्हापासून येथला लोकरीचा धंदा जोरात सुरू झाला त्या आर्थिक बळावरच पुढे स्पेनचा नाविक युद्धात इग्लडने पराभव केला ऑस्ट्रेलियामध्ये ज्याप्रमाणे मेंढ्यांची सख्या विपुल आहे त्याचप्रमाणे वेल्समध्येही आहे.

आता रस्त्यावर मोटरीची गर्दी झाली आम्ही ऑस्वेस्ट्रीकडे जात होतो मार्गात गोबोवेन गाव लागले नेटो सघटनेच्या सैन्यातील जर्मन विभाग येथे सैनिकी शिक्षणासाठी आला होता पण दुसऱ्या महायुद्धाचा स्थानिक लोकातील राग अजून गेलेला नसल्यामुळे या जर्मन विभागाला लवकरच परत जावे लागले पुढे एक छोटी नदी आली रस्तेही चिंचोळे झाले नि भोवताली विपुल झाडी होती. डोंगराच्या उतरणीवर शेते होती अधूनमधून छोटे टुमदार गाव दिसे पण प्रत्येकात वैचित्र्य होते एके ठिकाणी सुदर ओढा दिसला त्याच्या भोवताली कापलेली रेखीव शेती होती ओढ्यावर लहान पूल होता नतर लागलेल्या दुकानावर पाटी होती 'फॅमिली बुचर' काही चर्चची रचना थोडी मदिरासारखी वाटली कुरणातून खूप मेंढ्या होत्या. काही उन्ह खात बसल्या होत्या

गेली दोनतीन शतके या भागातली जगले बरीच कापली गेल्याने प्रदेश उजाड होण्याची भीती निर्माण झाली, नि वृक्षारोपणाची मोठी योजना हातात घेण्यात आली आता झाड कापण्यास परवानगी लागते. इथल्या डोंगरातून स्लेटचा धदा चालत असल्याने काही डोंगर किती तरी प्रमाणात कापले गेलेले दिसले रस्त्याच्या डाव्या हाताला नदी होती तिच्या दोन्ही काठावर मुबलक वृक्ष असून काही ठिकाणी घरे होती कोपऱ्यात पडझड झालेले एक प्राचीन नॉर्मन चर्च दिसले काही ठिकाणी सुरूच्या विस्तृत बागा आढळल्या नतर वाय नदी आली त्यात लोक मासे पकडीत होते काहीजण नौकाविहार करीत होते अजूनही प्रदेश डोंगराळ होता रस्त्याच्या दोन्ही बाजूला वृक्ष असून काही वेळा तर त्याला ॲव्हेन्यूचे स्वरूप आले होते. वाटेवरच साठ मैलाचा परीघ असलेले 'फॉरेस्ट ऑफ डीन' लागले

आता आम्ही टिंटर्न ॲबीकडे आलो सपूर्ण उद्ध्वस्त झालेली ही वास्तू आहे. पण तिथल्या अवशेषावरूनही मूळ भव्यतेची कल्पना येते हा ॲबी १९३१ मध्ये वाय नदीच्या बाजूला स्थापला गेला त्याची उभारणी सिस्टर्सिअन साधूनी केली. स्वाव-

लबनावर या साधूचे जीवन आधारित होते दोनशे वर्षांनंतर या ॲबीची पुनर्बांधणी झाली पुढील शतकात ते खूप समृद्ध झाले. पण सोळाव्या शतकात क्रॉम्वेलच्या राजवटीत ॲबी बंद होऊन त्याचे जीवन संपले इथल्या घटा वगैरे वस्तू अर्ल ऑफ वुस्टरने नेल्या हे भग्न अवशेष पाहण्यासाठी आता हौशी प्रवासी, कवी किंवा कलाकार येतात, असे त्याच्या पुस्तिकेत म्हटले आहे

थोडा प्रवास झाला नि डाव्या हाताला सेव्हर्न नदी आली बराच वेळ ती दिसत होती मधूनच पांढऱ्या रंगातले बंगले दिसले शिलाँगची आठवण देणारे हे निसर्गचित्र होते वाटेत ब्रिस्टोल क्रिक दिसली त्यातच सेव्हर्न नदी वाहते आता बस बाथ गावात शिरली गाव रोमन काळापासून प्रसिद्ध आहे तेथे त्यांचे लष्करी ठाणे होते शिवाय गरम पाण्याचे झरे असल्याने त्यानी येथे स्नानगृहे बांधली होती कालौघात हे सर्व धरणीच्या पोटात लुप्त झाले पुढे खोदकाम करीत असताना या स्नानगृहांचा पत्ता लागला आता त्याना नीट स्वरूपात ठेवण्यात आले आहे

स्नानगृहे तीन आहेत ग्रेट रोमन बाथ, ईस्ट बाथ नि सर्क्युलर बाथ. येथे पाणी चांगलेच गरम असून त्यात पाऊल बुडवले तर थोडा चटका बसतो सर्क्युलर बाथमधल्या विहिरीच्या आकाराच्या तळ्यात बरेच शेवाळे होते या बाथमध्येच रोमन अवशेषांचे छोटे प्रदर्शन आहे गावातली आणखी पाहण्याची गोष्ट म्हणजे ॲबी चर्च दुसऱ्या महायुद्धात बाँबहल्ल्यामुळे त्याचे नुकसान झाले पण ते सर्व आता दुरुस्त झाले आहे ॲबी भव्य असून त्याचे स्टेन ग्लासेस नि छताचे कोरीव काम लक्षणीय आहे सायकाळी सहाच्या सुमारास बाथ सोडले नि दिवेलागणीच्या सुमारास ब्रिस्टोल या सिगरेट, चॉकलेट यांच्या निर्मितीविषयी ख्यात असलेल्या गावात आलो मुक्कामाची व्यवस्था ग्रँड हॉटेलात होती

ब्रिस्टोल सकाळी नऊच्या सुमारास सोडले बस ॲव्हान नदीकडून गेली त्यात हंस पक्ष्यांचा कळप जलविहार करीत होता रस्त्याला थोडा चढ होता रात्री पाऊस पडून गेलेला असल्याने रस्ते स्वच्छ होते आणि वातावरणात विशेष आल्हाद होता आजच्या प्रवासाचा पहिला टप्पा होता वेल्स कॅथिड्रल तिकडे नेणारा रस्ता छोटा असून त्याच्या दोन्ही बाजूंना वृक्षांची रांग असल्याने बराच वेळ तोही ॲव्हेन्यूसारखा वाटला पाऊस मधूनमधून पडत होता त्यामुळे सृष्टी न्हाल्यासारखी वाटत होती वेल्स गावही सॉमरसेट काउंटीमध्ये असून तिथल्या कॅथिड्रलची ख्याती आहे कॅथिड्रल सिटी म्हणूनच ते गाव ओळखले जाते

कॅथिड्रलभोवती मोठे उद्यान असून त्यातल्या उजव्या भागाकडे अधिक झाडी आहे हे कॅथिड्रल तसे लहानच आहे त्याच्या उभारणीला सुरुवात ११७४ मध्ये झाली नि सुमारे ६५ वर्षांनी त्याची बांधणी संपली त्याचा पश्चिमेकडचा दर्शनी भाग प्रेक्षणीय आहे त्यात तीन सहस्र सुंदर मूर्ती आहेत त्यापैकी १५२ पुरुषभर उंचीच्या आहेत या शिल्प सौंदर्याचे जनकत्व बिशप जोसेलिनकडे जाते कॅथिड्रल

आतून नि बाहेरून मनोज्ञ आहे. कॅथिड्रलची थोडी पडझड होत आहे दुरुस्तीचाही प्रयत्न चालू आहे या कामाचे महत्त्व मनावर बिंबविण्यासाठी प्रो इ एस प्रिऑर याचे पुढील विचार तिथे उद्धृत केलेले आहेत 'द्रव्याचा अभाव, पडझड नि दुरुस्ती या दृष्टिकोनातून येथील मूर्तींची सख्या नि गुणवत्ता याचा विचार आपण करतो, नि रक्षणासाठी त्यांची तुलना इतर मध्ययुगीन इग्लिश मूर्तिकामाशी करतो तेव्हा आपल्याला असे म्हणावे लागते की, वेल्सचे कॅथिड्रल सपले तर आपल्या अभिजात कलेचा अर्धा भाग नष्ट होईल '

आता पुढचा थाबा होता ग्लॅस्टोनब्युरी ॲबीपाशी. तिकडे जाण्यासाठी बसला व्हेल ऑफ ॲव्हेलॉनच्या प्रदेशातून जावे लागले ग्लॅस्टोनब्युरी सॉमरसेट काउटीतच असल्याने भोवतालचे सृष्टिसौंदर्य प्रेक्षणीय होते इथल्या ॲबीमुळे गाव विशेष ख्यात आहे ख्राईस्टचे दफन करणाऱ्या लोकापैकी जोसेफ ॲरिमाथिआ हा एक होता सेट फिलिपने ख्रिश्चन धर्माच्या प्रचारासाठी त्याला इग्लडला पाठविले होते अशी अनेक शतके लोकाची श्रद्धा होती या ॲरिमाथिआने पहिले चर्च येथे बाधले त्यावर पुढे हा ॲबी उभा झाला वरील लोकश्रद्धेमुळे इग्लिश जेरूसलेम अशी ग्लॅस्टोनब्युरीची प्रसिद्धी झाली

रिफॉर्मेशनच्या काळात हा ॲबी नष्ट करण्यात आला आज मोठ्या मैदानात दिसतात ते ॲबीचे अवशेष त्यात साधूसाठी स्वयपाकघर आहे, तसेच त्याची भाडी, वगैरे वस्तू आहेत आत शिरल्यावर डाव्या हाताला ग्लॅस्टोनब्युरी थॉर्न आहे. तो ॲरिमाथिआने लावला होता असा समज आहे त्याच्या शेजारीच सेट पेट्रिक चॅपेल आहे मध्यभागी साधूसाठी भोजनगृह आहे दुसरी एलिझाबेथ या राणीने दिलेला लाकडी क्रॉसही येथे लावलेला आहे आणखी एक गोष्ट म्हणजे इथे किंग आर्थरचे थडगे आहे तिथल्या पाटीवर पुढील माहिती होती आर्थर नि त्याची पत्नी याच्या शवपेटिका ११७१मध्ये येथील चॅपेलमध्ये मिळाल्या पुढे १२७८मध्ये पहिला एडवर्ड नि त्याची पत्नी एलिनॉर यांच्या उपस्थितीत त्याचे नवीन जागी दफन करण्यात आले १५३९मध्ये हा ॲबी नष्ट होईपर्यंत हे थडगे सुरक्षित होते. गमत म्हणजे एका श्रीमत व्यक्तीच्या खाजगी भूमीवर हा ॲबी कुतूहलाचे अवशेष म्हणून १९०८पर्यंत होता त्यानतर त्याचा ताबा चर्च ऑफ इग्लडने घेतला नि ते आता त्याची व्यवस्था पाहते

प्रवासाचा पुढील टप्पा स्टोनहेज होता. तिकडे जाण्याचा मार्ग विल्टशायर-मध्ये असणाऱ्या सॅलिसबरी प्लेनमधून होता पण स्टोनहेंज ही काय भानगड आहे? ही दगडाची अती प्राचीन वर्तुळे आहेत एक बाहेरचे मोठे नि दुसरे आतले छोटे सर्वांत मोठा दगड २१$\frac{1}{2}$ फूट उचीचा आहे ख्रिस्तपूर्व १७०० शतकात हे दगड प्रेंबूकशायरमधून आणण्यात आले. त्याच्याविषयी अनेक उपपत्त्या सागण्यात येतात. एक म्हणजे ते सूर्यमदिर असावे हे दगडाचे अवशेष पाहण्याला शेकडो प्रवासी

येतात आता अवशेषांच्या सरक्षणासाठी भोवताली कुपण आहे त्याच्या बाहेरूनच लोकाना चक्कर टाकता येते इथल्या रक्षकाने जी माहिती सागितली त्यावरून ते रोमन कालातील कालनिर्णयाचे साधन होते आपल्याकडच्या दिल्लीच्या जतरमतरसारखे

स्टोनहेजकडून आम्ही सॅलिसबरी कॅथिड्रलकडे आलो ते तेराव्या शतकात बाधले गेले असून ते सर्वोत्तम गोथिक वास्तू म्हणून ओळखले जाते येथे एक मध्ययुगीन मोठे घड्याळ आहे इग्लडमधले ते सर्वांत जुने आहे नि जगातल्या चालू असणाऱ्या यांत्रिक घड्याळापैकी ते सर्वांत प्राचीन आहे

कॅथिड्रल पाहण्याचाच आजचा दिवस होता आता सॅलिसबरीकडून आम्ही विंचेस्टर कॅथिड्रलकडे आलो विंचेस्टर हॅमशायरमध्ये असून वेसेक्स राज्याची ते गाव राजधानी होते येथूनच किंग आल्फ्रेडने राज्य केले होते मला विंचेस्टरविषयी थोडे अधिक कुतूहल होते फिल्ड मार्शल वेव्हेल याचे चरित्र मी वाचले होते वेव्हेल विंचेस्टरचे स्कॉलर असून त्याचे दफनही इथेच झाल्याचे स्मरत होते म्हणून ती जागा पाहण्यासाठी आत गेलो कॅथिड्रलमध्ये बऱ्याच सेनाधिकाऱ्यांचे नि सेनानींचे दफन करण्यात आले आहे एका अधिकाऱ्याविषयी लिहिले होते, 'ज्यावेळी परिस्थिती कठीण असावयाची त्यावेळी तो खदकातून सैनिकाना उत्साह देण्यासाठी हिंडत असे जेव्हा सकट अधिक मोठे असे तेव्हा त्याचे हास्य अधिक मोहक असे ' फिरता फिरता वेव्हेल याचे दफन-स्थळ दिसले तिथे लिहिले होते ' फिल्ड मार्शल नि हिंदुस्थानचे व्हॉइसरॉय असणाऱ्या वेव्हेलचा हा ध्वज आहे .. स्वगृही परत येताना प्रतिष्ठा विशेषकरून त्यांच्याबरोबर आली नाही ' काही असामान्य माणसांच्या नशिबी हेच लिहिलेले असते

आता आम्ही लडनकडे निघालो आज तीन-चार कॅथिड्रल पाहिल्याने मला निक्सनने सागितलेल्या विनोदाचे स्मरण झाले एका प्रवाशाची दैनदिनी बसमध्ये एका ड्रायव्हरला मिळाली उघडया पानावर त्याला पुढील शब्द आढळले. ' Saw A.B C ' डायरी परत करताना डायरीवाल्याला ड्रायव्हर म्हणाला, 'माफ करा पान उघडे असल्याने माझे लक्ष गेले त्यावर Saw A B C एवढेच शब्द आहेत त्यांचा अर्थ काय ?' तो प्रवासी हसत म्हणाला, 'यात गूढ काही नाही त्याचा अर्थ ' Saw another bloody cathedral '

●

ग्रंथ संग्रहालय ठाणे
23202
231497

# १०. लंडन (दोन)

यानंतर दोन दिवसानी आम्ही 'यॉर्क, एडिंबरा, इंग्लिश लेक्स अँड चेस्टर' या चार दिवसांच्या सहलीला गेलो पहिल्या दिवसाची धाव यॉर्कपर्यंत होती. आज बस फक्त दहा मिनिटे उशिरा सुटली बस ड्रायव्हरचे नाव होते कॅरी स्वतःची ओळख करून देताना तो म्हणाला, 'तुम्हाला चिंता करण्याचे कारण नाही तुम्ही ठरलेल्या वेळा पाळा. बाकीचे मी पाहीन मी उत्तम संघटक आहे मला कॅरी नावाने हाक मारा ड्रायव्हर म्हणाल तर मी लक्ष देणार नाही ' लंडनची माहिती देताना तो म्हणाला, 'हे गाव परदेशी लोकांचे आहे आपण जिकडे जात आहोत ती गावे नि माणसे ही खरी इंग्लिश ' आता लंडनभोवती एक 'ग्रीन बेल्ट' तयार करण्यात येत आहे ही गोष्ट त्यानेच सांगितली

पहिला थांबा केंब्रिजला होता ऑक्सफर्ड नि केंब्रिज हे इंग्लंडचे अलंकार आहेत लंडनच्या वायव्येला ऑक्सफर्ड आहे तर केंब्रिज ईशान्येला आहे सत्तावीस वर्षांपूर्वी मी केंब्रिजला येऊन गेलो असल्याने गावाविषयी औत्सुक्य माझ्या बरोबरच्याच लोकांना होते कॅरीने गावाविषयी माहिती दिली त्यातली थोडी नवीन होती केंब्रिजचे वैशिष्ट्य विज्ञानाच्या शाखा हे आहे तर ऑक्सफर्डचे वैशिष्ट्य कलाशास्त्राच्या शाखा हे आहे इथे मुक्काम दीड तासाचा होता तेव्हा ख्राइस्ट, किंग्ज, ट्रिनिटी, सिडनी, ससेक्स, पेंब्रूक ही महाविद्यालये बाहेरून पाहिली त्याशिवाय ग्रेट सेंट मेरी चर्च पाहिले नि गावातून फेरी मारली क्रॉम्वेल, पीट, बेकन, न्यूटन, डार्विन, मिल्टन, वर्डस्वर्थ, टेनिसन हे सगळे केंब्रिजचे विद्यार्थी तसेच इंग्लंडचे अनेक श्रेष्ठ खेळाडू केंब्रिजमध्ये तयार झाले आहेत

केंब्रिजहून आम्ही लिंकनला जाणार होतो तिथले कॅथिड्रल प्रेक्षणीय आहे. पण तिकडे गेले असता यॉर्कला उशिरा पोहोचू नि तिथल्या गोष्टी पाहण्यास वेळ मिळणार नाही असे कॅरीचे म्हणणे होते पण लिंकनला जायचे की नाही हे तुम्ही ठरवा असे तो म्हणाला आता बस ग्रेट नॉर्थ रोड ए वनवर धावत होती हा रस्ता एडिंबरापर्यंत जातो रोमन काळापासून तो आखलेला आहे. पश्चिम इंग्लंडमध्ये जे निसर्ग सौंदर्य आढळते तसे आज दिसले नाही मार्गावर गावे कमी होती नि वस्तीही कमी आढळली शेते कापलेली होती त्यामुळे डोळ्यांना आल्हाद देणाऱ्या हिरव्या रंगाचा अभाव होता अर्थात दाट झाडी अधूनमधून दिसत होती

कॅरीच्या अपेक्षेप्रमाणे लिंकनला वगळण्याला कोणी विरोध केला नाही यॉर्क लंडनहून सुमारे १८८ मैल दूर आहे रोमन काळात यॉर्कमध्ये रोमन लोकांची मोठी वस्ती होती नि ते त्यांचे लष्करी केंद्र होते आजही रोमन लोकांनी बांधलेल्या इमारतीचे अवशेष तेथे आहेत मध्ययुगात गावाभोवती बांधलेला कोट अजूनही

असून त्याचे दरवाजे रात्री बंद होतात लोहमार्ग नि मोठे उद्योग याचेही यॉर्क मोठे केंद्र आहे

यॉर्ककडे जाताना बस नॉटिंगहॅमशायरकडून गेली याच काउंटीत शेरवूड फॉरेस्ट होते. तेव्हा रॉबिनहूडच्या कथेचा उल्लेख कॅरीने केला नसता तरच आश्चर्य ! मार्गाच्या डाव्या हाताला शेफिल्ड येत होते, तेव्हा त्याने तिथल्या चाकूकाऱ्यांच्या प्रसिद्धीचाही उल्लेख केला कॅरीसारख्या लोकांना ' गाइड–कम–ड्रायव्हर ' म्हणतात ते उगीच नाही त्याच्याकडे प्रवासाच्या प्रदेशाची भरपूर माहिती होती यॉर्कमधला मुक्काम व्हायकिंग या २५० वर्षांच्या जुन्या हॉटेलात होता मात्र हॉटेल अद्ययावत होते हल्ली फार नोकरवर्ग परवडत नसल्याने चहा, कॉफी, साखर, दूध, याच्या पुड्या नि इलेट्रिक केटल खोलीत ठेवलेली असतात आपल्याला केव्हाही चहा-कॉफी करून घेता येते

यॉर्कमध्ये नॅशनल रेल्वे म्युझियम आहे. असा म्युझियम उभा करण्याचे १९६८च्या ट्रान्सपोर्ट कायद्याने ठरले पुढे सात वर्षांनी तो उघडण्यात आला. इंग्लंडमध्ये लोहमार्गाची उत्क्रांती कशी झाली याचा इतिहास या म्युझियममध्ये मिळतो मुख्य हॉलमध्ये निरनिराळ्या जातींची इंजिने किंवा त्याच्या प्रतिकृती ठेवलेल्या आहेत त्यात १८२९मधले अॅजेनोरिया तसेच १९३८मधले मलार्ड आहे हे एंजिन तासाला १२६ मैल धावत असे हे रेकॉर्ड समजले जाते राजघराण्यासाठी जे डबे होते ते म्हणजे चाकावरचे दिवाणखानेच उत्तम खुर्च्या, कोच, त्यावरचे लाल व्हेलव्हेट कव्हरींग, आरसे, वगैरे वस्तू त्यात होत्या आगगाडीचा उगम ब्रिटन-मधला तेव्हा देशाच्या ऐतिहासिक कर्तृत्वाचे पुरावे अशा प्रकारे संग्रहालयात जपून ठेवण्याचा प्रयत्न प्रशंसनीय आहे परंपरेकडे पाठ फिरविणे हे नेहमीच पुरोगामी-पणाचे लक्षण नसते

परतीच्या वाटेवरच रोमन अवशेष होते ते पाहून यॉर्क कॅथिड्रलकडे आलो हे गोथिक कॅथिड्रल आहे आतले स्टेनग्लासेस, त्याची तीन उंच गोपुरे, त्यातल्या घंटा, नि त्याचा प्रचंड मोठा दर्शनीय भाग यामुळे कॅथिड्रलचा खूप लौकिक असून ते पाहण्यासाठी देशोदेशींची शेकडो माणसे येतात. पण आम्ही दाराशी यायला नि कॅथिड्रलची दारे बंद व्हायला एकच गाठ पडली अर्थात मी हे कॅथिड्रल १९५२मध्ये पाहिले होते डॉक्टरला पाहता आले नाही इतकेच ! यॉर्कला आलेला प्रवासी त्याच्या कोटावरून चालला नाही असे क्वचित घडते कोटावरून गावाचे छान चित्र दिसते गाव सुंदर असून घरे छोटी आहेत लहान उद्यानेही किती तरी असून बहुतेकात गुलाबाची झाडे विपुल होती

सकाळी सव्वा आठला यॉर्कमधून बाहेर पडलो तेव्हा धुके नि थंडी होती. गावातून बाहेर पडणाऱ्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंना डोंगराची माळ होती झाडांवर दव होते दूरचे फार दिसत नव्हते भरपूर लोकर असलेल्या गलेलठ्ठ मेंढ्या कुरणांतून

चरत होत्या. दृश्य चित्तवेधक होते सुमारे पाऊण तासाचा प्रवास झाला नि धुके गेले आजचा पहिला थाबा डर्‌हॅमला होता

डर्‌हॅम लडनहून २५४ मैलावर आहे. येथील कॅथिड्रल नि किल्ला प्रसिद्ध आहे ती दोन्ही उचवट्यावरच आहेत किल्ल्यापेक्षा कॅथिड्रल अधिक उचीवर आहे. तिकडे जाणारा रस्ता चिंचोळा, चढीचा नि बराचसा व्यापारी पेठेतून आहे डर्‌हॅमला तासभरच थाबावयाचे असल्याने आम्हाला कॅथिड्रलकडे लगबगीनेच जावे लागले इग्लडमध्ये जी भव्य कॅथिड्रल्स आहेत त्याच्यामध्ये डर्‌हॅमची गणना होते, आणि कॅथिड्रलला भेट दिल्यावर ही ख्याती यथार्थ आहे हे पटते

अकरानतर एडिंबराकडे निघालो मार्गावर वॉशिग्टन काउटी लागली कॅरीच्या सागण्याप्रमाणे अमेरिकेचा पहिला अध्यक्ष जॉर्ज वॉशिग्टन याचे पूर्वज या भागातले नतर बस गेट्‌सहेड या गावाकडून गेली यांत्रिक कारखाने, रेल्वे वर्कशॉप, रसायने नि जहाज उद्योग ही गावाची कमाई आहे गेट्‌सहेडच्या पलीकडे न्यू कॅसल येते यावेळी 'कॅरिंग कोल्स् टू न्यू कॅसल' या म्हणीचा कॅरीने उल्लेख केला पण बहुतेक जण हा उद्योग आयुष्यात केव्हाना केव्हा तरी करतात!

आता अरण्यमय प्रदेश आला रस्त्याच्या दोन्ही बाजूना खडक आढळले नि दूर डोगर दिसू लागले बाराच्या सुमारास छोटी घाटी लागली ती ओलांडल्यावर 'नॉर्थ' सी दृष्टिपथात आला मग रस्ता समुद्रकिनाऱ्याने गेला काही वेळ किनारा शभर फुटांवर होता आणि रस्ता डोंगरात असल्याने सुमारे चारशे फूट खाली समुद्राच्या लाटा उसळताना दिसल्या स्कॉटलडमधून प्रवास करताना महाराष्ट्राची आठवण येते मुबईचे भूतपूर्व गव्हर्नर लव्ले याना सातारा भागात हिडताना स्कॉटलडची आठवण झाली होती

स्कॉटलंड नि इग्लड राजकीय दृष्ट्या एक असले तरी कायदा, कोर्ट, सप्रदाय, भाषा या सबधात ते दोन देश भिन्न आहेत पूर्वी स्कॉटलड फार गरीब होते डॉ जॉन्सन विनोदाने म्हणत असे की, इग्लडकडे जाणारा मार्ग धरणे ही प्रत्येक स्कॉच माणसाची महत्त्वाकाक्षा असते पण उत्तम वैज्ञानिक, राजकारणी, डॉक्टर स्कॉटलडमध्ये झाले आहेत. यदुनाथ सरकारांनी कुठे तरी लिहिले आहे की, ब्रिटिश साम्राज्याच्या वाढीला स्कॉटिश अधिकाऱ्यांचा बराच हातभार लागला आहे साम्राज्यकाळात या दोन देशातील तेढ बोलण्यापुरती दर्शविली जाई पण आता स्कॉच राष्ट्रवाद वर येत आहे नि तिथे स्वायत्ततेच्या गोष्टी बोलल्या जातात. स्कॉटिश नॅशनॅलिस्ट पार्टी अस्तित्वात आहे या दोन देशांतला गमतीदार फरक मॉर्टनने 'इन स्कॉटलड अगेन' या ग्रथात दाखवला आहे ते म्हणतात की, आवश्यक तेव्हा प्रॉटेस्टट किंवा कॅथॉलिक होणारा व्हिकार ऑफ ब्रे याच्या बाबतीत इग्रज लोकांनी चेष्टा करणारी कविता केली अशी कविता स्कॉटलंडमध्ये लिहिली गेली नसती, किंवा म्हटली गेली नसती दोन देशातला मुख्य फरक म्हणजे समेटवृत्ती

हा इंग्रजाचा स्वभाव आहे स्कॉटिश लोकांना या शब्दाचा अर्थ माहीत नाही.

एडिंबरा ही स्कॉटलंडची राजधानी येथील सर्वांत महत्त्वाचे ऐतिहासिक स्थान म्हणजे 'एडिंबरा कॅसल' त्यातच 'नॅशनल वॉर मेमोरिअल,' राजवाडा वगैरे आहेत गावात वॉल्टर स्कॉटचे मेमोरिअल नसते तरच आश्चर्य! माउंट रॉयल हॉटेलमध्ये आम्ही राहत होतो येथेच डाव्या हाताला समोर हे स्मारक होते एडिंबराच्या वैद्यकीय शिक्षणाची फार ख्याती आहे सुमारे १२७ वर्षे चाललेले 'द एडिंबरा रिव्ह्यू' हे प्रसिद्ध मासिक इथलेच

गावात शिरल्यावर आम्ही प्रथम कॅसलवर गेलो तिथल्या म्युझियममध्ये शस्त्रे, लष्करी वेष, चांदी-सोन्याची पदके, ध्वज ठेवलेले आहेत एका दालनात दागिने तसेच राजमुकुट आहेत मेरी क्विन ऑफ स्कॉटची खोली मुद्दाम दाखवतात मॉर्टन म्हणतात, 'या खोलीत एक पलंग राहणे कठिण त्यात पहिल्या जेम्सला मेरीने जन्म दिला' खोलीच्या खिडकीतून पाहिले की, खाली दरी दिसते कॅथॉलिक संप्रदायाचे संस्कार करण्यासाठी याच मार्गाने या बालकास टोपलीतून खाली सोडण्यात आले अशी कथा सांगतात दोन महायुद्धांत कामास आलेल्या सैनिकांचे येथेच मोठे स्मारक आहे किल्ल्यावरच्या विहिरीत २८,५०० गॅलन पाणी असून ती ७१० फूट खोल आहे या भागात नेल्सनचे 'मॉन्युमेंट' आहे कॅरीच्या सांगण्या-प्रमाणे त्याला काही लोक 'मॉन्युमेंटल फॉली' म्हणतात!

पूर्वी एडिंबराला येऊनही स्कॉटिश संगीतनृत्याचा कार्यक्रम मी पाहिला नव्हता तेव्हा आज त्या कार्यक्रमाला गेलो त्याची जाहिरातही बरीच झाली होती एकंदर तीन तासांचा कार्यक्रम झाला त्यात थोडे मद्य नि अल्पोपहार देण्यात आला काही गाणी उत्तम होती. आणि तीनचार नृत्याचे प्रकार बरे वाटले पण आमचा गट आला नसता तर कार्यक्रम रद्द होणार होता असे मागाहून कळले त्यावरून कार्यक्रमाच्या आकर्षकतेची कल्पना बांधता येईल!

आता परतीचा दक्षिणेकडचा प्रवास सकाळी आठ वाजता सुरू झाला प्रवासाचा मार्ग पेटलँड टेकड्यातून होता हा डोंगराळ प्रदेश प्रामुख्याने एडिंबरा, पिबल्स, लॅनार्क या परगण्यात येतो हा रस्ता पुढे लॉकरबीकडून ग्रेटना ग्रीनकडे येतो आज धुके विलक्षण होते नि स्वेटर घालण्याइतकी थंडी होती भोवताली हिरवेगार मैदान होते, डोंगर अंतरावर होते रस्त्यावर फारशी गर्दी नव्हती पावसाळ्यातल्या कामशेतची आठवण देणारा हा प्रदेश होता. घरे फारशी दिसली नाहीत हिरवी कुरणे मात्र विस्तीर्ण होती त्यात मेंढ्यांचे कळप होते आता आकाश भरून आले बस ट्वीड नदीच्या काठाने जात होती येथे फरच्या झाडाची मोठी लागवड दिसली थोड्याच वेळात दोन्ही बाजूंना उंच डोंगर आले झिमझिम पाऊस सुरू झाला डोंगर ओलांडून बस नदीच्या काठाने जाऊ लागली नदीचे पात्र छोटे होते पावसाला जोर आला धुकेही वाढले. त्यामुळे सायंकाळचा भास झाला-

या डोंगरातच ट्वीड नदीचा उगम आहे

आता डोंगर पाठीमागे पडले झाडे छोटी झाली. बराच वेळ रस्ता पठारातून गेला मग काही वेळ डोंगरात शिरला येथेच कॅरीने प्रथम हॉर्न वाजवला यानंतर प्रवासात एकदोनदा त्याने तो वाजवला पण चार दिवसाच्या प्रवासात हॉर्न इतक्या कमी वेळा वाजणे हे भारतीय प्रवाशाला चमत्कारिक वाटणारे होते ! पावसाचा ओर चागलाच होता पण चरणाऱ्या मेंढ्यावर त्याचा परिणाम दिसत नव्हता लॉकरबीमध्ये ऑगस्ट महिन्यात मेंढ्याची जत्रा भरते आता लागलेल्या दऱ्या छोट्या होत्या मात्र त्यातली वृक्षराजी दाट होती रस्त्याला उतरण होती पाऊस पडत होता थडीची धार कमी झाली नव्हती धुके इतके होते की, सर्व मोटरी दिवे लावून पळत होत्या अकरानंतर ग्रेटना ग्रीन आले

या छोट्या गावाचा मोठा रोमाचकारी इतिहास आहे स्कॉटलड—इग्लड याच्या सीमेवर ते गाव आहे लग्नाविषयीचे निर्बंध स्कॉटलडमध्ये कमी कडक असल्याने इग्लडमधली प्रेमी जोडपी आपल्या कुटुबियाना चकवून येथे येऊन लग्ने करीत ही लग्ने लोहार आपल्या छोट्या कारखान्यात लावून देत असे. मॉर्टन 'इन सर्च ऑफ इग्लड' या ग्रथात सागतात की येथे एक आर्चबिशप ऑफ कँटरबरी, तीन लॉर्ड चॅन्सेलर, नि एक प्रिव्ही सील यांची लग्ने लागली आहेत

लोहाराचे दुकान रस्त्याच्या जवळ असून एक मजली आहे त्यातील अर्धा भाग राहण्यासाठी असून उर्वरित जागेत आता सुव्हेनिअर्स, फोटो, नि चित्रे अशा गोष्टी विकण्यासाठी ठेवलेल्या आहेत त्याशिवाय लग्ने झालेल्या लोकाचे फोटो आहेत तसेच भिंतीवर टागलेल्या चित्राखाली विनोदी वाक्ये दिलेली आहेत एका चित्रात बग्गीतून पळणारे जोडपे दाखविले आहे या बग्गीला अपघात झाल्याने मुलगी हतबुद्ध झालेली आहे चित्राखाली लिहिले आहे भक्कम बग्गीलाही काही वेळी अपघात होतात ' दुसऱ्या चित्रात पहिल्या बग्गीला दुसरीने जवळजवळ गाठले असून तिच्यात मुलीचा बाप आहे तिसऱ्या चित्रात पूर आलेली नदी दाखविली असून खाली गाडीवानाचे वाक्य आहे 'कठीण आहे जरा शेवटच्या पाच मैला-साठी अजून वीस मिनिटे लागतील आपणाला बाहेर पडायचय ?'

मोठ्या अक्षरात दुकानाची पाटी सागते 'हेच ते जगप्रसिद्ध जुने लोहाराचे दुकान, नि लग्न लावण्याची खोली ग्रेटना ग्रीन ' बाहेर नागर वगैरे शेतीची आयुधे होती डॉक्टर दुकानाचा फोटो घेत असताना मालक तिथे आला नि म्हणाला, 'माझ्यासह फोटो घ्या ' तो तसा घेतला

बारानंतर बस इग्लिश भूमीवर धावू लागली आम्ही ग्रासमीरकडे जात होतो तिकडे जाणारा मार्ग कबरलँडमधल्या कार्लाइल, पेनसीथ, केसवीक या गावा-कडून होता पाऊस थांबला तरी अजून ढगाळलेलेच होते मात्र रस्ते ओले नि झाडावरही पावसाच्या पाण्याचे थेंब दिसत होते सगळा डोंगराळ प्रदेश असून

डोगरही उच होते त्यांची शिखरे धुक्यात लपेटलेली होती, आणि त्याच्यावरची झाडी गर्द नि हिरवीगार होती हा सगळा प्रवास लेक डिस्ट्रिक्टमधून होत होता लेक डिस्ट्रिक्ट म्हणून ख्यात असलेली भूमी चारशे चौरस मैलाची असून त्यात कंबरलँड, वेस्टमोअरलँड नि लँकेशायर यांचा भाग अतर्भूत होतो, आणि त्यात इंग्लडमधले तीन सर्वात उच डोगर आहेत विल्यम वर्ड्स्वर्थने या प्रदेशाला प्रसिद्धी मिळवून दिली त्याचे 'वर्ड्स्वर्थज् गाईड टू द लेक्स' असे पुस्तकही उपलब्ध आहे

डोंगरातून नदी वाहत होती काही वेळ ती रस्त्याच्या बाजूने वाहताना दिसली रस्ता नि नदीचे पात्र ही दोन्हीही चिचोळी होती मधूनच ओढा लागला त्याच्या शेजारी घर होते, नि त्याच्याकडे जाणारा छोटा पूल होता भोवताली दाट झाडी होती घराच्या पाठीमागे उत्तुग पर्वत होता त्या डोगरावरून धबधबा येत होता, नि इतस्तत गुरे नि मेढ्या चरत होती डोळे सुखावतील असेच हे चित्र होते

आता धुक्याचा जोर वाढला पावसाचेही काही थेंब आले डोंगरातून जाणारा रस्ता नागमोडी होता धुके नि दाट झाडी यामुळे ग्रासमीर लगेच दृष्टिपथात आले नाही पण बस जशी उच वळणावर वळली तसे शात जलाशय दिसले. सृष्टीचे येथील निसर्गचित्र खरोखर नितात रमणीय आहे वर्ड्स्वर्थसारख्या निसर्गवेड्या कवीला या भूमीने का मोह घातला याची कल्पना येथे आल्यावरच येते ग्रासमीर सरोवर वेस्टमोरलँड काउटीत येते सरोवराचा परिघ एक मैलाचा आहे वर्ड्स्वर्थ येथे राहत होता त्याच्या घराचे नाव 'डव्हकोट' असून ते डोगराच्या आडोशाला आहे आम्ही गेलो तेव्हा ते बद होते वर्ड्स्वर्थचे दफनही येथील चर्चमध्येच झाले आहे

ग्रासमीरमधून दुपारी दोननतर निघालो रस्ता निमूळता, वळणावळणाचा नि चढाचा होता त्याच्या दोन्ही बाजूंना निबीड अरण्य होते मार्गावरच रिडाल वॉटर हे सरोवर लागले ते अर्ध्या मैल लांबीचे असून त्याच्या भोवतालची वनश्री मनोज्ञ आहे आता बस विडमिअर सरोवराच्या बाजूने जाऊ लागली इग्लडमधले हे सर्वात मोठे सरोवर त्याची लांबी साडेदहा मैलाची असून त्याच्या भोवतालची अरण्यशोभा रमणीय आहे यावेळी आकाश भरून आले नि धुके दाट झाले त्यामुळे काळोख झाल्यासारखा वाटला त्यातच दाट झाडी होती पावसाचे थेंब पडू लागले मला वर्षा ऋतूतल्या माथेरानचे स्मरण झाले

आता बस केंडालकडून गेली यावेळी कॅरीने इग्लिश इतिहासाची काही पाने सांगितली आठवा हेन्री हा इग्लिश इतिहासात प्रसिद्ध आहे त्याच्याच राजवटीत कॅथॉलिक रोमशी सबध तोडण्यात आला हेन्रीने अनेक बायका केल्या त्यापैकी शेवटची कॅथॅरिन पार ही या केंडाल गावातली स्कॉटला 'लेडी ऑफ द लेक'ची स्फूर्ती तिच्यामुळे मिळाली असे कॅरी म्हणाला.

केंडाल मागे टाकून बस लँकेशायरमधल्या मार्गावरून धावू लागली लिव्हरपूल, मँचेस्टर ही त्यातली गावे काही वेळ बस मँचेस्टर गावातून गेली यावेळी जहाजाना

समुद्राकडे नेणारा गावातला कालवा आम्हाला दिसला

पाचच्या सुमारास चेस्टर आले गेल्या आठवड्यात आम्ही या गावातून पुढे गेलो होतो. आज राहण्याची सोय क्विन हॉटेलमध्ये होती चेस्टर लहान असले तरी पाहण्यासारखे आहे येथील उत्खननात रोमन अवशेष मिळाले आता त्याच्याभोवती लोखंडी कुपण घातले आहे पलीकडेच अकराव्या शतकातले पॅरिश चर्च आहे आम्ही गेलो तेव्हा दरवाजा बद होता पण पाठीमागून एक कुटुब आले नि ते आत गेले त्याच्या पाठोपाठ आम्ही आत गेलो. कोपऱ्यात काचेचे कपाट होते त्यात माहिती ठेवलेली होती ती किती जुनी होती याची कल्पना पुढील गोष्टीवरून येईल हिशेबाची वही १६८३मधली होती बॅप्टिझमच्या नोंदी १५६१मधल्या होत्या लग्नाच्या रजिस्टरमधल्या नोंदी १६१४मधल्या होत्या दफन केलेल्या लोकांची यादी १७२९मधली होती आणि हे सर्व एका छोटया गावातले !

चेस्टरभोवती तट असल्याचा उल्लेख पूर्वी केला आहे त्यावरून आज मैलाची चक्कर मारली जेव्हा नदी आली तेव्हा तिच्या पुलापाशी आम्ही खाली उतरलो. मग गावातून हिंडत हॉटेलकडे आलो. गाव टुमदार, सुबक नि स्वच्छ आहे मोटरी फार नव्हत्या लोकांची गर्दी अगाला अग भिडण्याइतकी नव्हती शेवटी एका गोष्टीची नोंद आवश्यक आहे कॅरी म्हणाला होता, ' इकडच्या भागात गुन्हे कमी होतात खरे इग्लिश लोक इकडेच राहतात रस्त्यात पडलेली पर्स कोणी उचलणार नाही ' बोलाफुलाला गाठ म्हणा, पण आम्हाला रस्त्यावर अशी पर्स पडलेली दिसली आमच्या पाठीमागून माणसे आली पण कोणीही ती उचलली नाही.

गावातून बस बाहेर पडली तेव्हा सकाळचे सव्वा आठ वाजले होते पाऊस पडून गेला होता परंतु ढगाळलेले होते धुके मात्र नव्हते थडीही कमीच होती दीड तासानतर ढगही विरले उन्ह आले उष्मा होऊ लागला रस्त्यावरची वाहनांची रहदारी खूप वाढली आज बस प्रथम कॉव्हेट्रीपाशी थाबली हे गाव वॉविकशायरमध्ये येते इग्लडमधल्या यादवी युद्धात पार्लमेटरी पक्षाने राजपक्षाच्या कैद्याना इतक्या उपेक्षेने वागविले की इग्रजीत ' To send a person to Coventry ' असा वाक्‌प्रचार रूढ झाला कॉव्हेट्री हे यान्त्रिक उद्योगाचे विशाल केंद्र होते दुसऱ्या महायुद्धात या शहरावर जर्मनानी विमानातून दहा तास बॉबमारा केला त्यामुळे एक–तृतीयांश घरे नष्ट झाली बसचा अर्धा ताफा नादुरूस्त झाला दूरध्वनीच्या सातपैकी सहा लाईनी बिघडल्या. लोहमार्गावरील वाहतूक बद पडली गावाचा अलकार असणारे भव्य कॅथिड्रल जवळजवळ जमीनदोस्त झाले इग्रजानी त्याचा वचपा ड्रेस्डेनला पूर्ण बेचिराख करून काढला इग्लडवर बॉबहल्ला होत असताना एअर मार्शल हॅरिस म्हणाले, ' ते जे पेरत आहेत त्याची फळे हॅबुर्ग नि ड्रेस्डेन या गावातील लोक चाखणार आहेत '

कॉव्हेट्रीवर बॉबहल्ल्याची चिन्हे दिसत नाहीत. नष्ट झालेल्या भागात

अद्यतन घरे नि इमारती उभ्या झाल्या आहेत परंतु जुन्या चर्चचा उद्ध्वस्त भाग स्मारक म्हणून ठेवण्यात आला आहे. त्याच्या शेजारी अत्यंत आधुनिक रचनेचे चर्च बांधण्यात आले आहे तेही भव्य आहे नवीन चर्चच्या भिंतीवर लिहिले होते की, प्राचीन काळापासून कलाकार नि कारागीर यानी आपले हस्तलाघव चर्चची सेवा करून परमेश्वरचरणी अर्पण केले आहे या चर्चच्या उभारणीत ड्रेस्डेनच्या लोकांनी सहाय्य केले. असेच उलट सहाय्य कॉव्हेंट्रीच्या लोकानी ड्रेस्डेनच्या सबधात केले युद्धकालात झालेल्या समाजाच्या मानसिक जखमा अशा प्रकारे बुजविण्याचा प्रयत्न झाला चर्चमध्ये एक छोटे प्रदर्शन नि जाहिरात होती 'कॉव्हेंट्री–कलकत्ता प्रोजेक्ट. मुलाना वैद्यकीय सहाय्य पोहोचविण्यासाठी लँडरोव्हर गाडी विकत घेऊन सज्ज करण्यासाठी आर्थिक सहाय्य द्या '

स्ट्रॅटफर्ड अपॉन अॅव्हॉन हेही वॉर्विकशायरमध्ये येते ते कॉव्हेंट्रीच्या दक्षिणेला आहे. कॉव्हेंट्रीहून आम्ही स्ट्रॅटफर्डला आलो हे शेक्सपिअरचे जन्मगाव त्याचे घर राष्ट्रीय स्मारक झाले आहे. मागच्या वेळी मी येथे आलो होतो, नि शेक्सपिअर मेमोरिअल थिएटरमध्ये नाटकही पाहिले होते यामुळे मला गावाविषयी किंवा स्मारकाविषयी विशेष उत्सुकता नव्हती बाकीची मडळी आत जाऊन स्मारक पाहून आली मी फक्त येथे मोजे विकत घेतले

सहलीचा शेवटचा थाबा होता ऑक्सफर्ड पण ऑक्सफर्ड नि केंब्रिज ही पाहिलेली नगरे होती तेव्हा गावातून नुसते आम्ही हिंडलो या दोन गावात नेहमी स्पर्धा राहिलेली आहे ऑक्सफर्ड–केंब्रिज बोट रेस प्रसिद्धच आहे पण ही गावे एक-मेकांच्या वाकुल्या कशा काढतात याची कल्पना पुढील कवितेवरून येईल राजाने केंब्रिजला पुस्तकांच्या सचाची भेट दिली ही वार्ता प्रकट झाल्यावर ऑक्सफर्डमधल्या विनोदी कवीने लिहिले

To Oxford sent a troop of horse, for why?
That learned body wanted loyalty
To Cambridge books he sent, as well discerning
How much that loyal body wanted learning

याला केंब्रिजकडून उत्तर आले

The King to Oxford sent a troop of horse,
For Tories own no argument but force
With equal skill to Cambridge books he sent,
For Whigs admit no force but argument

दुसऱ्या महायुद्धाच्या हकिगती वाचताना वाचक ज्या काही व्यक्तीच्या नावाशी थबकतो नि विचार करू लागतो त्यापैकी एक नाव विन्स्टन चर्चिल याचे आहे दुसरे महायुद्ध झाले नसते तर चर्चिल यांचे असामान्य व्यक्तित्व जगाला अज्ञात राहिले असते पण युद्धामुळे त्यांना सधी मिळाली युद्धकालातील त्यांच्या कर्तृत्वाचे

मूल्यमापन करताना नवीन पतप्रधान ॲटली म्हणाले होते, ‘आमच्यांत कितीही राजकीय मतभेद असले तरी चर्चिल यांनी जी महान देशसेवा केली तिचे स्मरण करताना मी सर्व सभागृहाचे मनोगत व्यक्त करीत आहे असे मला वाटते एका माणसाने राष्ट्राच्या आत्म्याचा आविष्कार करणे नि समाईक इच्छाशक्तीचे कृतीत रूपातर करणे म्हणजेच खरे नेतृत्व आपल्या इतिहासातील अत्यत अधाऱ्या नि मोठ्या सकटसमयी या देशात अशी व्यक्ती पुढे आली की, जिने कोणत्याही स्थितीत शरण जाणार नाही असे धैर्याने नि दृढपणाने जाहीर केले त्यानी सर्वांच्या मनात असलेल्या विचाराना अमर शब्दांत व्यक्त केले ’

ज्यानी चर्चिल याचे साहित्य वाचले आहे त्याना ॲटलीचे वरील मूल्यमापन यथार्थ वाटेल मला अजूनही चर्चिल याची अनेक वाक्ये आठवतात झेकोस्लोव्हाकियाच्या बाबतीत ब्रिटनने शरणागती पत्करली तेव्हा ते म्हणाले, ‘तुम्हाला नामुष्की नि युद्ध यांपैकी एकाची निवड करावयाची होती तुम्ही नामुष्कीची निवड केलीत थोड्याच समयाने तुम्हाला युद्धाला तोंड द्यावे लागेल.’

दुसऱ्या प्रसगी ते म्हणाले, “तेव्हा आता आपण आपले कर्तव्य करण्यासाठी कबर कसू या, आणि असे वर्तन करू या की, ब्रिटिश साम्राज्य नि कॉमनवेल्थ एक हजार वर्षे टिकली तरीही लोक म्हणतील, ‘हाच त्याचा परमोच्च दिवस होता.’” लडनवरच्या बॉबहल्ल्याविषयी ते म्हणाले, ‘ लडनचे लोक एका आवाजाने हिटलरला म्हणतील, तुला जितके जमेल तितके वाईट कर आम्ही त्याला पुरून उरू ” हॅरोच्या शाळेत १९४२मध्ये भाषण करताना ते म्हणाले, ‘हे काही भयानक दिवस नाहीत हे महान दिवस आहेत आपल्या देशाच्या इतिहासातील सर्वांत श्रेष्ठ दिवस आहेत ’

चार्टवेलला चर्चिल याचा निवास होता ते निवासस्थान त्याच्या मित्रानी १९४७मध्ये विकत घेऊन ‘द नॅशनल ट्रस्ट’च्या स्वाधीन केले. ज्या चर्चिल–साहित्याने आपल्याला इतका आनद दिला त्या व्यक्तीचे घर आपण पाहिले नाही याची मला खत होती म्हणून वेळात वेळ काढून तिकडे जाण्याचे ठरविले आम्हाला एलिझबेथ डाऊनी हिला भेटायला जायचे होते मुबईच्या डॉ. सौ. रे याची ती मैत्रीण तिच्याकडे सकाळी जाऊन दुपारी चार्टवेलला जावयाचे असे आम्ही ठरविले. तसे एलिझबेथला कळविल्यावर ती म्हणाली, ‘माझ्या घरी लच घेऊ आणि नतर माझ्याच मोटरीने आपण चार्टवेलला जाऊ ’

‘चार्टवेल मॅनॉर’ १९२२मध्ये मेजर कॅम्बेल कल्कुहौऊनकडून चर्चिल यांनी विकत घेतला, आणि अखेरपर्यंत ते तिथे राहिले निवासस्थानापाशी विशाल उद्यान असून त्याच्या मानाने घर लहान वाटते घरामध्ये फर्निचर वगैरे जसे होते तसेच ठेवलेले आहे. चर्चिल यांनी काढलेली पेंटिंग्ज येथे लावलेली आहेत दिवाणखान्यात एका कोपऱ्यात चर्चिल बिझिक खेळत असत ते टेबल नि पत्ते तसेच ठेवलेले आहेत·

एका दालनात चर्चिल यांना मिळालेल्या भेटी, पदके, मानपत्रे यांचे प्रदर्शन आहे शिवाय त्याचे युनिफॉर्म आहेत गार्टरचा बहुमान मानकऱ्याच्या मृत्यूनंतर शासनाला परत करावयाचा असतो पण राणीने तो येथे ठेवण्यासाठी परत दिला आहे चर्चिल याच्या मातोश्री अमेरिकन असल्याने ते अर्धे अमेरिकन होते तेव्हा त्याना केनेडीच्या राजवटीत सन्माननीय अमेरिकन नागरिकत्व देण्यात आले त्याचा लेख येथे आहे

एका कॉरिडॉरमध्ये आयझेनहॉवर, माँटगॉमेरी, टेडर, अॅलेक्झाडर, मार्क क्लार्क, स्टॅलिन, रुझवेल्ट, ट्रुमन या दुसऱ्या महायुद्धातील नेत्याचे फोटो आहेत. वेव्हेल नि ऑकिन्लेक याचे नाहीत चर्चिल याच्याबद्दलची दोन तीन व्यगचित्रे आहेत एकात मॅक्मिलन, इडन, बटलर चर्चिलसमोर उभे आहेत, आणि चर्चिल आपल्या मत्रिमडळातील बदलाविषयी सागताहेत, 'मला तरुण रक्त हवे आहे' चर्चिलपेक्षा वयाने लहान असलेले हे तिघेजण पडलेल्या चेहऱ्याने त्याच्याकडे पाहात आहेत.

चर्चिल स्वत लेखक असल्याने इथल्या शेल्फवर त्यानी जमा केलेले शेकडो ग्रथ आहेत. त्यात त्याचे स्वत चे आहेतच पण युद्धाविषयी दुसऱ्यानी लिहिलेले काही आहेत. चर्चिल यांनी 'द हिस्टरी ऑफ द इग्लिश पिपल' असा अनेक खडात्मक ग्रथ लिहिला आहे 'सोशल हिस्टरी ऑफ इग्लड' या नावाचे ग्रथ इथल्या शेल्फवर मी पाहिले चर्चिल यांच्या मुलांनी आई वडिलाना वेळोवेळी दिलेल्या भेटी तसेच त्यांची मुलगी सहारा हिने काढलेली चर्चिल याची चित्रे या सर्वांचे प्रदर्शन येथे आहे

उद्यानात एका बाजूला उतरणीच्या दिशेने चर्चिल यांचा स्टुडिओ आहे त्यात प्रवेश करण्यासाठी शुल्क भरावे लागते. आत एका खोलीत त्यानी काढलेली चित्रे आहेत काही अपूर्ण आहेत येथे चित्रकलेला आवश्यक असणारी साधन सामुग्री ठेवलेली आहे एका दालनात अनेक बारीक सारीक गोष्टीचे प्रदर्शन आहे त्यात युद्धकाळातले त्याचे रेशनबुक आहे त्यावरून मला एका कथेची आठवण झाली. चर्चिल याना जेवताना मासाचा उत्तम तुकडा वाढण्यात आला आठ दिवसानी तोच तुकडा पुन्हा आला चर्चिल यानी पृच्छा केली की, हाच तुकडा आपल्याला कसा मिळाला चौकशीत कळले की, खाटीक तो तुकडा मुद्दाम बाजूला काढून ठेवत असे. चर्चिल यांनी त्याला निरोप पाठविला की, प्रत्येक नागरिकाला क्रमाक्रमाने हा तुकडा मिळाला पाहिजे. एकाच व्यक्तीसाठी तो ठेवता कामा नये चर्चिल यांच्या स्वभावाचा पैलू दाखविणारी आणखी एक गोष्ट येथे आहे. ती म्हणजे सहीसाठी येणाऱ्या पत्राच्या मसुद्यासबधीची त्याची सूचना 'फार कृतज्ञ आहे' हे शब्द मसुद्यात असता कामा नयेत कृतज्ञ आहे की नाही हे फक्त मी ठरवू शकतो.

बागेच्या कोपऱ्यात एका बाजूला चर्चिल यानी बाधलेली भित दाखवण्यात येते. हे काम करतानाचा चर्चिल याचा फोटोही आहे या सबंधातील एक मजेची गोष्ट म्हणजे आपण ब्रिकलेअरचे काम करीत असल्याने ब्रिकलेअरच्या युनियनने

आपल्याला सभासद करून घ्यावे असा अर्ज चर्चिल यानी केला होता अर्थात तो मंजूर झाला नाही ही गोष्ट वेगळी.

उद्यानात एक ओहोळ आहे तो खाली सरोवराला जाऊन मिळतो चर्चिल यानी या ओहोळातून एक लहान तळे निर्माण केले, नि त्यात सोनेरी मासे ठेवले येथे एक दगडी खुर्ची आहे येथे बसून ते माश्यांना खाद्य घालीत अजूनही पाय वाजले की, मासे वर येतात चर्चिल यानी उत्तमोत्तम भाषणाची तयारी इथल्या एकातात बसून केली असे सांगतात वाटेवरच एका जागी 'बटरफ्लाय हाऊस' आहे कोशातून फुलपाखरू बाहेर आले की, चर्चिल ते उद्यानात सोडत. दर वर्षी हजार ते पधराशे निरनिराळ्या जातीची फुलपाखरे उद्यानात सोडण्यात येत

वास्तू नि उद्यान ही सरदारी थाटाची आहेत चर्चिल स्वत बादशाही खाक्याचे होते पण सामान्य माणसाविषयी त्याची कणव शाब्दिक नव्हती त्याचा पराभव झाल्यावर लॉर्ड मोरान म्हणाले, 'लोकांत कृतज्ञता नाही' चर्चिल म्हणाले, 'छे, छे असे काही मी म्हणणार नाही लोकानी फार भोगले आहे' चर्चिल याच्या अनेक मताविषयी मतभेद असू शकतात पण ते असामान्य पुरुष होते याविषयी मतभेद असू शकत नाही अशा व्यक्तीच्या निवासस्थानात आपण काही क्षण घालविले याचे अनोखे समाधान मला मिळाले

●

# ११. डब्लिन

आयर्लंडच्या स्वातंत्र्यलढ्याचा भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या पद्धतीवर बराच परिणाम झाला आहे तात्यासाहेब केळकरानी 'आर्यलडचा इतिहास' हे पुस्तक लिहिले होते ना सी फडके यानी टेरेन्स मॅक्स्विनीचे चरित्र लिहिले होते लडनमध्ये ब्रिक्स्टनच्या तुरुगात असताना वीर सावरकराना आयरिश क्रातिकारकाच्या सहाय्याने सोडविण्याची योजना होती अशा आयर्लंडला भेट देण्याचे माझ्या मनात फार पूर्वीपासून होते पण हा मनोरथ या वेळेच्या सफरीत पूर्ण झाला

ब्रिटनमध्ये प्रवेशासबधी कडक निर्बंध आहेत तेव्हा डब्लिनहून परत लडनला आल्यावर प्रवेश नाकारला तर काय याची उगाचच मला भीती वाटत होती पण श्री आर्या यानी सर्व चौकशी करून ही भीती अनाठायी आहे असे आम्हाला सागितले. मग एके दिवशी सकाळी विमानाने डब्लिनला जाण्यास आम्ही निघालो आज ब्रिटिश एअरवेजच्या विमानात त्याच्याच मासिकात पोलडवरचा लेख पाहिला त्यात हॉटेलची व्यवस्था असल्याशिवाय वॉर्साला जाऊ नये अशी साव-धानतेची सूचना दिलेली होती बरे झाले ही सूचना वॉर्साला जाऊन आल्यानतर मी वाचली

डब्लिनला विमान उतरले आणि आम्ही बाहेर आलो दक्षिण आयर्लंड हा स्वतत्र देश आहे पण प्रवेशाबद्दल तेथे अजिबात अडचणी येत नाहीत येथे लडनहून येणे म्हणजे मुबईहून दिल्लीला जाण्याइतकेच सोपे आहे. विमानतळावर चौकशी करून हॉटेल बुकिंग केले मग टॅक्सीने हॉटेलकडे येण्यास निघालो. टॅक्सीवाला बोलका होता नि त्याने डब्लिनची माहितीही थोडक्यात चागली दिली आमचे हॉटेल ओकानेल पथावरून आत जाणाऱ्या एक रस्त्याच्या तोंडावरच होते ओकानेल स्ट्रीट हा डब्लिन नगराचा राजपथ. याचे पूर्वीचे नाव सॅकव्हिल स्ट्रीट होते या पथाला मोठा इतिहास आहे सन १९१६च्या 'ईस्टर मडे'ला काही आयरिश नेत्यानी रिपब्लिकन आर्मीच्या एक सहस्र स्वयसेवकांसह या पथावरून प्रचलन करून त्यावरच्या सर्व महत्त्वाच्या इमारती ताब्यात घेतल्या नि एक जाहीर-नामा प्रसिद्ध केला (त्याची प्रत म्युझियममध्ये नि ट्रिनिटी कॉलेजच्या ग्रथालयात आहे) त्यानतर एक आठवडाभर ब्रिटिश सैन्य नि रिपब्लिकन आर्मी याच्यात तुबळ लढाई झाली यावेळी ब्रिटिशानी तोफाचा वापर केला त्यामुळे अर्धा रस्ता उद्ध्वस्त झाला शेवटी या आर्मीतले सैनिक शरण आले पुढे त्याच्या नेत्यांना मार्शल लॉखाली गोळ्या घालून मारण्यात आले पण त्यामुळे सघर्ष अधिक तीव्र झाला शेवटी ब्रिटिशानी आयर्लंडला 'डोमिनिअन स्टेटस्' दिले हा करार ज्याना मान्य नव्हता, त्यांनी यादवी युद्ध सुरू केले त्यात मायकेल कोलिन्स हा आयरिश

देशभक्त सेनानी मारला गेला पुढे डि व्हॅलेरानी परिस्थितीशी जमवून घेतले

डॅनिएल ओकानेल हा एकोणिसाव्या शतकातील आयरिश देशभक्त त्याला 'लिबरेटर' ही पदवी आहे त्याचा पुतळा या राजपथाच्या नदीजवळच्या चौकात आहे पथाच्या दुसऱ्या टोकाला पार्नेलचा पुतळा आहे पुतळ्याखाली पार्नेलच्या भाषणातील उतारा आहे राष्ट्राच्या वाटचालीला सीमा घालण्याचा कोणाला अधिकार नाही. इतक्याच मर्यादेपर्यंत तुला जाता येईल, पुढे जाता येणार नाही असे कोणालाही आपल्या राष्ट्राला सांगता येत नाही आयर्लंडच्या प्रगतीच्या मर्यादा ठरविण्याचा आम्ही कधी प्रयत्न केला नाही आणि यापुढे करणार नाही ' या दोन टोकावरच्या पुतळ्याच्या मधल्या रस्त्यावर डब्लिनला पाणीपुरवठा करण्याची योजना करणारा सर जॉन ग्रे, दारुबंदीचा पुरस्कर्ता फादर मॅथ्यू, आणि जिम लार्किन याचे पुतळे आहेत लार्किनच्या पुतळ्याखाली त्याचे वाक्य दिले आहे 'मोठे लोक मोठे वाटतात कारण आपण गुडघ्यावर उभे आहोत चला, आपण पायावर उभे राहू '


पार्नेलच्या पुतळ्याच्या पलीकडे सिटी म्युझियम नि चर्च आहे. त्याच्या अलीकडे 'गार्डन ऑफ रिमेंब्रन्स' आहे १९१३मध्ये येथेच 'आयरिश व्हॉलंटिअर आर्मी'ची स्थापना झाली होती नंतर तीन वर्षांनी झालेल्या ईस्टरच्या उठावानंतर आयरिश सैनिकांना रात्रभर येथेच डांबून ठेवण्यात आले होते हे उद्यान आयरिश स्वातंत्र्यवीराचे स्मारक आहे त्याचे उद्घाटन १९६६मध्ये डि व्हॅलेरा यांनी केले या वर्षी ईस्टर उठावाला पन्नास वर्षे झाल्याने त्याची सुवर्ण जयंती अशा प्रकारे साजरी करण्यात आली

उद्यान खोलगट भागात आहे उद्यान तसेच त्याच्यातील हौद या दोघांचा आकार क्रॉसचा आहे हौदात निळ्या लाटा दाखविणाऱ्या मोझाइक्स आहेत तळाशी तलवार, ढाल, भाले मोडलेल्या स्थितीत दाखविली आहेत संधी होऊन शांतता झाली की, जलाशयात आपली शस्त्रे टाकण्याची प्राचीन केल्टिक पद्धत आहे तिचा प्रतिकात्मक रीतीने येथे उपयोग केला आहे

हौदावरून पुढे गेले की, एक शिला-स्मारक येते स्मारकाची कल्पना यिट्सच्या 'ईस्टर १९१६' या कवितेवरून घेतलेली आहे इतिहासात एका विशिष्ट क्षणाला माणसाचे पूर्ण परिवर्तन होते ही या कवितेची मध्यवर्ती कल्पना आहे येथे माणसाचे हंस पक्ष्यांत परिवर्तन झालेले दाखविलेले आहे. पुनरुत्थान, जय, नि पूर्णता याचे हंस हे प्रतिक म्हणून घेण्यात आले आहे येथील आरक्षक मी भारतीय आहे हे पाहून मोठ्या आपुलकीने बोलला, नि त्याने उद्यानाचे माहितीपत्रक दिले इतकेच नाही तर चौकी उघडून १९१६मधली काही वृत्तपत्रीय कात्रणेही त्याने मला दाखविली. ब्रिटिशांशी आयरिश लोकासारखे भारतीय लढले याची त्याला जाणीव होती. हा 'भाई भाई'चा प्रकार नव्हता!

१९१६च्या उठावानतर आयरिश देशभक्ताना ज्या तुरुगात ठेवण्यात आले होते नि जेथे त्याना गोळचा घालण्यात आल्या तो 'किलमेनहॅम जेल' फक्त रविवारी उघडा असतो पण निदान तो बाहेरून पाहावा म्हणून सकाळीच तिकडे जाण्याचे ठरविले यावेळी हवेला बर्फाची धार होती तुरुगाच्या भागाकडे कोणती बस जाते याची माहिती मिळवून ती पकडण्यासाठी थोडी पळापळ करावी लागली तुरुगासमोर दोन-पाच मोटरी उभ्या होत्या, आणि रस्त्यावरून एखाद-दुसरी बस वा मोटर अधूनमधून जात होती. याशिवाय सगळे शात होते डब्लिनचे असे वर्णन केलेले आहे की, त्याच्या नागरी जीवनाला जरी गती आली असली तरी त्या गतीत घाई नाही या रस्त्यावर उभे राहिले असताना त्या वर्णनाची सत्यता पटली आम्ही तुरुगाचा फोटो घेतला नि परतीची बस घेण्यासाठी थाब्यावर आलो किती तरी वेळ बस नव्हती !

ज्या आयरिश देशभक्ताना गोळचा घालून मारले त्याचे राष्ट्रीय स्मारक आहे तिकडे जाणाऱ्या बसची प्रथम माहिती काढली आणि तिच्यात बसलो



**आयरिश देशभक्ताचे स्मारक**

अखेरचा थांबा आल्यावर उतरलो मग जागेची चौकशी केली दोनचार लोकाना विचारले पण त्याना निश्चित माहिती नव्हती. अखेरीस माहिती मिळाली, नि लगबगीने स्मारकाच्या स्थानी आलो स्मारक चर्चच्या पाठीमागे आहे स्मारकाच्या

मध्यभागी हरित तृणाची चौकोनी जागा आहे पलीकडे भिंत असून त्यावर सोनेरी क्रॉस आहे, आणि भिंतीवर स्वातंत्र्याचा जाहीरनामा आहे भोवताली उंच वृक्ष आहेत स्मारकाच्या जवळ रंगीबेरंगी फुलांची वाटिका आहे स्मारकाकडे जाण्यासाठी तीन चार पायऱ्या चढाव्या लागतात दोन्ही बाजूला देशभक्तांना दफन केले आहे त्यांची नावे एडवर्ड डॅली, मायकेल ओहौराहॉन, विल्यम पर्स, जोसेफ प्लकेट, जॉन मॅक्ब्राईड, कॉन कोलबर्ट, इमॉन सिनट, सिन ह्युस्टन, मायकेल मलीन, जेम्स कॉनोली, सिन मॅकडरनॉट्स्. या स्मारकाचा फोटो घेतला नि आम्ही म्युझियमकडे आलो

म्युझियममध्ये आयरिश वस्तूंचे प्रदर्शन आहे आयरिश लेसीस, काचेची भांडी म्हणजे चषक, मद्याच्या बाटल्या, मेणबत्त्याची घरे, अशा अनेक प्रेक्षणीय वस्तू आहेत काचेच्या वस्तू व्हेनीस नि भारतीय आहेत भारतीय वस्तूसबंधी नोंद आहे 'उत्तर भारतात सारासीन म्हणजे अरबी काचेची परंपरा रेंगाळत होती ' या नोंदीचा अर्थ मला समजला नाही कपाटांतून चांदीच्या वस्तूंचेही प्रदर्शन केले होते. एके ठिकाणी १७ व्या नि १८ व्या शतकातील पत्त्यांचे जोड ठेवलेले होते भिंतीवरची टॅपेस्ट्री दर्शनीय होती

परंतु म्युझियमचे वैशिष्ट्य होते ते क्रांतिकारकांच्या संबंधातील वस्तूंच्या प्रदर्शनात या वस्तूंची नोंद घेताना कोणाचेही मन हेलावले पाहिजे स्वातंत्र्याच्या लढ्यात तळहातावर शीर घेऊन लढणारा वर्ग नेहमीच अल्पसंख्य असतो पण त्यांच्या काळातील बहुसंख्य लोक विस्मृतीत गडप होतात मात्र जिवंत राहतात त्या या देशभक्तांच्या आठवणी !

येथे पिअर्स बंधूंची छायाचित्रे आहेत प्लकेटचे खड्ग आहे डॅलीने मृत्यूच्या आदल्या दिवशी बहिणीच्या हाती दिलेले 'फर्स्ट एडचे ड्रेसिंग ' आहे कॉन कोलबर्टने मृत्यूच्या आदल्या दिवशी डॅली कुटुंबाला लिहिलेले छोटे पत्र आहे 'निरोप घेण्यासाठीची ही ओळ आपण सर्वजण आयर्लंडवर प्रेम करू या ' टॉम केंटला मृत्युदंड होण्यापूर्वी तो ज्या खोलीत होता तिचे रेखाचित्र आहे

एका दालनात डि व्हॅलेरा याच्या सिनफेन ब्रँचची माहिती आहे मायकेल कोलिन्सला छपून गोळी घालण्यात आली त्यावेळेचा त्याचा लष्करी वेष आहे, नि त्याचा डेथ मास्क ' आहे. रॉजर केसमेंटच्या स्मरणार्थ जी पदके काढण्यात आली ती आहेत दुसऱ्या दालनात डॅनिएल ओकानेलचा पुतळा नि तो भाषण करीत असतानाचे चित्र आहे तसेच त्याची काठी नि गळपट्टा आहे तिथेच एक मोठे घोषवाक्य आहे 'सरंजामशाहीचा नाश करा '

दुसऱ्या दालनात आयरिश पार्लमेंटमध्ये वापरल्या जाणाऱ्या वस्तू, त्यांची चित्रे, पुतळे वगैरे आहेत पार्नेलला १८८२मध्ये 'फ्रीडम ऑफ् डब्लिन 'चा किताब मिळाला, तो किताब नि करंडक येथे आहेत अँग्लो–आयरिश युद्धातील सर्व

प्रकारची शस्त्रे आहेत आयरिश–अमेरिकन युतीचे फोटो आहेत. केसमेटच्या आयरिश ब्रिगेडचे कपडे आहेत आयरिश सिटिझन आर्मीसाठी जो ध्वज मेगानीने तयार केला तो येथे आहे आयर्लंडच्या स्वातंत्र्यासाठी आयरिश रिपब्लिकन आर्मी का स्थापन झाली त्याची कारण परपरा सांगणारा मोठा लेख आहे. जेम्स कॉलिन्सचा ईस्टर उठावातला रक्तलाच्छित शर्ट ठेवलेला आहे रिपब्लिकन आर्मीचे सस्थापक नि अधिकारी कॅप्टन व्हाईट याचे छायाचित्र आहे पिस्तूल लपविण्यासाठी आतून कापलेले पुस्तक, बदुकीच्या गोळचा, इत्यादींचे प्रदर्शन आहे येथून बाहेर पडण्या-पूर्वी जाहीरनाम्याची स्लाईड मी विकत घेतली

जाहीरनाम्यातील काही मजकूर पाहिला की, वाटते वीर सावरकरांच्या अभिनव भारताचे हे घोषणापत्र तर नाही ना ? जाहीरनाम्यातील पुढील वाक्ये कशी वाटतात ? 'आयरिश स्त्री पुरुष हो, परमेश्वराच्या नावाने नि ज्या पिढी-कडून आयर्लंडला आपल्या प्राचीन राष्ट्रीयत्वाची परपरा मिळाली त्या पिढीच्या नावाने आयर्लंड आपल्या पुत्राना आवाहन करीत आहे की, त्यानी देशाच्या ध्वजाखाली एकत्र येऊन स्वातंत्र्यासाठी आघात करावा

'आयरिश व्हॉलटिअर नि आयरिश सिटिझन आर्मी ' या नैर्बंधिक सघटना-मधून 'आयरिश रिपब्लिकन ब्रदरहूड ' या गुप्त सघटनेने तरुणांना सघटित नि सुशिक्षित केले, त्याना शिस्त लावली, आणि योग्य सधीची ती सघटना वाट पाहत होती आता अमेरिकेतील देशांतरीत आयरिश बधू तसेच युरोपातील शूर मित्र याच्या सहाय्याने पण मुख्यत स्वतःच्या सामर्थ्यावर अवलबून राहून ही संघटना यश निश्चित मिळणार या विश्वासाने सघर्षात उतरत आहे

आम्ही असे जाहीर करतो की, आयर्लंडवर आयरिश लोकाचे स्वामित्व असले पाहिजे नि त्याचे भवितव्य घडविण्याचा अनिर्बंध अधिकार त्याना असला पाहिजे...'

ट्रिनिटी कॉलेज हे डब्लिनचे एक आकर्षण आहे त्याची स्थापना १५९१मध्ये राणी एलिझाबेथने केली लाल विटांच्या या प्राचीन वास्तूकडे पाहिले की, ही ऑक्सफर्डमधलीच इमारत आहे असे वाटते इथले ग्रथालय १५९२मधले आहे त्याचा हॉल मढवलेला आहे ओक लाकडाचे नक्षीदार स्तभ असून छत पाईन लाकडाचे आहे प्रत्येक खाबापाशी पुतळे आहेत त्यापैकी महत्त्वाचे म्हणजे होमर, शेक्सपिअर, स्विफ्ट, डेमॉस्थिनिस, मिल्टन, बर्क, इत्यादी पुस्तकांची सख्या १२ लक्ष ५० सहस्त्र असून त्यांत सर्व विषय अतर्भूत आहेत लक्षात रहाणाऱ्या दोन गोष्टी 'बुक ऑफ केल्स ' हे प्राचीन हस्तलिखित आहे शेळीच्या कातडयावर लिहिले असून चित्रे नि नक्षी यानी ते सजविलेले आहे त्यामुळे ते जगातील एक अतुलनीय हस्तलिखित मानले जाते. दुसरी म्हणजे मार्क नि ल्यूक याच्या बोधवाणीची प्राचीन हस्तलिखिते.

सेंट पॅट्रिक कॅथिड्रल भव्य आहे त्याची स्थापना ११९०मधली. जोनाथन

स्विफ्ट हा महान लेखक या कॅथिड्रलचा डीन होता येथे एका कोपऱ्यात विहीर आहे तिला त्याचेच नाव आहे. स्विफ्टचे दफनही येथेच झाले त्याने स्वत विषयी जो ' एपिटाफ ' लिहिला तो येथे कोरलेला आहे '

' Here lies the body of Jonathan Swift,
for thirty years dean of this Cathedral
where savage indignation can no longer gnaw his heart
Go traveller, and imitate, if you can, one
who played a man's part in defence of Liberty

मात्र ऑलिव्हर क्रॉम्वेलने इथेच १६४१मध्ये घोडे बांधले होते

डब्लिनबाहेर जावयाचे असेल तर किलार्नीच्या सहलीला जा असे लडनला श्री सिन्हाने सुचविले होते पण ती सहल जुलै ३ ते २८ ऑगस्ट या दिवसांत असते आम्ही डब्लिनला आलो ते सप्टेंबर मध्ये तेव्हा त्या सहलीचा विचार सोडावा लागला मग इथल्या परिचित लोकाच्या सल्ल्यावरून ग्लेंडेलौच्या सहलीला गेलो

ग्लेडेलौ हे डब्लिनपासून तीस मैलांवर विक्लो डोंगरमाळेत आहे विक्लोमध्ये सुदर खोरी नि रम्य दऱ्या आहेत परतु ग्लेंडेलौत जे सौदर्य आहे तसे आयर्लंड-मधल्या दुसऱ्या इतर खोऱ्यात नाही निसर्गशोभेबरोबर आणखी एका गोष्टीसाठी ग्लेंडेलौची ख्याती आहे ती म्हणजे इथली सेंट केव्हिनने चौदाशे वर्षांपूर्वी स्थापन केलेली मॉनस्ट्री ही होय एकातातले संन्यस्त जीवन जगण्यासाठी केव्हिन या प्रदेशात आला त्याच्या साधू जीवनाची ख्याती पसरून त्याच्या कृपाछत्राखाली आयुष्य व्यतीत करण्यासाठी देशातून असख्य माणसे येथे आली, नि मग एक मोठा मठ स्थापन झाला पुढील साडे चारशे वर्षांत या मठाचे ऐश्वर्य वाढत गेले, नि त्याला कॅथिड्रलचा मान मिळाला पण या समृद्धीमुळे डॅनिश लुटारू लोकांची त्याच्याकडे दृष्टी वळली त्याच्या लुटमारीमुळे मठाचे खूप नुकसान झाले पण कालौघात त्याची आर्थिक स्थिती सावरली पुढे १३९८मध्ये ब्रिटिशानी त्याच्यावर आघात केला त्यातून मात्र ग्लेंडेलौ सावरले नाही आता या निसर्गरम्य खोऱ्यात आपल्याला भेटतात ते केवळ त्या मठाचे अवशेष

दुपारी तीनच्या सुमारास तिकडे जाण्यासाठी आम्ही निघालो डब्लिनची लिफी नदी मागे पडली आजही बस ड्रायव्हर हाच वाटाड्या होता आणि तो उत्तम इग्रजी बोलत होता डब्लिनमध्ये ही गमत दिसते आयरिश लोकाची भाषा गॅलिक असून ती अती प्राचीन आहे आयर्लंड १९२१मध्ये स्वतत्र झाल्यानतर गॅलिकला राज्यभाषेचे स्थान देऊन तिला लोकव्यवहारात प्रचलित करण्याचा प्रयत्न आयरिश नेत्यानी केला. परंतु त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला नाही फक्त रस्त्याच्या नावाच्या पाट्या गॅलिक नि इग्रजी भाषेत आढळल्या

वाटेवर नवव्या शतकातले व्हायकिंग चर्च लागले त्यानंतर किलमेनहॅम

तुरुग लागला. नदीतून काढलेला पण आता बद करण्यात आलेला वाहतुकीचा कालवा मागे पडला थोड्या वेळाने डब्लिनच्या उपनगरात उभ्या होणाऱ्या नवीन वसाहती पाठीमागे राहिल्या आता बस डोंगराच्या दिशेने धावू लागली थोडा उष्मा होता नि ढगाळलेलेही होते थोड्याच वेळाने बस घाटी चढू लागली रस्त्याच्या बाजूला नि दूरवर घरे दिसत होती नि त्याच्या भोवताली हिरवीगार शेती होती कुरणातून मेंढ्या नि गुरे चरत होती पण माणसाची किंवा वाहनाची वर्दळ कमीच होती

आता बस पठारावर आली नि वृक्षराजी दाट झाली रस्ता चिचोळा होता या लॅकेन भागात 'शीप फार्मिंग' होते असे ड्रायव्हर म्हणाला दूरवर सरोवर दिसले खूप विस्तृत नि पसरलेले होते नदीचाच भास झाला. इथली घरे अगदी जुन्या पद्धतीची होती त्याच्या बांधणीत दगडाचा बराच वापर होता शाळा गावापासून दोन मैलावर होती गटागटाने मुलेमुली चालत परत येताना दिसली एका गावाच्या अलीकडे बस असताना ड्रायव्हर म्हणाला की, आता मोठे शेत



चॉकलेटसाठी धावत येणारी गाढवे

येईल त्यात दोन गाढवे असतील मी हॉर्न मारला म्हणजे ती पळत येतील मी त्याना चॉकलेट देईन तुम्हाला द्यावीशी वाटली तर तुम्ही द्या शेत येताच ड्रायव्हरने हॉर्न मारला नि गाढवे पळत आली आमच्यापैकी बऱ्याच जणानी

चॉकलेटे दिली, आणि गाढवे चॉकलेटे खात असतानाचे फोटो घेतले.

ब्लेसिंग्टन सरोवर मागे पडल्यावर मोठे मैदान आले त्यात तीन कुत्री धावाधाव करत होती नि गुराना गोळा करून घराकडे हाकलण्याचा प्रयत्न करीत होती हे माळरान थोडे रुक्ष वाटले काही वेळाने किंग्ज रिव्हर लागली. तिचा प्रवाह सात मैलाचा आहे. अत्यंत छोटी असली तरी तीत उत्तम ट्राउट मिळतो आता पुन्हा घाटी आली एका वेळी दोन गाड्या समोरासमोरून जाऊ शकणार नाहीत इतका रस्ता चिंचोळा झाला भोवताली अरण्यच होते

इथेच एके ठिकाणी चार्ल्स पार्नेलचे टुमदार घर आहे त्याच्या अलीकडे रेड बेरीजचे मळे होते पार्नेल हा आयरिश राष्ट्रीय चळवळीचा अग्रणी 'अनभिषिक्त राजा' अशी त्याला पदवी होती ओ शिया नावाच्या लग्न झालेल्या स्त्रीशी त्याचा प्रेमप्रसंग झाला या गोष्टीची फार वाच्यता झाल्याने पार्नेलने राजकारणातून अंग काढून घेतले पार्नेलने या वावटळीकडे दुर्लक्ष करावे असे बर्नार्ड शॉने सुचविले पण तसे घडले नाही पार्नेलचे चरित्र वाचण्यापूर्वी मी त्याच्या जीवनावरचा चित्रपट पाहिला होता त्यात पार्नेलचे काम क्लार्क गेबलने केले होते. घराकडे दृष्टिक्षेप करताना स्वाभाविकच त्याची आठवण झाली.

आता एक छोटा ओहोळ लागला त्याला 'फिडलर्ज स्ट्रिम' असे नाव आहे लोक त्याच्या काठाशी वाद्यसंगीताची आराधना करतात आता बस उताराला लागली भोवतालची झाडी विलक्षण दाट झाली त्यातून खोऱ्यातली घरे अस्पष्ट दिसत होती प्रवाशाचा ओघ सतत असल्याने हॉटेले नि खाजगी लॉज बरेच आहेत खोऱ्याच्या पायथ्याशी एक मोठे आधुनिक हॉटेल होते नि त्याच्यासमोर एक मंजुळ आवाज करणारा निर्झर होता

या हॉटेलकडे पाठ करून उभे राहिले की, समोर मोडकळीस आलेले दार दिसते त्यातून आपण मॉनस्ट्रीच्या आवारात शिरतो प्रथम डोळ्यात भरते ते 'राउंड टॉवर' हा मिनार १०३ फूट उंचीचा असून त्याचा भूमीपाशी घेर १६ फुटाचा आहे तो हजार वर्षांचा जुना असून एकप्रकारे आयर्लंडचे प्रतिक समजला जातो या टॉवरच्या थोडे दक्षिणेला सेंट पिटर नि पॉल याचे कॅथिड्रल येते सेंट केव्हिन क्रॉस येथे केव्हिनचे दफन झाले आहे त्याच्या क्रॉसला पाठ लावून जो कोणी दोन हात जोडू शकतो त्याची इच्छा पूर्ण होते अशी समजूत आहे सेंट केव्हिन किचन, वगैरे दुसरे अवशेषही जवळपास आहेत अजूनही लोकांची श्रद्धा इतकी प्रबळ आहे की काही लोक आपले दफन येथे व्हावे अशी इच्छा व्यक्त करतात, आणि तशी दफने होतात हा सगळा अरण्यमय प्रदेश शांत नि रम्य असून कायम लक्षात राहील असाच आहे.

●

# १२. लिस्बन

दिनाक १८ सप्टेंबर ही लडनमधील शेवटची रात्र होती १९५३मध्ये लडन सोडताना मनाला वाईट वाटले होते १९७१मध्ये तितके वाटले नाही आज मन तटस्थ होते परतु इग्लिश इतिहास, लोकशाही, उदारमतवादी समाज, इग्रजी साहित्य, चर्चिल, शॉ, परिचित मडळी, पूर्वी येथे झालेले प्रदीर्घ वास्तव्य यामुळे गाव सोडताना मन तटस्थ असूनही थोडी उद्विग्नतेची छटा त्याच्यावर आलीच

हिथ्रो विमानतळावर बाय एम् सी ए मध्ये काम करणाऱ्या मार्टिनच्या टॅक्सीने जायचे होते माझे मित्र नि 'महाराष्ट्र टाइम्स'चे सपादक श्री गोविंदराव तळवलकर यांच्या दोघी मुली निरुपमा नि सुषमा निरोप द्यायला उपस्थित होत्या त्याचा निरोप घेतल्यावर टॅक्सी निघाली. आज वाहतुकीत बराच अडथळा आला- दोन ठिकाणी खोळबा होत आहे असे पाहून मार्टिनने लहान गल्ल्यांतून मोटर बाहेर काढली भारतीय माणसाला इग्लडमध्ये आत येण्यासाठी बरेच अडथळे असले तरी बाहेर जाताना काहीच नसतात सामान चटकन पुढे गेले तसेच तपासणी लवकर आटोपली. येथे श्री आर्या येऊन भेटले नि पुढील प्रवासात काहीही अडचण आली तर बिनासकोच दूरध्वनी करा असे त्यांनी आम्हास सागितले

साडेदहा वाजता विमानात बसलो अर्ध्या तासाने विमान हलले थोडे धावले नि आकाशाकडे झेपावले काल रात्री पाऊस झाला होता थोडा उष्मा होता काही क्षणांनीच धुके आले नतर ढगाचे लोट येऊन खालची सृष्टी अतर्धान पावली माझ्या शेजारी दक्षिण ऱ्होडेशियातला एक तरुण इग्रज होता त्याचे वडिल ऱ्होडेशियात स्थाईक झाले होते सत्तांतरानतरही शक्यतो आम्ही तेथेच राहणार असे तो म्हणाला त्याच्याबरोबर त्याची पत्नी नि दोन मुले होती ते ब्रिटनमध्ये प्रवासाला आले होते ऱ्होडेशियातली परिस्थिती गभीर असून वश-सघर्षाची थोडी शक्यता आहे असे त्याचे मत होते भारतीय लोक त्या देशात आहेत पण बहुतेक डॉक्टर, इजिनिअर अशा क्षेत्रात काम करतात अशी त्याने माहिती दिली जग बदलले की माणसे बदलतात, त्यांचे स्वभाव बदलतात तीस वर्षांपूर्वी ऱ्होडेशियातला इग्रज इतक्या मोकळेपणाने बोलला असता की नाही याची मला शका आहे आज गप्पांत आम्ही एकमेकाना सिगारेटीही दिल्या उड्डाण जवळजवळ दोन तासांचे होते आणि ब्रिटिश एअरवेजचे विमान प्रशस्त नि छान होते त्यामुळे प्रवास सुखावह झाला विमान लिस्बनच्या जसे जवळ आले तसे ढग विरळ झाले थोड्या समयाने आकाश निरभ्र झाले आता डोंगराळ भाग दृष्टिपथात आला तसेच अटलाटिकचा निळा जलाशय, त्यातील अजस्त्र बोटी, जहाजे दिसू लागली सूर्यप्रकाश लख्ख होता विमानाने उची सोडण्यास सुरवात केली नि डोंगरावरची पांढऱ्या रगातली घरे दिसू लागली स्पेन

नि पोर्तुगाल एकाच सस्कृतीचे, सप्रदायाचे नि वशाचे आहेत जुन्या घरांच्या ठेवणीत दोन्ही देशात तसा फरक वाटत नाही पाहता पाहता विमान जमिनीवर धावू लागले नि थोड्या क्षणाने स्तब्ध झाले सामान येण्यास वेळ लागला. मग हॉटेलची चौकशी केली तिथे टॅक्सीनेच जावे लागणार होते येथे इतके डॉलर्स मोडले पाहिजे असा जाचक नियम नव्हता तात्पुरत्या खर्चासाठी थोडे चलन मोडून टॅक्सी घेण्यासाठी रांगेत उभे राहिलो येथला सर्वसामान्य मनुष्य इग्रजीच्या बाबतीत अज्ञानीच होता सुदैवाने आरक्षक उभा होता आमचा क्रमाक आल्यावर टॅक्सीत सामान ठेवले नि हॉटेल ब्रिटानियाकडे आलो. या हॉटेलसमोर पुस्तकाचे दुकान होते त्यात रमण महर्षी, योगशास्त्र, साईबाबा इत्यादी पुस्तके होती थोड्या अचब्याची गोष्टच होती !

'पोर्तुगेज-मराठे सबध' हे डॉ पिसुर्लेकराचे पुस्तक आहे त्या नावानेच या दोन समाजातले सबध घोषित होतात गोव्यामुळे मराठ्याचा पोर्तुगालशी शेकडो वर्षांचा सबध आला मराठ्याच्या इतिहासाबद्दलचे कागदपत्र लिस्बनमध्ये आहेत असे मी ऐकले होते असा प्रदीर्घ सबध आलेल्या देशाला आतापर्यंत आपण गेलो नाही याची मनाला हुरहुर होती तेव्हा हिंदुस्थानला परत येताना लिस्बनला उतरण्याचे ठरवून मी येथे आलो

लिस्बन–पोर्तुगीज नाव आहे लिस्बोआ–हे फार प्राचीन म्हणजे ५,००० वर्षांचे जुने शहर आहे सात टेकड्यांनी वेढलेले हे बदर पाहून फोनिशिअन लोक लुब्ध झाले नि त्यानी गावाला नाव दिले 'ॲलिस उबो'– मोहक छोटे बदर आणि खरोखरच ते आजही तसेच आहे फोनिशिअन लोकाची वसाहत असणाऱ्या जागीच 'कॅस्टेलो डे एस जॉर्ज' हा प्राचीन किल्ला आहे फोनिशिअन लोकानतर रोमन लोक आले रोमन लोकाच्या पश्चात अनेक टोळ्यानी या गावावर स्वाऱ्या केल्या सहाव्या शतकात व्हिसिगॉथ आले त्याच्यानतर स्पेनप्रमाणेच पोर्तुगाल मूर लोकाच्या, म्हणजे अरबांच्या, ताब्यात गेले मुरांच्या राजवटीत व्यापाराची वृद्धी होऊन गाव भरभराटीला आले मुराचे राज्य सुमारे तीनशे वर्षे टिकले त्यामुळे जुन्या वास्तू, किल्ले, इत्यादीवर मुरीश रचनेचा प्रभाव आढळतो

डि अलफान्सो हेन्रिक्स या पोर्तुगीज राजाने इग्लिश, जर्मन, फ्लेमिश क्रुसेडर याच्या सहाय्याने लिस्बनला सतरा आठवड्याच्या वेढ्यानतर जिंकले मुरांना लिस्बन नि त्याच्या भोवतालच्या प्रदेशांतून कायमचे हाकलून दिले याच राजाने से कॅथिड्रल बाधले येथे पूर्वी मशीद होती. या काळापासून पोर्तुगीज राष्ट्रीय जीवनाला सुरवात झाली असे म्हणावयास हरकत नाही सोळाव्या शतकापासून लिस्बनच्या नवीन उत्कर्षाला सुरवात झाली पोर्तुगीज जहाजे नि पोर्तुगीज नावाडी हे त्या काळात सर्वोत्तम समजले जात सागरी मार्ग शोधून काढण्यात पोर्तुगालने आघाडी मारल्याने जगातील सपत्तीचा ओघ स्वाभाविक लिस्बनकडे आला

पहिला मॅन्युएल हा या काळातला राजा तो सर्वांत अधिक श्रीमत समजला जात असे पोर्तुगालमधल्या गोथिक वास्तुशिल्पावर त्याने स्वत ची एवढी छाप टाकली की, या नवीन रचनेला मॅन्युएलिन हे नाव पडले त्याच शतकात लिस्बनला दोन मोठ्या भूकपानी प्रचड हादरा दिला त्यानतरची इन्क्विझिशनची छाया गावावर पडली मग प्लेगचा फटका बसला पुढे १५८१मध्ये स्पेनच्या दुसऱ्या फिलिपने लिस्बन जिंकून स्वत च्या राज्याला जोडले. नतर साठ वर्षांनी जाओ ब्रॅगाझा याने स्पेनविरुद्ध स्वातत्र्ययुद्ध लढून १६४०मध्ये पोर्तुगाल स्वतत्र केला या ब्रॅगांझा राजवशाची कारकीर्द १९१०पर्यंत चालली

लिस्बनला सर्वांत मोठा भूकपाचा धक्का १७५५मध्ये बसला त्यामुळे तीन चतुर्थांश शहर उद्ध्वस्त झाले. राजाने पतप्रधान पोबाल याच्याकडे लिस्बनची पुनर्बांधणी करण्याचे सपूर्ण काम सोपले पोबालने ' मेलेल्याचे दफन करा नि जिवत असणाऱ्याची काळजी घ्या ' हे सूत्र सागून नवीन लिस्बनच्या उभारणीला सुरवात केली आज दिसणारे भव्य विशाल पथ, प्राका द कर्मांशियो, वगैरे पोबालची निर्मिती आहे

गावाच्या मध्यभागीच मार्क्विस ऑफ पोंबालचे स्मारक आहे तिथूनच खाली नदीकडे जाणारा सरळ असा विशाल राजपथ आहे त्याच्या दोन्ही बाजूना पादचारी पथ असून त्यावर वृक्षाची रांग आहे त्याच्या पलीकडे पुन्हा पादचारी पथ असून त्यावर दुकाने आणि रेस्टारट आहेत हा सगळा विभाग खरोखर आकर्षक आहे या रस्त्याने चालत गेले की, एक मोठा चौक येतो त्यात विशाल स्मारक आहे नि त्याच्या पलीकडे एक छोटा रस्ता आहे या रस्त्यावरच आपल्याला आयफेल टॉवर सारखा मनोरा दिसतो त्यात लिफ्ट असून त्याने वर जाता येते लिस्बन टेकड्यावर वसलेले असल्याने लोक टॉवरचा उपयोग आपल्या घराकडे जाण्यासाठी वाहना-सारखा करतात १७५५च्या भूकपानतर लिस्बनची पुनर्रचना झाली असली तरी येथले कार्मेल चर्च अर्धवट स्थितीत स्मारक म्हणून राखलेले आहे

भोवतालच्या टेकड्यावरची चढती घरे, कॅस्टेलो डे एस जॉर्ज, से कॅथिड्रलचा मनोरा, खालचा बाईक्साचा मोठा व्यापारी विभाग, त्यातले लहान रस्ते, पलीकडे असणारी ब्रह्मपुत्रेसारखी टेगस नदी, त्यातल्या आगबोटी असा लिस्बनचा सुदर देखावा या टॉवरवरून दिसतो टॉवरमधून बाहेर पडले की, लगेच आपल्याला कार्मेल चर्चचे मोठे अवशेष दिसतात लिफ्टने टॉवरवरून खाली आल्यावर व्यापारी पेठेच्या छोट्या रस्त्यावर येतो या रस्त्याने पुढे गेले की, एक मोठी दगडी कमान येते त्यातून बाहेर पडले म्हणजे समोर विशाल चौक दिसतो. हाच तो प्राका द कर्मांशियो येथे पहिल्या जोसेचा अश्वारूढ पुतळा आहे

परत जाताना उजव्या हाताला से कॅथिड्रल दिसते आणि त्याच्या पलीकडे अल्फामाचा विभाग येतो हा भाग प्राचीन असून व्हिसिगोथ काळापासून येथे


वस्तीला सुरवात झाली घट्ट खडकांचा पाया असल्याने लिस्बनला उद्ध्वस्त करणाऱ्या धरणीकपाचा या भागाला धक्का बसला नाही अल्फामाचा भाग बाराव्या शतकात जसा होता तसाच आज आहे चिचोळे रस्ते त्याच्या पुराण-काळाचे पुरावे आहेत शहराची उभारणी आराखड्यानुसार झालेली नाही आणि इथली चित्रविचित्र वस्ती हे या भागाचे सौदर्य समजले जाते काही नागमोडी अरुद बोळ असे आहेत की, त्याच्या काही कोपऱ्यात सूर्यप्रकाशही पोहोचू शकत नाही, आणि दोन समोरासमोरील घरातले अतर इतके कमी आहे की, त्यातले लोक एकमेकाशी हस्तादोलन करू शकतात हा सगळा भाग चढ-उताराचा असल्याने काही ठिकाणी दोन बोळाना जोडणाऱ्या पायऱ्या आहेत या रस्त्यावरून हिंडताना आपण किती प्राचीन रस्त्यांवरून चालत आहोत या कल्पनेने मन थक्क होते

अल्फामा भागातून सेंट जॉर्ज कॅसलकडे जाता येते हा किल्ला रोमन लोकांनी बाधला पुढे मुरानी येथे लष्करी ठाणे करून राजवाडाही बाधला त्यांच्याकडून ११४७मध्ये अल्फाझो हेन्रिक्सने तो जिकला पोर्तुगीज राजवश येथील राजवाड्यात राहत असे पोर्तुगालमधला तो एक उत्तम किल्ला समजण्यात येतो, आजही येथे मोडलेल्या स्थितीतल्या जुन्या तोफा पडलेल्या होत्या गावाचे सुदर चित्र येथून दिसते

प्राका द कर्मशियोकडून नदीच्या काठाने टॉवर ऑफ बेल्हेमकडे आपण येतो या भागातच काही महत्त्वाची स्थाने आहेत त्यापैकी एक हे टॉवर १५१५ ते १५२१च्या काळात हे टॉवर बाधले गेले पूर्वकाळात येथूनच महत्त्वाच्या जलपर्यं-टनावर जहाजे गेली आहेत त्याचे स्वरूप किल्ल्यासारखे असून त्यात तोफा ठेवलेल्या आहेत नि त्याच्या माऱ्यातून कोणतेही जहाज सुटले नसते पूर्वीच्या काळात हे टॉवर नदीच्या पात्रात होते पण नदीने पात्र बदलल्याने ते काठाकडे आलेले दिसते या टॉवरच्या थोडे पूर्वेकडे 'मॉन्युमेंट टू द डिस्कव्हरीज' येते प्रिन्स हेन्री द नेव्हिगेटर याने सॅग्रेसला नाविक शाळा स्थापन केली होती त्याच्या नेतृत्वाखाली सागरी मार्ग शोधण्याच्या कामाचा मोठा टप्पा गाठला गेला होता त्या हेन्रीच्या पाचशेव्या पुण्यतिथीनिमित्त हे स्मारक उभे करण्यात आले त्याची रचना कॅरॅव्हेल जातीच्या जहाजाची असून त्या काळातील श्रेष्ठ पुरुषाच्या प्रतिमा त्यात दाखविल्या आहेत या स्मारकाच्या बरेच पूर्वेकडे टॅगस नदीवरचा सेतू येतो तो बाधण्याचे काम १९६२मध्ये सुरू होऊन पुढे चार वर्षांनी तो पुरा झाला त्याची लाबी ६९४ फूट असून तो युरोपमधला सर्वांत लांब असलेला टागता पूल समजला जातो. त्याला प्रारभी साल्झारचे नाव होते पण ते आता खोडून टाकण्यात आले आहे

बेलेमकडून गावाकडे परत जाताना एका राजपथावरच्या चौकात जेरोनिमॉस मॉनस्ट्री लागते मॅन्युएल राजाच्या कारकिर्दीत १५०२मध्ये या वास्तूच्या उभार-णीला सुरवात झाली आपल्या दर्यासारगाचे उत्तम स्मारक करण्याच्या उद्देशाने ती वास्तू बांधण्याचे राजाने ठरविले तिचा पहिला शिल्पकार फ्रेंच होता ती पूर्ण

होण्याला शभर वर्षांचा अवधी लागला पोर्तुगीज मॅन्युएल शिल्पाचा तो उत्तम नमुना समजला जातो आत शभर फूट उचीचे विशाल स्तंभ असून त्यावर चढत्या



' मॉन्युमेंट टू द डिस्कवरीज '

वेली काढलेल्या आहेत छताकडच्या विशाल खिडक्याचे स्टेनग्लासेस प्रेक्षणीय आहेत या मॉनस्ट्रीत मॅन्युएल, वास्को द गामा, नि पोर्तुगीज महाकवी कामोएस याचे दफन केलेले आहे नदीवरच्या त्या सेतूकडे जाणाऱ्या अव्हिनिडा दा पाँटे या मार्गाने गावाच्या मध्यवर्ती भागाकडे परत निघाले की, रस्त्यावर ॲक्वेडक्ट दिसतो तो १७३१ ते १७४८च्या काळात बाधण्यात आला त्याला ३५ कमानी असून त्यांतली सर्वांत उच ६५ मीटर उच आहे त्याची बाधणी दगडी असून तो अकरा मैल लांबीचा आहे अजूनही त्याचा जलवाहिनी म्हणून उपयोग होतो.

लिस्बनमध्ये तेरा म्युझिअम आहेत. त्यांतले नावीन्यपूर्ण असे तीन पाहिले. पहिला म्युझियम ‘कोचेस’चा होता. पंधरा ते वीस या शतकातल्या निरनिराळ्या प्रकारच्या बग्ग्या येथे ठेवलेल्या आहेत. त्यावरून बगीच्या बांधणीत कशा सुधारणा होत गेल्या याची कल्पना येते. दुसऱ्या फिलिपचा पंधराव्या शतकातला ‘कोच’ आहे. त्यात गाडीवानासाठी आसन नव्हते. तो बगीच्या एका घोड्यावर बसत असे पॅरिसमध्ये बांधलेला सतराव्या लुईचा ‘कोच’ सुंदर आहे काही ‘कोच’ भेट म्हणून आलेले आहेत राजांच्या प्रवासासाठी बांधलेला अठराव्या शतकातला कोच सर्वांत उत्तम आहे. एक ‘कोच’ असा होता की, त्यात जेवणाचे मेजही होते ‘कोच’शिवाय काही छोटी वाहने होती त्यात रथ होते तसेच हात-रिक्शाही होती १९३५ मध्ये लंडनमध्ये बांधलेला नि भेट म्हणून आलेला ‘कोच’ही येथे आहे. १९७७ मध्ये एलिझबेथ राणी येथे आली असताना त्याचा वाहन म्हणून उपयोग करण्यात आला.

दुसरा म्युझियम पाहिला तो ‘मॅरिटाइम’ किंवा ‘नेव्हल म्युझियम’ [illegible]’ या माझ्या पुस्तकातील ‘अमेरिकेचा शोध’ या प्रकरणात पोर्तुगीजांनी नवीन भूमीचा शोध कसा लावला याची माहिती तसेच हेन्री द नेव्हिगेटर याचे अल्प चरित्र आहे साहजिकच या म्युझियमविषयी मला जिज्ञासा होती. इमारतीच्या आत शिरले की, प्रथम दिसतो तो हेन्रीचा मोठा पुतळा मग येतात ते हेन्री, कॅब्रॉल, इत्यादींचे छोटे पुतळे समोरच्या भिंतीवर जगाचा मोठा नकाशा आहे त्यात स्पेन नि पोर्तुगाल याच्यात झालेली जगाची विभागणी दाखविलेली आहे पहिल्या दालनात गामाचा मोठा पुतळा आहे त्याशिवाय तोफा नि जहाजाच्या प्रतिकृती ठेवल्या आहेत मार्क्विस ड निसा नि नेल्सन याचा पत्रव्यवहार आहे सैनिकाचे नि खलाशाचे पुतळे आहेत. दर्यासारंगाची चित्रे आहेत दुर्बिणी नि निरनिराळ्या प्रकारची होकायंत्रे येथे ठेवलेली आहेत

त्याच्या पलीकडच्या दालनात निरनिराळ्या दर्यासारंगाचे पुतळे, आगबोटी, क्रुझर्स, मोठी होकायंत्रे, अद्ययावत जहाजे यांच्या प्रतिकृती ठेवलेल्या आहेत येथेच जखमी नाविक अधिकाऱ्याचे तसेच ॲडमिरल कुन्हाचे १९६१मधले चित्र आहे. तिसऱ्या दालनात शिडाच्या जहाजांच्या प्रतिकृती ठेवलेल्या आहेत त्याशिवाय भिंतीवर उत्तमोत्तम मोठी रंगीत चित्रे लावलेली आहेत मॅरिना द पेस्काचे कोळ्याच्या जीवनावरचे चित्र हृद्य आहे दुसरे चित्र केवळ खलाशाचे आहे तिसऱ्या चित्रात किनाऱ्यावर चिंताग्रस्त चेहेऱ्याची बाई नि मुले दाखविलेली असून खवळलेल्या समुद्राकडे ती पाहात आहेत चौथ्यात कोळी नि त्याची जाळी दाखविलेली आहेत.

एका कोपऱ्यात ॲडमिरलचे केबिन ठेवलेले असून, त्यात खुर्च्या, टेबले, चांदीचे चमचे, काटे, पेले तसेच काचेच्या वस्तू, दिवा, सोफा, पुस्तके ठेवलेली आहेत. त्याशिवाय येथे लावलेली चित्रेही—सेतुबलमधले कोळी, तुफानात सापडलेल्या

जहाजाची शिडे ताणत असलेले खलाशी, बंदरातील जहाजे, पोर्तुगीज नाविक जहाज नि चाच्यांचे जहाज याच्यात झालेली १८२२मधली सागरी लढाई नि त्यात कप्तानाला झालेली जबर जखम, इत्यादी—लक्षणीय आहेत दोन हातांनी धरण्याच्या गामाच्या तलवारीची प्रतिकृती येथे आहे मूळ तलवार मिलिटरी म्युझियममध्ये आहे बाजूच्या दरवाज्याकडे अल्बुकर्क, डिॲगो काओ, हेन्री, जाओ यांचे पुतळे आहेत पहिल्या मजल्यावरच्या दालनात अंगोलातील मोहिमेची चित्रे आहेत त्यात सैनिक तळ, शिपायांची चढाई वगैरे दाखविले आहे त्याशिवाय डासांपासून पहारेकरी सैनिकाचे रक्षण करणारा तंबू, त्यांची शस्त्रे, तोफा, सैनिक पदके, इत्यादींच्या प्रतिकृती येथे ठेवलेल्या आहेत

मैदानाच्या बाजूकडे प्रदर्शनाचे एक दालन आहे त्यात मोटर टॉर्पेडो बोट, तोफा, बंदुका ठेवलेल्या आहेत एक लढाऊ विमानही येथे आहे तसेच १६८३मध्ये जाओ राजा वापरत असलेल्या जहाजाच्या भव्य प्रतिकृती ठेवलेल्या आहेत पौराणिक काळी ज्या छोटया लाकडी होडया वापरण्यात येत त्यापैकी सापडलेल्या एकदोन येथे मांडलेल्या आहेत

पोर्तुगालने सागरीमार्ग संशोधनाच्या कार्यात फार मोठी कामगिरी केली आहे जगाचा इतिहास बदलणाऱ्या ज्या काही घटना असतात त्यापैकी, कोलंबसाचा अमेरिकेचा शोध नि वॉस्को द गामाचा हिंदुस्थानकडे येणाऱ्या मार्गाचा शोध, या आहेत पण हेन्री द नॅव्हिगेटरने समुद्रपर्यटनाच्या कलेला शास्त्रीय पायावर उभी केली नसती तर कोलंबस नि गामा यांना आपले कार्य पुरे करता आले नसते. पोर्तुगालच्या या महान कार्याची कल्पना देणारा हा ' मॅरिटाइम म्युझियम ' प्रेक्षणीय असून लिस्बनला येणाऱ्या प्रत्येकाने तो अवश्य पाहावा

म्युझियममधून बाहेर पडून मोठया रस्त्यावर आले की, थोडया अंतरावर ट्रॅमचा अखेरचा थांबा आहे त्या ट्रॅमने एशंट आर्टच्या म्युझियमकडे येता येते हा सुमारे पंधरा मिनिटांचा प्रवास आहे म्युझिअमसमोर डॉकयॉर्ड आहे रस्ता ओलांडून पलीकडे आल्यावर एक उंच टेकडी येते तिच्यावर हा म्युझिअम आहे तो पूर्वी राजवाडा होता वर जाण्यासाठी दगडी पायऱ्यांचा जिना आहे आतल्या निरनिराळ्या दालनातून उत्तम चित्रे, तसेच शिल्पाच्या उत्तम वस्तू आहेत त्याचप्रमाणे काचेच्या नि मातीच्या वस्तूही प्रेक्षणीय आहेत पण लक्षात राहतो तो चर्चच्या धार्मिक व्यवहारासाठी लागणाऱ्या साहित्याचा संग्रह त्यापैकी बऱ्याचशा वस्तू सोन्याच्या नि चांदीच्या आहेत खाली तळघरासारख्या जागेत एक लहानसे चॅपेल आहे त्यातला बराचसा भाग सोनेरी वर्खाचा आहे

लिस्बन गाव नदीच्या दोन्ही बाजूंना वसलेले आहे गावाच्या व्यापारी विभागात येण्यासाठी आता नदीवर मोठा पूल असला तरी सर्वसामान्य लोक वाहन म्हणून फेरीचा उपयोग करतात एका वेळी फेरीतून सुमारे तीन-चारशे लोक नदी

ओलाडतात फेरीच्या प्रवासासाठी लोकाना महिन्याचा पासही मिळतो असे दिसले इतराना फेरीतच तिकीट विकत मिळते

नदी किंवा सरोवर यावरचा जलविहार ही नेहमीच उत्तम करमणूक असते तेव्हा दोन मैल लाबीचे पात्र असणाऱ्या या टेगस नदीवर जलविहार करण्याच्या उद्देशाने एका सायकाळी आम्ही फेरीत बसलो गर्दी खूप होती अजून सूर्यास्त झाला नव्हता सूर्यबिब क्षितिजापाशी समुद्राला टेकले होते समोरच्या काठावरचा डोंगर स्वच्छ दिसत होता दोन्ही बाजूना दूरवर नुसते पाणीच पाणी होते अटलांटिक दूर असला तरी नदीचे पात्रच समुद्रासारखे होते समोरच्या डोंगरावरची ख्राईस्टची मूर्ती अस्पष्ट दिसत होती दुसऱ्या महायुद्धात ओढले जाऊन त्याचे चटके पोर्तुगालला बसले नाहीत तर डोगरावर चर्च उभे करू असा लिस्बनच्या लोकानी नवस केला होता नवस फळला म्हणून ही मूर्ती उभी झाली

आता उजव्या हाताला नदीवरचा अजस्त्र सेतू दिसत होता त्याच्या खालून एक मोठी नौका जात होती फेरी जशी किनाऱ्याकडे येऊ लागली तसे ढग येऊन अधार झाला किनाऱ्याकडचा भाग आता दिव्यानी झगमगून उठला वाऱ्याला जोर होता त्यामुळे लाटा उसळून त्याचा आवाज होत होता घराकडे जाण्यासाठी माणसाला काय उत्कठा असते ! फेरीतल्या बऱ्याच लोकाच्या चेहऱ्यावर ती दिसत होती नदीचा काठ जसा जवळ आला तशी फेरीच्या दरवाज्याकडे गर्दी झाली आम्हाला उतरावयाचे नसल्याने आम्ही बाकावर बसून होतो आता लाईट हाऊसचे लाल हिरवे दिवे लुकलुकू लागले सेतूवरून जाणाऱ्या गाड्याचे दिवे लागल्याने त्यावर प्रकाशाची कमान दिसू लागली फेरी धक्क्याला लागताच माणसांचा लोंढा एकदम बाहेर पडला

परतीच्या प्रवासासाठी फेरीत दहा-वीस माणसेच चढली फेरीत दिवे लागले नदीच्या प्रवाहात नागरलेल्या जहाजावरचे दिवेही उजळले. आकाशातील तारे चमकू लागले फेरी निघाली वाऱ्याचा जोर वाढला, नि पाणी खूपच उसळू लागले डोगर जसे दूर जाऊ लागले तशी ख्राइस्टची अस्पष्ट मूर्ती काळ्या लाल ढगात अतर्धान पावली मग डोगरही दिसेनासा झाला दिवे छोटे झाले आता समोरच्या काठावरचे दिवे मोठे होऊ लागले हळूहळू फेरी काठाकडे आली समोरून दोन दुमजली बसगाड्या गेल्या आम्ही एका बाजूने उतरलो, नि दुसऱ्या बाजूने एक मानवी लोंढा फेरीत शिरला जीवनाचे रहाटगाडगे पुन्हा सुरू झाले

●

# १३. माद्रिद

लिस्बनहून आम्ही येणार होतो माद्रिदला सकाळी लवकरच टॅक्सीने आम्ही विमानतळावर आलो पचवीस मिनिटे लागली प्रथम आम्ही चुकीच्या जागी उभे राहिलो त्यामुळे पुन्हा नवीन रांगेत उभे राहावे लागले. पण लवकर आल्याचे फायदे असतात आम्हाला उशीर झाला नाहीच, शिवाय चलनबदलीही करून घेता आली सामान रवाना झाल्यावर तपासणी आटोपून लाउजमध्ये जाऊन बसलो पावणे नवाला विमानात बसण्याची सूचना मिळाली. विमान सुदर होते. प्रवाश्यांच्या माहितीसाठी, पोर्तुगीज एअरवेज कुठेकुठे जाते हे दाखविणारा नकाशा आसनापाशी होता लहान मुलानी सोडविण्याचे एक कोडे घरी नेण्यासाठी देण्यात आले शिवाय न्याहारीचे पदार्थ चविष्ट होते एकंदरीत विमानातील प्रवास आल्हाददायक होईल असेच वातावरण होते

अर्ध्या तासाने विमान उडाले सूर्याची प्रभा जोराने आत येत होती यावेळी थोडे उकडल्यासारखे झाले डाव्या हाताला समुद्र होता दूरवर टेगस नदी दिसली पण ढगामूळे ती दृष्टिआड गेली काही वेळाने ढग अदृश्य झाले आता विमान भूमीवरून जाऊ लागल्याने खाली शेते दिसू लागली त्याच्या आजूबाजूला कालव्याचे पाट होते भूमीचा रग पिवळसर वाटला हळूहळू डोंगराळ प्रदेश दिसू लागला त्यावर टेरेस शेती होती पुन्हा एकदा नदी दिसली परतु प्रदेश रुक्षच वाटला डोंगराळ प्रदेश, विशाल प्रस्तर, दगडधोंडे, विरळ झाडी, हिरवळीचा अभाव यांमुळे विमान स्पॅनिश भूमीवरून जात असावे असे मला वाटले १९५२मध्ये स्पेनमध्ये बसने मी प्रवास केला होता पण त्यावेळी या भागातून गेलो नव्हतो त्यामुळे हा प्रदेश अपरिचितच होता अधूनमधून नद्या लागत तेव्हा मात्र सृष्टी थोडी हिरवी दिसे माद्रिद जसे जवळ येऊ लागले तसा प्रदेश रुक्ष नि डोंगराळ झाला

माद्रिदला विमान उतरले तेव्हा अकरा वाजून गेले होते सामान मिळणे, पासपोर्टवर शिक्का बसणे ही कामे लवकरच आटोपली माद्रिदहून बार्सिलोनाला जाणार असल्याने त्यासाठी स्थानिक विमानतळावर जावे लागणार होते म्हणून विमानतळावर सामान ठेवण्याची कल्पना आम्ही सोडली मग टॅक्सी करून हॉटेलकडे येण्यास निघालो राजमार्ग मोठा होता गाव जसे जवळ येऊ लागले तसे नवनवीन बाधकाम चाललेले दिसले. गावात शिरल्यावर मोटरी, ट्रामगाड्या नि बसगाड्या याच्या गर्दीत आमची टॅक्सी सापडली, नि तिचा वेग कमी झाला त्यामुळे हॉटेलकडे पोहोचण्यास थोडा विलब झाला

हॉटेल लॅकॉरझॉन हे पेन्शोनेट होते, आणि जोसे अँटोनिओ पथावरच्या एका

मोठ्या इमारतीत सहाव्या-सातव्या मजल्यावर होते आमच्या खोलीतून बाहेर पाहिले की, रुक्ष प्रदेश, काही चर्च, दूरवरचा किल्ला नि भोवतालची जुनी वस्ती असे चित्र दिसावयाचे या पथावर उभे असताना मला वाटले की, मागच्या वेळेला आम्ही येथेच कुठे तरी वस्तीला होतो जोसे अँटोनिओ हे या पथाचे नवीन नाव आहे पूर्वीचे नाव होते 'ग्रान व्हाया' जोसे अँटोनिओ याने फॅलेंजिस्ट पक्षाची स्थापना केली होती त्याला कम्युनिस्टांनी गोळी घालून मारले होते. जोसे अँटोनिओ हे नवीन नाव फार लोकमान्य नाही


माद्रिद समुद्रसपाटीपासून २१०० फूट उच असून ते उचसखल असणाऱ्या मैदानात वसलेले आहे युरोपमधली ती सर्वांत उच राजधानी समजली जाते माद्रिद वेगाने बदलत आहे नि आजच्या काळात तसे बदलणे अपरिहार्य आहे परंतु माद्रिद निवासीयांच्या मनावर गावाची विलक्षण पकड आहे स्पॅनिश लोकांच्या स्थानिक निष्ठा प्रखर असतात लोकांच्या गावाविषयीच्या भक्तीसंबंधी मादाम द ऑलनोय हिने सतराव्या शतकात लिहिले होते की, भव्यतेचे नि सुखाचे माद्रिद हे त्यांच्या दृष्टीने केंद्र आहे आगगाडी, भव्यता, प्रतिष्ठा यांचा अभाव असणारे क्षुद्र, दरिद्री जीवन जगण्यास माद्रिदचे लोक तयार होतील फक्त ते जीवन माद्रिदमध्ये असले पाहिजे तेव्हा जिवतपणी नि मृत्यूनतर स्थानिक जीवनाचे ध्येय म्हणून पुढील म्हण सांगतात 'माद्रिदहून स्वर्गात जावयाचे आणि स्वर्गातल्या छोट्या खिडकीतून माद्रिदकडे पहावयाचे'

मांझानारेस नदीच्या काठाशी एका उंचवट्यावर माजरिट नावाचा मुरीश किल्ला होता १०८३मध्ये सहाव्या अल्फासोने तो मुरांकडून जिंकला पुढे १५६१मध्ये फिलिपने येथे राजधानी केली तेव्हापासून माद्रिद हे स्पेनची राजधानी झाले माद्रिद देशाच्या मध्यभागी आहे, आणि येथून चार दिशांना रस्ते नि रेल्वे जातात हे माद्रिदचे वैशिष्ट्य जुन्या माद्रिदमध्ये रस्ते छोटे, कोंदट नि उत्तम फरसबंद नाहीत परंतु नवीन भागातले रस्ते विशाल असून त्यात भव्य चौक नि वृक्षराजीचे पदपथ आहेत जोसे अँटोनिओ रस्त्यावरून खाली चालत गेलें की, बँका, चित्रपटगृहे, अद्ययावत हॉटेले लागतात हा सगळा नवीन बांधला गेलेला भाग आहे या रस्त्याच्या अंताला प्लाझा द एस्पाना हा विशाल चौक येतो त्यात एक उद्यान असून त्यात प्रसिद्ध स्पॅनिश लेखक सर्व्हांटेझचे स्मारक आहे त्याच्या पुतळ्यासमोर त्याचे मानसपुत्र डॉन क्विक्झोट नि सँकोपाझा यांचेही अश्वारूढ पुतळे आहेत

पुएर्तो डेल सोल–'गेट ऑफ द सन'–हा माद्रिदमधला मुख्य चौक त्यातून दहा रस्ते फुटतात. यातला महत्त्वाचा रस्ता म्हणजे काले द अल्काला. पूर्वी माद्रिद भोवती असलेल्या कोटाला सोळा दरवाजे होते. त्यापैकी तीन अजून आहेत त्यातला अल्काला हा सर्वांत महत्त्वाचा त्याच्या रस्त्यावरच भव्य इमारती, पोस्ट ऑफिस, बँका, कम्युनिकेशन सेंटर येते यादवी युद्धात या सेंटरची बरीच हानी

झाली पण नंतरच्या काळात ते पूर्वी होते तसेच बांधण्यात आले अल्कालाच्या अलीकडेच उजव्या भागाला ' गार्डन ऑफ इंडिपेन्डन्स ' येते आणि त्याचाच बाजूने

राष्ट्रीय ग्रंथ संग्रहालय



सर्व्हांटेझचे स्मारक

पास्को डेल प्रादो हा रस्ता जातो या रस्त्यावरच प्रादो हा जगप्रसिद्ध म्युझियम आहे

पुएर्तो डेल सोलकडून पश्चिमेकडे जाणारा रस्ता कॅले मेअर या रस्त्याकडे जातो हा माद्रिदचा जुना भाग येथेच प्लाझा मेअर चौक आहे कॅले मेअर या रस्त्यावर स्मारके आहेत त्यावरील भाषा स्पॅनिश असल्याने ती स्मारके कोणाची आहेत याचा बोध होत नाही मुख्य पोलीस ठाणे, लष्करी ठाणे याची कार्यालये

याच रस्त्यावर दिसली इन्स्टिटयूट ऑफ कल्चरच्या दर्शनीय भिंतीवर चित्रे होती येथून पुढे गेले की, उजव्या हाताला एक चर्च येते यादवी युद्धाचा तडाखा त्याला बसलेला दिसला पण त्याची दुरुस्ती झाली नव्हती नदीवरच्या पुलावर उभे राहिले की, समोर जुनी वस्ती दिसते त्यांच्या छपरावरून ती घरे किती जुनी असावीत नि त्याना तोफमाऱ्याची झळ कशी लागली असावी हे अजूनही दिसते पण दूरवर दृष्टी टाकली की, उत्तुग इमारतीचे नवीन माद्रिद कसे उभे राहात आहे तेही दिसते

प्लाझा मेअरच्या थोडे पुढे जाऊन डाव्या बाजूला खाली उतरणीच्या बाजूला गेले की, आपल्याला जुनी घरे आढळतात हा पुराणा विभाग येथेच मुरिश क्वॉर्टर्स आहेत येथील घराच्या रचना तसेच खिडक्यांना असणाऱ्या लोखडी जाळ्या वगैरे मध्ययुगीन काळाचे स्मरण देतात मात्र प्लाझा मेअर हा आधुनिक व्यापारी विभाग झाला आहे त्याच्या विशाल चौकात उत्तम कपडयातल्या तरुण-तरुणींचे गट गप्पा मारीत उभे असलेले दिसतात जुनी स्पॅनिश सामाजिक रचना मोडत असल्याचा तो पुरावा आहे

प्रादो हे जागतिक कीर्तीचे माद्रिदमधले चित्रसग्रहालय आहे ही वास्तू १८१९मध्ये उघडण्यात आली पण त्यात असणाऱ्या चित्राचा सग्रह करण्याचे काम तत्पूर्वी चारशे वर्षे सुरू झाले होते स्पॅनिश राजे कलेचे भोक्ते होते प्रत्येक राजाने स्वत च्या समकालीन कलाकाराना राजाश्रय दिला होता तसेच आधीच्या श्रेष्ठ कलाकाराची चित्रे जमा केली होती फर्डिनड नि आयझाबेल या राजदपतीने चित्राचा सग्रह करण्याची सुरवात केली पुढील काळातल्या राजानी इटालिअन, फ्रेंच, डच, जर्मन कलाकारांची चित्रे मिळविली नि काही चित्रकाराना त्यानी आश्रयही दिला

सग्रहालय गर्द झाडीच्या विशाल उद्यानात आहे ते तीन मजली असून त्यात ९७ खोल्या आहेत चित्रकलेच्या सबधात व्हेलासक्विझ हा राजाचा सल्लागार होता आणि त्याने राजासाठी अनेक चित्रे विकत घेतली आजही प्रादोचे सचालक स्वत कलाकार असतात चित्रांची एकदर सख्या तीन हजार असून बरीचशी पधरा ते एकोणीस शतकातली आहेत पण व्हेलासक्विझ नि गोया याच्या चित्राना प्राधान्य दिलेले असल्याने या सग्रहालयाला स्पॅनिश चित्राचे आगार समजतात व्हेलास-क्विझची पन्नास चित्रे आहेत त्यातले 'लास मेनिनास' हे श्रेष्ठ समजले जाते चित्रावरून असे वाटते की, चित्रकार आरश्यात बघून चित्र काढत आहे या चित्राकडे आरश्यातून आपण पाहिले तर आपणही त्या खोलीत आहोत असे वाटेल असे गाईड म्हणाला म्हणून आम्ही बायकोच्या पर्समधल्या आरश्यातून तो अनुभव घेतला. आणि पुढे त्या चित्राची प्रतिकृतीही विकत घेतली या चित्रकाराची आणखी लक्षात राहणारी पुढील चित्रे आहेत ख्राइस्टचे चित्र, माद्रिदमधल्या आई-मुलाचे चित्र,

लोहाराच्या भट्टीचे चित्र, त्यातले तप्त लोखंड लाल दिसते प्रिन्स कार्लोचे चित्र मुद्दाम दाखविण्यात येते त्यातल्या घोड्याचे पोट विशेष मोठे आहे



'प्रादो 'मधील व्हेलासक्विझची कलाकृती

गोयासाठी एक दालन आहे इथे त्याची श्रेष्ठ चित्रे आहेतच, पण त्याने काढलेल्या उत्तम ड्रॉइंगचा मोठा संग्रहही आहे ख्राईस्ट ऑन द क्रॉस, मेरी लुई, नेकेड माजा, फॅमिली ऑफ चार्लस द फोर्थ, ब्लाइंड मॅन्ज ब्लफ ही लक्षात राहणारी चित्रे आहेत गोयाला युद्धाचा तिटकारा होता नेपोलिअनने स्पेन जिकल्यावर गोयाच्या जीवनातला 'ब्लॅक पिरियड' सुरू झाला, नि त्याने चित्रात काळा रंग वापरण्यास सुरवात केली या काळातली 'सॅटर्न ईटिंग इट्स् चिल्ड्रेन,' 'द एक्झिक्युशन ऑफ द डिफेंडर्स ऑफ माद्रिद' ही चित्रे विशेष दृष्टीत भरतात

मुरिलोची तीन चित्रे लक्षात राहातात स्त्री नि मुले, झोपलेली बाई नि स्वप्न, ' ला इमॅक्युलेट साउल्ट ' हे तिसरे चित्र फ्रँकोने १९४१मध्ये व्हेलासक्विझच्या चित्राच्या बदलीत पॅरिसहून परत आणले असे जेम्स मिचनेरनी आयबेरिया या आपल्या प्रवासग्रथात म्हटले आहे याशिवाय ग्रेको, रूबेन्स, रिवेरा, रॅफेल, इत्यादी श्रेष्ठ चित्रकाराच्या कलाकृती येथे आहेत माद्रिदच्या रस्त्यावरून 'हिंडण्यापेक्षा' हे ' फॉरेस्ट ऑफ मास्टरपिसेस ' पाहणे जास्त चागले हे मिचनेरचे मत प्रादोमधून हिंडल्यावर पटते

रॉयल पॅलेस हा नदीच्या काठाशी आहे पाचव्या फिलिपने १७३७मध्ये तो बाधण्यास सुरवात केली, नि पुढे सत्तावीस वर्षांनी तो पुरा झाला त्याची रचना टचुस्कन पद्धतीची असून त्याचा शिल्पकार टचुरिनचा साचेटी होता प्रासादाच्या आत गेल्यावर उजव्या हाताला शुभ्र प्रस्तराचा नक्षीदार जिना येतो वरच्या मजल्यावरचे निरनिराळे दिवाणखाने पाहण्यासाठी त्याने वर जावे लागते

प्रत्येक दिवाणखान्याचे काही तरी वैशिष्टच आहे बहुतेकातील छते नि ' टॅपेस्ट्री ' वाखाणण्यासारख्या होत्या एक छत गोयाची कलाकृती आहे पहिल्या दिवाणखान्यात एक टेबल आहे त्याच्यासाठी मौलिक दगड वापरण्यात आले असून ते उरल नि इटली यामधले आहेत एका झुबराचा आकार राजमुकुटासारखा होता एक हॉल घड्याळांसाठी राखलेला होता, नि त्यातली घड्याळे विविध प्रकारची नि प्राचीन होती एका दिवाणखान्याचे नाव पॉर्सिलिन हॉल असून त्यात अत्यत मुबक चिनी मातीच्या वस्तू होत्या भोजनगृह प्रेक्षणीय असून त्यात शभर लोकांच्या बसण्याची व्यवस्था होती एक हॉल टॅपेस्ट्रीसाठी होता, नि त्या सर्व बेल्जम नि हॉलडमधून आणलेल्या होत्या एक दिवाणखाना आरश्यांनी मढवलेला होता त्यात सर्वांचे प्रतिबिंब दिसे थ्रोन रूम भव्य असून तिचा वापर राजदूतांची पहिली भेट घेण्यासाठी केला जातो एकदरीत राजवाड्याचा लौकिक योग्य असून त्याच्या भोवतालचे उद्यान त्याला शोभेसे आहे

टॉलेडो शहर हे स्पॅनिश सस्कृतीचे प्रातिनिधिक समजले जाते म्हणून त्या सपूर्ण गावाला राष्ट्रीय स्मारकाचे स्थान देण्यात आले आहे टॉलेडो अती प्राचीन असून माद्रिदपासून पचेचाळीस मैलावर आहे नि त्याच्या भोवतालहून टेगस नदी वाहाते व्हिसिगोथ लोकांनी त्याला आपली राजधानी केले होते नि पुढे मुराचे ते लष्करी ठाणे झाले त्यांनी बाधलेला किल्ला अजूनही आहे अल्फांसोने १०८५मध्ये हे शहर मुराकडून जिकले टॉलेडोच्या तलवारी जगप्रसिद्ध होत्या

सकाळी नऊ वाजता टॉलेडोकडे आमची बस निघाली प्रारभी टोलेजग इमारती, विशाल पथ अशा भागातून बस गेली नतर जुनी वस्ती आली रस्त्यावर रहदारी कमी होती थोड्या वेळाने दूरवर रुक्ष टेकड्या दिसू लागल्या भूमी पिवळसर असून शेतातून शेळ्या चरताना दिसल्या माद्रिदच्या आसमतात औद्योगि-

करण सुरू असल्याने रस्त्याच्या बाजूने अद्यतन वस्ती नि कारखाने लागत मात्र छोट्या नि जुन्या घरांची गावे अधिक लागली प्रदेशाचा रुक्षपणा हटविण्यासाठी नवीन झाडांची लागवड जोरात होत आहे वाटेत लाल विटांचे कारखाने लागले, नि त्यांचाच वापर केलेल्या नवीन घरांच्या सुबक वसाहती दिसल्या

काही शेतात ट्रॅक्टर दिसले दूरवरच्या डोंगरामध्ये जुन्या वस्तीची गावे होती घरांचा पांढरा रंग लाबून दिसे आता शेतातून गाईबैलांची खिल्लारे आढळली उजव्या हाताला लोहमार्ग होता त्यावरून एक आगगाडी गेली तिचाच काय तो मोठा आवाज झाला थोड्या वेळाने लांबवर पहाडात एक गाव दिसू लागले, नि त्यातला एल कझार–मुरिश राजांचा भव्य किल्ला--नजरेत आला टॉलेडो जवळ आले होते गावाभोवती तट असून आत शिरण्याचा रस्ता चढाचा आहे प्रारंभी मुरिश काळातला मोठा दरवाजा येतो त्यानंतर न्यू मिलिटरी ॲकेडमीचे कार्यालय दिसते येथूनच आपण गावातल्या मोठ्या चौकात जातो

टॉलेडोचे कॅथिड्रल हे स्पॅनिश गोथिक रचनेचा सर्वोत्तम नमुना समजला जातो त्याच्याकडे जाण्यासाठी आपल्याला छोट्या बोळातून जावे लागते एका बोळाला 'स्ट्रीट ऑफ् डेव्हिल' हे नाव आहे हे कॅथिड्रल पूर्वी मशीद होते टॉलेडो जिंकले तेव्हा अल्फांसोने वचन दिले की, मशीद जाग्यावर राहील पण त्याच्या अनुपस्थितीत ती पाडून त्यावर चर्च उभारण्यास सुरवात झाली आपला शब्द मोडण्यात आला आहे असे परत आल्यावर राजाला आढळले तेव्हा त्याने रागावून आर्चबिशपला जाळण्याची शिक्षा दिली पण मुरिश पंडित अबू वालिद याने राजाला शांत केले ही कथा मॉर्टननी 'ए स्ट्रेंजर इन स्पेन' या आपल्या ग्रंथात दिली आहे या अबू वालिदचा छोटा पुतळा येथे आहे

कॅथिड्रल एकंदर भव्य आहे त्याचा वास्तुशिल्पी पेड्रो पेरेझ हा ज्यू होता त्याच्या उभारणीला १२२५मध्ये सुरवात होऊन १४९३मध्ये ते पूर्ण झाले त्याच्या स्टेन ग्लासेस मनोज्ञ असून त्या फ्लेमिश रचनेच्या आहेत त्याच्या एका भागात चित्रांचा उत्तम संग्रह आहे रॅफेलचे 'ला व्हर्जिन डेल व्हेलो,' गोयाचे 'एल प्रेंडिमी एन्टो डेस जिझस,' नि ग्रेकोचे टिअर्स ऑफ पीटर नि 'ख्राइस्ट डाइड फॉर ऑल' ही चित्रे विशेष लक्षात राहतात ट्रेझरी विभागात अनेक सोन्याचांदीच्या वस्तू आहेत त्यात मुसोलिनीने भेट दिलेली चांदीची वस्तू आहे पुस्तके नि हस्त-लिखिते यांचा विभागही चांगला आहे तेराव्या शतकातले एक बायबल आहे त्यातील चित्रे सोन्याच्या वर्खाची आहेत

सेंट टोम हे छोटे चर्च आहे येथे पूर्वी मशीद होती बेरिअल ऑफ काउंट ऑर्गाझ' हे ग्रेकोचे सर्वश्रेष्ठ चित्र येथे आहे आणि ते पाहण्यासाठीच सर्वजण येथे येतात सांता मारियाला ब्लाका सिनेगॉगच्या निरनिराळ्या अवस्थांची कथा लक्षात राहणारी आहे तेराव्या नि चौदाव्या शतकात हा ज्यू लोकांचा सिनेगॉग होता

पधराव्या शतकात त्याचे चर्च झाले पुढे शभर वर्षांनी त्याचे रूपातर स्त्रियाच्या अनाथाश्रमात झाले नतर दोनशे वर्षांनी त्याला बरॅकचे रूप मिळाले आणि पुन्हा ते चर्च झाले इमारत जुन्या वस्तीत आहे नि बाहेर जुन्या वाड्याला असते तशी भित आहे आत छोटा बाग आहे पण त्यावर धुळीचे थोडे आवरण दिसले वाड्याचे छत फारच नक्षीदार असून त्यावर मुरिश प्रभाव जास्त दिसतो

टेगस नदीवरचा एलाकाट्रा पूल ओलाडून उच टेकाडावर आले की, टॉलेडो शहराचे सुदर चित्र डोळ्यात भरते १९५२मध्ये अशाच जागेवरून मी टॉलेडोचे चित्र कॅमेऱ्याने टिपले होते यथूनच थोड्या अतरावर एक छोटी इमारत आहे या इमारतीत सोळाव्या नि सतराव्या शतकात रुग्णालय होते आता तेथे लहान म्युझियम आहे त्यातील चित्रे एका श्रीमत कुटुबाने जमा केली होती एके काळी तो खाजगी होता त्यात ग्रेकोचे होली फॅमिली हे उत्तम चित्र आहे शिवाय रिबेरा, मोरो, टिटोरेटा, इत्यादी श्रेष्ठ कलाकारांच्या कृती आहेत येथे एक विलक्षण गमतीदार चित्र आहे ते नवरा-बायकोचे आहे बायकोला सदतिसाव्या वर्षी दाढी येऊ लागली चित्रात बाईला दाढी दाखविली आहे

माद्रिदहून आम्ही बार्सिलोनाला जाणार होतो हे गाव स्पेनमध्ये असल्याने तिकडे जाण्यासाठी आम्हाला स्थानिक विमानतळावर जावे लागले तिथे दहा वाजता टॅक्सीने आलो सामान रवाना झाल्यावर अकरा वाजता विमानात बसलो वीस मिनिटांनी ते उडाले सूर्यप्रकाश चागला असूनही थडी जाणवत होती खालचा प्रदेश डोंगराळ होता हिरवळ नि झाडी कमी होती नद्या नि ओढे लागत होते पण बरेचसे कोरडे होते किंवा त्यात पाणी कमी होते अजूनही जमीन पिवळसरच दिसली आता लहान लहान गावे दिसू लागली काही वेळ पाढऱ्या ढगांची गर्दी झाली पण ते पाठीमागे पडले आता प्रदेशाचे स्वरूप बदलले आणि भरपूर पाणी असणाऱ्या नद्या लागल्या थोड्या वेळाने समुद्र दिसला नद्यांचा प्रवाह तिकडेच जात होता आता डोंगराची माळ आली ती समुद्राला लागूनच होती डोंगरावर झाडी विपुल होती विमान समुद्राच्या किनाऱ्याने जाऊ लागले समुद्र शात होता नि त्याच्या पाण्याचा रग पाचूसारखा होता त्यात मोठी जहाजे होती आता अद्यतन घराच्या वस्त्या लागल्या रस्त्यावरून मोटरी जात होत्या गावाभोवती डोंगराची राग असून त्यावर गर्द वृक्षराजी होती सव्वा बाराच्या सुमारास विमान भूमीवर उतरले

अजून आम्ही स्पेनमध्येच असल्याने पासपोर्ट तपासणी, इत्यादी गोष्टीचे सव्यापसव्य नव्हते टॅक्सीने आम्ही 'हॉटेल रॉयल'कडे येण्यास निघालो आज बार्सिलोनात 'फिएस्टा डेला मेसेड' या धार्मिक उत्सवाप्रित्यर्थ सुट्टी होती, नि रस्त्यावर गर्दी होती गावात टॅक्सीचा वेग मदावला ड्रायव्हरला इग्रजी समजत नव्हते नि आम्हाला स्पॅनिश टॅक्सी बराच वेळ धावली तेव्हा अस्वस्थपणे रस्त्या-वरच्या हॉटेलाची नावे आम्ही पाहू लागलो शेवटी एका बोळात गाडी वळली, नि

एका मोठ्या चौकात थाबली हॉटेल छोटे असल्याने पत्ता लागेना. मग जवळपास चौकशी केली गमत म्हणजे आम्ही उभे होतो तेथेच ते निघाले

बार्सिलोना स्पेनमधले दुसऱ्या क्रमाकाचे शहर असून ते कॅटालान विभागात येते स्वतत्र कॅटालान राष्ट्रवादाचा या प्रदेशात प्रभाव आहे बार्सिलोना माद्रिदपेक्षा जुने आहे कार्थेजिअन जनरल हॅमिल्कर बार्का याने या शहराची स्थापना केली असून त्याचे नाव शहराला मिळाले पुढे त्यावर रोमन लोकांचे वर्चस्व झाले त्यानतर व्हिसिगोथ आले ७१७मध्ये अरबानी ते शहर जिंकले सुमारे ८४ वर्षे इस्लामी राजवट तिथे चालली नतर पुन्हा ते ख्रिस्ती स्वामित्वाखाली आले पधराव्या शतकात नवीन उभ्या राहणाऱ्या स्पॅनिश शासनाचे ते भाग झाले

बार्सिलोना हे मोठे बदर तसेच व्यापारी नि औद्योगिक केंद्र आहे गावाचे दोन भाग पडतात जुन्या भागातली घरे प्राचीन रचनेची असून त्यातील रस्ते अरुद आहेत नि बोळ चिचोळे आहेत याच भागात कॅथिड्रल आहे त्याच्या बांधणीला तेराव्या शतकात सुरवात होऊन पुढे तीनशे वर्षांनी ते पुरे झाले त्याची रचना गोथिक असून आतून ते भव्य नि सुदर आहे १९५२मध्ये मी त्याला भेट दिली होती आज रात्री त्याच्यावर रोषणाई झाल्यावर भोवतालचा सगळा भाग उजळून निघाला. युरोपमध्ये ज्या गावात प्रथम छापखाना निघाला नि जिथे पहिले वृत्तपत्र छापले गेले त्यापैकी एक बार्सिलोना आहे ते पहिले वृत्तपत्र आजही छापले जाते

अमेरिकेचा शोध लावल्यावर ती वार्ता स्पॅनिश राजदपतीला कोलबसाने बार्सिलोनात प्रथम सांगितली या प्रसगाचे चटकदार वर्णन मॉर्टन यानी आपल्या ग्रथात केले आहे कोलबसाचे येथे स्मारक आहे आधुनिक श्रेष्ठ कलाकार असा पिकॅसोचा गौरव होतो पिकॅसो स्पॅनिश होता नि त्याचे कलाविषयक शिक्षण बार्सिलोनाच्या आर्ट ॲकेडमीत झाले होते १९७०मध्ये त्याने आपली शेकडो चित्रे बार्सिलोनाला भेट दिली ती येथल्या पिकॅसो म्युझियममध्ये आहेत पण हा म्युझियम रविवारी नि सुट्टीच्या दिवशी बद असतो

रॅब्लास या विशाल राजपथाबद्दल बार्सिलोनाची ख्याती आहे हा पथ खरोखरच नयनरम्य आहे त्याच्या दोन्ही बाजूना वृक्ष असून पदपथावर पुस्तके, वृत्तपत्रे नि फुले याच्या दुकानाच्या रांगा आहेत त्यावरून चालत गेले की, प्रथम प्लाझा कॅटालुना येतो त्यानतर दोन चौक ओलाडले की जोसे ॲटोनिओ हा पूर्व-पश्चिम असणारा मोठा रस्ता येतो त्यावर पर्यटन, एअर इडिया, बँका इत्यादीची कार्यालये आहेत तसेच ‘ प्लाझा डेला युनिव्हर्सिडाड नि ‘ बुल रिंग ’ आहेत या रस्त्याच्या उत्तरेला जनरॅलिसिमो फ्रँको हा अद्यतन वस्तीतला विशाल पथ येतो त्याच्या उत्तरेकडे दोन चौक सोडल्यावर होली फॅमिली हे चर्च येते ते आधुनिक रचनेचे असून, त्याचा शिल्पकार गौडी होता त्याच्या उभारणीला १८८०मध्ये सुरवात झाली पण ते अपूर्ण स्थितीत आहे त्याचे मनोरे दुरून दिसतात त्याला चेष्टेने

'गौडीज फॉली' म्हणतात अँटोनियो गौडी हा मोठा वास्तुशिल्पी समजला जातो त्याचा जन्म १८५२मध्ये झाला होता पुढे १९२६मध्ये तो अपघातात मरण पावला त्याच्या विचारांचा प्रभाव अमेरिकन वास्तुशिल्पीवर झाला आहे

पार्क गुएल हे गौडीने आखलेले पण अर्धवट स्थितीत बांधलेले उद्यान आहे ते होली फॅमिली या चर्चच्या वायव्येकडे येते आता त्याच्या भोवती अद्यतन घराच्या वस्त्या उभ्या आहेत उद्यानात मध्यभागी दगडी मंडप आहे त्याशिवाय गुफा, मिनार, दगडी पायऱ्या नि विविध रंगाच्या खडकांचे प्रदर्शन इत्यादी गोष्टी आहेत इथल्या फाटकाची गाईडने प्रशंसा केली मिचनेर यानीही आपल्या 'आयबेरिया' या ग्रंथात त्याची स्तुती केली आहे मला त्यात चित्तवेधक असे काही आढळले नाही

टिबिडॅबो हे बालोद्यान गुएलच्या उत्तरेला उंच डोंगराच्या पठारावर आहे फिरते चक्र, छोटी आगगाडी, हवेतले गोल फिरणारे विमान अशा लहान मुलांना करमणुकीच्या गोष्टी येथे आहेत शिखराकडे एक सुंदर चर्च आहे टिबिडॅबो याचा अर्थ काय? कॅटलन देशभक्तीचा पुरावा म्हणून मिचनेर यांनी पुढील माहिती दिली आहे लॅटिनमध्ये 'टिबी' म्हणजे 'तुला' नि 'डॅबो' म्हणजे 'मी देतो' इथे सैतानाने जिझसला भुरळ घालण्याचा प्रयत्न केला असे गाईडने सांगितल्यावर मिचनेर म्हणाले, 'बायबल म्हणते . . ' यावर गाईड मध्येच त्यांना थांबवून म्हणाला, 'पॅलेस्टाईनच्या रूक्ष टेकडीवर भुरळ कशी काय घालता येणार? ते सर्व इथेच घडले,' आणि मग त्याने भोवतालच्या रम्य देखाव्याकडे मिचनेरचे लक्ष वेधले इथे उभा असताना मला मात्र सॅन फ्रॅन्सिस्कोची आठवण झाली

●

# १४. रोम

बार्सिलोनाहून आम्ही रोमला येणार होतो सकाळी साडेसातला टॅक्सीने विमानतळाकडे आलो आरक्षकाची तपासणी वगैरे चटकन सपले कुठलाच त्रास झाला नाही विमानतळ मोठा होता आमच्या विमानाच्या पुढे दोन विमाने होती आमच्या उड्डाणाचा क्रमांक येईपर्यंत साडेनऊ वाजले विमान आकाशात गेले नि बार्सिलोनाभोवतालच्या डोंगरमाळेवरची छोटी-मोठी घरे पाहता पाहता अदृश्य झाली आता खाली शांत समुद्र होता पांढरे ढग होते त्यांच्या आकारावरून ते हिमाच्छादित पर्वत असावे असेच वाटले समुद्रात दोनचार मोठ्या आगबोटी दिसल्या मग ढग आले त्यांचे समुद्रावर आच्छादन निर्माण झाले नि खालचे काही दिसेनासे झाले काही समयानंतर ढग ओसरले यासमयी विरुद्ध दिशेने एक विमान गेले

आता खाली थोडी जमीन दिसली नंतर छोटी वस्ती लागली पण पुन्हा ढगाची विलक्षण गर्दी झाली विमानाभोवतीही ढग आल्याने काहीच दिसेनासे झाले फक्त विमानाचाच आवाज ऐकू येत होता असे काही क्षण गेले मग ढगाची गर्दी कमी होऊ लागली आणि ते विरले तेव्हा खाली शेते दिसू लागली नंतर गर्द झाडीचा डोंगराळ प्रदेश आला त्यात अधूनमधून घराचे पुंजके दिसत होते मग नागमोडी रस्ते दिसू लागले आता रोम जवळ आल्याची सूचना मिळाली थोड्याच क्षणात विमान रोमच्या तळावर उतरले

रोममधल्या वाय् एम् सी ए मध्ये खोली राखून ठेवण्यासाठी आम्ही पत्रे पाठविली होती पण ती मिळाली नसल्याचे आम्हाला चौकशीत समजले एक दिवसाच्या राहण्याची सोय तिथे होत होती पण आमचा तीन दिवसाचा मुक्काम असल्याने आम्ही हॉटेलात जावयाचे ठरविले, नि त्यातल्या त्यात स्वस्त असणाऱ्या हॉटेलात जागा मिळविली पण या सर्व कामासाठी दीडदोन तास लागले नंतर एअर टर्मिनलकडे येणाऱ्या बसची तिकिटे काढून रांग धरली बसमध्ये जागा मिळण्यास पंधरा मिनिटांचा अवधी लागला रोमला आजची माझी तिसरी खेप यापूर्वी १९५२ नि १९७१मध्ये आलो होतो तरीही रोमला येऊन गेल्याला आता आठ वर्षे झाली होती बस धावू लागल्यावर सभोवतालचे चित्र नवीन वाटले पण शहर जसे जवळ आले तसे परिचित स्थाने लक्षात आली अर्थात रस्ते नवीन झाले आहेत नि काही एकेरी वाहतुकीचे आहेत त्यामुळे मागच्याप्रमाणे गावातून बराच वेळ बस गेली नाही

एअर टर्मिनल आले सगळे सामान हॉटेलावर नेण्याऐवजी निदान एक मोठी बॅग येथेच ठेवावी असे ठरविले विमानतळापेक्षा येथे भाडे थोडे कमी होते बॅग

ठेवण्याची व्यवस्था झाल्यावर टॅक्सी करून आम्ही हॉटेलकडे येण्यास निघालो हॉटेल जवळच होते पण रस्ते एकेरी वाहतुकीचे असल्याने लांब चक्कर मारूनच तेथे येता येत होते हॉटेल म्हणजे पेन्शोनेट होते जुन्या प्रकारच्या मोठ्या भारदस्त वाड्यात चौथ्या मजल्यावर होते आत मध्यभागी चौक असून त्यात दोन माणसे राहतील असे छोटे लिफ्ट होते त्याशिवाय चार माणसे एका वेळी वर जाऊ शकतील इतका मोठा दगडी जिना होता प्रत्येक मजल्यावर लहान पेन्शोनेट होते रात्री बाहेर जाणाऱ्याना मुख्य वाड्याची नि मजल्याची अशा दोन किल्ल्या देण्यात येत खोल्या खूप मोठ्या होत्या पण त्यात आधुनिक सुविधा कमी होत्या संडास बाहेर असून स्नानासाठी द्रव्य द्यावे लागे

मी रोमला पूर्वी येऊन गेलेलो असल्याने ऐतिहासिक स्थाने पाहण्यासाठी नगर–सहल घेण्यात मौज नव्हती अशा सहलीमुळे थोड्या वेळात नि कमी त्रासात प्रवाश्याला बऱ्याच गोष्टी पाहता येतात पण गाव खरे पाहावयाचे असेल तर त्यातल्या लहान–मोठ्या रस्त्यावरून पायी हिंडण्यासारखा उत्तम मार्ग नसतो यावेळी आम्ही रोममध्ये पायीच हिंडलो उत्तम नकाशा जवळ असल्याने हिंडण्याचे काम सोपे झाले होते

ख्रिस्तपूर्व आठव्या शतकात टायबर नदीच्या काठावरच्या टेकड्यावर काही जमाती राहत होत्या कालौघात त्यांनी इटलीची भूमी पादाक्रांत केली. नंतर त्यांनी भूमध्य समुद्राभोवतालचा प्रदेश काबीज केला अखेरीस त्यांनी स्पेन, इंग्लंड, फ्रान्स, इत्यादी देशांवर स्वामित्व जमविले परंतु रोमन लोकांनी केवळ साम्राज्य निर्माण केले नाही त्यांनी आपल्या स्वामित्वाखालच्या प्रदेशावर रोमन संस्कृतीचा दीर्घकाळ राहील असा छाप उठवला कलात्मक सृजनता, वैज्ञानिक संशोधन, किंवा तात्त्विक विचार या गोष्टींचा रोमन लोकात अभाव असला तरी राजकीय नि प्रशासकीय कौशल्य त्यांच्यापाशी उत्तम होते रोमन साम्राज्याचे वैशिष्ट्य म्हणजे त्यात राष्ट्रीय किंवा वांशिक भेद पाळले जात नसत रोमन लोकांत चिवटपणा होता, त्यांना नागरिक जीवनाची जाणीव होती, नि मूलभूत उदारमतवादी विचारसरणी त्यांच्या स्वभावाचा भाग झालेली असल्याने त्यांच्या विशाल साम्राज्यात शांतता टिकली नि असंख्य जातिजमातींना सांस्कृतिक जीवनाचे नि भौतिक समृद्धीचे फायदे मिळाले रोमच्या रस्त्यावरून हिंडताना या इतिहासाची आपल्याला नकळत जाणीव झाली नाही तर आश्चर्य !

आमचे पेन्शोनेट ज्या रस्त्यावर होते त्या रस्त्याचे एक तोंड 'व्हाया नॅशोनाल' या प्रमुख पथावर होते या पथाच्या एका टोकाला प्लाझा रिपब्लिका होता त्यातून निरनिराळ्या ठिकाणी जाणाऱ्या सहलीच्या बसगाड्या सुटत या प्लाझाच्या आजू-बाजूला अजूनही रोमन अवशेष आढळतात पथाच्या दुसऱ्या टोकाला व्हिक्टर इम्यान्युएलचे स्मारक आहे या चौकाला प्लाझा व्हेनेझिया हे नाव असून त्याच्या

थोडे अलीकडे ट्रॉजन फोरम येतो हल्ली त्याची दुरुस्ती चालली होती इटलीचे एकीकरण व्हिक्टर इम्यान्युएलच्या राजवटीत साधले गेले त्या एकीकरणाचे स्मरण म्हणून हे स्मारक उभारण्यात आले १९११मध्ये त्याचे काम पुरे झाले त्यामध्येच 'टूम ऑफ् द अन्नोन सोल्जर' आहे

या स्मारकाच्या डाव्या हाताला थोड्या अंतरावर रोमन फोरम येतो फोरम-समोर 'व्हाया इंपेरिआली' हा विशाल रस्ता आहे त्यावरून शेकडो मोटरींची रहदारी चालू असते येथून जाणाऱ्या नागरिकाला या भव्य रोमन अवशेषाकडे पाहून काय वाटत असेल याचे मला नेहमीच कुतूहल वाटत आले आहे या रस्त्या-वरच्या एका जुन्या वास्तूच्या भिंतीवर नकाशा काढलेला आहे आणि त्यात रोमन राज्याचा विकास कसा झाला नि त्याचे शेवटी केवढे मोठे साम्राज्य झाले हे दाखविले आहे तेथून अनेक लोक जा-ये करीत होते पण थाबून त्या नकाशाकडे पाहत उभा राहणारा मी एकटाच होतो येथूनच दोनशे पावलांवर कलोशिअम आहे रोममधली एक महत्त्वाची नि फार प्राचीन वास्तू आहे त्याची उभारणी पहिल्या शतकात झाली नि तिचा उपयोग करमणुकीच्या जीवघेण्या खेळासाठी होत असे या भागात रोममधले महत्त्वाचे अवशेष इतक्या जवळजवळ विखुरलेले आहेत.

व्हिक्टर इम्यान्युएल स्मारकाच्या वायव्येकडे पँथिऑन येतो तिकडे जाण्या-साठी बरेच चालावे लागते पँथिऑनची उभारणी अँग्रिपाने खिस्तपूर्व २७मध्ये केली पण पुढे आग लागल्याने त्याचे बरेच नुकसान झाले पुढे हॅड्रिअनने तो दुरुस्त केला ६०६मध्ये त्याचे चर्चमध्ये रूपांतर झाले त्यात रॅफेलचे तसेच इटलीच्या काही राजांचे दफन झाले आहे त्याचा घुमट विशाल असून बाहेरचा दर्शनीय भागही भव्य आहे गमत म्हणजे आता त्याच्या भोवताली वस्ती असून त्याच्याकडे येणारे रस्ते हे जवळजवळ बोळच आहेत

रोममध्ये ज्याप्रमाणे चर्च, म्युझियम, राजवाडे बरेच आहेत तसेच कारंजीही आहेत त्यांची सख्या ३०० भरेल सर्वांत प्रसिद्ध कारंजे म्हणजे ट्रिव्ही फाउंटन पँथिऑनच्या पूर्वेला ते आहे प्रवाश्याने पाठ करून त्यात एक नाणे टाकले तर तो रोमला परत येतो अशी समजूत आहे मागच्या वेळेला मी नाणे टाकले होते आणि आता मी परत आलो होतो ! रोमन काळात येथे वहाणारे पाणी पुढे बंद झाले १४८५मध्ये पोप निकोलसने हे कारंजे चालू केले १७३२मध्ये निकोला साल्व्हीने काढलेला आराखडा मजूर झाल्यावर त्यानुसार हे कारंजे बांधण्यात आले याचे पाणी गंगेच्या पाण्यासारखे शुद्ध नि नितळ समजले जात असे पोपसाठी दर आठवड्याला पिंपातून येथील पाणी नेण्यात येत असे इतकेच काय, इंग्रज प्रवासी चहासाठी त्याचा विशेष वापर करीत पण १९६१मध्ये ते पाणी पिण्यास योग्य नाही असे जाहीर करण्यात आले

रोमला आलेला प्रवासी ज्याप्रमाणे ट्रिव्ही फाउंटनला जातो तसाच स्पॅनिश

स्टेप्सवरही चालून येतो खरे म्हणजे त्याना फ्रेंच स्टेप्स म्हणावयास पाहिजे कारण त्यांचा आराखडा फ्रेंचानी काढला नि त्या बाधण्याचा खर्चही त्यांनीच केला पण तिथे स्पॅनिश दूतावास असल्याने त्याना स्पॅनिश स्टेप्स नाव पडले या स्टेप्सवर होतकरू कलाकार नि हौशी तरुण प्रवासी याची गर्दी असते येथे जवळच किट्सचे स्मारक आहे स्टेप्सवरून खाली उतरले की, एक मोठा रस्ता येतो त्या रस्त्याने नदीकडे चालू लागले म्हणजे उजव्या हाताला ऑगस्टस् टूम येतो त्यावरून पुढे गेले की, थोडयाच अतरावर व्हाया कॉन्डोटी हा चौक येतो येथून चालत आम्ही टायबरवरच्या काव्हूर पुलाकडे आलो नि तो ओलाडून नदीच्या दक्षिणेच्या काठाकडे आलो नदीच्या काठाने विशाल वृक्षाची रांग आहे नि त्याच्या जोडीला जो पदपथ आहे तो रहदारीच्या रस्त्यापेक्षा मोठा आहे त्यावरून निवातपणे चालत जाता येते आज बराच वेळ चालल्याने या रस्त्यावर काही वेळ विश्राती घेतली

या पथावरच आपल्याला कॅस्टेल सांत अँजेलो हा भुईकोट किल्ला लागतो येथे नदीवर जो पूल आहे त्यावर बर्निनीने केलेले पुतळे ठेवलेले आहेत हॅड्रिअनने दफनभूमी म्हणून ही वास्तू बाधली, पण पुढे तिचे किल्ल्यात रूपांतर झाले आता तिथे एक छोटे सग्रहालय आहे हाच रस्ता येथून पुढे व्हॅटिकनच्या प्रवेशद्वाराकडे जातो या प्रशस्त चौकात उभे राहिले की, समोर सेंट पीटरचे कॅथिड्रल दिसते

सेंट पीटरचे दफन येथे झाल्याने तिथेच पहिले चर्च बाधण्यात आले ती वास्तू एक हजार वर्षे टिकली पुढे १५०६मध्ये पोप ज्युलिअसने ते पाडून नवीन चर्च बाधण्याचे ठरविले या कामासाठी त्याने डोनॅटो ब्रामाटे यांची नियुक्ती केली पण हाती काम घेण्यापूर्वीच पोप नि ब्रामाटे हे दोघेही स्वर्गवासी झाले मग ते काम दुसऱ्या वास्तुशिल्पीकडे देण्यात आले त्यात रॅफेलही होता मायकेल अँजेलोने ते काम बरेच तडीस नेले पण तरीही कॅथिड्रलला आजचे स्वरूप येण्यास बरीच दशके लागली, आणि त्यासाठी अनेक वास्तुशिल्पी खपले त्यापैकी एक बर्निनी त्याने ४४ वर्षे या कामासाठी दिली चौकाची मांडणी, त्यातले उभे स्तभ, चर्चच्या आतली माडणी नि काही पुतळे या स्तिमित करणाऱ्या गोष्टी ही त्याचीच निर्मिती

चर्चच्या आत शिरले की, उजव्या हाताला मायकेल अँजेलोचा पिएटा आहे १९७२मध्ये विध्वसक वृत्तीच्या एका व्यक्तीने त्यावर प्रहार करून त्याचे थोडे नुकसान केले त्यामुळे आता त्याच्या भोवती काचेचे आवरण असून प्रेक्षकाना दूर ठेवण्यासाठी कठडा केला आहे सेंट पीटरचे आजचे विस्मयकारक सौंदर्य हे एका शतकात निर्माण झाले नाही तसेच एखाद-दुसऱ्या पोपच्या कर्तृत्वाचे फळ नाही ही अफाट वास्तू श्रेष्ठ कलाकाराच्या स्फूर्तीचे, असख्य कारागिरांच्या हस्तकौशल्याचे नि असख्य धर्मनिष्ठ लोकाच्या श्रद्धेचे फळ आहे रोमला आले असता कोणती गोष्ट न पाहता जाऊ नये असे मला कोणी विचारले, तर मी सागेन, सेंट पीटर पाहिल्याशिवाय परत जाऊ नये निदान मी तरी जाणार नाही त्यामुळे चिकार

[illegible] आम्ही सेंट पीटरकडे आलोच सेंट पीटर मी तिसऱ्यांदा पाहत होतो पहिल्यांदा ही वास्तू पाहताना जो अचंबा वाटला तो आजही वाटला!

गेल्या वेळी इटलीतील मुक्कामात डॉक्टरला फ्लॉरेन्सला जाता आले नाही म्हणून यावेळी तिथे जाण्यासाठी आम्ही रोमला थांबलो रोमच्या वायव्येला १४५ मैलांवर असलेले फ्लॉरेन्स एके काळी इटलीची राजधानी होते त्याचे पूर्ववैभव हीच त्याची आजची संपत्ती आहे गावातल्या उत्तम इमारती या उत्तम वास्तुशिल्पाचे नमुने समजले जातात, गावातील कलात्मक वस्तू या श्रेष्ठ कलाकारांच्या निर्मिती आहेत. त्यातच या गावाचे शास्ते अफाट बुद्धिमत्तेचे निघाले त्यानीही आपले कर्तृत्व फ्लॉरेन्सचे वैभव वाढविण्यासाठी खर्च केले लिओनार्डो डा व्हिंसी, मायकेल अँजेलो, डांटे, मॅकिअॅव्हेली, गॅलिलिओ हे जगप्रसिद्ध पुरुष तसेच प्रसिद्ध व्यापारी नि राजकारणी मेडिसी कुटुंब याच गावातले

[illegible] सावकारी नि कापडाचा व्यापार हे येथील प्रमुख उद्योग होते गावाची राजकीय नि सामरिक शक्ती अल्प होती तरीही या गावाने युरोपीय जीवनावर जितका खोल नि प्रदीर्घ परिणाम केला तसा थोड्या गावांनी केला आहे फ्लॉरेन्सची भाषा हीच इटलीची राज्यभाषा झाली फ्लॉरिन हे गावाचे नाणे व्यापारी जगाचे 'स्टँडर्ड' नाणे झाले होते. फ्लॉरेंटाइन कलाकारानी यथार्थ दर्शनाचे–पर्स्पेक्टिव्हचे–नियम केले फ्लॉरेन्टाइन साहित्यिक, चित्रकार, वास्तुशिल्पी, कलाकार यानी 'रेनेसान्स'ला जन्म दिला. आणि फ्लॉरेन्सचा दर्यावर्दी अमेरिगो व्हेसपुची याचे दोन खंडाना नाव मिळाले

फ्लॉरेन्सच्या सहलीची तिकिटे आधीच काढली होती. वेळेवर खाली आलो पण बस दिसेना म्हणून प्लाझा रिपब्लिकामध्ये गेलो थोडी पळापळ करीत चार-पाच ठिकाणी चौकशी केली. पण कोठेच पत्ता लागना. शेवटी निराश झालो, नि फ्लॉरेन्सची सहल हुकली असे मनाशी म्हणत आदल्या दिवशी डॉ देशमुख जिथे उभे होते तिथे येऊन आम्ही उभे राहिलो. येथून दोन प्रवासी बसगाड्या गेल्या त्यानी आमची चौकशी केली दुसरीतला गाईड म्हणाला, 'येथेच थांबा. तुमची बस येईल' अखेरीस आमची बस आली गाईडने विचारले, 'तुम्ही हॉटेलपाशी का थांबला नाहीत ?' मी म्हणालो, 'पाच मिनिटे वाट पाहून मग बसच्या शोधाला निघालो. केलेल्या पळापळीने किती घामाघुम झालो आहोत ते तूच पहा

पावणे आठच्या सुमारास बस निघाली आता नवीन गाईड आली. तिने सगळ्यांची माहिती आपण आपण अमेरिकन आहोत, असे दोघांनी सांगितल्यावर मग इंग्रजीत का बोलता ? अशी तिने चेष्टेत पृच्छा केली थोड्याच वेळात रोम नि त्याची उपनगरे पाठीमागे पडली, आणि बस राजमार्गावर आली. अर्ध्या तासाने भोवताली डोंगर दिसू लागले. त्यावर दाट झाडी होती. सगळा प्रदेश वनराईने भरलेला होता. आता मोठ्या आकाराची शेते लागली त्यात कापणी

झालेली दिसली मग एक नदी लागली त्यानंतर डोंगरमाळ जवळ आली तिच्यात आगगाडीसाठी बोगदा होता बस मात्र डोंगराला वळसा घालून गेली आता सूर्य वर आला, तरी हवेत गारवा होता रस्त्याच्या बाजूला काही कारखाने लागले उसाची लागवडही बरीच दिसली काही डोंगरावर घरांच्या वस्त्या आढळल्या त्यांतली बरीच जुनी वाटली. तसेच काही मोडकळीस आलेली दिसली अर्थात आधुनिक धर्तीची घरे बांधली जात होती कारखान्यासाठी जमिनीचे मोठे पट्टे राखलेले आढळले तशा जाहिराती दिसल्या मात्र मार्गावर बराच वेळ मोटरी, बसगाड्या, ट्रक यांची रहदारी कमीच होती

आता निसर्गरम्य खोरे आले उंच डोंगर, त्यातून जाणारा लहानसा घाट, भोवतालची रमणीय हिरवीगर्द वृक्षराजी, समोरच्या डोंगरावर किल्ला नि त्याच्या पलीकडे चर्च—असे हे चित्र होते थोड्या वेळाने मोठी नदी लागली नंतर द्राक्षाचे विस्तृत मळे दिसले मग एक औद्योगिक गाव आले नऊच्या सुमारास एकदम वातावरण बदलले. थंडी पडली भोवताली खूप धुके आले ढगाचीही गर्दी झाली ढग अगदी खाली उतरले होते. त्यामुळे समोरचे डोंगर दिसेनासे झाले सुमारे पंधरा-वीस मिनिटे असा प्रवास झाला मग धुके कमी झाले सूर्यप्रकाश थोडा आला. पण हवा मात्र थंड राहिली दहाच्या सुमारास कॉफीपानासाठी एका गावात आम्ही थांबलो बसमधून बाहेर येण्यापूर्वी गाईड म्हणाली, 'वीस मिनिटांचा अवधी देते वीस म्हणजे वीस. जर्मन किंवा इंग्लिश टाईम इटालिअन नाही' बाहेर आल्यावर ती मला म्हणाली 'तुम्ही कोणती वेळ पाळणार?' 'कदाचित जर्मन वेळ जमणार नाही पण इटालिअन वेळ निश्चित पाळणार नाही,' असे मी म्हटल्यावर ती मोठ्याने हसली

बस थोडा वेळ पळाली नि प्रदेशाचे स्वरूप खूपच डोंगराळ झाले पुन्हा ढगाळले ढग काळे होते आता द्राक्षे, तंबाखू यांचे विस्तृत मळे लागले सन-फ्लॉवरची शेतेही खूप दिसली त्याच्या तेलाचा वापर इकडे अधिक आहे आता रस्ता डोंगरात शिरला दूरवरच्या डोंगरांवर छोटी छोटी गावे दिसू लागली मग काही वेळाने एका विशाल चर्चचा मोठा घुमट दिसला सभोवती डोंगरांची माळ होती मग नदीचा प्रवाह नजरेत आला थोड्या वेळाने तिच्या पात्रातले पांढरे प्रस्तर दिसले ती आर्नो नदी होती, नि तिच्या काठावरचे गाव फ्लॉरेन्स होते फ्लॉरेन्सची उपनगरे अद्ययावत दिसली पण गावात शिरल्यावर दोन-तीन मजली जुन्या रचनेची घरे, छोटे रस्ते नि बोळ दृष्टिपथात आले

फ्लॉरेन्समध्ये चाळीस म्युझियम आहेत, सत्तावन राजवाडे आहेत, नि अनेक चर्चे आहेत हे सगळे घाईने पाहण्याला आठवडाही पुरला नसता तेव्हा दिवस-भरात प्रातिनिधिक स्वरूपाचे तेवढेच पाहिले अॅकेडमी उफिट्झी नि पिटी हे सर्वांत महत्त्वाचे म्युझियम आहेत आम्ही प्रथम अॅकेडमीकडे आलो येथे उत्तम

टॅपेस्ट्री, पेंटिंग नि पुतळे आहेत पण नावाजलेला पुतळा म्हणजे मायकेल अँजेलोचा 'डेव्हिड' फ्लॉरेन्सच्या एका चौकात एक मोठा दगड पडलेला होता लिओनार्डो, इत्यादी कलाकार त्याचा काय उपयोग करावा याचा विचार करीत होते पण तेवढ्यात मायकेल अँजेलोने त्या दगडाचा कबजा घेऊन पुढे सहा महिन्याच्या अखेरीस गोलिआथवर गोफणीने दगड मारण्याच्या तयारीत असलेला डेव्हिड त्याने तयार केला नतर फ्लॉरेन्समधल्या कलाकार समितीने–त्यात लिओनार्डो, बोटेसेली, लिपी, वगैरे श्रेष्ठ कलाकार होते–या पुतळ्याचे कौतुक करून तिला पॅलॅझो व्हेशिओच्या गच्चीवर ठेवण्याचा निर्णय केला तो तिथे तीनशे वर्षे होता

ॲकेडमीपासून थोड्या अतरावर पिआझा ॲन्युझिआटा असून त्यात 'द हॉस्पिटल ऑफ द इनोसट' आहे युरोपातील सर्वात जुन्या रुग्णालयापैकी हे एक आहे त्याच्या दर्शनी भागावर बालकांच्या मूर्ती असून अँड्रिया डेला रोबा या कलाकाराने त्या तयार केल्या होत्या पहिली रेनेसान्स इमारत अशी तिची ख्याती आहे या चौकातून निघणारा रस्ता पिआझा डुओमोकडे येतो डुओमो म्हणजे कॅथिड्रल फ्लॉरेन्समधले हे सर्वात महत्त्वाचे कॅथिड्रल आहे इथेच सॅव्होनारोलाने धर्मप्रचार केला या कॅथिड्रलची दोन वैशिष्ट्ये आहेत एक, त्याचे कपॅनिली–घटामिनार त्याचा मूळ आराखडा जिओटोचा आहे, दुसरे त्याचा घुमट तो ब्रुनेलेस्चीने बाधला तो तीनशे फूट उच असून सेंट पीटरपेक्षा लहान आहे मात्र सेंट पीटरचा घुमट हा या घुमटाची नक्कल आहे.

डुओमोच्या पिछाडीकडून जाणारा रस्ता पिआझा जिओव्हानी या चौकाकडे येतो. त्यातून निघणाऱ्या एका रस्त्याने आपण पिआझा डेला सिनोरियाकडे येतो फ्लॉरेन्समधले बरेचसे राजकारण या चौकात घडले आहे तेराव्या शतकात बाधलेल्या किल्ल्याच्या नावावरूनच हा चौक प्रसिद्ध आहे येथेच महापौराचे कार्यालय आहे हा चौक विशाल असून त्यात पहिल्या कॅमिओचा अश्वारूढ पुतळा आहे नेपच्यून फाउटन नि मायकेल अँजेलोच्या डेव्हिडची प्रतिकृती येथे आहेत या चौकाच्या कोपऱ्यावरच पॅलेझो व्हेशिओ येतो हा राजवाडा कोमिओसाठी वास्तुशिल्पी व्हसारीने बाधण्यास सुरवात केली नि सोळाव्या शतकाच्या अखेरीस तो पुरा झाला त्याचे दुसरे टोक ऑर्नो नदीच्या काठाकडच्या लुनगार्नो रस्त्यापर्यंत जाते

या राजवाड्यातच उफिझी आर्ट गॅलरी आहे उफिझी म्हणजे कार्यालय मेडिसी शासनाची न्यायालयीन नि शासकीय कामे येथे चालत पुढे मेडिसी कुटुबातील राजांनी वरच्या मजल्यावर आपल्या जवळची मौल्यवान चित्रे ठेवावयास सुरवात केली मेडिसी वशातल्या सगळ्या लोकाना उत्तम चित्रे विकत घेण्याची हौस होती त्यामुळे चित्राचा विपुल सग्रह उभा झाला ती सर्व चित्रे येथे लावण्यात आली आहेत जेव्हा मेडिसी राजवशाच्या हातातून सत्ता गेली तेव्हा शेवटच्या वशजाने

नवीन शासकाकडून अभिवचन घेतले की, ही चित्रे फ्लॉरेन्समध्येच राहतील १५७४मध्ये ग्रँड ड्यूक फ्रॅंसेस्कोने वरच्या मजल्यावर मेडिसी कुटुंबाच्या मालकीच्या कलावस्तूंचे प्रदर्शन करण्याची व्यवस्था केली इथे तेराव्या ते अठराव्या शतकातील सर्वोत्तम चित्रांचा संग्रह आहे त्यात फ्लॉरेन्टाइन चित्रांना विशेष प्राधान्य आहे

या गॅलरीत प्रत्येक चित्रकारासाठी खोली आहे त्यातली पहिली फिलिपो लिपी याच्यासाठी आहे त्याचे 'सेंटली मॅडोना' हे चित्र उत्तम समजले जाते त्यानंतरचा क्रमांक आहे बोटिसेलीचा 'बर्थ ऑफ व्हिनस' नि 'प्रिमाव्हेरा' ही त्याची प्रसिद्ध चित्रे येथे आहेत मायकेल अँजेलोचे उत्तम चित्र म्हणजे 'होली फॅमिली' नि 'अडोनी फॅमिली' लिओनार्डोचे 'होली ख्राइस्ट' हे प्रसिद्ध चित्र येथेच आहे. याशिवाय रॅफेल, ब्रोंझिनो, ह्युगो ग्राएल, इत्यादी चित्रकारांची चित्रेही येथे लावलेली आहेत कॉरिडॉरमधल्या छतांवरची कलाकुसर विशेष लक्षात राहते येथल्या एका खिडकीतून पाँटे व्हेशिओ या प्राचीन सेतूचे उत्तम चित्र टिपता येते हा सेतू तेराव्या शतकात बांधण्यात आला त्याच्याशिवाय आणखी तीन चार पूल आहेत दुसऱ्या महायुद्धाच्या काळात जर्मनांनी हे पूल नि पाँटे व्हेशिओच्या दोन्ही बाजूला असणारी प्राचीन घरे यांना उद्ध्वस्त केले होते युद्ध संपल्यावर मिळालेल्या उद्ध्वस्त वस्तूंच्या सहाय्याने १६व्या शतकापासून जशी घरे होती तशीच ती पुन्हा बांधण्यात आली

सांता क्रोस चर्च हे इटलीचे वेस्टमिन्स्टर अॅबी म्हणून ओळखले जाते मायकेल अँजेलो, मॅकिॲव्हेली, गॅलिलिओ नि रोझिनी यांचे येथे दफन झाले आहे चर्चच्या एका दालनात सेंट ॲसिसीचे कपडे आहेत तेथे जवळच तीन फूट लांबीची हिम्सची पुस्तके काचेच्या कपाटात ठेवलेली आहेत. बाहेर एका जागी डांटेच्या सातशेव्या जन्मोत्सवाचे एक स्मारक आहे सांता क्रोस हे सर्वांत मोठे फ्रॅन्सिस्कन चर्च असून 'फ्रेस्कों'च्या कलेचे ते आगार समजले जाते उत्तम चित्रे, सुबक शिल्प यांनी हे चर्च नटलेले आहे. त्याच्या समोरच्या विशाल चौकात पाच-पाच मिनिटांनी एक लक्झरी कोच येत असे नि त्यातून बाहेर पडलेले प्रवासी लगबगीने या चर्चमध्ये शिरत यावरून चर्चची लोकप्रियता नि महत्त्व ध्यानात येते

फ्लॉरेन्समधले हस्तकारागीर पंधराव्या शतकात सोने, चांदी नि कातडे यांच्या ज्या वस्तू बनवीत त्या अजूनही तयार होतात. ही दुकाने चर्चच्या चौकाला लागून आहेत वस्तूंची किंमत नि डॉलर्सची टंचाई यांमुळे या वस्तू पाहणे एवढ्यावरच बरेचजण समाधान मानताना दिसत होते ! गावातून बाहेर पडेपर्यंत साडेपाच वाजून गेले वाटेतच भोजन केले रोममध्ये पोहोचेपर्यंत रात्रीचे दहा वाजून गेले होते

●

# १५. अॅथेन्स

मुंबईहून सोफियाला जाण्यासाठी निघाल्यावर अॅथेन्सला विमान-बदली केली होती. आता मुंबईला परत येण्यासाठीही आम्हाला अॅथेन्सला जावे लागणार होते. दिनांक २८ सप्टेंबर हा रोममधला आमचा शेवटचा दिवस होता. सकाळी न्याहारी-नंतर सामान आवरून मालकाला खोली रिकामी करून दिली. अजून थोडा वेळ मोकळा होता. तेव्हा बाजारात जाऊन मायकेल अँजेलोच्या पिएटाची एक छोटी प्रतिकृती विकत घेतली. मग हॉटेलवर परत येऊन सामान घेतले नि चालत एअर टर्मिनलकडे निघालो. थांबत थांबत शेवटी तिथे पोहोचलो. हा पायी प्रवास थकवणाराच झाला पण टॅक्सीचा खर्च वाचवावयाचा असल्याने सामानासह चालणे अपरिहार्य होते. क्लोकरूममधून बॅग घेतली. नंतर बसने विमानतळावर आलो. येथे खूप गर्दी होती.

आफ्रिका, अमेरिका, आशिया नि युरोप या खंडातल्या सर्व महत्त्वाच्या गावांना जाणारी विमाने एक तर येथून सुटत किंवा येथे थांबत होती. त्यामुळे विमानतळ गजबजलेला होता. आम्ही प्रथम सामान रवाना केले. साडेतीन वाजता आरक्षकांच्या तपासणी-चाकोरीतून गेलो. विमानाचे उड्डाण ४-३५ला होते. पण त्यात बसेपर्यंत ५-२० झाले. त्याच्या चाकांनी जमीन सोडायला आणखी पंचवीस मिनिटे लागली. विमान ७४७ या जातीचे होते. तेव्हा आतल्या सुखसोयींचे वर्णन काय करणार! शिवाय प्रवासी थोडे कमी होते. एकंदरीत सर्व सावकाशीनेच चालले होते. उड्डाण दोन तासांचे होते. तेव्हा वृत्तपत्रे नि मासिके वाचण्यास मुबलक वेळ मिळाला.

सिंदबादने अजस्त्र पक्ष्यांचे जे वर्णन केले आहे त्याची आठवण हे विमान पाहिल्यावर मला झाली. पाहता पाहता हा अजस्त्र पक्षी आकाशात उडू लागला. खाली शांत समुद्र होता. त्याचा नीलवर्ण सूर्यप्रकाशात खुलून दिसत होता. त्यात काही आगबोटी होत्या. काही वेळाने दोन मोठी बेटे आढळली. हळूहळू शुभ्र मेघांची गर्दी झाली. मग खालचा प्रदेश दृष्टिआड गेला. तरंगत जाणारे ढग वाफेसारखे दिसले. नंतर काही वेळाने विमानाच्या बाजूला पांढऱ्या ढगांची गर्दी झाली. त्यामुळे विमान थोडे हादरत होते. आजचा फराळ रुचकर होता. भोजनानंतर पावणेसातच्या सुमारास सूर्यास्त झाला. पंधरा मिनिटांनी खाली जमीन नि दिवे दिसले. मग वस्त्या दृष्टिपथात आल्या. आम्ही ग्रीसच्या भूमीवरून जात होतो. सव्वासातच्या सुमारास विमानाने तळाकडे झेप घेतली. दहा मिनिटांनी ते भूमीवर धावू लागले. अॅथेन्स आले होते. प्रवासाचा अखेरचा टप्पा आला होता.

अॅथेन्समध्ये राहण्याची सोय झेक एअरलाईन्सने केली होती. आमच्याकडे

तसे पत्र होते झेक एअरलाईन्सच्या रोममधल्या कार्यालयातून ही गोष्ट पुन्हा पक्की करून घेतली होती तेव्हा प्रवासाच्या शेवटच्या दिवशी तरी हॉटेल वगैरेची डोकेदुखी करावी लागणार नाही या समाधानाने आम्ही सामान उचलून बाहेर आलो प्रथम थोडे चलन बदलण्यासाठी एक्सचेंजच्या कार्यालयात आलो कार्यालय बंद झाले आहे असे तिथल्या माणसाने सांगितले मग हॉटेलच्या बुकिंगची नि तिथे कसे जाता येईल याची चौकशी करण्यासाठी माहितीकेंद्रावर आलो तिथल्या बाईने हॉटेलवर दूरध्वनी केला तिथला व्यवस्थापक म्हणाला, 'आमच्याकडे बुकिंग झालेले नाही ' म्हणजे पूर्वनियोजित व्यवस्था नि त्याची केलेली चौकशी हे सर्व फुकट गेले होते आता रात्री दहा वाजता कुठे जाणार ? तेव्हा त्याच हॉटेलात राहण्याची सोय आहे का नि असल्यास दर काय हे विचारले तिथे जागा असून दर माफक होते शिवाय ते जवळ होते मग तिथे जाण्यासाठी टॅक्सी घेण्यास गेलो पण हॉटेल जवळ असल्याने बराच वेळ कोणी टॅक्सीवाला येईना मग आम्ही रांगेत उभे राहिलो जी टॅक्सी मिळाली तिच्या ड्रायव्हरला पत्ता दाखविल्यावर तो गुरगुरू लागला आम्ही चूप बसलो थोड्याच वेळात हॉटेल आले सामानाच्या नावाखाली टॅक्सीवाल्याने आमच्याकडून अधिक पैसे घेतले सामान खोलीकडे रवाना झाल्यावर व्यवस्थापक म्हणाला, 'उद्या सकाळी आम्ही झेक एअरलाईन्सला दूरध्वनी करू त्यांनी जबाबदारी घेतली तर तुम्हास पैसे भरावे लागणार नाहीत ' मग खोलीत आलो सिगरेट पेटवली आणि गॅलरीत जाऊन उभा राहिलो दूरवर अॅक्रोपोलिस दिसत होता त्याच्यावरचे दिवे लुकलुकत होते किती तरी वेळ अॅक्रोपोलिसकडे मी पाहत होतो

ग्रीसची राजधानी असणारे हे गाव पाश्चिमात्य संस्कृतीचे उगमस्थान आहे युरोपमध्ये जेव्हा रानटी लोक हिंडत होते तेव्हा ग्रीक साहित्यिक, नाटक, तत्त्वज्ञान, काव्य, याच्या निर्मितीत गर्क होते ग्रीक कलाकार अत्यंत मनोज्ञ शिल्प नि चित्र निर्माण करीत होते, ग्रीक शास्त्रज्ञ विज्ञानाचा पाया रचीत होते, नि राजकीय तत्त्वज्ञ लोकशाहीच्या संस्थांच्या उभारणीत निमग्न होते हिरोडेटस, थुसिडिडेझ, होमर, एस्किलस, सोफक्लिझ, युरिपिडेझ, अॅरिस्टोफेनेझ, सॉक्रेटिस, प्लेटो, डिमॉस्थेनिस या नामावळीवरून युरोपीय संस्कृती ग्रीसची किती ऋणी आहे याची कल्पना येते

मध्यपूर्वेकडून युरोपकडे येताना अॅथेन्सला आलो की, पहिली युरोपीय नगरी पाहत आहोत असे वाटते आणि युरोपकडून मध्यपूर्वेकडे जाताना आपण पूर्वेकडील पहिली नगरी पाहत आहोत असे वाटते, असे गमतीने म्हटले जाते पण युरोपीय संस्कृतीला जन्म देणाऱ्या या नगरीचा राजकीय इतिहास विषाद निर्माण करणारा आहे अॅथेन्स अत्युच्च वैभव शिखरावर चढले ते पेरिक्लसच्या राजवटीत त्यानंतर त्याचा राजकीय ऱ्हास सुरू झाला पेरिक्लसच्या मृत्यूनंतर तीनशे वर्षांनी या नगराच्या मानेवर गुलामगिरीचे जे जोखड बसले ते पुढे २००० वर्षे राहिले

ॲथेन्सचे अखेरचे स्वामी तुर्क त्याच्या स्वामित्वाखालून ॲथेन्स मुक्त झाले १८३३-मध्ये यावेळी ॲथेन्स हे तुर्की मांडणीचे एक ओंगळ खेडेगाव होते त्यातली बरीचशी वस्ती ॲक्रोपोलिसच्या उत्तर नि पूर्व भागाच्या उताराकडे होती आणि तिच्यातली घरे ही खोपटीच होती

१८३३मध्ये स्वातन्त्र्ययुद्धाचा पहिला टप्पा यशस्वी झाल्यानतर ग्रीसच्या नवीन शासनाची राजधानी कोठे करावयाची या प्रश्नाचे उत्तर शोधायला फार वेळ लागला नाही काही गावे व्यापारी दृष्टीने समृद्ध होती पण एकाच्याही पाठीमागे ॲथेन्सला मागे टाकील अशी परपरा नव्हती किंवा त्याला युरोपीय इतिहासात लौकिक नव्हता शेवटी ॲथेन्स ते ॲथेन्स ! तेव्हा त्यालाच राजधानी करण्याचे निश्चित झाले स्वतत्र ग्रीसचा पहिला राजा म्हणून ओटो नावाच्या बव्हेरिअन राजपुत्राची निवड झाली त्याने आपल्याबरोबर जर्मन वास्तुशिल्पकार शौबर्ट याला आणले नवीन नगराची मांडणी नि उभारणी शौबर्ट याने केली

ॲथेन्स इतर युरोपीय शहरांप्रमाणे वेगाने बदलत आहे याची कल्पना आपल्याला कॉन्स्टिटच्युशनल स्क्वेअरमध्ये उभे राहिल्यावर येते. अद्ययावत हॉटेले, विमान कपन्याची कार्यालये, बँका नि टुरिस्ट बसगाड्या यांनी हा भाग गजबजलेला असतो या चौकाच्या पाठीमागे जुना राजवाडा आहे तिथेच आता लोकसभा भरते त्याच्याजवळच ' मॉन्युमेंट ऑफ द अन्नोन सोल्जर ' आहे येथे उभे असताना मला सोफियातल्या डिमिट्राव्ह मॉसलिअमचे स्मरण झाले

ॲथेन्समध्ये म्युझियम बरेच आहेत त्यातला नॅशनल आर्किऑलॉजिकल म्युझियम हा महत्त्वाचा कॉन्स्टिटच्युशनल स्क्वेअरकडून आपल्याला तिकडे जाता येते या रस्त्याचे नाव आहे एलेफथेरिऑस पूर्वीचे नाव होते व्हेनिझेलॉस आपल्या-कडेच रस्त्याची नावे बदलली जातात असे नाही ! या रस्त्यावरून जाताना ग्रीक ॲकेडमी नि युनिव्हर्सिटी ऑफ ॲथेन्स या वास्तू दिसतात त्याची उभारणी प्राचीन ग्रीक वास्तुशिल्पानुसार केलेली आहे

नॅशनल म्युझियमची वास्तू विशाल असून त्यातील वस्तूचा सग्रह मौल्यवान नि अति प्राचीन आहे त्याची स्थापना १८६६मध्ये झाली डोळ्यात भरणाऱ्या गोष्टी अनेक आहेत सर्वात महत्त्वाची म्हणजे मायसिनिअन सस्कृतीच्या वस्तू त्या ख्रिस्तपूर्व १५००मधल्या आहेत त्यापैकी सोन्याची नक्षी असलेले खजीर, चौदा किलो वजनाची सोन्याची गाय, इत्यादी प्रमुख आहेत या वस्तू शिलमान या जर्मन व्यापाऱ्याला सापडल्या त्या त्याने म्युझियमला देणगी म्हणून दिल्या मौल्यवान खडे नि रत्ने याचा सग्रह लक्षणीय आहे मृत व्यक्तीच्या स्मारक-शिलांवरची चित्रे चमत्कारिक वाटली मृत्यूसबधी माणसाच्या काय विचित्र भावना नि कल्पना असतात हे त्यावरून दिसते

निरनिराळ्या दालनात ज्या मूर्ती ठेवलेल्या आहेत त्याच्यावरून शिल्पकलेतील

उत्क्रांतीचे चित्र दिसते मूर्तीकलेवर इजिप्शिअन कलेचा परिणाम झालेला दिसतो किंबहुना ती कला ग्रीकांनी इजिप्शिअन लोकांकडूनच उचलली होती पहिल्या दालनात एक पाय पुढे ठेवून उभा असलेल्या माणसाचा प्रचंड मोठा दगडी पुतळा आहे पण त्याच्या डोक्याव्यतिरिक्त शरीराचा भाग हा अगदी गुळगुळीत आहे पुढील काळात पुतळ्यांच्या स्वरूपात बदल झालेला दिसतो आता माणसाच्या शरीरातील स्नायू दाखविण्यात येऊ लागले हिस्टोरिकस हा पुतळा प्रमाणबद्ध असून त्यात केस कापलेले दाखविले आहेत कुस्ती, भालाफेक हे छोटे पुतळे जिवंत वाटतात पॉसिडॉनचा प्राचीन पुतळा समुद्रात मिळाला

पॉलिक्लिटसचे शिल्पही येथे आहे. त्याने मूर्ती कशी घडवावी याची नियमावली तयार केली होती स्कॉपास हा शिल्पकार व्यक्तीच्या भावना चेहऱ्यावर दाखवू लागला एका शिलाचित्रात त्याने म्हातारा, त्याचा मुलगा, नि नातू रडताना दाखविले असून त्यांच्या शेजारी कुत्रा आहे हेलेनिस्टिक युगातील चित्रात वास्तवता फार आढळते भेदक डोळे असणारा तत्त्वज्ञानी, मुष्टियोद्धा, पारदर्शक कपड्यातील स्त्री, या मूर्ती लक्षात राहतात व्हिनस, क्युपिड, ॲफ्रोडाइट, पॅन, ॲपिथ्राईट या दगडी मूर्तीही सुंदर आहेत दोन हजार वर्षांपूर्वी कलेची श्रेणी इतकी उच्च होती हे पाहून मन थक्क होते

कॉन्स्टिटयूशन स्क्वेअरमधून ॲमॅलिआस रस्त्याने ॲक्रोपोलिसकडे येताना आर्च ऑफ हेड्रियन, टेंपल ऑफ झुस लागतात हा रस्ता मागे टाकून ॲरिओ-पायिटो या रस्त्याकडे आले की, ॲक्रोपोलिसकडे जाणारा रस्ता भेटतो. हा रस्ता विशाल असून त्यावर अनेक प्रवासी बसगाड्या सतत उभ्या असतात ॲक्रोपोलिस-वर जाण्यासाठी अशी गर्दी असते ! ॲक्रोपोलिस म्हणजे किल्ला पण पाचशे फूट उंचीच्या टेकडीवरील अथेन्सच्या ॲक्रोपोलिसला विशेष महत्त्व आहे ते तिथल्या पार्थिनॉनमुळे वास्तुशिल्पाचे ते रमणीय लेणे समजले जाते ॲथेना देवीचे ते मंदिर होते याच देवीवरून गावाला ॲथेन्स नाव मिळाले पार्थिनॉनची कल्पना मुंबईच्या टाउनहॉलच्या दर्शनी भागावरून येऊ शकते. तुर्की राजवटीत त्याची मशीद झाली होती एरिखथिअस मंदिराच्या बाहेर स्त्रियांचे पुतळे आहेत. त्यातला एक लॉर्ड एल्जिनने इंग्लंडला नेला आता बाकीचेही हलविण्यात आले असून त्यांच्या जागी प्रतिकृती ठेवण्यात येणार आहेत. मूळ पुतळे हलविण्याचे कारण ॲथेन्समध्ये प्रदूषणाचा ताप वाढला असून त्याचा या उघड्यावरच्या शिल्पावर वाईट परिणाम होत आहे

ॲक्रोपोलिसवरची ही माझी तिसरी खेप होती तरीही येथील प्राचीन काळातील दगडावर बसले असताना मन ऐतिहासिक कालातून एक फेरी मारून येते त्याचाही एक विलक्षण आनंद असतो आ थे बसलो असताना गाईडने वीस मिनिटे ग्रीक इतिहास, संस्कृती, सभ्यता, परंपरा याविषयी जे भाषण दिले ते

खरोखरच अविस्मरणीय होते आपण ग्रीक आहोत नि आपल्या देशाने जगाला लोकशाही, व्यक्तिस्वातंत्र्य, उत्तम शिल्प, कला, साहित्य, इत्यादींची देणगी दिली आहे याचा तिला विलक्षण अभिमान होता इतकी उत्तम नि निष्ठावान गाईड यापूर्वी मी पाहिली नव्हती. भाषणाच्या शेवटी ती म्हणाली, 'ग्रीसकडे कसे पाहावे याविषयी मी आपणाला एक दृष्टी दिलेली आहे. यावेळी किंवा पुन्हा ग्रीसला याल तेव्हा या दृष्टीने या देशाकडे बघा अशी माझी विनती आहे'

हॉटेलवर परतण्यापूर्वी झेक एअरलाईन्सच्या कार्यालयात गेलो हॉटेलमधून कोणी दूरध्वनी केला नव्हता तिथल्या बाईला पत्र दाखविल्यावर ती म्हणाली, 'काळजी करू नका आम्ही दूरध्वनी करतो. बील भरण्याची जबाबदारी आमची आहे' मग बस थांब्यावर आलो बऱ्याच वेळाने एक बस आली पण ती बंद पडली मग दुसरी आली त्यात दुप्पट माणसे चढली. पुढे अर्ध्या वाटेत ती बंद पडली. थोड्या वेळाने एक बस आली तिच्यात जागा मिळवून आम्ही हॉटेलवर आलो आत शिरतो तो नवीन व्यवस्थापक समोर आला तो म्हणाला, 'झेक एअरलाईन्स-मधून दूरध्वनी आला नाही तुम्ही पैसे भरा नि खोली रिकामी करा.' साहजिकच थोडी शब्दाशब्दी झाली नंतर झेक एअरलाईन्समध्ये आम्ही दूरध्वनी लावला पण शनिवार असल्याने तो आता कोणी घेईना एकदर हा सगळा व्यवहार मनःस्ताप देणारा ठरला आमच्याजवळ जेमतेम पुरतील एवढे पैसे होते तेव्हा बील भरले नि सामान खाली आणले नंतर जवळच्याच एका स्वस्त हॉटेलात शांत मनाने बीअर पीत मी बसलो बाकीच्यांनी फराळ केला

उन्ह थोडे कमी झाल्यावर टॅक्सीने विमानतळावर आलो अजून उड्डाणाला चार-पाच तासाचा अवधी होता दुपारच्या प्रसंगाने आम्ही सगळेच थोडे नाराज होतो आठच्या सुमारास सामान रवाना झाल्यावर डॉ देशमुख नि मी खाली थांबलो दोघी डॉक्टरणी वरच्या मजल्यावरील झेक एअरलाईन्सच्या कार्यालयात गेल्या ते उघडले होते तिथल्या अधिकारी बाईला झालेली घटना त्या दोघींनी कथन केली तिने खेद व्यक्त केला पण त्यामुळे झालेला मनःस्ताप दूर झाला नाही नि अखेरचा खर्च केलेला डॉलर परत मिळाला नाही! नशीब म्हणजे असे काही घडले तर हाताशी पैसे असावे असा विचार करून आम्ही तितके पैसे जवळ ठेवले होते थोडा दूरदर्शीपणा कामास आला

अखेरीस विमानात बसण्याची सूचना मिळाली विमान गच्च भरले होते मिळाले ते आसन घेतले. अकराच्या सुमारास विमानाच्या चाकांनी भूमी सोडली खाली अॅथेन्समध्ये रंगीबेरंगी दिव्यांची रोषणाई दिसली नंतर काही वेळाने दोनतीन बेटे दिसली ती मागे पडली आता सोबतीला फक्त अंधार नि खाली अथांग सागर होता भोजनोत्तर विमानातले दिवे मालविण्यात आले अडीच वाजता गडबड सुरू झाली. विमान उतरू लागले अबू डाबी आले होते यावेळी माझ्या घड्याळात अडीच झाले

होते नि अबू डाबीत साडेतीन इथे तासभर मुक्काम झाला चारच्या सुमारा विमानाने आकाशाकडे झेप घेतली अर्ध्या तासाने पूर्वेकडे आकाश लाल झाले नत आकाशाचा रक्तिमा जाऊन ते पिवळसर झाले मग प्रकाश दिसू लागला हळूच सू वर आला विमानात आता उकडू लागले खाली सिंधूसागर दिसत होता विमानातह गडबड सुरु झाली न्याहारीच्या गाड्या आल्या फराळाच्या ताटल्या देण्यात आल्य काही वेळाने त्या परत गेल्या

आता मुंबई जवळ आली होती हळूहळू विमान उंची सोडू लागले. मुंबईच औद्योगिक भाग दिसू लागला थोड्याच वेळात विमान भूमीवर धावू लागले आमची सफर संपली होती विमानातून बाहेर येत असताना माझ्या मनश्चक्षूसमोर, सोफियातील उंच इमारतीवरचा स्वच्छ प्रकाशातला लाल तारा आला

REFBK-0023202